सत्यमेव जयते

# चंद्रपूर महानगर पालिका
# लेखा परीक्षण अहवाल
# २०१३ - २०१४

उप संचालक, (मनपा लेप) विभाग -२, स्थानिक
निधी लेखापरिक्षा, औरंगाबाद लेखा कोष भवन,
[illegible] मजला, जिल्हाधिकारी कार्यालय जवळ

Scanned by CamScanner

# चंद्रपूर शहर महानगरपालिका,चंद्रपूर (लेखापरिक्षण विभाग)
## विभागनिहाय लेखा आक्षेप
## सन-२०१३-१४

| अ क्र. | विभागाचे नांव | परिच्छेद क्रमांक | एकुण परिच्छेद |
|---|---|---|---|
| १ | लेखा विभाग | १ ,२, ३, १७, ३०, ४०, ६३, ६६ | ८ |
| २ | लेखा परिक्षण विभाग | २३, ४५, ५५. | ३ |
| ३ | सा.आस्थापना विभाग | १२, १३, २९, ३१, ४२, ५८, ६४, ६५, | ८ |
| ४ | बांधकाम विभाग | ६, ७, ८, ९, १०, ११, २२, २४, २५, २६, २७, २८, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२, | १९ |
| ५ | नगर रचना विभाग | ४४, 5 | 2 |
| ६ | सफाई विभाग/स्वच्छता | ४, ३९,४१. | ३ |
| ७ | कर विभाग | १५, १८, १९, २०, २१, ३८, ५९, ६० | ८ |
| ८ | पाणी पुरवठा विभाग | १४, ३५, ६२ | ३ |
| ९ | लाईट/विदयुत विभाग | ४३. | १ |
| ११ | स्थानिक संस्था कर (LBT) | ५, ३६, ३७. | 2 |
| १२ | शिक्षण विभाग | ३४ ५३, ५४. अनुपालन प्राप्त ३५ | ३2 |
| १३ | कोर्ट विभाग | ३३. | १ |
| १४ | अग्निशमन/यांत्रिकी विभाग | ० | ० |
| १५ | आरोग्य विभाग | ५६. | १ |
| १६ | जन्म मृत्यू विभाग | ५७. | १ |
| १७ | भांडार विभाग | ३२. | १ |
| १८ | जनगणना विभाग | १६ | १ |
| १९ | निवडणुक विभाग | ० | ० |
| २० | ग्रंथलय विभाग | ० | ० |
| २१ | नगर रचना विभाग | ० | ० |
| २२ | सुवर्ण जयंती | ६१ | १ |
| एकुण परिच्छेद :-------- | | | ६६ |

Scanned by CamScanner

# चंद्रपुर महानगरपालिका

# लेखा परीक्षण अहवाल

# 2013-2014

उप संचालक,(मनपा लेप) विभाग - 3, स्थानिक निधी लेखापरिक्षा, औरंगाबाद

लेखा कोष भवन, तिसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालया जवळ

Scanned by CamScanner

# अस्वीकृती प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे चंद्रपुर महानगरपालिका यांनी 2013-2014 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

Scanned by CamScanner

**चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर या संस्थेचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल.**

**क्र. स्था-18/ब/लेखापरीक्षण अहवाल/2013-2014/** 23 दि 6.1.2017

**दिनांक :**

उप संचालक (म.न.पा.ले.प.)
स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद
उपविभाग क्र. 3 यांचे कार्यालय,
3 रा मजला,लेखा कोष भवन, पत्रजीलपुरा, औरंगाबाद.

प्रति,

मा. आयुक्त,
चंद्रपूर शहर महानगरपालिका,
चंद्रपूर.

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर या संस्थेचे सन 2013-2014 या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण श्री. अतुलकुमार भा. वासनिक, सहाय्यक संचालक (मनपालेप), स्थानिक निधी लेखापरिक्षा, औरंगाबाद, उपविभाग-3, मुख्यालय नागपूर यांच्या पथकाने दिनांक 08/02/2015 ते 09/09/2016 या कालावधीत पूर्ण केले. श्रीमती रेहाना अ. काझी, उपसंचालक(मनपालेप), स्थानिक निधी लेखापरिक्षा, औरंगाबाद, उपविभाग-3, यांनी प्रारुप अहवालाचे पुनर्विलोकन करुन दिनांक 29/11/2016 रोजी आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांचे समवेत प्रारुप लेखापरीक्षण अहवालावर चर्चा करुन अंतिमीकरण केले.

लेखापरीक्षण कालावधीमध्ये खालील पदाधिकारी व अधिकारी या संस्थेचे कामकाज पाहत होते.

**महापौर**

| | |
|---|---|
| सौ.संगीता न. अमृतकर | 01/04/2013 ते 30/04/2014 |
| सौ.राखी स.कंचर्लावार | 30/04/2014 ते 31/03/2014 |

**आयुक्त**

| | |
|---|---|
| श्री.प्रकाश बोखड | 01/04/2013 ते 20/10/2013 |
| श्री.चिंतामणी बहाडकर (प्रभारी) | 21/10/2013 ते 19/11/2013 |
| श्री.प्रकाश बोखड | 20/11/2014 ते 31/03/2014 |

Scanned by CamScanner

## प्रस्तावना

### चंद्रपूर महानगरपालिका चंद्रपूर लेखापरीक्षण अहवाल (2013-2014)

मनपा चंद्रपूर (' ड' वर्ग महानगरपालिका) चे 2013-2014 ( व 2014-2015) चे स्थानिक निधी लेखापरीक्षण दि.08.02.2016 ते दि.09.09.2016 या कालावधीत एकूण 750 श्रमदिवस खर्ची घालून उपसंचालक (मनपालेप) स्थानिक निधी लेखापरीक्षा औरंगाबाद उपविभाग-3, औरंगाबाद यांचे कार्यालयांतर्गत अ.आ.वासनिक, सहायक संचालक, मनपा लेप (नागपूर व चंद्रपूर मनपा), मुख्यालय-नागपूर यांच्या पथकाने केले असून सन 2013-14 च्या लेखापरीक्षण संदर्भात मार्च 2014 हा निवडक महिना व त्यासोबत इतर ही महिन्यातील उपलब्ध करण्यात आलेल्या अभिलेख्यांची तपासणी करून निदर्शनास आलेल्या अनियमितता, उणिवा व त्रुट्या आक्षेपांच्या स्वरुपात प्रारुप अहवालात मांडण्यात आल्या. मनपा चंद्रपूर कार्यालयात दि.29/11/2016 रोजी आयुक्त, मनपा, चंद्रपूर यांचेसोबत अहवालाचे वाचन करून चर्चा करून उपसंचालक मनपालेप औरंगाबाद उपविभाग-3 यांनी अहवालाचे अंतिमीकरण केले.

लेखापरीक्षण करताना आढळून आलेल्या अनियमितता, उणिवा व त्रुट्या संक्षिप्त स्वरुपात पुढीलप्रमाणे असून मनपा प्रशासनाने त्यासंदर्भात अत्यावश्यक कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

1) अधिकारी/कर्मचारी संवर्गातील महत्वाची पदे रिक्त असून झोनल अधिकारी, स्वच्छता निरिक्षक, कर निर्धारक, अग्नीशमन अधिकारी, इ रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार लिपिक वर्गीय कर्मचाऱ्याकडे सोपविण्यात आला आहे. तर कार्यरत सफाई कर्मचाऱ्यांची संख्या मंजूर पदांपेक्षा अधिक आहे.

2) मनपाचे लेखे (Books Of Accounts) विहित पद्धतीने ठेवण्यात आलेले नाहीत. मनपाचे वार्षिक लेखे तयार केलेले नाही. तसेच अभिलेख्यांचे अंतर्गत लेखा परीक्षण करण्यात येत नाही.

3) घनकचरा वाहतुकीमध्ये वजनासंबंधाने उचित नियंत्रण अभावी मोठ्या रकमेचे अतिप्रदान झाले आहे.

4) स्वच्छतेवरील खर्च काही प्रमाणात भरून काढण्यासाठी अधिनियमानुसार शहरातील व्यावसायिक प्रतिष्ठानाकडून सेवाशुल्क वसूल करण्यासंबंधाने धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला नाही.

5) स्थानिक संस्था कराची (LBT) आकारणी बांधकामांच्या वास्तविक क्षेत्राप्रमाणे करण्यात येत असल्याची खात्री होत नाही.

6) रस्ता बांधकामाच्या मंजूर प्राकलनानुसार काम न करता त्यामधील काही बाबी वगळून अन्य बाबींवर वाढीव काम करण्याची मनपा मध्ये पद्धत रुढ आहे असे दिसून आले. या वाढीव कामासाठी सक्षम परवानगी घेण्यात येत नाही.

7) बांधकामाच्या नोंदी मोजमाप पुस्तकात घेतांना महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील तरतुदींचे उल्लंघन होत असल्याचे दिसते. परिणामी नोंदी व प्रत्यक्ष काम यांबाबत संदिग्धता निर्माण होण्यास वाव आहे.

Scanned by CamScanner

बांधकामांच्या चाचण्या व निरीक्षण शासकीय ऐवजी खाजगी संस्थांमार्फत करण्यात येत आहेत.

1) बांधकामांच्या चाचण्या व निरीक्षण शासकीय ऐवजी खाजगी संस्थांमार्फत करण्यात येत आहेत.

2) बांधकामासाठी मासिक मानधनावर सल्लागार तज्ञ न नेमता निविदा मागवून सल्लागार संस्थाना काम देऊन अनावश्यक खर्च करण्यात आला आहे.

3) घरकुल, शौचालय इ योजना पूर्णपणे राबविल्या नाहीत.

4) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील कर्जाच्या परतफेडीबाबत अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आली नाही.

5) BOT तत्वावरील पाणीपुरवठा कराराचा कंत्राटदाराने भंग केल्याने मोठ्या प्रमाणावर आर्थिक हानी झाल्याची शक्यता दिसून येते.

6) स्थानिक संस्था कराची उचित आकारणी व वसुली होण्याचे दृष्टीने निर्धारणाची कार्यवाही संथ गतीने सुरु असल्याचे दिसून आले.

7) दुकान गाळे भाडे, मालमत्ता कर इ महसुलाची मोठ्या प्रमाणावर थकबाकी आढळून आली. अधिनियमातील तरतुदीप्रमाणे थकबाकीवर शास्ती आकारली नाही. कर विभागातील कामकाजात मोठ्या प्रमाणावर त्रुट्या आढळून आल्या आहेत.

8) कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती चुकीची करण्यात आल्याचे दिसून आले. आयकराची ही परिगणना चुकीची करण्यात आली. कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतीपुर्तीच्या देयकांचे प्रदान करताना आवश्यक पूर्ततेकडे दुर्लक्ष करण्यात येते. भविष्य निर्वाह निधीच्या प्रदानातही मागविण्यांची उचित पडताळणी करण्यात येत नाही असे दिसून आले. पदाधिकारी/अधिकाऱ्यांच्या वाहन वापरावर मर्यादा नसल्याने इंधनावर प्रचंड खर्च असणे, वर्षअखेर अपूर्ण नसलेल्या बांधकामांची लेखापरीक्षणास त्रुटीपूर्ण माहिती देणे अनुभवास आले आहे.

9) विद्युत देखभाल व दुरुस्ती करणाऱ्या कंत्राटदाराने त्यांचेकडील कर्मचारी संख्या कमी दर्शवून शासनाच्या वीमा प्रिमिअम महसुलाचे नुकसान केले आहे. तसेच त्याने त्रयस्थ व्यक्ती व मालमत्तेचा वीमा काढला नसल्याचे दिसून आले.

10) शहरातील नाली सफाईचे काम बेरोजगार सेवा सहकारी संस्थांच्या तुलनेत खाजगी कंत्राटदारांना अधिक दराने दिल्याने मनपा निधीचे हानी झाली आहे.

11) चंद्रपूर पंचशताब्धी महोत्सव व महापौर चषक कार्यक्रमावर वित्तीय औचित्यांचे उल्लंघन करून अमाप व अनावश्यक खर्च नोंदविण्यात आला आहे.

12) नगररचना विभागातील कामकाजात मोठ्या प्रमाणावर त्रुट्या निदर्शनास येतात. कर आकारणीच्या दृष्टीने त्यांचा कर विभागाशी समन्वय आढळून येत नाही. अग्नीशमन ना-हरकत प्राप्त न करता नकाशे मंजूर करण्यात आले आहेत. बांधकामास विलंबाने परवानगी देणे, पूर्णत्वाचे प्रमाणपत्र न देणे, इ बाबी आढळून आल्या आहेत.

Scanned by CamScanner

13) महानगरपालिकेतर्फे वसूल करून राज्य शासनास भरणा करावयाच्या करांच्या रकमा पूर्णपणे शासन जमा करण्यात आलेल्या नाहीत.

14) मनपाच्या शाळांना जिल्हापरिषदेतर्फे परस्पर अनुदान प्राप्त होऊन त्यातून झालेल्या खर्चावर कोणतेही नियंत्रण नसल्याचे दिसते. आरोग्य केंद्रांच्या लेख्यातही त्रुट्या आहेत.

15) मालमत्ता हस्तांतरण प्रकरणे चुकीच्या पद्धतीने निकाली काढणे, बांधकामावरील गौण खनिजांचा खनिकर्म विभागाशी मेळ न घालणे, कंत्राटदाराना विनादंड मुदतवाढी देणे, निविदा सादर करण्यास पुरेसा वेळ न देणे, निविदा सादर करताना B-1 नमुन्यासोबत फॉर्म I,II व III मध्ये आवश्यक तपशील नसतांना निविदा मंजूर होणे, इ. बाबी आढळून येतात.

यासंबंधाने सदरच्या अहवालात विस्तृत आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

---------

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण .................................................. 1

I PART I : भाग १ .................................................. 3

मागील लेखा परीक्षण अहवाल .................................................. 3

PART II .................................................. 7

कलम ९ अ खालील आक्षेप .......... २०२३-२४ .................................................. 8

1 महानगरपालिका चंद्रपूर येथे दुहेरी नोंद पध्दतीने लेखे न ठेवणेबाबत. .................................................. 9

2 मनपा चंद्रपूरच्या जमा खर्चाचे वार्षिक अंदाजपत्रक, प्रत्यक्ष जमा खर्च व आर्थिक स्थितीबाबत. .................................................. 10

3 वार्षिक लेखे व त्यावरील अहवाल. .................................................. 15

4 अतिरिक्त वजन दर्शवून झालेल्या अतिप्रदानाबाबत. .................................................. 16

5 स्थानिक संस्था कराची आकारणी बांधकामाच्या वास्तविक क्षेत्रफळाप्रमाणे होत नसल्याची अनियमितता. .................................................. 19

6 सक्षम प्राधिकरणाची पूर्वमंजुरी न घेता वाढीव कामाचे मुल्यांकन नोंदविण्याची अनियमितता. .................................................. 21

7 रस्त्याची लांबी निश्चित असताना त्यामध्ये वाढ दर्शवून कंत्राटदारास अवाजवी प्रदान करण्याबाबत व इतर बाबी. 22

8 60% काम झाले असताना कंत्राटी मूल्यापेक्षा अधिक मूल्याचे प्रदान करणे. .................................................. 25

9 एकाच कामाचे दोन वेगळ्या रकमांचे प्रथम व धावते देयक मंजूर सादर करणे व त्यापैकी मोठ्या रकमेचे देयक मंजूर होणेबाबत. .................................................. 28

10 कामाच्या निविदा ई-टेंडरींगद्वारे न मागविल्यामुळे निविदा पद्धतीत पारदर्शकता व निकोप स्पर्धेचा अभाव असणेबाबत. .................................................. 30

11 मोजमाप नोंदवह्यांमधील त्रुट्याबाबत. .................................................. 31

12 अंतर्गत भरतीप्रक्रियेव्दारे निवड करण्यात आलेल्या आरोग्य निरिक्षकास शासन अधिसुचना दिनांक 22.04.2009 च्या परि.8 मधील जोडपत्र-3 चा चुकीचा लाभ देवून वेतन निश्चिती करताना झालेले अतिप्रदानाबाबत. 32

13 श्री. नामदेव बा. राउत यांना ग्रंथपाल पदावर अंतर्गत भरती प्रक्रियेव्दारे नियुक्त देतांना तसेच त्यांनी परिक्षा कालावधीमध्ये उपभोगलेल्या रजेची नोंद सेवा पुस्तकात न घेणे इत्यादीबाबत. .................................................. 34

14 बि. ओ. टी. तत्वावरील पाणीपुरवठा योजनेच्या कराराचा भंग करुन नागरिकांना पाणी पुरवठ्याची सोय उपलब्ध न करणे व मनपाचे आर्थिक नुकसानीच्या संभावनेबाबत. .................................................. 36

15 स्वच्छतेची सेवा पुरविण्यासाठी सेवाशुल्क न आकारल्यामुळे मनपा निधीवरील प्रचंड आर्थिक बोजाबाबत. .................................................. 38

कलम ९ ब खालील आक्षेप .................................................. 41

16 जनतेकडून प्राप्त महसुलातून बेजबाबदारपणे खर्च करण्याबाबत. .................................................. 42


Scanned by CamScanner

17 सन 2013-14 या आर्थिक वर्षात बँकांमध्ये गुंतविण्यात आलेल्या मुदती ठेवीवर बँकेने कमी व्याज दिल्याबाबत तसेच बँकेत मुदती ठेवी गुंतवणूकीचे पध्दतीबाबत. ....43
18 कर विभागातील सर्वसाधारण अनियमितता व कामकाजातील त्रुट्यामुळे मनपा महसुलाची हानी होत असल्याबाबत. ....44
19 उचित समर्थनाशिवाय (JUSTIFICATION) जाहिरातीचे खाजगीकरणास अर्थसंकल्पीय सभेने स्थगिती दिल्यामुळे व प्रशासनाने विखंडनाच्या प्रस्तावाचा पाठपुरवठा न केल्यामुळे महसुलात प्रचंड नुकसान होणेबाबत. ....47
20 शास्ती 2% पेक्षा कमी आकारुन चंद्रपूर मनपाचे झालेल्या हानीबाबत. ....48
21 वृक्षकर 1% ऐवजी 0.5% वसूल केल्यामुळे महसुलाची हानी झाल्याबाबत. ....51
22 तज्ञ व्यक्तीऐवजी सल्लागार संस्थांची पॅनलवर नेमणूक करुन खर्चात अनावश्यक वाढ करण्याबाबत व निविदेच्या स्पर्धेत नसलेल्यांची सुद्धा पॅनलवर निवड करणेबाबत. ....53
23 कंत्राटदारांच्या देयकातून 5% ऐवजी 4% दराप्रमाणे मूल्यवर्धित कराची वसुली झाल्यामुळे राज्य शासनाकडील महसुलाची हानी झाल्याबाबत. ....56
24 विहित मूल्याच्या मुद्रांकावर करारनामे न केल्याने झालेल्या शासन महसुलाची हानी बाबत. ....59
25 शासनाकडील कल्याणकारी योजनेवरील एकूण प्राप्त अनुदानातून केवळ 5% रक्कम खर्च करुन उर्वरित निधी मुदत ठेवीच्या स्वरुपात गुंतवून रु.1.0 कोटीवरील प्राप्त व्याज शासनाकडे जमा न करणेबाबत. ....62
26 गांधी चौक ते जटपुरा गेट व जटपुरा गेट ते गिरनार चौक या रस्त्याच्या दुतर्फा रॉयल पामचे 12 ते 15 फुटी झाडे लावणेबाबत. ....64
27 रमाई आवास (घरकुल) योजनेची शून्य अंमलबजावणी असल्यामुळे योजना राबविण्यात मनपा प्रशासन उदासीन असणेबाबत. ....65
28 महानगरपालिकेच्या अभिलेख्यावर कंत्राटदार नोंदणीकृत नसणेबाबत. ....68
29 सन 2013-14 या आर्थिक वर्षात आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांचे आयकराची चुकीची परिगणना करुन कमी रकमेची कपात केल्याबाबत. ....70
30 म.न.पा.चंद्रपूर शहर येथील अधिकारी / कर्मचारी व इतर फर्मला दिलेल्या अग्रिमाबाबत. ....73
31 वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकातील चुकीच्या प्रदानामुळे झालेल्या अतिप्रदानाची वसुली करणेबाबत तसेच वैद्यकीय देयकातील अनियमितेबाबत. ....75
32 चंद्रपूर पंचशताब्दी योजना व महापौर चषक स्पर्धा आयोजनातील बिछायत व भोजनावरील अनियमित खर्चाबाबत. ....78
33 श्री. निशिकांत चांदेकर, कनिष्ठ लिपिक चिरुध्द नगर परिषद, चंद्रपूर, युपीएल नं.673/2000 मा. औद्योगिक न्यायालय, नागपूर तसेच रिट पिटीशन नं.1097/2003 मा. उच्च न्यायालय, नागपूरचे कोर्ट प्रकरणाबाबत. ....81
34 क्रीडासत्र 2013-14 मध्ये सहभागी खेळाडू मुलांसाठी चना (हरभरा) व सॉक्स-बूट खरेदीमध्ये आढळून आलेल्या अनियमिततांबाबत. ....82
35 महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देय असलेल्या कर्ज परतफेडीची रक्कम व वेतनापोटीच्या रकमेच्या थकबाकीबाबत. ....84

Scanned by CamScanner

36 स्थानिक संस्था कराच्या निर्धारणाकरिता नियुक्त केलेल्या सनदी लेखापालाच्या मानधनाबाबत. ....................87
37 स्थानिक स्वराज्य संस्था कर जमा महसुलाच्या आकडेवारीतील तफावत, नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडून वार्षिक विवरणपत्रे मुदतीत प्राप्त न होणे व मनपामार्फत कराचे निर्धारणास विलंब होणेबाबत. ....................89
38 गाळे भाड्याची रक्कम वसूल केली नसल्याची अनियमितता (सन 2013-14). ....................91
39 "पैसे द्या व वापरा" तत्वावरील शौचालये चालवण्यासाठी स्वयंसेवी संस्थेस एकमुश्त रकमेचे अनावश्यक मासिक प्रदान करण्याबाबत. ....................92
40 महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 अन्वये मंजुर करण्यात येणा-या परतावा अग्रिम व नापरतावा रक्कम तसेच मासिक वर्गणीबाबत. ....................93
41 नाली सफाईचे काम सहकारी संस्थांऐवजी खाजगी कंत्राटदारांकडून अत्याधिक दराने देऊन मनपा निधीचे अनावश्यक प्रदान होणेबाबत. ....................98
42 सफाई कामगारांच्या भरलेल्या अतिरिक्त पदांमुळे आस्थापना खर्चात अनावश्यक वाढ झाल्याबाबत. ....................101
43 विद्युत व्यवस्थेच्या देखभाल व दुरुस्तीच्या रु.99.82 लाख मूल्याचे कामास तांत्रिक मान्यता नसणे व इतर अनियमितता. ....................104
44 नगररचना विभागाच्या दुर्लक्षामुळे विविध नियमांचे व अटी शर्तीच्या उल्लंघनासह मनपाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याबाबत. ....................106

**कलम ९ क खालील आक्षेप** ....................110

—————— निरंक —————— ....................111

**कलम ९ ड खालील आक्षेप** ....................113

45 महानगरपालिकेच्या लेख्यांची छाननी व लेखापरीक्षा न होणेबाबत. ....................114
46 बांधकामावर वापरलेल्या गौण खनिजाच्या परीमाणाचा खनिकर्म विभागाने जारी केलेल्या ट्रांझीट पासशी मेळ न घेण्याबाबत. ....................115
47 वाटाघाटीअंती मान्य झालेला दर निविदाप्रपत्र या मूळ दस्तावेजात नमूद न केल्याने कार्यारंभाच्या आदेशात चुकीचा दर नमूद करणे व चुकीच्या दराने कामाचे प्रदान करण्याच्या शक्यतेस वाव मिळण्याबाबत. ....................116
48 कंत्राटदारास विनादंड मुदतवाढी देण्याबाबत. ....................118
49 त्रयस्थ लेखापरीक्षण शुल्क या बाबीवर अनियमित खर्च नोंदविण्याबाबत. ....................120
50 बांधकामांची नोंदवही व अपूर्ण बांधकामांच्या नोंदीबाबत. ....................120
51 संबंधित कामाच्या निविदेसोबत कंत्राटदाराकडे अन्य बांधकामापैकी राहिलेल्या कामाचे मूल्य दर्शविणारे प्रतिज्ञापत्र न जोडणेबाबत. ....................121
52 मोजमाप पुस्तकांस एकसारखे क्रमांक देण्याची अनियमितता. ....................122
53 विद्यार्थ्यांची मापे न घेता गणवेश शिवल्यामुळे गणवेशासाठी झालेला खर्च समाधानकारक नसल्याबाबत. ....................123
54 चंद्रपूर महानगरपालिकेअंतर्गत सर्व प्राथमिक / माध्यमिक शाळांना, शाळा देखभाल दुरुस्तीसाठी पंचायत समितीकडून परस्पर प्राप्त होत असलेल्या अनुदानाबाबत. ....................125

Scanned by CamScanner

55 न्यायालयीन प्रकरणात महानगरपालिकेला सेवा देणा-या अधि वक्त्यांच्या शुल्कातून आयकराची कपात उचित दराने न करणेबाबत. ....126
56 मनपा चंद्रपूर अंतर्गत नागरी आरोग्य केंद्रातील बाह्यरुग्ण तपासणी नोंदवही (OPD REGISTER), औषधी साठा व पुरवठा नोंदवहीतील त्रुट्याबाबत. ....128
57 विवाह मंडळाची नोंदणी शुल्क व नुतनीकरणाची तसेच विवाह नोंदणी शुल्काची रक्कम शासनाकडे जमा न करणे. 131
58 नगरपरिषद चंद्रपूर व महानगरपालिका चंद्रपूर यांच्या मंजुर आकृतीबंधातील व्यस्त प्रमाणाबाबत. ....132
59 वारसान हक्काने शासकीय नझुल जागेवरील मालमत्ता हस्तांतरणाने नांव दाखल करणे. ....133
60 मौल्यवान वस्तू अथवा रोख हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून क्षतीपुर्ती बंधपत्र न घेणेबाबत. ....135
61 सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत स्वंयरोजगारा करीता वैयक्तिक कर्ज मंजुरीबाबत. ....135
62 टँकरद्वारे पाणी पुरवठा केलेल्या प्रकरणी प्राप्त रक्कमांचा तपशिल व आवश्यक अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करुन न देणेबाबत. ....139
63 अखर्चित शासकीय अनुदान व उपयोगिता प्रमाणपत्रांबाबत. ....140
64 दिनांक 1 नोव्हें. 2005 नंतर नियुक्त कर्मचा-यांचे मासिक वेतनातून परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन रक्मेची 10% रक्कम कपात न करणे, व मनपाच्या समतुल्य हिश्श्याची रक्कम संबंधीत खात्यात वळती न करणेबाबत. ....141
65 सेवापुस्तकातील अनियमितता तसेच वेतननिश्चितीबाबत. ....143
66 म.न.पा.चंद्रपूर शहर येथील सामान्य निधीचे व इतर निधींचे रोखपुस्तक व बँक खात्यातील अखेरच्या शिलकेच्या ताळमेळाबाबत. ....151
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र ....155
विवरणपत्रे व जोडपत्रे ....156

Scanned by CamScanner

## विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| इतर | 11 | 16, 17 | | 63 |
| सामान्य प्रशासन | 12, 13 | 40 | | 64, 65 |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 6, 7, 8, 9, 10 | 22, 23, 24, 25, 26, 27, 28 | | 46, 47, 48, 49, 50, 51, 52 |
| शहर अभियंता आणि विद्युत विभाग | | 43 | | |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | 14 | 35 | | 62 |
| लेखा विभाग | 1, 2 | 29, 30, 31 | | 66 |
| लेखापरीक्षण | 3 | | | 45 |
| नगर रचना | | 44 | | |
| जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर | 5 | 36, 37 | | |
| कर निर्धारण व संकलन | | 18, 19, 20, 21 | | 59, 60 |
| आरोग्य | 15 | 39 | | 56 |
| विधी विभाग | | 33 | | 55 |
| घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प | 4 | 41, 42 | | |
| परवाना व मंडई विभाग | | 38 | | |
| शिक्षण विभाग किंवा शिक्षण मंडळ, प्राथमिक शिक्षण मंडळ किंवा माध्यमिक शिक्षण | | 34 | | 53, 54 |
| क्रिडा विभाग | | 32 | | |
| जन्म मृत्यु नोंदणी | | | | 57, 58 |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| विभाग | | | | |
| समाज विकास किंवा सामाजिक न्याय विभाग | | | | 61 |



Scanned by CamScanner

I Part I : भाग १

*मागील लेखा परीक्षण अहवाल*

# चंद्रपूर शहर महानगरपालिका लेखापरीक्षण अहवाल 2013-14

## भाग-1

## मागील लेखापरिक्षण जमा व खर्च बाजूचा अहवाल

अ) सन 2011-2012 या लेखापरीक्षण अहवालातील एकुण 83 परिच्छेद प्रलंबित असून, प्रलंबित परिच्छेदांची वर्षनिहाय यादी खालीलप्रमाणे आहे

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण प्रलंबित परिच्छेदांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 2011-2012 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58,59,60,61,62,63,64,65,66,67,68,69,70,71,72,73,74,75,76,77,78,79,80,81,82,83 | 83 |
| | | एकूण | 83 |

ब) वित्तीय वर्ष 2012-2013

| परिच्छेद क्रमांक | विषय |
|---|---|
| कलम 9 अ खालील आक्षेप | |
| 1 | चंद्रपूर महानगरपालीकेचा अर्थसंकल्प, आर्थिक स्थिती व वार्षिक लेख्यावरील अभिप्राय. |
| 2 | दुहेरी नोंद पद्धती अभिलेख्यातील अनियमितता. |
| 3 | अग्रीमाची रक्कम वसूल न करण्याची अनियमितता. |
| 4 | सेवापुस्तकातील अनियमिततेबाबत. |
| 5 | वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीवर झालेल्या नियमबाह्य खर्चाबाबत. |
| 6 | झेरॉक्सबाबत झालेल्या अनियमिततेबाबत. |
| 7 | परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमधील नियमबाह्य अनियमितता. |
| 8 | श्री.महेंद्र बब्बुजी हजारे, आरोग्य निरीक्षक यांचे चुकीचे वेतननिश्चितीबाबत. |
| 9 | विमानाने केलेल्या नियमबाह्य प्रवासाबाबत. |
| 10 | रजेवर/गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्यांची नोंद सेवापुस्तकात घेतल्या जात नसल्याबाबत. |
| 11 | श्री.श्रीहरी शंकर बनकर, वरिष्ठ लिपिक यांना नियमबाह्य वेतनवाढी मंजूर करण्यात आल्यामुळे झालेल्या अतिप्रदानाबाबत. |



Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| 12 | दैनंदिनी छपाईकरिता महानगरपालिका निधीची हानी करण्याची अनियमितता. |
| 13 | कीटकनाशक व जंतुनाशक व क्लोरीन खरेदीतील अनियमितता. |
| 14 | कर वसुलीची उद्दिष्टपुर्ती अवैधरीत्या दर्शविण्याची अनियमितता. |
| 15 | मनपाचे मालकीची व भाडेपट्टेवर दिलेल्या इमारत/गाळे यांचे भाडे व मालमत्ताकर थकबाकीबाबत. |
| 16 | दुकान/गाळ्यांचा योग्य विनियोग न करण्याची अनियमितता. |
| 17 | प्राथमिक शाळेच्या अभिलेख्यातील नियमबाह्यता. |
| 18 | कंत्राटदाराची बिलें मोजमाप पुस्तकात उतरवून प्रदान केल्याची अनियमितता. |
| 19 | बैल बाजार परिसरात झरपट नदीवर आंघोळीचे ओटे बांधकामाच्या अभिलेख्यांमध्ये खाडाखोड करण्याची अनियमितता. |
| 20 | सन 2007-08 मध्ये निविदा मंजूर केलेल्या कंत्राटदारांनाच सन 2012-13 मध्ये कार्यारंभ आदेश देण्याची अनियमितता. |
| 21 | महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियमाचे विसंगत वसुलीमुळे शासन महसूल हानीची अनियमितता. |
| 22 | कंत्राटी कामाचा विमा शासकिय विमा निधीकडे उतरविण्यात आला नसल्याची अनियमितता. |
| **कलम 9ब खालील आक्षेप** | |
| 23 | प्रवास भत्यातील तिकीटाचे नियमबाह्यरित्या जादा दराने शोधन केल्याबाबत. |
| 24 | रूपये 1000 वरील रकमांचे प्रदान रोखपालाने रोखीने केल्याची अनियमितता |
| 25 | प्राथमिक शाळांना मिळणारे अनुदान महानगरपालिका निधीत जमा न करण्याची अनियमितता |
| 26 | हातगाडया खरेदीवरील निष्फळ खर्चाबाबत |
| 27 | उपायुक्त यांना खाजगी निवास भाडयाची रूपये 120240/- जादा प्रदानाबाबत. |
| 28 | विवाह नोंदणी फी व शास्तीची रक्कम शासकीय कोषागाराकडे भरणा करण्याची कार्यवाही होत नसल्याबाबत. |
| 29 | ग्रंथालय विभागातील पुस्तक खरेदीतील अनियमितता. |
| 30 | अपंग, महीला व बालक आणि अनु. जाती व अनु. जमातीकरीता विहीत प्रमाणात खर्च न करण्याची अनियमितता |
| 31 | महानगरपालिका कार्यालयाबाहेर रकमांचे प्रदान नियमबाह्यपणे रोखीने करण्याची अनियमितता |
| 32 | पशुंची तपासणी न करताच पशुवध फी वसुल करण्याची अनियमितता |
| 33 | प्रवास भत्ता अनुज्ञेय नसलेल्या श्रेणीतुन केल्यामुळे झालेल्या जादा प्रदानाबाबत. |
| 34 | मालमत्ता व इतर कराची थकीत रकमांची नोंद सन 13-2012 मधील मागणी नोंदवही मध्ये न घेतल्याची अनियमितता. |
| 35 | म.न.पा. तील स्वच्छता विभागाचे कचरा गोळा करण्याचे कंटेनर दुरूस्तीमधील अनियमितता. |
| 36 | ई. निविदा पद्धतीशिवाय बांधकामे करण्याची अनियमितता. |
| 37 | बांधकामे अपूर्ण असण्याची अनियमितता |
| 38 | बाबूपेठ वार्ड येथील महर्षी कर्वे शाळेतील वालकंपाउंड चे बांधकाम अभिलेख्यातील अनियमितता. |
| 39 | अनुदानित रक्कमांचा दुरूपयोग करण्याची अनियमितता. |
| 40 | कोहिनूर स्टेडीअम येथे वालकंपाउंड उंची वाढविणे प्रदानामधील अनियमितता. |
| 41 | प्राप्त निविदा धारकांएवजी इतरांना कामाचे कंत्राट देण्याची अनियमितता. |
| 42 | मानवी मजूर पुरविण्याबाबतचे कंत्राट नियमबाह्यपणे देण्यात आल्याची अनियमितता. |
| 43 | टाकाऊ वस्तू संतुलन कंत्राटातील अनियमिततेमुळे महानगरपालिकेच्या झालेल्या हानीबाबतची अनियमितता. |
| **कलम 9क खालील आक्षेप** | |



Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| ———निरंक——— | |
| कलम 9ब खालील आक्षेप | |
| 44 | प्रमाणणकार लेखाशिर्ष, लेखासंकेतांक, अंदाजपत्रकीय तरतुद व चढत्या क्रमांकाची बेरीज नमुद नसतांना रकमेची अदाई करण्याची अनियमितता. |
| 45 | कर विभागातील जमा रकमाच्या विवरणपत्राची पडताळणी करणेबाबत. |
| 46 | सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-याच्या वेतनातुन 3 महिने आधी भविष्य निर्वाह निधी वर्गणीची रक्कम कपात न करण्याबाबत. |
| 47 | वेतन राखीव निधीमधील अनियमितता. |
| 48 | अनुदान नोंदवही अपुर्ण असणेबाबत. |
| 49 | रोख पुस्तकामधील अनियमितता. |
| 50 | लेखापरीक्षण अहवालातील लेखाआक्षेपाबाबत विहीत मुदतीत कार्यवाही केली नसल्याची अनियमितता |
| 51 | प्राथमिक शाळाच्या अभिलेख्यात आढळून आलेल्या नियमबाह्यता. |
| 52 | नियम, अधिनियम व शासन निर्णयानुसार प्रदान रकमाबाबत कार्यवाही केली नसल्याची अनियमितता |
| 53 | मालमत्ता कर विभागातील झालेल्या अनियमितेबाबत. |
| 54 | जन्म व मृत्यू विभागातील जमा रकमांच्या अभिलेख्यातील अनियमिततेबाबत. |
| 55 | चंद्रपूर शहर महानगरपालिका येथील स्थानिक संस्था कर वसुली बाबत (TBL) |
| 56 | स्थानिक संस्था कराच्या बँकेत जमा रकमेशी ताळमेळाबाबत (TBL) |
| 57 | बांधकाम व्यावसायिककंत्राटदार यांचेकडून स्थानिक संस्था कराची आकारणी व वसुलीबाबत/ |
| 58 | श्री. भुपेश बाबुरावजी गोठे, आरोग्य निरीक्षक यांचे पदोन्नतीचे वेळी केलेल्या चुकीचे वेतननिश्चितीबाबत |
| 59 | श्री. नामदेव राउत यांच्या सेवापुस्तकामध्ये आढळून आलेल्या अनियमितता बाबत. |
| 60 | मनपा अधिकारी व कर्मचा-यांना मोबाईल सिम कार्ड पुरवुन मासिक बिलाचे शोधन करण्याबाबत. |
| 61 | चंद्रपूर शहर महानगरपालिका येथील स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडून प्राप्त विवरणपत्राबाबत. |
| 62 | आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीमधील अनियमिततेबाबत. |
| 63 | आगप्रतीबंधक व जीवरक्षक उपाययोजना केली नसल्याची अनियमितता. |
| 64 | आरोग्य विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन श्रेणीतील कमाल टप्प्यावरील वेतनानंतरच्या वेतनवाढीबाबत. |
| 65 | नागरीकांना आरोग्यविषयक सुविधा मिळाल्या नसल्याची अनियमितता |
| 66 | मनपा सार्वत्रिक निवडणूक 2012 मध्ये कर्मचारी/अधिकारी मानधन तसेच अतिकालिक भत्ताच्या रकमाच्या प्रदानाच्या अनियमिततेबाबत. |
| 67 | श्री.नामदेव राऊत, सहायक ग्रंथपाल यांच्या प्रवास भत्ता देयकातील अनियमिततेबाबत. |
| 68 | शासकीय वास्तुंचे देखभाल दुरूस्तीवर मंजूर तरतुद खर्च न करण्याची अनियमितता |
| 69 | वृक्ष निधीमधुन ट्रिगार्ड खरेदीमधील नियमबाह्य अनियमितता. |
| 70 | अनुसुचित जाती व नवबौध्द घटकासाठी घरकुल बांधकामाबाबत. |
| 71 | चंद्रपूर विकास योजनेच्या अधिप्रमाणित प्रती तयार करुन शासनाकडे पाठविण्याकरीता अग्रीमाची रक्कम रुपये 40000/- नगररचना कार्यालय चंद्रपूर यांना प्रदानाबाबत |
| 72 | नगररचना विभागाने जाहिरातीवर केलेल्या नियमबाह्य शोधनाबाबत. |
| 73 | कोर्ट केसेस प्रकरणात प्रदान रकमेतील अनियमितता. |
| 74 | चंद्रपूर शहर महानगरपालिका येथे विविध विभागात नोंदवह्या न ठेवणेबाबतची अनियमितता. |



Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| 75 | एम.एच 34-9889 (स्टाफ कार) मधील इंधन वापराबाबत. |
| 76 | म.न.पा.तील कार्यरत वाहनांचे इतिहासपत्रकाबाबत (HISTORY SHEET). |
| 77 | म.न.पा.तील वाहनाकरीता इंधन खरेदी देयके व इंधन वापराबाबत. |
| 78 | म.न.पा. तील कार्यरत वाहने दुरुस्तीमधील अनियमितता. |
| 79 | मोजमाप पुस्तकातील अनियमितता. |

**<u>पुनर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट परिच्छेदांचा तपशील</u>**

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट परिच्छेदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | लेखापरीक्षण वर्ष | परिच्छेद क्र. | एकूण |
|---|---|---|---|
| 1 | 2011-2012 | 17(2.319), 20(2.320), 25(2.321), 60(2.322), 57(2.324) | 05 |



Scanned by CamScanner

# Part II

# भाग एक

## गंभीर अनियमितता

## कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप



Scanned by CamScanner

# कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान



Scanned by CamScanner

लेखा

**1 महानगरपालिका चंद्रपूर येथे दुहेरी नोंद पध्दतीने लेखे न ठेवणेबाबत.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 04**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक लेखासं-10/2004/71/प्र.क्रं.5/04/नवि-31 दिनांक 6 जुलै 2005 नुसार महानगरपालिकेने दि.01/04/2005 पासून लेखे दुहेरी नोंद पध्दतीने (Accrual based double entry accounting system) ठेवण्याबाबत सुधारणात्मक बाब म्हणून आदेशीत केले आहे. तथापी महानगरपालिका चंद्रपूर येथे लेखे दुहेरी नोंद पध्दतीने ठेवलेले आढळून आलेले नाही.***

नागरी प्रशासनात सुधारणा घडवून आणणे व स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे व त्यांची बाजारातील पत सुधारण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र शासनाने ज्या सुधारणा करणे बंधनकारक केले आहे, त्यातील अनिवार्य सुधारणामध्ये आधुनिक द्विनोंद पध्दतीने लेखे ठेवणे होय. त्यानुषंगाने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक, लेखासं-10/2004/71/प्र.क्रं.5/04/नवि -31 दिनांक 6 जुलै 2005 मध्ये नमूद असल्यानुसार स्थानिक संस्थांचे लेखे दुहेरी पध्दतीने ( Accrual Based double entry accounting System) ठेवण्याबाबत आदेशीत केले आहे. सदरील नोंदवहया राष्ट्रीय महानगर पालिका लेखा नियमपुस्तिका (NMAM) मधील विहित नमून्यात महानगरपालिकेने ठेवणे आवश्यक आहे, परंतू पुढील नोंदवहया विहीत नमुन्यात ठेवण्यात आल्या नाहीत.

| Sr. No. | Contents | Form |
|---|---|---|
| 1. | Cash book | GEN - 1 |
| 2. | Journal book | GEN - 2 |
| 3. | Ledger | GEN - 3 |
| 4. | Cash bank receipt voucher | GEN - 4 |
| 5. | Cash bank payment voucher | GEN - 5 |
| 6. | Contra voucher | GEN - 6 |
| 7. | Journal voucher | GEN - 7 |
| 8. | Receipt | GEN - 8 |
| 9. | Receipt register | GEN - 9 |
| 10. | Statement on status of cheque received | GEN - 10 |
| 11. | Collection register | GEN - 11 |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 12. | Summary of daily collection | GEN - 12 |
| 13. | Registers of bills for payments | GEN - 13 |
| 14. | Payment order | GEN - 14 |
| 15. | Cheque issue register | GEN - 15 |
| 16. | Register of advance | GEN - 16 |
| 17. | Register of permanent advance | GEN - 17 |
| 18. | Deposit register | GEN - 18 |
| 19. | Summary statement of deposits adjusted | GEN - 19 |
| 20. | Demand register | GEN - 20 |
| 21. | Bill of -------- income | GEN - 21 |
| 22. | Summary statement of bills raised | GEN - 22 |
| 23. | Register of notice fee, warrants fees, other fee | GEN - 23 |
| 24. | Summary statement of notice fee, warrants fees, other fee | GEN - 24 |
| 25. | Register of refunds, remissions and write off | GEN - 25 |
| 26. | Summary statement refunds and remissions | GEN - 26 |
| 27. | Summary statement write - off | GEN - 27 |
| 28. | Statement of outstanding liability for expenses | GEN - 28 |
| 29. | Documents control register + stock account of receipt / cheque book | GEN - 29 |

2) उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांनुसार दुहेरी नोंद लेखा पध्दत अंमलबजावणी साठी राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता तयार होईपर्यंत राष्ट्रीय लेखा नियम पुस्तीकेचा वापर करणे व राष्ट्रीय नियम पुस्तीकेतील तत्वांना बाधा न आणता नगरविकास संचालनालयातील लेखा सुधारणा कक्षाचे पूर्ण संमतीने आवश्यक असल्यास त्यात किरकोळ बदल करणे व त्या अनुसार कोडींग पध्दतीचा वापर करणे अनिवार्य केले असून वार्षिक अंदाजपत्रक, ताळेबंद व Income and Expenditure Statement हे उपरोक्त सुचने नुसार ठेवावयाचे आहे.

3) उपरोक्त शासन निर्णयनुसार राज्यातील सर्व महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांना आपले लेखे दुहेरी नोंद पध्दतीने अदयावत ठेवण्याबाबत स्पष्ट सुचना असून महानगरपालिकांना अशा दुहेरी नोंद पध्दतीची अंमलबजावणी दिनांक 1 एप्रिल 2005 पासून अनिवार्य केली असतांना देखील नागपूर महानगरपालिका, यांनी सन 2013-14 या वित्तीय वर्षाच्या अखेर पर्यंत उपरोक्त लेखे दुहेरी नोंद पध्दतीत ठेवले नसल्याचे आढळून आले.

DATDSTM7301 (Ref No : 1, Hmm No : 40)

***2 मनपा चंद्रपूरच्या जमा खर्चाचे वार्षिक अंदाजपत्रक, प्रत्यक्ष जमा खर्च व आर्थिक स्थितीबाबत.***

**अंदाजपत्रक (सन 2013-14)**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 00**

*लेखा शीर्ष :00 शासन/मनपा निधी*



Scanned by CamScanner

*अनियमितता कलम : 9अ*

***मनपा चंद्रपूरचे अंदाजपत्रक तयार करताना विशेष राखीव निधी तसेच विशिष्ट सामाजिक घटकांच्या कल्याणासाठी करावयाच्या तरतुदीकडे दुर्लक्ष केले आहे. वर्ष अखेर मोठ्या प्रमाणावर शिल्लक जमा असून त्यामध्ये शासकीय अनुदानाच्या अखर्चित निधीचा समावेश असला तरी मनपाची वर्षाअखेर आर्थिक स्थिती समाधानकारक असल्याचे दिसून येते.***

**1) <u>अंदाजपत्रक</u>**

मनपा चंद्रपूर मधील सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार सन 2013-2014 या आर्थिक वर्षाच्या सुधारित अर्थसंकल्पातील जमा व खर्चाचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे-

(रकमा रुपयात)

| अंदाजित जमा/खर्च | | | | | प्रत्यक्ष जमा/खर्च | |
|---|---|---|---|---|---|---|
| जमा | सुरुवातीची शिल्लक | | | | | |
| | सर्वसाधारण | रु. 42369024 | | | | |
| | अनामत | रु. 21012176 | | | | |
| | एकूण - | | रु. 63381200 | | | |
| | आंडवली निधीतील सुरुवातीची शिल्लक | | रु.440296829 | | | |
| | एकूण सुरुवातीची शिल्लक | | | रु.503678029 | | रु. 501571590 |
| | भाग 1 | महसुली उत्पन्न (भांडवली अनुदानासह) | रु.1563074313 | | रु.1523466016 | |
| | भाग 2 | कर्ज व भांडवली उत्पन्न | रु. 19000000 | | रु.3839296 | |
| | भाग 3 | असाधारण ऋण | रु. 77667000 | | रु.95332686 | |
| | एकूण उत्पन्न (भाग 1+2+3) | | | रु.1659741313 | | रु.1622637998 |
| | एकूण जमा (2013-14) | | | रु.2163419342 | | रु.2124209588 |
| खर्च | भाग 1 | महसुली खर्च | रु. 634927894 | | रु.502284003 | |
| | भाग 2 | भांडवली खर्च | रु. 681460000 | | रु.312422465 | |
| | भाग 3 | असाधारण खर्च | रु. 79510000 | | रु.54434461 | |
| | एकूण खर्च | | | रु. 1395897894 | | रु. 869140930 |
| | अखेरची शिल्लक | | | रु. 767521448 | | रु. 1255068658 |

**यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत. --**

**अ) जमा**

1. मुंबई अर्थसंकल्पीय नियमपुस्तिकेचे कलम 31 नुसार कर, शुल्क इत्यादींची आकारणी प्रचलित किंवा सुधारित मान्य दरानुसार गृहीत धरुन अपेक्षित जमेचा अंदाजपत्रकात समावेश होणे अपेक्षित आहे. या आधारावर "मनपा कर व दर" या शिर्षाखाली रु.49.81 कोटी चे अंदाज वर्तविण्यात आले होते. त्या सदराखाली



Scanned by CamScanner

प्रत्यक्ष जमा रु.49.31 कोटी म्हणजेच समाधानकारक असल्याचे दिसून येते.

परंतु पाणीपुरवठा लाभ कर, खुल्या भूखंडावरील शुल्क, अवैध बांधकाम मालमत्ता कर आकारणी, भुयारी मलनि:सारण शुल्क व जोडणी फी, सफाई शुल्क इत्यादी महत्वाच्या बाबी आयुक्तांच्या प्रस्तावास डावलून आकारणी पासून व अंदाजपत्रकीय तरतुदीपासून वगळण्यात आले आहे. त्यामुळे मोठया प्रमाणावरील उत्पन्नापासून मनपा वंचित राहिली असल्याचे दिसून येते.

2. मनपाच्या मालमत्तांच्या माध्यमाने भांडवली उत्पन्नापोटी व्यापार संकुल गाळे विक्रीतून रु.1.50 कोटी अपेक्षित होते परंतु लिलाव विक्रीची कार्यवाहीच करण्यात न आल्यामुळे उत्पन्न निरंक आहे. त्यामुळे भांडवली उत्पन्नाच्या एकूण चार बाबी मिळून अपेक्षित रु.1.90 कोटी पैकी केवळ 38.39 लाख भांडवली उत्पन्न मनपास प्राप्त झाले.

3. मनपाच्या मालमत्तेतून मिळकती पासूनच्या ( उदा. इमारत भाडे, नगररचना शुल्क ई) रु.4.51 कोटी अंदाजपत्रकानुसार अपेक्षित असतांना केवळ रु.1.99 कोटी महसूल जमा झाला यामध्ये नगररचना विभागाकडील वसुली अल्प (42%) आहे असे दिसते.

(रकमा कोटीत)

| बाब | अंदाजित जमा | प्रत्यक्ष जमा |
|---|---|---|
| इमारत परवाना / विकास शुल्क, इत्यादी | 1.24 | 0.83 |
| गुंठेवारी | निरंक | निरंक |
| वाढीव चटई क्षेत्र | 0.74 | 0.00 |
| एकूण | **1.98** | **0.83 (42%)** |

**ब) खर्च-**

मुंबई अर्थसंकल्पीय नियमपुस्तिकेतील कलम 32 नुसार मागील तीन वर्षाच्या खर्चाची सरासरीच्या आधारावर पुढील वर्षाचे नियमित बाबींवरील खर्चाचे अंदाजपत्रक सर्वसाधारणपणे तयार करण्याची तरतूद आहे. परंतु प्रत्यक्ष तरतूद सरासरीहून 10 % च्या अधिक्यापेक्षा जास्त केल्याचे दिसते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 91 मध्ये विशेष निधीच्या उभारणीची तरतूद करण्यात आली आहे. त्याप्रमाणे काही निधींची उभारणी केली परंतु एकत्रित पाणीपुरवठा व मलप्रवाह विनियोग कर्जनिधी तसेच जल व मलप्रवाह निधीची स्थापना करण्यात आली नाही.

1. **राखीव निधी-** वेतन राखीव निधी, कर्जनिवारण निधी, वृक्षसंवर्धन निधी, निवृत्तीवेतन निधी, घसारा निधी या प्रकारच्या विशेष निधीमध्ये विशिष्ट रकमांची खर्च बाजूस तरतूद केली असली तरी अंदाजपत्रकीय प्रत्यक्ष आकडेवारी नुसार सदर निधीमध्ये तरतुदीप्रमाणे रकमा जमा करण्यात आलेल्या नाहीत.



Scanned by CamScanner

(रकमा लाखात)

| निधी | तरतूद | प्रत्यक्ष रक्कम |
|---|---|---|
| वेतन राखीव निधी | 50.00 | निरंक |
| कर्जनिवारण निधी | 5.00 | निरंक |
| घसारा निधी | 10.00 | निरंक |
| वृक्षसंवर्धन निधी | 35.00 | निरंक |
| निवृत्तीवेतन निधी/ग्रॅज्युईटी ई. | 1216.00 | 668.79 |

2. **वृक्षसंवर्धन निधी** - महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 मधील प्रकरण 6, कलम 15, 16 मध्ये शहरातील अस्तित्वात असलेल्या झाडांचे संरक्षण व संवर्धन करणे, नवीन झाडे लावणे यासाठी वृक्ष प्राधिकरण निधीची स्थापना करून त्यामध्ये वृक्षकर, शासनाकडून त्या प्रयोजनासाठी प्राप्त अनुदान व देणग्या यांचा समावेश करण्याची तरतूद आहे. सदर रक्कम मनपाच्या जमेच्या अर्धा टक्क्याच्या आत असल्यास फरकाची रक्कम मनपाने सदर निधीतून जमा करून त्यासाठी मनपाच्या अंदाजपत्रकात तशी तरतूद करणे आवश्यक आहे. सदर निधीमध्ये नागरिकांपासून उपरोक्त करापासून रु.14,44,807/- जमा झाली आहे. अंदाजपत्रकातील क्र. अ ते इ (भाग-1) नुसार प्रत्यक्ष जमा महसूल (अनुदानासह) रु.152,34,66,016/- असून त्याच्या अर्धा टक्के रु. 76,17,330 एवढा निधी वृक्षसंवर्धन निधीमध्ये जमा होणे अपेक्षित होते. परंतु, प्रत्यक्षात नागरिकांपासून रु.14,44,807/- जमा झाल्याने उर्वरित रक्कम रु. 61,72,523/- मनपा निधीतून वृक्ष संवर्धन निधीमध्ये वळविणे आवश्यक होते परंतु तशी कार्यवाही झाली नाही.

3. मनपामार्फत पूर्ण करावयाच्या शासनाच्या भांडवली स्वरूपाच्या योजनांसाठी शासन हिस्सा म्हणून वेळोवेळी अनुदान प्राप्त होत असून त्यास जोडून मनपाच्या हिश्श्याची रक्कम याप्रमाणे 100% निधीची उभारणी होणे कोणत्याही योजनेच्या प्रभावी व परिपूर्ण अंमलबजावणीसाठी आवश्यक असते. परंतु मनपा हिश्श्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आली नाही.

4. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जीइएन- 1093/325/प्र.क्र.24 न.वि. 32, दिनांक 17/04/1993 व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जीइएन- 1093/1198/न.वि.14, दिनांक 17/04/1993 अन्वये महिला व बाल विकास कल्याण करिता 5%, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांकव जीइएन- 1655/ प्र.क्र.46/325/न.वि.33, दिनांक 14/02/2002 अन्वये अपंगाकरीता 3% व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई 32, दिनांक 03 जुलै 1982 अन्वये मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजनेकरिता 5% अर्थसंकल्पात तरतूद करणे आवश्यक आहे. असे असताना अंदाजपत्रकाच्या वरील विविध घटकांच्या विकासासाठी अर्थसंकल्पात नगण्य तरतूद केली असून त्यातून केलेला खर्च त्याहुनही कमी आहे. सन 2013-14 मध्ये अनुदाने वगळून मनपाचा प्रत्यक्ष महसूल



Scanned by CamScanner

रु.53,45,38,867/- (एकूण महसूल अनुदाने) असून त्यानुषंगाने आवश्यक तरतूद, प्रत्यक्ष तरतूद व खर्च तपशील पुढीलप्रमाणे आहे.

(रकमा रुपयात)

| बाब | अपेक्षित खर्चाची तरतूद | प्रत्यक्ष खर्चाची तरतूद | प्रत्यक्ष खर्च | अपेक्षित तरतुदीची प्रत्यक्ष खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| महिला व बाल कल्याणासाठी योजना | 5% म्हणजेच 2,67,26,943 | 5,00,000 | 95,064 | 0.36% |
| अंध व अपंगाचे कल्याणासाठी योजना | 3% म्हणजेच 1,60,36,166 | 10,00,000 | 2,18,245 | 1.36% |
| मागासवर्गीयांसाठी कल्याणासाठी योजना | 5% म्हणजेच 2,67,26,943 | निरंक | निरंक | 0.00% |

वरील तक्त्यावरून शासन निर्देशानुसार सामाजिक घटकांच्या कल्याणकारी योजनांसाठी मनपाने अंदाजपत्रकात योग्य तरतूद व प्रत्यक्ष खर्च केला नाही. सदर बाब अंदाजपत्रकातील गंभीर त्रुटी म्हणून नमूद करता येईल.

2) <u>आर्थिक स्थिती</u>

अंदाजपत्रकातील आकडेवारीनुसार सन 2013-14 अखेर मनपाकडे रु. 125.51 कोटी एवढी रक्कम शिल्लक दिसत असली तरी, विविध शासकीय अनुदानाच्या अखर्चित रकमांचाही त्यात मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. सदर खर्चित रकमा बँकामध्ये विविध गुंतवणुकांच्या स्वरुपात जमा आहे. विविध कर व शुल्काद्वारे प्राप्त महसूल अपेक्षित महसुलाच्या तुलनेत जवळजवळ 100% असला तरी विविध प्रकारच्या कर व शुल्काची आकारणी मनपाने सन 2013-14 मध्ये केली नाही. मालमत्ता कराचे निर्धारण, सर्वेक्षण सुद्धा सन 2013-14 मध्ये झाले नाही. नगररचना विभागाकडूनही विविध शुल्कापोटी अपेक्षित महसूल प्राप्त झालेला नाही.

उपरोक्त बाबी विचारात घेता मनपा चंद्रपूरच्या मिळकतीत अधिक भर पडणे शक्य होते. असे असले तरी मनपाची सन 2013-14 अखेरची आर्थिक स्थिती समाधानकारक असल्याचे दिसून येते.

DATA\WM6901 (Ref No : 60, Hmm No : 92)



Scanned by CamScanner

केला

### 3 वार्षिक लेखे व त्यावरील अहवाल.

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 00**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***मनपाच्या वार्षिक लेख्यातील वित्तीय विवरणपत्र व त्यावरील महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, मनपा आयुक्त व स्थायी समिती यांचे मंजुरीसह अहवाल लेखापरीक्षणास प्रमाणीकरणाकरिता उपलब्ध झाले नाहीत.*** |

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.स्थानिले-1010/प्र.क्र.26-ब/विमाप्रशा, दिनांक 31.3.2011 व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.लेखाप-2016/संक्र 25/नवि-31, दिनांक 18.6.2016 नुसार तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीस अनुसरुन महानगरपालिकाकडील स्थायी समितीने मंजूर केलेले वार्षिक लेखे प्रमाणीकरणासाठी मनपा लेखापरीक्षण विभागाकडे सादर करावयाचे बंधनकारक केले आहे. (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 107-अ)

नॅशनल म्युनिसिपल अकाऊंट मॅन्युअल (NMAM) मधील प्रकरण 31 (31.4 ते 31.8) मध्ये व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 106 (3) मध्ये वार्षिक लेख्यास स्थायी समितीची मंजूरी प्राप्त करणे पर्यन्तची कार्यपध्दती स्पष्ट केली आहे.

या संदर्भाने अर्धसमास पत्र क्र.92, दिनांक 5.7.2016 अन्वये पुढील प्रमाणे वार्षिक लेखे प्रमाणीकरणासाठी सादर करण्याची सूचना मनपा प्रशासनाकडे सादर करण्यात आली होती.

1) Annual financial consisting of statement
   i) Balance Sheet
   ii) Income & Expenditure Statement
   iii) Statement of Cash flows
   iv) Receipts & Payment account
   v) Notes to accounts
   vi) Financial performance indicators
2) Report of Municipal Chief Auditor
3) Municipal Commissioner's Reports on the Annual Financial Statement & the qualifications & comments made in the Report of the Municipal Chief Auditor.
4) Standing Committee's Action Taken Report on Qualification and comments made in the Report of the Municipal Chief Auditor & the report of the Municipal Corporation.

परंतु मनपाचे स्थायी समितीने मंजूर केलेले व त्यांचे ॲक्शन टेकन रिपोर्टसह असलेले पूर्ण वार्षिक



Scanned by CamScanner

लेखे प्रमाणीकरणासाठी उपलब्ध झालेले नाही.

DATABWM6901 (Ref No : 7, Hann No : 92)

4 **अतिरिक्त वजन दर्शवून झालेल्या अतिप्रदानाबाबत.**

**घनकचरा वाहतूक. (स्वच्छता)**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :180 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 34741740.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 32821740.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 79682.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 1840318.00/-

***चंद्रपूर शहरातील घनकचरा वाहतूकीच्या देयकात मोटर वाहन कायद्याचे उल्लंघन करून वाहनाच्या क्षमतेपेक्षा जास्त वजन दाखवून जादा रकमेचे प्रदान झाल्यामुळे मोठ्या रकमेचे मनपा चे नुकसान झाले आहे.***

प्रमाणक क्र. 1824 दिनांक 29.03.2014 रुपये 26,12,406/-
कंत्राटदार – मे. सेंटर फॉर डेव्हलपमेंट कम्युनिकेशन, जयपूर, ब्रांच नागपूर.

चंद्रपूर शहरातील घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम 2000 नुसार घनकचरा वाहतुकीसाठी निविदाधारक मे. सेंटर फॉर डेव्हलपमेंट कम्युनिकेशन, जयपूर, ब्रांच नागपूर यांना क्र. चंश मनपा/आयुक्त/अति/ घकव्य/3397/2014 दि. 02.02.2013 अन्वये कार्यादेश देण्यात आला. त्यानुसार शहरातील तिन्ही झोनअंतर्गत 33 प्रभागातील घनकचरा वाहतूक करून कंपोस्ट डेपो येथे पोचते करण्याच्या कामासाठी मनपाने रकमेचे प्रदान केले.

या कामासाठी कंत्राटदाराने 22 नवीन बंदिस्त वाहने लाऊन उपरोक्त काम केल्याचे नस्तीतील टिपणीत उल्लेखित आहे.

कंत्राटदाराने कामाचे देयक सादर करतांना दिनांक निहाय व वाहन निहाय वजनाचे तक्ते (Gross wt., Tare wt., Net wt.) सादर केले आहेत. त्यातील घनकचऱ्याच्या निव्वळ वजनासाठी रु. 708/- प्रति मेट्रिक टन प्रमाणे वेळोवेळी याप्रमाणे 2013-2014 मध्ये रु. 2.51 कोटी चे प्रदान झाले आहे.

परंतु उपरोक्त वाहनांच्या वजन क्षमतेबाबत स्थानिक उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अभिलेख्यातून त्यांचे पत्र क्र. 5561/मोकवि./उपप्रापका/चंद्र/15 दि. 30.05.2016 अन्वये प्राप्त माहिती प्राप्त केली असता क्षमतेपेक्षा वजन रकमेची अतिरिक्त उचल करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

**(मोटर वाहन कायदा 1988 नुसार) <u>वजन धारण करण्याची</u> क्षमता**

| वाहन क्र. MH34 AB | RLW (Registered Laden weight) in kg | UW (unladen weight) in kg | मालाच्या वाहतुकीसाठी निव्वळ वजन मर्यादा (RLW-UW) |
|---|---|---|---|
| 6326 | 8290 | 4070 | 4180 kg = 4.18 टन |
| 6324 | 8290 | 4090 | 4160 kg = 4.16 टन |
| 6320 | 8290 | 4070 | 4180 kg - 4.18 टन |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 6369 | 2500 | 1290 | 1250 kg = 1.25 टन |

**अतिप्रदानाची परिगणना -**

| वाहतूक व वजन केल्याचा दिनांक | वाहन क्र. MH34 AB | वाहनाची वजन क्षमता | देयकातील वजन (टन) | जादा वजन दर्शविलेला (टन) | अतिप्रदान 708/- प्रती टन रु. |
|---|---|---|---|---|---|
| 01.02.14 | 6369 | 1.250 | 1097 | 0.72 | 510 |
| 01.02.14 | 6369 | 1.250 | 2.25 | 1.00 | 708 |
| 01.02.14 | 6324 | 4.16 | 5.96 | 1.80 | 1274 |
| 01.02.14 | 6326 | 4.18 | 5.32 | 1.14 | 807 |
| 01.02.14 | 6326 | 4.18 | 5.2 | 1.02 | 722 |
| 01.02.14 | 6326 | 4.18 | 5.14 | 0.96 | 680 |
| 01.02.14 | 6326 | 4.18 | 5.19 | 1.01 | 715 |
| 02.02.14 | 6326 | 4.18 | 5.07 | 0.89 | 630 |
| 02.02.14 | 6326 | 4.18 | 4.96 | 0.78 | 552 |
| 02.02.14 | 6326 | 4.18 | 4.9 | 0.72 | 510 |
| 02.02.14 | 6324 | 4.16 | 7.39 | 3.23 | 2287 |
| 03.02.14 | 6324 | 4.16 | 5.91 | 1.75 | 1239 |
| 03.02.14 | 6326 | 4.18 | 6.14 | 1.96 | 1388 |
| 03.02.14 | 6324 | 4.16 | 6.35 | 2.19 | 1551 |
| 03.02.14 | 6326 | 4.18 | 6.32 | 2.14 | 1515 |
| 03.02.14 | 6324 | 4.16 | 5.78 | 1.62 | 1147 |
| 03.02.14 | 6324 | 4.16 | 6.00 | 1.84 | 1303 |
| 03.02.14 | 6326 | 4.18 | 6.92 | 2.74 | 1940 |
| 03.02.14 | 6326 | 4.18 | 6.15 | 1.97 | 1395 |
| 03.02.14 | 6324 | 4.16 | 6.62 | 2.46 | 1742 |
| 04.02.14 | 6324 | 4.16 | 6.39 | 2.23 | 1579 |
| 04.02.14 | 6326 | 4.18 | 6.15 | 1.97 | 1395 |
| 04.02.14 | 6326 | 4.18 | 6.49 | 2.31 | 1635 |
| 04.02.14 | 6324 | 4.16 | 5.14 | 0.98 | 694 |
| 04.02.14 | 6324 | 4.16 | 6.53 | 2.37 | 1678 |
| 05.02.14 | 6324 | 4.16 | 5.25 | 1.09 | 772 |
| 05.02.14 | 6324 | 4.16 | 5.05 | 0.91 | 644 |
| 05.02.14 | 6326 | 4.18 | 5.05 | 0.87 | 616 |
| 05.02.14 | 6326 | 4.18 | 5.43 | 1.25 | 885 |
| 06.02.14 | 6326 | 4.18 | 5.65 | 1.47 | 1041 |
| 06.02.14 | 6326 | 4.18 | 5.96 | 1.78 | 1260 |
| 06.02.14 | 6326 | 4.18 | 5.75 | 1.57 | 1112 |
| 06.02.14 | 6326 | 4.18 | 6.58 | 2.4 | 1699 |
| 06.02.14 | 6324 | 4.16 | 5.39 | 1.23 | 871 |
| 06.02.14 | 6324 | 4.16 | 5.25 | 1.09 | 772 |
| 06.02.14 | 6324 | 4.16 | 5.68 | 1.52 | 1076 |
| 07.02.14 | 6324 | 4.16 | 6.37 | 2.21 | 1565 |
| 07.02.14 | 6324 | 4.16 | 4.6 | 0.44 | 312 |
| 07.02.14 | 6324 | 4.16 | 4.71 | 0.55 | 389 |



Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 07.02.14 | 6326 | 4.18 | 5.59 | 1.41 | 998 |
| 07.02.14 | 6326 | 4.18 | 7.36 | 3.18 | 2251 |
| 08.02.14 | 6326 | 4.18 | 5.25 | 1.07 | 758 |
| 08.02.14 | 6326 | 4.18 | 5.55 | 1.37 | 970 |
| 08.02.14 | 6326 | 4.18 | 5.88 | 1.7 | 1204 |
| 08.02.14 | 6326 | 4.18 | 5.03 | 0.85 | 602 |
| 08.02.14 | 6326 | 4.18 | 5.94 | 1.76 | 1246 |
| 08.02.14 | 6326 | 4.18 | 5.13 | 0.95 | 673 |
| 10.02.14 | 6324 | 4.16 | 6.80 | 2.64 | 1869 |
| 10.02.14 | 6326 | 4.18 | 6.74 | 2.56 | 1812 |
| 10.02.14 | 6326 | 4.18 | 5.26 | 1.08 | 765 |
| 10.02.14 | 6326 | 4.18 | 5.85 | 1.67 | 1182 |
| 10.02.14 | 6326 | 4.18 | 6.54 | 2.36 | 1671 |
| 10.02.14 | 6324 | 4.16 | 5.51 | 1.35 | 956 |
| 12.02.14 | 6324 | 4.16 | 5.80 | 1.64 | 1161 |
| 12.02.14 | 6324 | 4.16 | 5.56 | 1.40 | 991 |
| 12.02.14 | 6324 | 4.16 | 5.20 | 1.04 | 736 |
| 12.02.14 | 6326 | 4.16 | 6.02 | 1.86 | 1317 |
| 12.02.14 | 6326 | 4.18 | 5.94 | 1.76 | 1246 |
| 12.02.14 | 6320 | 4.18 | 6.17 | 1.99 | 1409 |
| 13.02.14 | 6326 | 4.16 | 5.61 | 1.45 | 1027 |
| 13.02.14 | 6326 | 4.16 | 5.02 | 0.86 | 609 |
| 13.02.14 | 6326 | 4.16 | 5.54 | 1.38 | 977 |
| 13.02.14 | 6324 | 4.16 | 6.48 | 2.32 | 1643 |
| 13.02.14 | 6324 | 4.16 | 5.76 | 1.60 | 1133 |
| 14.02.14 | 6326 | 4.18 | 5.79 | 1.61 | 1140 |
| 14.02.14 | 6326 | 4.18 | 5.24 | 1.06 | 750 |
| 14.02.14 | 6326 | 4.18 | 6.42 | 2.24 | 1586 |
| 14.02.14 | 6324 | 4.16 | 5.18 | 1.02 | 722 |
| 14.02.14 | 6324 | 4.16 | 5.42 | 1.26 | 892 |
| 15.02.14 | 6326 | 4.18 | 5.63 | 1.45 | 1027 |
| 15.02.14 | 6326 | 4.18 | 5.21 | 1.03 | 729 |
| 15.02.14 | 6324 | 4.16 | 5.6 | 1.44 | 1020 |
| एकूण | | | | | 79,682 |

माहे फेब्रुवारी 2014 मधील वाहतुकीबाबत वाहन क्र. MH34AB - 6324, 6326 व 6320 संदर्भात सदर महिन्यातील प्रथम 15 दिवसांत वरीलप्रमाणे अंदाजे 80,000/- चे अतिप्रदान झाले आहे. संपूर्ण वर्षात याच दराप्रमाणे परिगणना केल्यास पुढीलप्रमाणे अंदाजित नुकसान झाले असल्याची शक्यता आहे.

1) अतिप्रदानाच्या परीगणनेचा नमुनादाखल कालावधी - 1 ते 15 फेब्रुवारी 2014(15 दिवस)
2) वरील क्र. 1 वरील निदर्शनास आलेले अतिप्रदान - रु. 79,682/- म्हणजे रु. 80,000/- अंदाजे.
3) वरील दराने 30 दिवसांत संभाव्य अतिप्रदान - रु. 80,000 x 2 (महिने) = 1,60,000/-
4) 2013-2014 या वर्षातील संभाव्य अतिप्रदान - रु. 1,60,000 x 12 (महिने) = 19,20,000/-

या संदर्भात अर्धसमास पत्र क्र. 81, दि. 20.06.2016 व 87 दि. 27.06.2016 नुसार विभागास अनुपालन / अभिप्राय सादर करण्यास



Scanned by CamScanner

कळविले होते. तथापि, विभागाकडून कोणतेही समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.
DATABWM6901 (Ref No : 6. Hmm No : 87)

L.B.T

### 5 स्थानिक संस्था कराची आकारणी बांधकामाच्या वास्तविक क्षेत्रफळाप्रमाणे होत नसल्याची अनियमितता.

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
आक्षेपाधीन रक्कम रु. 69456.00/-

***स्थानिक संस्था कराची आकारणी केल्याचे अभिलेखे उपलब्ध न केल्यामुळे स्थानिक संस्था कराची आकारणी बांधकामाच्या वास्तविक क्षेत्रफळाप्रमाणे न केल्याचे स्पष्ट होते. विवरण पत्र स्थानिक संस्था कर विभागाला दर महिन्याच्या 10 तारखेपर्यंत सादर करण्यात येत नाही. नोंदणीकृत बांधकाम व्यावसायिकांची यादी मनपाच्या स्थानिक संस्था कर विभागाकडे उपलब्ध नाही.***

(1) महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम (नगर विकास अधिसूचना क्र.स्था.सं.क.0209/प्र.क्र.65/09/नवि.34, दि.25 मार्च 2010) मधील नियम 9 नुसार महानगरपालिका हद्दीत बांधकाम करण्याचे काम हाती घेणाऱ्या कोणत्याही बांधकाम व्यावसायिक/कंत्राटदारास स्थानिक संस्था कराखाली महानगरपालिकेकडे नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (स्थानिक संस्था कर) मधील नियम 27(4) नुसार, एकतर शहराच्या बांधकामाकरिता किंवा व्यापाराकरिता आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा किंवा अधिनियमामध्ये दिलेल्या मानकांनुसार स्थानिक संस्था कराचे ठोस प्रदान करण्याचा पर्याय सुचविला आहे. चंद्रपूर महानगरपालिका येथे आदेश क्र.-चंशमनपा/स्था.सं.क.वि/1198/12, दि.25 जुलै 2012 नुसार बांधकाम कंत्राटदार यांना बांधकामाची परवानगी देते वेळी बिल्डींग प्लान नुसार बांधकामाच्या क्षेत्रफळाप्रमाणे स्थानिक संस्था कराची आकारणी करणे अनिवार्य केले आहे. त्यानुसार महानगरपालिकेतील नगरविकास विभाग बांधकाम व्यावसायिकांकडून बांधकाम परवानगी शुल्क व स्थानिक संस्था कर एकत्रितपणे पावत्याद्वारे वसूल करीत असल्याचे दिसून आले. परंतु बांधकाम क्षेत्रानुसार अशी वसुली होत असल्याचे अभिलेखे तपासणीस पुरविण्यात आलेले नाही. खाली नमूद बांधकाम कंत्राटदार/ व्यापाऱ्यांकडून माहे मार्च 2014 मध्ये स्थानिक संस्था करापोटी रु.69456/- एवढी रक्कम वसूल झाल्याचे नगर रचना विभागाचे अभिलेख्यावरून दिसून आले. सदर कराची आकारणी



Scanned by CamScanner

बांधकामाच्या वास्तविक क्षेत्रफळाप्रमाणे झाली किंवा कसे हे स्पष्ट होऊ शकले नाही.

| अ.क्र. | पावती क्र. | दिनांक | बांधकाम कंत्राटदार | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1 | 8/722 | 01/03/2014 | रविकांत वा.जक्कुलवार | 8517 |
| 2 | 8/742 | 05/03/2014 | घरकुल कंपनी प्रा.ली. | 44965 |
| 3 | 8/747 | 07/03/2014 | अल्ली अजगर नजमुद्दीन वाला | 15974 |
| एकूण रक्कम | | | | 69456 |

(2) बांधकाम कंत्राटदार/बिल्डर्स यांना मनपाच्या नगररचना विभागाने बांधकामाची परवानगी देते वेळेस स्थानिक संस्था कराची अधिसूचनेत नमूद दरानुसार रक्कम वसूल करून त्याबाबतचे विवरण पत्र मनपाच्या स्थानिक संस्था कर विभागाला दर महिन्याच्या 10 तारखेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. सदर कार्यवाही क्र.-चंशमनपा/स्था.सं.क.वि/1198/12, दि.25 जुलै 2012 नुसार आदेशित केली असतांना सुद्धा विवरणपत्र स्थानिक संस्था कर विभागाला पुरविण्यात येत नसल्याचे कळविण्यात आले.

3) शहरात मोठ्या प्रमाणावर बांधकाम व्यावसायिक आहेत. त्यांच्या एकूण संख्येबाबत महानगरपालिकेने माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. (अर्धसमास पत्र क्र.10, दि. 15/03/2016) परंतु त्यांची स्थानिक संस्था करअंतर्गत नोंदणी झाल्याचे स्थानिक संस्था कर विभागाकडील अभिलेख्यात दिसून आले नाही. त्यांची सदर प्रयोजनाखालील नोंदणी नगररचना विभागाकडे झाली असावी असे स्थानिक संस्था कर विभागातील संबंधित कर्मचाऱ्यांनी लेखापरीक्षणादरम्यान सांगितले. नगररचना विभागाकडे सुद्धा त्यांच्या नोंदणीचा अभिलेख उपलब्ध नाही. यावरून संबंधित बांधकाम व्यावसायिकांना नोंदणीपासून अनियमितपणे मुभा देण्यात आली हे स्पष्ट होते. लेखापरीक्षणाचे दिनांकास स्थानिक संस्था कर बंद असून सदर व्यावसायिक नोंदणी नोंदणी अभावी वार्षिक विवरणपत्रे मनपास सादर करण्यास पूर्वलक्षी प्रभावाने बाध्य नाहीत असे वाटते. परिणामी कर निर्धारणाअभावी बांधकाम परवानगीच्या वेळी निश्चित दराने वसूल झालेल्या स्थानिक संस्था कर व्यतिरिक्त लागू/थकीत स्थानिक संस्था कराची मनपाची हानी झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

उक्त अनियमिततेबाबत संबंधित विभागाला अर्धसमास पत्र क्र.10 दि.15/03/2016 ला निर्गमित करून कळविले असता याबाबतचे अनुपालन अद्याप लेखापरीक्षणास प्राप्त नसल्यामुळे सदरील परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DLFSPPM8501 (Ref No : 13, Hmm No : 10)



Scanned by CamScanner

## ***6 सक्षम प्राधिकरणाची पूर्वमंजुरी न घेता वाढीव कामाचे मुल्यांकन नोंदविण्याची अनियमितता.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :04 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 146827.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 146827.00/-

***सक्षम प्राधिकरणाची पूर्वमंजुरी नसतांना वाढीव कामाचे मुल्यांकन नोंदवून रु.146827 चे नियमबाह्यपणे शोधन केले.***

सन 2013-2014 या वित्तीय वर्षात महानगरपालिकेने विविध निधीमधून केलेली बांधकामे प्राकलनात नमूद असलेल्या परिणामानुसार करण्यांत आलेली नाही. याउलट मोजमाप पुस्तकातील सादर बाबींची पडताळणी केली असता प्राकलनातील परीमाणापेक्षा अधिक परीमाणाची नोंद पुस्तकांत घेऊन मुल्यांकन नोंदविण्यात आले.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका 1984 चे नियम 264 नुसार बांधकामासाठी सक्षम प्राधिकरणाकडून अंदाजाना मंजुरी दिलेली असून मंजुरी मिळालेल्या परिमाणाच्या बांधकामाच्या बाबतीत सक्षम प्रधीकाऱ्याच्या कक्षात येणार नाही असा होणारा जादा खर्च ज्यामध्ये संभव असेल अशी कुठलीही वाढ किंवा बांधकामामधील फेरफार करण्यास वरिष्ठ प्रधीकाऱ्याच्या मंजुरी शिवाय परवानगी देण्यात येवू नये असे असतांना खालील कामाच्या वाढीबाबत सक्षम प्राधिकरणाकडून खर्चाच्या अंदाजांना पूर्वमंजुरी घेण्यात आल्याचे वैध दस्तऐवज प्राप्त केले नसतांना तांत्रिक अधिकाऱ्यांनी वाढीव कामाचे मोजमाप नोंदीनुसार मोजमाप पुस्तकात जादाचे मुल्यांकन नोंदविले आहे. त्यामुळे शासन निधी मधून जादाचा खर्च झाल्याचे दिसून आले. सबब जादा खर्चाची एकूण रक्कम 146827 जबाबदारी निश्चित करून वसूल होणे आवश्यक आहे.

बांधकामाचा तपशील

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रदान | | | प्रकालनातील बाबी | मोजमाप पुस्तकानुसार मुल्यांकन | नियमबाह्य रित्या प्रदानाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्र.क्र | दि | रक्कम | बाब क्र परिमाण दर रक्कम | परिमाण दर रक्कम | 68224 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | अंचलेश्वर प्रभाग बुद्धविहार ते अडगुलवार घर कॉंक्रिट रोड | 31 | 29.03.2014 | 733580 | 3) 80.50*3430= 276123 | 100.39*3430= 344347 | |
| | | | | | 4) 80.50*3951 = 318128 | 100.39*3951 = 78603 | |
| एकुण रुपये | | | | | | | 146827 |

DATBNKM6401 (Ref No : 67, Hmm No : 50)

**7 रस्त्याची लांबी निश्चित असताना त्यामध्ये वाढ दर्शवून कंत्राटदारास अवाजवी प्रदान करण्याबाबत व इतर बाबी.**

**मागासक्षेत्र अनुदान निधी (BRGF)**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 6835261.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5822839.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1012422.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 6835261.00/-

***BRGF अंतर्गत प्रशासकीय व तांत्रिक मान्यताप्राप्त रस्ता बांधकामाच्या प्रस्तावित लांबी पेक्षा अधिक लांबीचे काम दर्शवून रु. 970422/- चा आर्थिक लाभ अनियमितपणे कंत्राटदारास प्रदान करण्यात आला आहे.***

कामाचे नाव - नागपूर रोड ते गजानन मंदिर रस्ता डांबरीकरण व रस्ता डांबरीकरण.
प्रमाणक क्र -2 दि. 30/08/2013 रक्कम - 4248066/- प्रथम धावते देयक
प्रमाणक क्र -10 दि. 06/03/2014 रक्कम - 2587194/- दुसरे व अंतिम देयक

सन 2011-12 या वर्षाकरीता जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचेकडून 100% केंद्रपुरस्कृत योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यतेसह प्राप्त अनुदानातून प्रस्तावित कामासाठी दि.08/12/2012 रोजी दोन वर्तमानपत्राद्वारे रु.7795040/- अंदाजपत्रकीय मूल्याची निविदा प्रसिध्दीत दिल्यानंतर दि.28/12/2012 पर्यंत 7 निविदा प्राप्त झाल्या असून त्या 31/12/2012 रोजी उघडण्यात आल्या. त्यापैकी सर्वात कमी दराची मे. रामा इन्फ्रास्ट्रक्चर यांची (21% कमी दर) निविदा स्विकृत करून दि.31/03/2013 रोजी 3 महिने मुदतीसाठी कार्यादेश देण्यात आला. मुदतीत काम पूर्ण न झाल्यामुळे दि.31/10/2013 पर्यंत मुदतवाढ देण्यात येऊन प्रथम धावते व दुसरे तथा अंतिम देयकान्वये रु.8652229.35 मूल्याचे काम करून कंत्राटदाराच्या 21% कमी दराप्रमाणे रु.6835261/- चे प्रदान करण्यात आले.

**यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.**

1. संबंधित नस्तीत उपलब्ध चंद्रपूर शहराच्या रोड मॅप तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीचे नियम 153



Scanned by CamScanner

नुसार अपेक्षित असल्याप्रमाणे प्रत्यक्ष जागेचे निरीक्षण करून बांधकाम विभागाने तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार प्रस्तावित रस्ता बांधकामाची निश्चित लांबी नागपूर रोड ते गजानन मंदिरपर्यंत 800 मीटर असताना नागपूर रोड ते साई मंदिरपर्यंत एकूण 1833 मीटर लांबीचे (सरासरी रुंदी कमी करून) डांबरीकरण केल्याचे मोजमाप पुस्तकात (क्र.12) नोंदविण्यात आले. परिणामी रु.7423845/- प्राकलित मूल्याच्या कामाऐवजी रु.8652229/- मूल्याचे (16.54% जादा) काम दर्शवून कंत्राटदाराचे निविदा दर (21% कमी) नुसार
रु.6835260/- चे प्रदान करण्यात आले. वास्तविक रु.7423845/- या मूळ प्राकलनानुसार 21% कमी दराप्रमाणे रु.5864838/- चे प्रदान मूळ स्वरुपात अभिप्रेत होते. मूळ अंदाजपत्रकानुसार आवश्यक नसतांना, तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तीकेतील नियम 227 (टीप-3) नुसार वाढीव कामासाठी जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मंजुरी सक्षम तांत्रिक मंजुरी नसतांना ते करण्यात आल्याचे दर्शवून शासकीय निधीचा अपव्यय करून रु. 970422/- (रु.6835260 - रु.5864838) चा अनावश्यक व नियमबाह्य खर्च केल्याने आर्थिक नुकसान झाल्याचे दिसते. ते वसूलपात्र आहे.

**अंदाजित व प्रत्यक्षात झालेल्या कामाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र | बाब | मंजूर अंदाजित परिमाण (m3) | मंजूर दर (रु) | प्रत्यक्षात एम बी मध्ये नोंदविलेले परिमाण | नोंदविलेल्या कामाची टक्केवारी | कमी जादा कामाचे मूल्य (रु) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Providing 80mm metal soling | 2000 | 239 | 1333.63 | 33.31% कमी | 1.39 लक्ष |
| 2 | Providing 40mm metal soling | 6000 | 253.35 | 6369.12 | 6.15% जास्त | 0.93 लक्ष |
| 3 | Providing & laying Net Mix laid Bitumen 50/75 mm ave. Thikness | 450 रस्ता लांबी- 800 m | 8306.75 | 566.16 रस्ता | 25.81% जास्त | 9.65 लाख |
| 4 | Providing & laying HM laid semi-dense Bitumen concrete 25mm thickness | 150 | 10963.25 | 183.01 | 20.00% जास्त | 3.29 लाख |
| 5 | C.C.Pipe | 30 | 1427.30 | 11 | 63.33% कमी | 0.27 लाख |

2. सदर बांधकामातील परिमाणात अंदाजपत्रकापेक्षा प्रचंड तफावत असताना मनपातील कोणत्याही स्तरावरून आक्षेप नोंदविण्यात आल्याचे नस्तीवरून दिसत नाही. कंत्राटदाराचा दर 21% एवढा कमी असल्यामुळे प्रस्तावित व मंजूर लांबीपेक्षा अधिक लांबीचे काम दर्शवून अनियन्त्रितपणे आर्थिक लाभाचे प्रदान झाल्याची शक्यता दिसून येते. बांधकाम सुरु झाल्यावर त्याची वेळोवेळी मोजमाप घेऊन, कामाचे प्रदान करेपर्यंत कोणत्याही स्तरावर आक्षेप नोंदविण्यात आल्याचे दिसून येत नाही त्यामुळे व अंदाजपत्रकातील एकूण 5 पैकी कमी मूल्याच्या बाबीमध्ये बचत दाखवून सर्वात अधिक दर असलेल्या (रु.8306.75 प्रति क्यु मिटर व रु. 10963.25 प्रति क्यु मिटर) बाबींवर अधिक खर्च झाला आहे.

3. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका मधील नियम 150 नुसार स्विकृत निविदा 10% पेक्षा बऱ्याच कमी दराची



Scanned by CamScanner

(21% कमी) असतांना अंदाजपत्रकाची पुनर्मोडणी अर्थात अंदाजपत्रक नव्याने तयार करून जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मान्यता घेणे बंधनकारक असतांना तसेच रु.7423845/- या मूळ अंदाजपत्रकीय मूल्याचे काम रु.5864838/- या रकमेमध्ये कंत्राटदाराने करण्याचे प्रस्तावित केलेल्या कामाची योग्यता निश्चित करण्यासाठी कंत्राटदाराकडून दर पृथःकरण मागविणे अभिप्रेत असतांना त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

4. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली नियम 150 नुसार एकूण पाच बाबींपैकी 4 बाबी 10% पेक्षा कमी अधिक प्रमाणात घट/वाढीच्या दर्शविण्यात आल्याने यास सक्षम मान्यता घेणे आवश्यक होते. परंतु तसे करण्यात आलेले नाही.

5. या कामाच्या प्राप्त तिन्ही निविदा B-1 नमुन्यातील पृष्ट क्र.1 वरील कामाचा तपशील, कंत्राटदाराचे नाव इत्यादी साठीचे क्र.1 ते 13 मध्ये माहिती भरलेली नाही. तसेच अत्यंत महत्वाचे म्हणजे स्विकृत निविदा B-1 नमुन्यातील पृष्ठ क्र.13 वरील विहित ठिकाणी कंत्राटदाराची कमी/जास्त दर नमूद करण्यात आला नसून तिन्ही निविदा प्रपत्रात शेवटी कामाच्या बाबी नमूद असलेले दोन पृष्ठे अनियमितपणे जोडून त्यावर निविदा दरे नमूद करून कंत्राटदार व अधिकाऱ्याच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या आहेत. याप्रमाणे निविदा प्रक्रियेविषयक मार्गदर्शक नियमांचे (महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिशिष्ट-12) तंतोतंत पालन न झाल्याचे दिसून येते.

6. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील नियम 202 टीप-2 नुसार निविदा प्रपत्र विक्री चा अंतीम दिनांक ते निविदा उघडणे ही कार्यवाही एकूण 4 दिवसांचे आत करणे क्रमप्राप्त असताना तसेच निविदा सुचनेमध्ये निविदा सादर करण्याचे अंतीम दिवशीच (28/12/2012) उघडण्यात येतील असे जाहीर केले असतांना तसे न करता विहित मर्यादित वेळेपेक्षा 3 दिवस विलंब करून दि.31/12/2012 रोजी निविदा उघडण्यात आल्या.

7. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका नियम 223 मध्ये कंत्राटदाराच्या शिथिल कारभारामुळे किंवा अपुऱ्या व्यवस्थेमुळे मुदतवाढीची मागणी केल्यास ती मंजूर करू नये असे निर्देशित केले आहे.

सदर कामाचा आदेश 31/03/2013 रोजी (4 महिन्याची मुदत) जारी झाल्यानंतर पावसाळ्याच्या सबबीवर कंत्राटदाराच्या 15/07/2013 च्या अर्जानुसार 06/08/2013 च्या आदेशान्वये 31/10/2013 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. परंतु अंदाजे 62% बांधकाम (प्रथम धावते प्रदानाप्रमाणे) 31/03/2013 ते 07/06/2013 (मोजमाप दिनांक) या कालावधीत व वाढीव कामासह उर्वरित काम 17/09/2013 ते 27/09/2013 या केवळ 10 दिवसात पूर्ण केल्याचे मोजमाप घेण्यात आले.

**कामाचा तपशील व लागलेला कालावधी**

| अ.क्र | बाब | प्रथम धावते देयकानुसार झालेले काम | मोजमाप दि. | कार्यादेश व मागील मोजमापा नंतर लागलेला कालावधी | दुसऱ्या व अंतीम देयकानुसार झालेले काम | मोजमाप दि. | मुदतवाढीनंतर काम पूर्ण करण्यात आलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Providing 80mm metal soling | 1333.63 m3 | 17/04/2013 | 17 दिवस | निरंक | -- | 10 दिवस |
| 2 | Providing | 4540.13 | 07/05/2013 | 20 दिवस | 1829.99 | 17/09/2013 | |



Scanned by CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 40mm metal soling | m2 | | | m2 | | |
| 3 | Providing & laying Net Mix laid Bitumen 50/75 mm ave. Thikness | 331.43 m3 | 24/05/2013 | 18 दिवस | 234.73 m3 | 03/09/2013 | |
| 4 | Providing & laying HM laid semi-dense Bitumen concrete 25mm thickness | 104.41 m3 | 07/06/2013 | 15 दिवस | 78.6 m3 | 27/09/2013 | |
| 5 | C.C.Pipe | 11 m3 | 07/06/2013 | -- | -- | | |
| | | | | 70 दिवस | | | 10 दिवस |

वरील क्र.1 मधील खडीच्या कामात अंदाजपत्रकापेक्षा अनुक्रमे 33.31% बचत दाखवून देखील कार्यादेशाच्या दिनांकापासून 17 दिवस खर्च करण्यात आले. वरील तक्त्याचे निरीक्षण केल्यास प्रथम धावत्या देयकाच्या कामात कंत्राटदाराचे शैथिल्य दिसून येते. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करता आले नाही. असे असतांना वरील नियम 223 चे उल्लंघन करुन मुदतवाढ मंजूर केल्याचे स्पष्ट होते. परिणामी करारनाम्यानुसार 30 दिवस X रु. 500/- व 27 दिवस X रु.1000 याप्रमाणे रु.42000/- विलंबापोटी वसूलपात्र ठरतात.

**वसूलपात्र रु. 1012422/-**

यासंदर्भात जारी केलेले मूळ अर्धसमास क्र.109 दि.28/07/2016 खुलाश्यासह प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

DATABWM6901 (Ref No : 18, Hmm No : 109)

***8 60% काम झाले असताना कंत्राटी मूल्यापेक्षा अधिक मूल्याचे प्रदान करणे.***

**चंद्रपूर शहर पंचशताब्दी योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 02**



Scanned by CamScanner

*लेखा शीर्ष :71 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 15070185.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 397000.00/-

***शहरातील नवीन विकसित भागात पाणी वितरण व्यवस्थेसाठी पाईप लाईन टाकणे या प्रयोजनासाठी शासनाकडून प्रशासकीय मंजुरी प्राप्त 13 कामापैकी मार्च 2014 मध्ये अंतीम प्रदान केलेल्या दोन कामांच्या खर्चाच्या लेखापरीक्षणात त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करणाऱ्या संस्थेने एप्रिल 2014 मध्ये 60% काम झाल्याचा अहवाल दिला असून त्यापूर्वीच मार्च 2014 मध्ये दोन्ही कामांसाठी अधिक मूल्याचे अंतीम प्रदान करण्यात आले.***

(रक्कम रुपयांत)

| अ.क्र | कामाचे नाव | 5% कमी दरानुसार कंत्राटी मूल्य | अंतीम प्रदानासह एकूण प्रदान | जादा खर्च | कामाची अंतीम मुदत | अंतीम प्रदाना पर्यंत विलंब | विलंब शुल्क आकारणी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | साईबाबा पाण्याची टाकी ते वैष्णवी अपार्टमेंट दाताळा रोड पर्यंत पाईपलाईन टाकणे [अंदाजित मूल्य रु. 7015497] | 6664722 | 7502285 (प्र.क्र.8, 6/3/2014 रु.2827739 दुसरे व अंतीम) | 12.56% | 30/04/2013 | 9महिने | निरंक |
| 2. | हनुमान मंदिर ते जगन्नाथ बाबामठ एरिया व महेश्वरी भवन ते महसूल कॉलनी पर्यंत पाईपलाईन | 71008700 | 7567900 (प्र.क्र,7, 06/03/2014 रु.4647280 दुसरे व अंतीम) | 6.57% | 30/04/2013 | 9महिने | निरंक |



Scanned by CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | टाकणे. [अंदाजित मूल्य रु. 7474600] | | | | | | |

चंद्रपूर शहर पंचशताब्दी वर्षानिमित्य शहराचा सर्वांगिण विकास आरखडा अंतर्गत एकूण 13 कामांना जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडून 29/03/2012 च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता व निधीचे वितरण झाले. त्यासाठी निविदा मागविण्यात येऊन सर्व कामासाठी 5% कमी या सर्वात कमी दराच्या मे. उज्वल कन्स्ट्रक्शन, चंद्रपूर यांच्या निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी चार कामांचे 31/10/2012 च्या पत्रान्वये सहा महिन्याच्या मुदतीसाठी आदेश देण्यात आले. त्यानुषंगाने वरील तक्त्याप्रमाणे रकमेचे प्रदान करण्यात आले.

त्यावरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1. उपरोक्त कामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणासाठी मनपाने प्राचार्य, राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय चंद्रपूर यांना मनपातील प्रचलित पध्दतीप्रमाणे दि.26/02/2013 रोजी पत्रे देऊन अहवाल मागविला असता सदर संस्थेने चार कामांचा एकत्रित अहवाल पत्र क्र.RCERT/CIVIL/8812A/2012-13 दि.17/04/2013 अन्वये मनपास सादर केला. सदर अहवालात पुढील निरीक्षण नमूद करण्यात आले.

1. The pipe laying work is 60%completed and trenches are already filled up.
2. Proper bedding according to soil condition is recommended.
3. we verified the pipe length used for pipe laying which are manufactured and certified by jindal saw limited.

उपरोक्त क्र.1) व 2) वरील निरीक्षणावरून 60% काम पूर्ण झाले असताना आवश्यक असलेल्या पूर्णत्वाच्या प्रमाणपत्राशिवाय तक्त्यामधील प्रमाणकान्वये अहवालापूर्वीच कामाचे प्रदान करण्यात आले.

मोजमाप पुस्तिकेतील ( क्र.14,15) मोजमापाच्या नोंदीचे अवलोकन केले असता मोजमाप पुस्तिकेतील विहीत नमुन्याप्रमाणे बंधनकारक असतांना मोजमापाचे दिनांक नमूद केले नाहीत. म्हणजेच प्रत्यक्ष कामाप्रमाणे आवश्यक प्रदान न करता त्रयस्थ लेखापरीक्षण अहवालानुसार प्रत्यक्ष काम पूर्ण होण्यापूर्वीच अंदाजे 40% चे प्रदान आगाऊ करून गंभीर वित्तीय अनियमितता करण्यात आली असल्याची शक्यता आहे.

2. वरील कामांची मुदत सहा महिने म्हणजेच 30/04/2013 पर्यंत असून काम सुरु न केल्याबद्दल मनपाने तक्त्यातील क्र.1 व 2 वरील अनुक्रमे कामे त्वरित सुरु करण्यासाठी दि.1/01/2013 व 22/08/2013 च्या पत्रान्वये सूचित केल्याचे दिसते. यांत काम सुरु करतानाच झालेला विलंब विचारात घेता कंत्राटदाराची



Scanned by CamScanner

उदासीनता दिसून येते याव्यतिरिक्त B-1 निविदा फॉर्म मधील परिच्छेद क्र.6 नुसार कंत्राटदाराने मुदतवाढी\साठी अर्ज करणे, मनपाने मुदतवाढ देणे या विहित प्रक्रियेची मनपाने गंभीर दखल घेतल्याचे अभिलेख्यावरून दिसून येत नाही.

त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण अहवालानुसार एप्रिल 2014 रोजी सुद्धा काम अपूर्ण असतांना (60% काम पूर्ण) मार्च 2013 मध्ये अनियमितपणे अंतीम प्रदान झाले असले तरी करारनाम्यातील दंडाच्या तरतुदीनुसार किमान प्रमाणकाच्या दिनांकापर्यंत विलंब शुल्काची वसुली आवश्यक ठरते. त्याप्रमाणे पुढीलप्रमाणे दंड वसूलपात्र आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| | | विलंब शुल्क | |
| क्र.1 वरील काम | 1/5/2013 ते 06/03/2014 (प्रमाणकाचा दिनांक) | प्रथम एक महिना रु.500 प्रति दिवस | रु.15500 |
| | | त्यापुढे रु.1000 प्रति दिवस | रु.183000 |
| | | | रु.198500 |
| क्र.2 वरील काम | 1/5/2013 ते 06/03/2014 (प्रमाणकाचा दिनांक) | प्रथम एक महिना रु.500 प्रति दिवस | रु.15500 |
| | | त्यापुढे रु.1000 प्रति दिवस | रु.183000 |
| एकूण विलंब शुल्क | | | रु.397000 |

DATABWM6901 (Ref No : 19, Hmm No : 112)

9 ***एकाच कामाचे दोन वेगळया रकमांचे प्रथम व धावते देयक मंजूर सादर करणे व त्यापैकी मोठ्या रकमेचे देयक मंजूर होणेबाबत.***

**नागरोत्थान महाअभियान योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :346 शासन व मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 837276.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 592930.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 244346.00/-



Scanned by CamScanner

***नस्तीवरील टिपणीद्वारे रु. 592930/- मूल्याचे प्रथम व अंतीम देयक मुख्य लेखापरीक्षकाकडे तपासणी साठी पाठविण्याच्या आयुक्तांच्या सुचनेनंतर देयक बदलून रु. 837276/- मूल्याचे त्याच कामाचे प्रथम व अंतीम देयक सादर व तयार करुन अंतिमतः प्रदान करण्यात आले.***

प्रमाणक क्रमांक – 48, दिनांक - 25/03/2014, रक्कम - 837276/-

महाराष्ट्र नागरोत्थान महाअभियानांतर्गत एकोरी प्रभागातील एकविरा मंदिरामागे व समस्कल दर्गा भागात विविध ठिकाणी कॉंक्रीट रोड बांधकामाचे मूळ प्राकलन मूल्य रु.769000/- होते. सदर कामाचा आदेश दि.01/06/2013 रोजी मे.ए.आर.वैरागडे यांना (15.9% कमी दराप्रमाणे) देण्यात आला.

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1. नस्तीमधील दि.19/03/2014 च्या शहर अभियंता यांच्या टिपणीनुसार रु.592930/- मूल्याचे उपरोक्त कामाचे प्रथम व अंतिम देयक आयुक्तांकडे मंजुरी सादर करण्यात आले. त्यावर आयुक्तांनी दि.24/03/2014 रोजी सदर देयकाची तपासणी महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकाकडून करवून घेण्याचे निर्देश दिले. परंतु त्यानंतर दि.26/03/2014 रोजीच्या टिपणीन्वये त्याच कामाचे मूल्य रु.244346/- वाढवून रु.837276/- चे प्रथम व अंतीम देयक (एम.बी.मध्ये नोंद आहे.) मंजुरीस मुख्य लेखापरीक्षक व आयुक्तांकडे सादर करण्यात आले. या देयकाच्या प्रदानास दि.27/03/2014 रोजी मंजुरी प्राप्त झाली. परंतु 19/03/2014 ते 26/03/2014 या कालावधीत अंतीम प्रदानाची कार्यवाही सुरु असतांना कामाचे मूल्य रु.244346/- इतके वाढण्याबाबत सदर नस्तीमध्ये खुलासा करण्यात आलेला नाही. कंत्राटदाराच्या निविदा दराप्रमाणे रु.769000 (-) 122271 (15.9% कमी) = रु.646729/- इतके कामाचे अपेक्षित मूल्य असतांना प्रथम 592930/- चे देयक तयार करणे व नंतर कंत्राटदाराचे दर व मूळ प्राकलन मुल्यापेक्षाही जास्त मूल्याचे काम झाल्याचे दर्शविणे ही बाब नियमसंगत नाही. अर्थात रु. 244346/- चे प्रदान अतिरिक्त व संशयास्पद वाटते.

2. सदर कामाची मुदत तीन महिने असतांना ते केव्हा पूर्ण झाले यांचे प्रमाणपत्र उपलब्ध नाही. तसेच मोजमाप पुस्तक (क्र.53) मध्ये नोंदींचा दिनांक नमूद नाही. शहर अभियंता यांच्या दि. 19/03/2014 च्या टिपणीनुसार काम पूर्ण झाले असे दिसत असले तरी ते विहित मुदतीचे आत पूर्ण झाले नसल्याची शक्यता वाटते. असे असल्यास करारनाम्याप्रमाणे विलंब शुल्क लागू होतो. यासंदर्भात अतिशय मोघम पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे असे दिसते. परिणामी करारनाम्यातील मुदतीच्या अटीचा भंग होऊन कंत्राटदारास अवाजवी मुभा देण्यात आली असण्याची शक्यता आहे. त्याची तपासणी करून विलंब शुल्क वसूल व्हावे.



Scanned by CamScanner

यासंदर्भात जारी करण्यात आलेल्या अर्धसमास क्र.24 दि. 07/04/2016 चे अनुषंगाने अभिप्राय प्राप्त न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATABWM6901 (RefNo : 22, Hmm No : 24)

लेखापरीक्षण 17

***10 कामाच्या निविदा ई-टेंडरींगद्वारे न मागविल्यामुळे निविदा पद्धतीत पारदर्शकता व निकोप स्पर्धेचा अभाव असणेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : 00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 93I*

गुंतलेली रक्कम रु. 274007345.00 /-

***राज्य शासनाने दिनांक 19 जानेवारी 2013 च्या शासन निर्णयान्वये लागु केलेल्या ई-टेंडरींग पद्धतीचा महानगरपालिकेने अवलंब न केल्याने निविदा पद्धतीत सुटसुटीतपणा, पारदर्शकता व निकोप स्पर्धा या महत्वाच्या उपयोगितांचा अभाव राहिल्याची शक्यता आहे.***

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.मातंसं/2010/प्र.क्र.34/39, दिनांक 6 ऑगस्ट 2010 अन्वये महाराष्ट्र राज्यात निविदा प्रक्रियेचे महत्व लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या ई-गव्हर्नंस कार्यक्रमांतर्गत ई-टेंडरींग हा मिशन मोड प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आला होता.

विकासात्मक कामे, सेवा, वस्तूंची खरेदी यावर प्रचंड खर्च होत असल्यामुळे निविदा प्रक्रियेत पारदर्शकता, सुटसुटीतपणा व निकोप स्पर्धेस वाव मिळावा म्हणून सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मातंस/नस्ती 2012/प्र.क्र.273/39 दिनांक 19 जानेवारी 2013 अन्वये शासनाच्या इतर विभागास महानगरपालिकांनाही ई-टेंडरींगच्या सेवा शासनाने उपलब्ध करुन दिल्या होत्या.

सदर दिनांक 19 जानेवारी 2013 च्या शासन निर्णयान्वये रु. 10.00 लाख किंवा त्यापेक्षा अधिक मूल्याच्या निविदांसाठी दिनांक 01 फेब्रुवारी 2013 पासून ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करण्याचे निर्देश जारी करण्यात आले होते.

महानगरपालिका चंद्रपूर येथे सन 2013-14 मध्ये विविध शासकीय योजनांखाली प्राप्त अनुदानातून खर्च करण्यात आला (रु. 27,40,07,345/- अंदाजपत्रकीय आकडेवारीनुसार). यापैकी मंजूर असलेले प्रत्येक काम रु. 10.00 लाख पेक्षा अधिक मूल्याचे असल्यामुळे शासकीय निर्देशाप्रमाणे ई-निविदा प्रसिध्द करण्यापेक्षा वर्तमानपत्राद्वारे निविदा सूचना



Scanned by CamScanner

प्रसिद्ध करून कंत्राटदारांकडून प्रत्यक्ष लिफाफा पद्धतीने निविदा प्राप्त करण्यात आल्यामुळे वरील निर्देशांचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते.

त्यामुळे प्रचलित निविदा पद्धतीत पारदर्शकता, सुटसुटीतपणा व निकोप स्पर्धा परिपूर्ण होते असे नमूद करता येणार नाही. यासंदर्भात अर्धसमास पत्र क्र. 27 दि. 11.04.2016 अन्वये महानगरपालिका प्रशासनाचे अभिप्राय व खुलासा मागविण्यात आला होता परंतु तो प्राप्त न झाल्यामुळे महानगरपालिकेतील प्रचलित निविदा पद्धतीवर आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATABWM6901 (Ref No : 20, Hum No : 27)

# 11 मोजमाप नोंदवह्यांमधील त्रुट्याबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 08**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 93*

***मोजमाप नोंदवह्यांमधील नोंदी अतिशय मोघमपणे घेण्यात येत असून त्यात पारदर्शकपणा दिसून येत नाही. परिणामी कोट्यावधीच्या बांधकामांच्या नोंदीच्या व प्रत्यक्ष कामाबाबत संदिग्धता निर्माण होण्यास वाव आहे.***

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकामधील परिशिष्ट 24 मध्ये मोजमाप नोंदवह्या ठेवण्यासंबंधी नियम मांडण्यात आले आहेत. मनपा चंद्रपूर कडून शासन अनुदान व मनपा निधीतून कोट्यावधी रकमांचे रस्ता व इतर बांधकाम करण्यात येत असून प्रत्येक कामाच्या नोंदी काटेकोरपणे घेणे अत्यावश्यक आहे.

मोजमाप नोंदवह्या न्यायालयात पुरावा म्हणून दाखल कराव्या लागण्याची शक्यता असल्यामुळे त्या अतिशय महत्वाचे लेखाविषयक अभिलेख म्हणून समजण्यात याव्यात आणि अत्यंत काळजीपूर्वक, व्यवस्थितपणे व अचूकपणे ठेवण्याचे निर्देश नियम 5 अन्वये देण्यात आले आहेत.

असे असतांना त्यासंबंधी पुढील त्रुट्या निदर्शनास आल्या आहेत –

1. मोजमापा संबंधीचे देयक तयार केल्यानंतर मोजमापे नमूद असलेले प्रत्येक पृष्ठ लाल शाईतील एका कर्णरेषेद्वारे खोडलेले नाहीत (नियम 13).

2. देयक पारित झाल्यानंतर व त्याचे प्रदान झाल्यानंतर सदर मोजमापे लाल शाईतील दुसऱ्या कर्णरेषेद्वारे खोडलेल्या नाहीत (नियम 15).

3. मोजमापाशी संबंधित प्रदान झाल्यानंतर त्यावर प्रमाणक क्रमांक व दिनांक नोंदविले नाहीत. (नियम 15).



Scanned by CamScanner

4. झालेल्या बांधकामाचे त्यावेळी मोजमाप घेतले जात नाही. अर्थात बांधकामाचे मोजमाप शेवटी एकत्रितपणे धावते देयकनिहाय न घेता वेळोवेळी घेणे आवश्यक आहे. रस्ता बांधकामातील जी कामे झाकली जाण्याची व अंतिम स्वरूप देतेवेळी तपशीलवार मोजमापांसाठी उपलब्ध होत नसल्याची शक्यता (उदा. रस्त्याचे विविध स्तर) आहे, ती कामे झाकली जाण्यापूर्वीच नोंदविणे आवश्यक आहे. (नियम 11) मोजमापाची तारीख स्वाक्षरीसह नोंदविण्यात येत नाही. पाणीपुरवठा संदर्भातील पाईपलाईन टाकण्याचे व इतर संबंधित कामाची मोजमापे पाणीपुरवठा विभागातील अभियंत्याकडून नोंदविली किंवा तपासली जात नाहीत.

5. मोजमाप नोंदवहीमध्ये कार्यारंभ आदेश क्रमांक, काम पूर्ण केल्याची तारीख, करारनाम्याचा संदर्भ इत्यादी आवश्यक बाबी नोंदविण्यात येत नाही. ( नियम 8 (1) )

6. मोजमाप नोंदवह्यांची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. (नियम 6) परिणामी काही नोंदवह्यांना सारखे क्रमांक देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिशिष्ट 10 (3) नुसार सर्वसाधारण मोजमाप नोंदवह्यांना क्रमांक देण्यात येऊन त्याची नोंद विभागीय नोंदवहीमध्ये करावयाची आहे. परंतु त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे मोजमाप पुस्तक क्रमांक 64,62 व 29 ह्या मोजमाप पुस्तकांचे क्रमांक इतर मोजमाप पुस्तकांस देण्यात आले आहेत. म्हणजे क्र. 64, 62 व 29 ह्या क्रमांकाचे प्रत्येकी 2 मोजमाप पुस्तके तयार केली आहेत. (DATBNKM6401)

7. मोजमापांच्या पृष्ठावर काही स्वाक्षऱ्या आढळतात परंतु त्या कोणत्या प्राधीकाऱ्याच्या आहेत ते नमूद करण्यात येत नाही. कंत्राटदारांची स्वाक्षरी आवश्यक (नियम 12) असतांना ती घेतली किंवा कसे हे समजून येत नाही.

8. मोजमापांच्या नोंदींच्या विशिष्ठ टक्केवारीत तपासणीची तरतूद नियम 11 मध्ये करण्यात आलेली असतांना तसे करण्यात येत नाही.

उपरोक्त त्रुट्या विचारात घेतल्यास कोट्यावधीच्या कामात प्रशासनाचे स्तरावरून गंभीरता, पारदर्शकपणा व नियमसंगत आवश्यक काटेकोरपणा पाळला जात नाही हे नमूद करता येते.

DATABWM6901 (Ref No : 33, Hrum No : 115)

8/12/2017

***12 अतंर्गत भरतीप्रक्रियेव्दारे निवड करण्यात आलेल्या आरोग्य निरिक्षकास शासन अधिसुचना दिनांक 22.04.2009 च्या परि.8 मधील जोडपत्र-3 चा चुकीचा लाभ देवून वेतन निश्चिती करताना झालेले अतिप्रदानाबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : 113 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 81180.00 /-



Scanned by CamScanner

Chandrapur (M Corp.)

**नगरपरिषदच्या नियमित सेवेत असलेल्या श्री. उदय ग. मैलारपवार सफाई कुली यांना अंतर्गत भरतीव्दारे आरोग्य निरीक्षक या पदावर निवड केल्यावर महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय दिनांक 22.04.2009 च्या नियम 8 मधील जोडपत्र-3 नुसार नविन पदाच्या वेतन श्रेणी रु 5200-20200 ग्रेड पे 2400 मध्ये वेतननिश्चिती करण्यात आल्याने संबंधीतास अतिप्रदान झाले आहे.**

श्री. उदय ग. मैलारपवार यांची नगर परिषद , चंद्रपूर यांचे आदेश क्र. नप/नुली/साप्रअ/103/98 दिनांक 22.02.1998 अन्वये सफाई कुली या पदावर वेतनश्रेणी रु. 2550-55-2660-60-3200 मध्ये प्रथम नियुक्ती झाली असून ते दिनांक 01.01.1999 ला मध्यान्हपूर्व रुजू झाले. चंद्रपूर नगर परिषद , सर्वसाधारण सभा ठराव क्र. 43 दिनांक 28.10.2010 च्या अनुषंगाने त्यांची अंतर्गत भरतीव्दारे नगर परिषद, चंद्रपूर यांचे आदेश क्र. चंनपामु.अ./साप्रअ/1/10 दि. 06.04.2010 अन्वये वेतन श्रेणी रु. 5200-20200 ग्रेड पे 2400 मध्ये दि. 07.04.2010 पासून आरोग्य निरीक्षक पदावर अंतर्गत भरती प्रक्रियेव्दारे निवड करण्यात आली. यावरील लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत-

1. महाराष्ट्र शासन वित्त विभाग मुंबई अधिसूचना क्र. वेपुर/1209/प्र.क्र.27/सेवा-9 दिनांक 22/04/2009 मधील परिच्छेद 8 जोडपत्र -3 चा लाभ दिनांक 01 जानेवारी 2006 किंवा त्यानंतर सरळ सेवेने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना देय आहे. श्री. उदय ग. मैलारपवार, आरोग्य निरीक्षक यांची मुळ नियुक्ती 01.01.1999 ची असून ते दिनांक 07.04.2010 ला वेतन श्रेणी 4440-7440 ग्रेड पे 1300 मध्ये रु. 6380/- वेतन घेत होते. पदाच्या जबाबदारीत वाढ होत असली तरी सेवेत नियुक्ती दिनांक 01 जानेवारी 2006 पूर्वीची असल्याने जोडपत्र - 3 लागू होणार नाही. परंतु सदर प्रकरणी श्री. मैलारपवार यांची नवीन पदावरील दिनांक 07.04.2010 ची नियुक्ती सरळ सेवेव्दारे प्रारंभिक पदावर झाली नसल्याने वरील नियमाचा लाभ देय नसून दिनांक 07.04.2010 रोजी करण्यात आलेली वेतननिश्चिती चुकीची ठरते.

संबंधीताच्या नवीन पदावरील नियुक्तीमुळे जबाबदारीत , कर्तव्यात वाढ झाली असल्यामुळे म. ना. से. (सुधारित वेतन) नियम 2008 मधील नियम 3 नुसार 3% वेतनवाढीचा लाभ देवून दिनांक 07.04.2010 रोजी पुनर्वेतननिश्चिती करुन त्या दिनांकापासून आजतागायत झालेल्या अतिप्रदानाची वसूली क्रमप्राप्त ठरते.

दिनांक 07.04.2010 ला जुन्या पदावरील रु. 4440-7440 ग्रेड वेतन रु. 1300 या वेतन श्रेणीतील
वेतन - रु. 6,380/-
अंतर्गत भरतीव्दारे निवडीचे पद - आरोग्य निरीक्षक.
रुजू दिनांक - 07.04.2010.
नवीन पदाची वेतन श्रेणी - रु. 5200-20200 ग्रेड पे रु.2400.

| कालावधी | देण्यात आलेले वेतन + ग्रेड पे. + घर भाडे भत्ता | देय असलेले वेतन + ग्रेड पे. + घर भाडे भत्ता | वसुलपात्र रक्कम |
|---|---|---|---|
| 07.04.10 ते 30.06.10 | 7510 + 2400 + 991 = 10901 | 6610 + 2400 + 901 =9911 | 990 x 2 महिने 24 दिवस =2772 |
| 01.07.10 ते 30.06.11 | 7510 + 2400 + 991 =10901 | 6610 + 2400 + 901 =9911 | 990 x 12 महिने = 11880 |
| 01.07.11 ते 30.06.12 | 7810 + 2400 + 1021 =11231 | 6880 + 2400 + 928 =10208 | 1023 x 12 महिने = 12276 |
| 01.07.12 ते 30.06.13 | 8120 + 2400 + 1052 =11572 | 7160 + 2400 + 956 =10516 | 1056 x 12 महिने = 12672 |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 01.07.13 ते 30.06.14 | 8440 + 2400 + 1084 =11924 | 7450 + 2400 + 985 =10835 | 1089 x 12 महिने = 13068 |
| 01.07.14 ते 30.06.15 | 8770 + 2400 + 1117 =12287 | 7750 + 2400 + 1015 =11165 | 1122 x 12 महिने = 13464 |
| 01.07.15 ते 30.06.16 | 9110 + 2400 + 1151 =12661 | 8060+ 2400 + 1046 =11506 | 1155 x 12 महिने = 13860 |
| 01.07.16 ते 31.07.16 | 9460 + 2400 + 1186 =13046 | 8380+ 2400 + 1078 =11858 | 1188 x 1 महिना = 1188 |
| | | | |
| | | एकूण | 81180/- |

(टिप - 1.कर्मचाऱ्यांचे कर्तव्य व जबाबदारीत वाढ होत असल्याचे गृहीत धरून रकाना क्र. 3 मधील वेतन निश्चिती म.ना.से. (वेतन) 1981 चे नियम 11(1) नुसार करण्यात आली आहे. सदर वाढीबाबत मनपाचे स्तरावर खात्री करावी. 2. दि.01.08.2016 चे पुढील कालावधीनंतरची परिगणना मनपाने करावी.)

2. महाराष्ट्र शासन नगरपालिका प्रशासन संचालनालय , मुंबई यांचे परिपत्रक क्र. नपप्रसं/2006 /स्व.नि/ प्र.क्र.277/2006/24 दिनांक 25 एप्रिल 2006 अन्वये अंतर्गत भरती करतांना स्थायी आदेश क्र. 23 तसेच आकृतिबंधात नमूद अटींचे काटेकोरपणे पालन करणेबाबत निर्देश आहेत. आरोग्य निरीक्षक या पदासाठी अंतर्गत भरतीसाठी आरोग्य निरीक्षकाचे अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रशिक्षण उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र श्री. उदय ग. मैलारपवार यांचे अंतर्गत भरती प्रक्रिया दिनांकास उपलब्ध असल्याचे आढळून आले नाही. तेव्हा नगर परिषद संचालनालय मुंबई यांचे स्थायी आदेश क्र. 23-अ अन्वये निर्देशाचे पालन झाले नसल्याचे दिसून येते.

3. श्री. उदय ग. मैलारपवार सफाई कुली हे 5 व्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी रु. 2550-55-2660-60-3200 या वेतन श्रेणीत दि. 01.01.2008 ला रु. 3080/- वेतन घेत होते. म. ना. से. वेतन 1981 नियम 39 अन्वये दि. 01.01.2009 ला वार्षिक वेतनवाढ मंजूर करताना (रु. 3050+60) रु. 3140/- एवढे मूळ वेतन देय असतांना रु. 3180/- वेतनवाढ मंजूर करण्यात आली. परिणामी रु. 40/- मूळ वेतनात अतिप्रदान झाले. तेव्हा दि. 01.01.2009 ते 31.12.2009 या कालावधीकरिता रु. 40 x 12 = 480 + महागाई भत्ता तसेच इतर भत्त्यासह वसुली करणे क्रमप्राप्त ठरते.

उपरोक्त दोन्ही प्रकरणी वसुलीची कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

DATDUBM6401 (Ref No : 53, Hmm No : 103)

***13 श्री. नामदेव बा. राउत यांना ग्रंथपाल पदावर अंतर्गत भरती प्रक्रियेव्दारे नियुक्त देतांना तसेच त्यांनी परिक्षा कालावधीमध्ये उपभोगलेल्या रजेची नोंद सेवा पुस्तकात न घेणे इत्यादीबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 04**



Scanned by CamScanner

*लेखा शीर्ष : 234   मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***श्री. नामदेव बा. राउत ग्रंथपाल सध्या कार्यरत प्रभाग अधिकारी झोन क्र. 1 यांना महानगरपालिके अंतर्गत भरती प्रक्रियेव्दारे ग्रंथपाल पदासाठी पुरेसा अनुभव नसतांना अनुभवाची अट शिथील करुन नियुक्ती करण्यात आली. तसेच उक्त कर्मचारी यांनी सेवेत कार्यरत असतांना विविध परिक्षेला हजर होण्यासाठी त्या कालावधीत रजा उपभोगल्या असून रजेच्या नोंदी सेवा पुस्तकात घेण्यात आल्या नाही*** |

चंद्रपूर नगर परिषदेच्या आस्थापनेवर मंजुर केलेल्या दिनांक 17.12.2005 च्या आकृतीबंधानुसार नगर परिषदेच्या आस्थापनेवर सहा. ग्रंथपाल व ग्रंथपालाचे प्रत्येकी एक पद मंजुर आहे. ग्रंथपाल हे पद भरण्याकरीता शैक्षणिक अर्हता, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रमाणपत्र व सहायक ग्रंथपाल पदावर 12 वर्षाचा अनुभव आवश्यक असतांना शासन आदेशाची अवहेलना करुन नियमबाह्यपणे ग्रंथपाल पदावर पदोन्नती देण्यात आली.

1. श्री. नामदेव बा. राउत यांची नगर परिषद , चंद्रपूर यांचे आदेश क्रं. चनप/मुली/आस्था /602/83 दिनांक 31.03.1983 अन्वये शिपाई पदावर नियुक्ती करण्यात आली असून ते दिनांक 01.04.1983 ला नगर परिषदेत सेवेत रुजू झाले. त्यानंतर शासन निर्णय सामान्य प्रशासन दिनांक 08.06.1995 नुसार नगर परिषद चंद्रपूर यांचे आदेश क्रं. चनप/नुअ/सापअ/161/1999 अन्वये वेतन श्रेणी रु. 950-20-1150 EB 25-1500 मध्ये दिनांक 01.04.1995 पासून कालबध्द पदोन्नतीचा लाभ देण्यात आला. रु. 1150/- वरील दक्षता रोध मजूर केल्याची नोंद सेवा पुस्तकात नाही. म.ना.से. (वेतन)नियम 1981 मधील नियम 37 नुसार सक्षम प्राधिकारी दक्षता रोध मंजूर करणार नाही तोपर्यंत वेतनवाढ देय ठरत नाही, असे असतांना पुढील वेतनवाढीचे लाभ अदा करण्यात आले. दक्षतारोध मंजूरीशिवाय देण्यात आलेल्या वेतनवाढीमुळे पुढील वेतनवाढी प्रभावित होत असल्याने 5 व्या वेतन आयोगानुसार केलेली वेतननिश्चिती चुकीची ठरते.

2. श्री. नामदेव बा. राउत यांना दिनांक 01.04.1995 ला कालबध्द पदोन्नतीची वेतनश्रेणी लागू केलेल्या पदावर नियमित पदोन्नतीचे आदेश न काढता नगर परिषद चंद्रपूरने अंतर्गत भरती प्रक्रियेव्दारे आदेश क्रं. चनप/नुअ/सापअ/95/10 दिनांक 05.03.2010 अन्वये 5 वे आयोगानुसार वेतनश्रेणी रु. 3200-4900 मध्ये सहाय्यक ग्रंथपाल पदावर पदस्थापना दिली.

श्री. नामदेव बा. राउत शिपाई यांना सहा. ग्रंथपाल पदावर अंतर्गत भरतीने नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात एक वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पुर्ण केल्यानंतर नियमित करण्याचे अटीवर नियुक्ती देण्यात आली होती. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पुर्ण केल्यास तसे सक्षम प्राधिका-यांने आदेश काढले असल्यास पुढील वेतनवाढी देय आहे. परंतु या आदेशाबाबतची नोंद सेवापुस्तकात आढळून आली नाही. असे असतांनासुध्दा वेतनवाढी मंजुर करुन वेतन अदा करण्यात आले.

3. श्री. नामदेव बा. राउत सहा. ग्रंथपाल यांना ग्रंथपाल पदावर चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूर यांचा आदेश क्रं. चंशमनपा/सापअ/464/14/दिनांक 21.05.2014 अन्वये वेतनश्रेणी रु. 9300-34800 ग्रेड पे- 4300 मध्ये पदोन्नती देण्यात आली आहे. नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांच्या प्रस्तावित सुधारित आकृतीबंधास आदेश क्रं. नपप्रसं/2005/6/32 सीएच/1/प्रलंबित/पदनि/प्रक्रं.877/2005/का-24 दिनांक 17.12.2005 अन्वये मंजुरी दिली असून त्यात ग्रंथपाल पदावर पदोन्नती देताना सहाय्यक ग्रंथपाल पदावरील 12 वर्षाचा अनुभव तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेचे एल जि एस परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. परंतु श्री. नामदेव राउत सहा. ग्रंथपाल यांना सहा. ग्रंथपाल पदावर 4 वर्ष 2 महिने एवढाच अनुभव असतांना तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेची एलजिएस परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र



Scanned by CamScanner

नसतांना ग्रंथपाल पदावर पदोन्नती देण्यात आली. ग्रंथपाल पदासाठी पदोन्नतीचे निकष पुर्ण होत नसतांना शासन आदेशातील तरतूदीचे पालन न करता दिलेली पदोन्नती नियमबाह्य आहे.

4. श्री. नामदेव बा. राऊत सहा. ग्रंथपाल यांनी स्थायी समिती सभा दिनांक 11.07.1995 चे ठराव क्रं. 26 अन्वये लायब्ररी सायन्स परिक्षेकरीता बसण्यास अनुमती दिल्यानुसार उक्त कर्मचा-याने लायब्ररी सायन्स परिक्षा 11.01.1996 ला उत्तीर्ण केली असुन सदर परिक्षेला उपस्थित असल्याने परिक्षा कालावधीत घेतलेल्या रजेची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही. तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठ नाशिकची बॅचलर ऑफ लायब्ररी सायन्स परिक्षा मे-2000 मध्ये व Master of Library & Information Science ची परीक्षा गुरु युनिव्हर्सिटी, बिलासपूर (छत्तिसगढ) येथून दिनांक 12.09.2003 ला उत्तीर्ण केली असून परीक्षेला उपस्थित कालावधीमध्ये घेतलेल्या रजेची नोंद सेवापुस्तकात घेतली नाही. तेव्हा परिक्षा कालावधीमध्ये अनुपस्थिती दरम्यानची रजा एकुण रजेतून कमी करुन रजा लेखा अद्यावत करण्यात यावा.

DATDIJBM6401 (Ref No : 57, Hmm No : 103)

सर्वसाधारण

## 14 बि. ओ. टी. तत्वावरील पाणीपुरवठा योजनेच्या कराराचा भंग करुन नागरिकांना पाणी पुरवठयाची सोय उपलब्ध न करणे व मनपाचे आर्थिक नुकसानीच्या संभावनेबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष : 111 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 93 ड*

गुंतलेली रक्कम रु. 18100000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 16700.00/-

***महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन परिपत्रक क्रं. नापापु-1001/प्र.क्रं.503/पापु22 दिनांक 12 जून 2001 चे निकषानुसार चंद्रपूर शहर महानगरपालिका अंतर्गत नागरिकांना पाणीपुरवठा करणे याकरीता पाणीपुरवठा योजना खाजगी कंत्राटदार मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. चंद्रपूर यांना BOT तत्वावर देण्यात आली. परंतु शासनाने निश्चित केलेल्या निकषानुसार कार्यवाही न झाल्याने मनपा निधीची झालेली आर्थिक हानी तसेच करारात नमुद अटी व शर्तीची पूर्तता न करणे, मनपा कार्यालयास देय असलेल्या रकमा विलंबाने भरणे, विलंब कालावधीसाठी नियमानुसार व्याज वसूल न करणे ईत्यादी प्रकरणी अनियमितता आवळून येते.***

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 189 (2) (क) अन्वये चंद्रपूर शहर महानगर पाणीपुरवठा योजना मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. यांना सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. 17 दिनांक 18.08.2011 अन्वये निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्याने (नस्तीत नमूद) रु. 181.00 लक्षचा करार करण्यात आला असून मनपा चंद्रपूर यांचे पत्र क्र. चंमपा/पापुवी/11/1767 दि. 28.09.2011 अन्वये पाणीपुरवठा योजना मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. चंद्रपूर यांना दिनांक 01.10.2011 पासून हस्तांतरीत करण्यात आली. सन 2013-14 चे लेखापरीक्षणादरम्यान उपलब्ध झालेल्या अभिलेख्याची



Scanned by CamScanner

पडताळणी केली असता सदर प्रकरणी अनियमितता झाल्याचे आढळून आले. सदर योजनेंतर्गत मनपाचे संबंधित
कंत्राटदारावर नियंत्रण नसल्याने कंत्राटदारास करारातील तरतुदींचा भंग करण्यास वाव मिळाला असे दिसते.

**यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.**

1. पूर्वीचे कंत्राटदार मे.गुरुकृपा असोसिएटस अँड कं. प्रा.लि. चंद्रपूर यांचेशी दि. 23.02.2004 ते 30.09.2011 या
कालावधीपर्यंत चंद्रपूर शहरास पाणीपुरवठा करणेबाबत करार करण्यात आला होता. परंतु संबंधीत कंत्राटदाराने कराराचा
कालावधी पूर्ण न करताच शहरास माहे सप्टेंबर - 2011 पाणीपुरवठा करणे बंद केले. कंत्राटदाराने निविदेतील अटी व
शर्तींची पूर्तता केली नाही व कराराचा भंग केला. कंत्राटदाराने कराराचा भंग केल्या प्रकरणी त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही
करून दंड वसूल केल्याचे आढळून आले नाही, तसेच पूर्वीच्या कंत्राटदारास सुरक्षा ठेव परत करण्यात आली असल्याचे
अर्धसमास पत्राच्या उत्तरात कळविले आहे. कराराचा भंग केल्याने सुरक्षा ठेव रक्कम जप्त करणे आवश्यक होते, परंतु
तशी कार्यवाही करण्यात आली नसल्याने मनपा निधीची हानी झाली असल्याचे दिसते.

2. . मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. चंद्रपूर यांना सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. 17 दिनांक 18.08.2011 अन्वये मंजुरी दिल्यानुसार दिनांक 01.10.2011 पासून पाणीपुरवठा योजना बि.ओ.टी. तत्वावर हस्तांतरीत करण्यात आली. कंत्राटदाराने पाणीपुरवठा योजना प्रकरणी निविदेत नमूद अटी व शर्तींची पूर्तता करण्यात आली असे नमूद असले तरी संबंधीत कंत्राटदाराची निविदा मंजूर करतांना निविदेतील अटी व शर्तींची पूर्तता केल्याप्रकरणी लिफाफा क्र. 1 सोबत जोडण्यात आलेले दस्तऐवजामध्ये पाणीपुरवठा योजनेसंबंधी कंत्राटदारास पाणीपुरवठा करणेबाबत पूर्वानुभव इत्यादीच्या प्रती तपासणीस उपलब्ध झाल्या नाहीत.

3. मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. यांनी दि. 01.04.2011 पूर्वीच्या तसेच दि. 01.10.2011 पर्यंतच्या मनपास वसूल करावयाची पाणीपट्टी कराची थकबाकी रक्कम कंत्राटदाराने वसूल केली परंतु मनपा कार्यालयाकडे जमा केलेली नाही, असे अभिलेख्यावरून निदर्शनास आले. या प्रकरणी अर्धसमास पत्र क्र.86 दिनांक 27.06.2016 मधील मुद्दा क्रं. 4 अन्वये विचारणा केली असता, सदर माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे कळविले. याबाबतचा तपशील उपलब्ध करून देण्यात आला नसल्याने पडताळणी करता आली नाही.

4. उक्त कंत्राटदार यांना पाणीपुरवठा योजना दि. 01.10.2011 ला हस्तांतरीत करण्यात आली. करारनाम्यातील अट क्र. 112 नुसार दर तीन वर्षांनी 10% पाणीपट्टी करात वाढ करण्याबाबत नमूद असतांना सर्वसाधारण सभेची दरवाढ प्रकरणी मान्यता नसताना कंत्राटदाराने स्वतःचे अधिकारात सन 2013 मध्ये पाणी करात वाढ करून कराराचे उल्लंघन केले असून नागरिकांकडून जादा दराने पाणीपट्टी कर वसूल केला. वाढीव पाणीपट्टी करापोटी कंत्राटदाराने किती पाणीपट्टी कर वसुल केला याबाबत अर्धसमास पत्रातील मुद्दा क्रं. 5 अन्वये विचारणा केली असता याबाबत झालेल्या कार्यवाहीची नस्ती उपलब्ध नाही असे कळविले. कंत्राटदाराने कराराचा भंग केल्याने त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करून दंड वसुल करणे आवश्यक होते, परंतु तशी कार्यवाही करण्यात आली नाही. याप्रकरणी अंतर्गत लेखापरिक्षण करून जादा वसुल करण्यात आलेला पाणीपट्टी कराची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

5. करारनाम्यातील अट क्रं. 16 नुसार कंत्राटदाराने प्रत्येक वर्षी 1.50 कि. मी. नविन पाईप लाईन टाकणेबाबत करारनाम्यात नमुद आहे. कंत्राटदाराने दिनांक 01.10.2011 नंतर 5 वर्षामध्ये किती कि.मी. नविन पाईप लाईन टाकली, याबाबत अभिलेख्यात काहीही नमुद नाही. तसेच चंशमनपा/पापूवि-2015/3025 दिनांक 15.01.2015 चे पत्रातील मुद्दा क्रं. 31 नुसार कंत्राटदाराने वर्षनिहाय किती पाईप लाईन टाकली, याबाबत कंत्राटदाराने माहिती पुरविली नाही असे नमुद आहे.



Scanned by CamScanner

उक्त पाईपलाईन मनपाची मालमत्ता असल्यामुळे त्याची माहिती मनपाकडे असणे व त्याची नोंद मोजमापासह मोजमाप पुस्तकात असणे अत्यावश्यक होते. पर्यायाने प्रत्यक्षात अट क्र.16 नुसार प्रत्येक वर्षी विहित काम झाले नसल्याचीही शक्यता आहे. नागरीकांना पाण्याची सोय उपलब्ध करण्यासाठी पाईपलाईन टाकण्याचे कामावर मनपाचे दुर्लक्ष होणे अतिशय गंभीर व आर्थिक हानीची शक्यता दर्शविणारी बाब आहे, असे दिसून येते.

6. <u>मुद्रांक शुल्काचा कमी दराने भरणा करणे</u> - ( कराराची रक्कम रु. 1,81,00,000/- )

मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. यांना चंद्रपूर शहरासाठी पाणी पुरवठा योजना दिनांक 01.10.2011 पासून 10 वर्षासाठी बि. ओ. टी. तत्वावर चालविण्यासाठी रु. 1,81,00,000/- लक्षचा करार करून हस्तांतरीत करण्यात आली. मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. यांनी करारनामा रु. 500/- चे मुद्रांक शुल्कावर सादर केला. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 नुसार मुद्रांक शुल्क प्रथम रु.10 लक्षसाठी रु. 100/- व पुढील प्रत्येक एक लक्षास रु. 100/- प्रमाणे मुद्रांक शुल्क भरणेबाबत तरतूद आहे.

मे. उज्वल कन्स्ट्रक्शन कं. लि. यांनी रु. 181 लक्ष करीता रु. 17200/- चे मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक असताना रु.500/- च्या मुद्रांकावर करारनामा केल्याने रु. 16700/- इतक्या रकमेची महाराष्ट्र शासनाची महसूल हानी झाली. सदर रकमेची वसूली करून राज्य शासनाच्या खाती जमा करावी.

DATDH:BM6401 (Ref No : 40, Hmm No : 86)

मार वि

***15 स्वच्छतेची सेवा पुरविण्यासाठी सेवाशुल्क न आकारल्यामुळे मनपा निधीवरील प्रचंड आर्थिक बोजाबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :180 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 55113734.00 /-

***चंद्रपूर शहर महानगरपालिकेने शहरातील कचरा गोळा करून त्याची डम्पिंग यार्ड पर्यंत वाहतूक करण्यासाठी 2013-2014 मध्ये एकूण रु. 5,51,13,734/- एवढा खर्च केला असून ही सेवा देण्यासाठी महानगरपालिकेने 321428 एवढी लोकसंख्या, 62745 एवढे मालमत्ता धारक तसेच 6619 व्यावसायिक प्रतिष्ठाने व 74 दवाखाने यांचेकडून कोणत्याही प्रकारचे सेवाशुल्काची आकारणी केली नसल्यामुळे स्वच्छतेवरील खर्चाचा संपुर्ण बोजा महानगरपालिकेवर पडला आहे.***

चंद्रपूर शहरातील 321428 या लोकसंख्येच्या दृष्टीने सन 2011-2012 मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार 100 ते 130 मेट्रीक टन एवढा घनकचरा गृहीत धरून कचरा गोळा करून वाहतूक करण्यासाठी निवडक महिन्यातील प्रमाणक क्र. 1678,



Scanned by CamScanner

दि. 15/03/2014 रु.27,44,240/- व प्रमाणक क्र. 1824, दि. 29/03/2014 रु. 26,12,406/- यासह 2013-2014 मध्ये एकूण रु. 5,51,13,734/- एवढा खर्च कंत्राटदारास प्रदानासाठी करण्यात आला.

यावर अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत –

1) चंद्रपूर शहरात एकूण 62745 मालमत्ता असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 137 अन्वये महानगरपालिका देत असलेल्या सेवेबाबत करयोग्य मूल्यावर सर्व मालमत्ता धारकांकडून 5% सफाई शुल्क आकारणे आवश्यक आहे. परंतु तशी अर्थसंकल्पात तरतूद केलेली नसून आकारणीबाबत धोरणात्मक निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे सफाईवरील खर्चाचा ताण मनपा निधीवर पडला आहे असे दिसते.

2) शहरातील 98 प्रकारच्या व्यवसायांचे एकूण 6619 व्यावसायिक प्रतिष्ठानांना सुद्धा महानगरपालिका स्वच्छतेबाबत सेवा पुरवित असल्यामुळे त्यांचेकडूनही पुरेसे शुल्क घेणे आवश्यक असतांना त्यांचेकडून पुढीलप्रमाणे नाममात्र शुल्क आकारण्यात येत आहे.

| अ. क्र. | व्यवसाय | वार्षिक शुल्क दर | एकूण व्यवसायिकांची संख्या | प्राप्त होऊ शकणारे अंदाजित एकूण शुल्क |
|---|---|---|---|---|
| 1 | हॉटेल | 500/- | 226 | 1,13,000/- |
| 2 | बार अँड रेस्टॉरंट | 2,000/- | 55 | 1,10,000/- |
| 3 | पिठाची गिरणी | 500/- | 319 | 1,59,500/- |
| 4 | आईस फॅक्टरी | 1,000/- | 3 | 3,000/- |
| 5 | आरा मशीन | 1,000/- | 19 | 19,000/- |
| 6 | कोल डेपो | 1,500/- | 1 | 1,500/- |
| 7 | मटन/चिकन शॉप | 500/- | 178 | 89,000/- |
| 8 | राईस मिल | 500/- | 8 | 4,000/- |
| | | | एकूण | 4,99,000/- |

उपरोक्त संदर्भात जारी केलेल्या अर्धसमास पत्र क्र. 5, दि. 18/02/2016 चे अनुषंगाने माहिती प्राप्त झाली नसली तरी प्रत्यक्षात अर्थसंकल्पीय आकडेवारीनुसार या शुल्कापोटी जमा निरंक आहे. वरील शुल्काचे पृथ:करण केल्यास मासिक शुल्क हॉटेल रु. 166.66, मटन/चिकन शॉप रु.41.66 एवढे नगण्य असल्याचे लक्षात येते. या शुल्कामध्ये वाढीची प्रचंड संभावना असून शुल्क आकारणी न केलेल्या इतर 6611 (6619 – 8) प्रतिष्ठानाकडून उचित शुल्क वसूल केल्यास कचरा वाहतुकीवरील खर्चाचा मनपा निधीतील ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल. यासंदर्भात मनपाने अर्थसंकल्पीय तरतुदीसह ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.

3) हॉस्पीटल मधून सुद्धा जैविक कचरा निघत असून घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी अधिनियम 2000 नुसार त्याची स्वतंत्रपणे विल्हेवाट लावणे आवश्यक ठरते. सदर सेवा घनकचरा वाहतुकीअंतर्गत येत असल्यामुळे दवाखान्यांकडून मुंबई नर्सिंग होम रजिस्ट्रेशन कायदा 1949 व महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग शासन अधिसूचना दि. 15/01/2005 नुसार रु. 50 ते 100 वार्षिक नोंदणी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 375 ते 386 नुसार प्रती बेड रु. 300/- मसुदा परवाना वार्षिक फी आकारून मिळणाऱ्या उत्पन्नातून व स्वतंत्र सफाई शुल्क आकारून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून स्वच्छतेकरिता येणाऱ्या खर्चाची तुट भरुन काढता येऊ शकते. तथापी, धोरणात्मक निर्णय घेऊन अर्थसंकल्पात तशी तरतूद करण्यात आलेली नाही.

4) चंद्रपूर शहरात अर्थसंकल्पीय प्रस्तावानुसार 1000 ते 1500 फेरीवाले व्यवसाय करीत असून त्यापैकी 700 ते 800 फिरते, 500 स्थायी व 50 ते 100 दोन्ही गटातील आहेत. त्यांचेकडूनही निघणारा कचरा मनपा उचलत असल्यामुळे



Scanned by CamScanner

त्यांचेकडूनही घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 2000 मधील तरतुदीच्या अनुषंगाने सेवा शुल्क वसूल करणे आवश्यक आहे. परंतु 2013-2014 या वर्षात त्यांची नोंदणी व शुल्क आकारणी करण्यात आलेली नाही.

घनकचरा अधिनियमानुसार घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी कचरा निर्माण करणाऱ्याची असतांना त्यांचेकडून कचरा उचलण्याच्या कामासाठी मनपाने सेवाशुल्क आकारणे नियमानुसार आवश्यक आहे. याबाबत उचित कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

DATABWM6901 (Ref No : 10. Hmm No : 05)



Scanned by CamScanner

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान



Scanned by CamScanner

**16 जनतेकडून प्राप्त महसुलातून बेजबाबदारपणे खर्च करण्याबाबत.**

**सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण - 2011**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष :313 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 180392.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 180392.00/-

***स्थानिक बाजारातील प्रचलित घाऊक दर विचारात न घेता 2,69,243/- एवढ्या प्रचंड संख्येतील छायाप्रतींसाठी रु 0.67 या अत्याधिक दराने छायाप्रतीवर रु 180392/- एवढा खर्च करून महसुलाचा अपव्यय करण्यात आला.***

प्रमाणक क्र. 1952 दिनांक-29/03/2014 रु. 180392

सदर प्रमाणक तपासतांना सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण -2011 या कार्यक्रमांतर्गत प्रारुप यादी तयार करण्यासाठी स्थानिक फर्म करून 269243 एवढ्या प्रचंड संख्येत छायाप्रती काढण्यात येऊन त्यावर प्रत्येकी छायाप्रतीसाठी रु.0.67/- एवढ्या अवास्तव दराने प्रदान करण्यात आले, असे उपरोक्त प्रमाणकावरून दिसून येते.

यावरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) या खर्चाची मूळ नस्ती सादर करण्यास तसेच महसुलाचा अपव्यय करणाऱ्या सदर खर्चाबाबत अभिप्राय अर्धसमास पत्र क्र. 43 दि. 12/05/2016 अन्वये मागविले असता त्याचे अनुपालन करण्यात आले नाही. त्यामुळे सदर रकमेचे खोटे देयके सादर करून रु.180392/- ची उचल करून अपहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) सर्वसाधारणपणे स्थानिक बाजारात 50 ते 100 छायाप्रती काढण्याचा घाऊक दर रु.0.50/- किंवा त्यापेक्षा कमी असतांना दोन लाखाच्या वरील प्रतींसाठी रु.0.67/- हा दर निश्चितच अवाजवी व मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम 58 नुसार वित्तीय औचित्याचे उल्लंघन करणारा आहे. याबाबत दरपत्रके किंवा निविदा प्राप्त करण्यात आले किंवा कसे हे नस्ती उपलब्ध न केल्यामुळे स्पष्ट झाले नाही. तथापि, उपरोक्त दरनिश्चिती गंभीरपणे करण्यात आली नाही हे दिसून येते.

3) DGS & D rate contract no. DCMOM-EB/IT-3/RC-



Scanned by CamScanner

D10Q0000/0614/83/02589/2020 Date-21 october 2013 नुसार Canon multifunction iR 2002 DADF फोटोकॉपिअर यंत्राची सदर खर्चाच्या कालावधीत किंमत रु. 42862.82 होती. (संदर्भ: www.dgsnd.into/product) उपरोक्त खर्चाच्या किंमतीमध्ये शासन दर करारामधील किमान मूल्यानुसार एकूण 4 नवीन छायाप्रति मशीन्सची खरेदी करता आली असती व पर्यायाने सदर मशीन्समुळे मनपाच्या मालमत्तेत उचित भर पडली असती असे प्रचलित शासन दर करारावरून लक्षात येते.

यासंदर्भात आयुक्त मनपा यांचे अभिप्राय प्राप्त नसल्यामुळे रु.180392/- हा खर्च तात्पुरता अमान्य करण्यात येत आहे.

DATABWM6901 (Ref No : 9, Hmm No : 43)

लेखा

***17 सन 2013-14 या आर्थिक वर्षात बँकांमध्ये गुंतविण्यात आलेल्या मुदती ठेवीवर बँकेने कमी व्याज दिल्याबाबत तसेच बँकेत मुदती ठेवी गुंतवणूकीचे पध्दतीबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
आक्षेपाधीन रक्कम रु. 41904.00/-

***सन 2013-14 या आर्थिक वर्षात मनपा चंद्रपूर शहरने बँकांमध्ये गुंतविण्यांत आलेल्या मुदती ठेवीवर बँकेने कमी व्याज आकारुन मनपाचे आर्थिक नुकसान केलेले आहे. तसेच मनपाद्वारे बँकांमध्ये मुदती ठेवी ठेवणेकरीता सिलबंद दरपत्रके न मागविता खुल्या स्वरुपात दरपत्रके मागविण्यात येतात. त्यामुळे स्पर्धात्मक दराबाबत शंका निर्माण होते.***

चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूरने सन 2013-14 या आर्थिक वर्षात विविध बँकेत महानरगरपालिका निधी व इतर निधींची रक्कम मुदती ठेवी स्वरुपात गुंतविली आहे . सदर मुदती ठेवी विविध बँकात गुंतवतांना महानगरपालिकेने व्याजदराबाबत सिलबंद दरपत्रके न मागविता खुल्या स्वरुपात बँकांचे व्याज दर मागविण्यात आल्याचे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते . स्पर्धात्मक दर प्राप्त होण्याकरिता स्थानिक बँकांकडून सिलबंद दरपत्रके मागविणे आवश्यक आहे . तसेच मागविण्यात आलेल्या दरपत्रकांमध्ये मुदती ठेवी दरासह मनपाद्वारे मुदतपूर्व बंद करण्यात आलेल्या ठेवींसंबंधी व्याज दर किती राहील . याबाबत अटी व शर्ती मागविण्यात न आल्यामुळे बँकेद्वारे मुदतपूर्व बंद करण्यात आलेल्या ठेवीवर कमी व्याज आकारुन महानगरपालिकेचे आर्थिक



Scanned by CamScanner

नुकसान झाल्याची शक्यता आहे.

याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :

(रकमा रुपयात)

| अ. क्र. | योजनेचे नांव | बँकेचे नांव व FD No. | व्याजाचा दर | कालावधी | गुंतवलेली रक्कम | व्याजाची अपेक्षित रक्कम | मुदती नंतरची रक्कम | मुदतपूर्व ठेव अदा केल्याचा दिनांक | बँकेने दिलेले व्याज | कमी दिलेले व्याज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) |
| 1 | नागरी दलितेतर वस्ती विकास सुधार योजना | बँक ऑफ बडोदा, चंद्रपूर FDR No. 982421 | 9.05% | 1 वर्ष दिनांक 1.11,2013 ते 8.11,2014 | 7600000 | 711496 | 8311496 | 13.12.2013 | 24049 | 41904 (9.05% [illegible]) |
| | | | | | | | | | | |

सदर ठेव ही जरी 1 वर्ष कालावधीकरिता बँकेमध्ये ठेवण्यात आली असली तरी महानगरपालिकेच्या निकडीनुसार ती मुदतपूर्व म्हणजेच दिनांक 13.12.2013 रोजी 35 दिवसांनी बंद करण्यात आली. सदर मुदतीसाठी ठेवीवर 9.05% व्याजदराने 35 दिवसांकरिता एकूण रु.65953/- व्याज देणे आवश्यक होते. परंतु बँकेने वरील तक्त्यात नमुद केल्यानुसार फक्त रु.24049/- व्याज दिलेले आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे रु.41904/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे. एवढया मोठया रकमा बँकेत गुंतवणूक करतांना मुदतपूर्व प्रकरणांतील ठेवीचा दर दरपत्रकातील अटी व शर्तीमध्ये नमुद असणे आवश्यक होते.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 35, दि.29.4.2016 तसेच 84 दि. 20/06/2016 नुसार विभागास अनुपालन / अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून कोणतेही समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATDSTM7301 (Ref No : 5, Hmm No : 84)

## 18 कर विभागातील सर्वसाधारण अनियमितता व कामकाजातील त्रुट्यामुळे मनपा महसुलाची हानी होत असल्याबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष :01 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| ***मालमत्ता कर हा मनपाच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असताना त्यांचे निर्धारण, आकारणी व वसुली यामध्ये पारदर्शकता प्रभावी अंमलबजावणीचा अभाव दिसतो. नगररचना बांधकाम विभागाशी कर विभागाचा समन्वय दिसून येत नाही. अधिनियमात तरतूद असलेल्या काही कराच्या आकारणीकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.*** |



Scanned by CamScanner

मनपा चंद्रपूरमधील कर विभाग सर्वात जास्त महसूल देणारा विभाग असून सन 2013-14 मधील कर व दर, विविध अधिनियमाअंतर्गत वसुली, मिळकतीचे उत्पन्न व संकीर्ण जमा यातून मिळालेल्या एकूण रु. या उत्पन्नापैकी रु.534538867/- उत्पन्नापैकी मालमत्ता कराद्वारे रु.80950328/- एवढे शासनास जमायोग्य कर वगळून 15.14% उत्पन्न कराद्वारे प्राप्त झाले आहे असे अंदाजपत्रकावरून दिसते. असे असले तरी कर आकारणी व वसुलीची झोन स्तरावर होणाऱ्या प्रत्यक्ष कार्यवाहीवर मनपाच्या कर विभागाकडे नियमितपणे एकत्रित माहिती उपलब्ध होत नसून त्यायोगे या प्रक्रियेत उचित व प्रभावी नियंत्रणाचा अभाव असल्याचे अर्धसमास क्र.104, दि.20.07.2016 वरील प्राप्त अभिप्रायावरून दिसून आले. नवीन बांधकामावर कराची आकारणी करण्यासंबंधाने कर विभाग व नगररचना / बांधकाम विभागांमध्ये समन्वय आढळून येत नाही.

यासंदर्भाने पुढील त्रुट्या निदर्शनास येतात.

1) अ)- नगररचना विभागाने परवानगी दिलेल्या बांधकामांपैकी विशिष्ट वर्षात किती बांधकामे प्रत्यक्षात पूर्ण झाली याची माहिती कर विभागाकडे उपलब्ध असणे कर आकारणीच्या अनुषंगाने अत्यावश्यक आहे. परंतु नगररचना विभाग पूर्णत्वाचे प्रमाणपत्र जारी करत नसल्यामुळे नगररचना व कर या दोन्ही विभागाकडे ती माहिती उपलब्ध नाही.

ब)- याशिवाय विनापरवानगी बांधकामाची प्रकरणे मनपा क्षेत्रात नझुल व झोपडपट्टी क्षेत्रात ही असण्याची शक्यता आहे. या अवैध बांधकामाची सर्वेक्षण होत असल्याचे दिसून आले नाही.

क)- वरील दोन्ही प्रकरणात (परवानगी प्राप्त व अवैध) बांधकामाची संख्या निश्चित होत नसल्यामुळे कर विभागाने उपलब्ध केलेल्या तपशीलात चालू वर्षातील पूर्ण झालेली बांधकामे व कर विभागाने गृहीत धरलेल्या नवीन मालमत्तांच्या संख्येचा मेळ घालता येत नाही. त्यामुळे बऱ्याच मालमत्ता वर्षानुवर्षे कराच्या कक्षेतून बाहेर असण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुढील काळात मालमत्तांची खाजगीकरणाद्वारे सर्वेक्षण करून संख्या निश्चित केली असता लेखापरीक्षण वर्षापूर्वी सदर त्रुटी असल्याची शक्यता आहे.

ड)- नगररचना विभागाने स्विकृत केलेल्या बांधकामाच्या नकाशाप्रमाणे मंजूर क्षेत्राच्या अनुषंगाने विशिष्ट मालमत्तेवर कराची आकारणी होण्यासाठी कर निरीक्षकाने मालमत्ता धारकाकडील मंजूर / स्विकृत नकाशाची प्रत तपासणे जरुरी आहे. ते नसल्यास सदरचे बांधकाम अवैध या सदरात मोडते. अशा अवैध दुप्पट बांधकामांवर मालमत्ता कर आकारता येतो. परंतु कर विभागाकडे अशा अवैध बांधकाम झालेल्या एकाही प्रकरणाची नोंद नाही असे अर्धसमासावरील (मुद्दा क्र.4) अभिप्रायावरून दिसते. सर्वेक्षणात असे एकही प्रकरण आढळून आले नसल्यास तसे कर विभाग / कर निरीक्षकांनी प्रमाणित करून अनुपालन करावे.

2) कर विभागाने पुरविलेल्या विवरणानुसार सन 2013-14 मध्ये एकूण 801 मालमत्तांची भर



Scanned by CamScanner

पडली आहे असे दिसते. परंतु अर्धसमास क्र.104 अन्वये प्रकरणांची संख्या व कर निर्धारण / आकारणीच्या नस्त्या लेखापरीक्षणास तपासणीसाठी उपलब्ध करण्याची सूचना दिली असता कर विभागाने झोन स्तरावर तसे निर्देश जारी केल्याचे अभिप्रायात नमूद केले. प्रत्यक्षात त्याची पूर्तता होण्याबाबत गंभीरता दाखविण्यात आली नाही. यावरुन कर निर्धारण व आकारणी अचूकपणे होत असल्याची खात्री होत नाही. अशा प्रकरणात मोठ्या प्रमाणावरील मालमत्ता कराच्या महसुलाची हानी होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) मालमत्तावरील कर निर्धारणासंबंधात मागणी नोंदवहीचे अवलोकन केले असता त्यामध्ये मालमत्तेचा प्रकार नोंदविलेला नाही असे दिसते. रहिवासी भाडेकरु असलेली रहिवासी मालमत्ता, व्यावसायिक मालमत्ता व इतर प्रकारामध्ये मालमत्ता आकारणीचे दर वेगवेगळे आहेत. रहिवासी मालमत्तांचे प्रकरणी एकही इमारतीमध्ये भाडेकरु व त्याप्रमाणे कराची स्वतंत्र आकारणी करण्यात आली नाही असे समजते. याची तपशीलवार तपासणी होणे अत्यंत आवश्यक आहे. त्याअभावी मालमत्ता कराच्या चुकीच्या आकारणीमुळे महसुलाची हानी संभवते.

4) ऑक्टोबर 2011 मध्ये नगरपरिषदचे मनपामध्ये रुपांतर झाल्यानंतर मालमत्ता धारक, कर मागणी, वसुली ई. तपशील इलेक्ट्रॉनिक पद्धतीने बॅकलॉग एन्ट्रीसह ठेवण्यासाठी ई-गव्हर्नन्स अंतर्गत खाजगीकरण करण्यात आले होते असे दिसून आले. त्यामुळे मानवी पद्धतीने मागणी व वसुली नोंदवही (डिमांड रजिस्टर) ठेवण्यात आलेले नाही. परंतु सन 2013-14 चे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ठेवलेला तपशील (डाटा) मनपाकडे उपलब्ध नाही असे समजते. सदरचा डाटा पुनर्जीवित होऊन अभिलेख्यावर ठेवणे व त्याचा नंतर उपलब्ध असलेल्या तपशिलाशी मेळ घालून अचूकता प्रमाणित होणे आर्थिकदृष्ट्या गरजेचे आहे.

5) <u>खुल्या भूखंडावर शुल्क आकारणी</u> - स्थायी समिती ठराव क्र.142, दि.18.02.2013 अन्वये शहरातील खुल्या भूखंडांवर वस्तीच्या प्रकारानुसार आकारावयाच्या शुल्क दरांना मंजुरी देण्यात आली होती. परंतु सन 2013-14 मध्ये ठरावानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. परिणामी वसुली निरंक आहे. अशा खुल्या भूखंडाची संख्या मनपाकडे उपलब्ध नसावी असे कर विभागाच्या अभिप्रायावरुन दिसून येते. यामुळे मनपा मोठया महसुलापासून वंचित आहे, याशिवाय अशा खुल्या भूखंडावरील कचरा घाण इत्यादीमुळे उद्भवणाऱ्या रोगराईवरील खर्चाचे दायित्व मनपावर येऊ शकते. सदर तुट टाळण्यासाठी थकबाकीसह शुल्क वसुली करुन अनुपालन दर्शवावे.

6) <u>पाणीपुरवठा लाभ कर</u> - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 129 नुसार नळाद्वारे पाणीपुरवठा होत नसलेल्या जनतेला इतर माध्यमातून पाण्याची सोय उपलब्ध करुन देत असल्यामुळे विशिष्ट दराने पाणीपुरवठा लाभ कर आकारता येतो. मनपा चंद्रपूरच्या काही क्षेत्रात मोठया प्रमाणावर टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा केला जात आहे. त्यासाठी इंधन, इतर बाबींवर मोठा खर्च होत असताना अधिनियमातील सदर तरतुदीकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. (सन 2014-15 - सदर बाब सन 2013-14 व 2014-15 च्या सुधारित मूळ अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आली



Scanned by CamScanner

असतानाही सन 2014-15 मध्ये वसुली निरंक आहे.)

7) <u>वृक्षकर</u> - वृक्षकर महाराष्ट्र नागरी क्षेत्र वृक्ष संवर्धन अधिनियम 1975 चे कलम 18(1) नुसार 1% वृक्षकर आकाराने आवश्यक असताना 0.5% दराने आकारला जात आहे. 0.5% दराने सन 2013-14 मध्ये रु. 1444807 ची वसुली झाली असून तेवढ्याच महसुलापासून मनपा वंचित आहे. याच दरानुसार सन 2010-11 ते 2013-14 पर्यंत एकूण रु.4773747/- एवढा कर वसूलपात्र आहे.

DATABWM6901 (Ref No : 79, Hmm No : 104)

***19 उचित समर्थनाशिवाय (Justification) जाहिरातीचे खाजगीकरणास अर्थसंकल्पीय सभेने स्थगिती दिल्यामुळे व प्रशासनाने विखंडनाच्या प्रस्तावाचा पाठपुरवठा न केल्यामुळे महसुलात प्रचंड नुकसान होणेबाबत.***

**<u>जाहिरातीचे खाजगीकरण</u>**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :04 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2050000.00 /-

***जाहिरात कराचे उत्पन्न वाढवून अवैध जाहिरातीस प्रतिबंध घालण्यासाठी खाजगीकरणाच्या मान्य धोरणास अर्थसंकल्पीय सभेने स्थगिती दिल्याने स्थायी समितीने मंजूर केलेल्या निविदेनुसार तीन वर्षात अपेक्षित रु. 66,80,500/- च्या उत्पन्नावर मनपाचे नुकसान झाले आहे. तसेच सदर स्थगितीच्या ठरावास विखंडित करण्याच्या प्रस्तावाबाबत मनपाने शासनाकडे लेखापरीक्षणाचे दिनांकापर्यंत पाठपुरवठा केला नाही.***

मनपा हद्दीमध्ये होर्डिंग, बोर्ड, बॅनर इत्यादी वर खाजगी जाहिराती साठी मनपातर्फे शुल्क आकारणी करून अल्प प्रमाणात उत्पन्न प्राप्त करण्यात येत होते. अंदाजपत्रकीय आकडेवारीप्रमाणे मागील वर्षातील प्रत्यक्ष उत्पन्न पुढीलप्रमाणे होते.

सन 2010-11 – 71,435/-

सन 2011-12 – 73,532/-

सन 2012-13 – 1,78,018/-

या उत्पन्नात वाढ होण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. 16 दि. 20.07.2012 अन्वये खाजगीकरणाचे धोरणास मंजुरी देण्यात येऊन स्थायी समितीच्या ठराव क्र. 58 दि. 07.11.2012 अन्वये निविदा आमंत्रित करण्यासाठी वार्षिक रु. 19,42,350/- ही देकार रक्कम ठरविण्यात आली. त्याअनुषंगाने दि. 28.01.2013 ते 20.02.2013 या कालावधीत तीन वेळा निविदा जाहिरात प्रसिद्ध करून मे. कन्सेप्ट इव्हेंट अँड आउटडोअर सोल्युशन्स, नागपूर यांच्याशी केलेल्या



Scanned by CamScanner

वाटाघाटी अंती एक लक्ष स्क्वेअर फुटपर्यंत ग्राउंड रेंट सह पुढील दर निश्चित करण्यात आले.

प्रथम वर्ष (2013-14) – 20,50,000/- (वार्षिक)

दुसरे वर्ष (2014-15) – 22,05,000/- (वार्षिक)

तिसरे वर्ष (2015-16) – 24,25,500/- (वार्षिक)

उपरोक्त दरास स्थायी समितीने ठराव क्र. 5 दि. 05.04.2013 अन्वये मंजुरी प्रदान केली.

यासाठी अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1. दिनांक 20.07.2012 रोजी मनपा सर्वसाधारण सभेने खाजगीकरणाद्वारे उत्पन्न वाढीचे धोरण निश्चित केले असतांना व तुलनेने अधिक उत्पन्न मिळण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु असतांना मनपाच्या अर्थसंकल्पीय सभेने ठराव क्र. 105 दि. 22.03.2013 अन्वये खाजगीकरणाचा विषय त्याच्या व्यतिरिक्त उत्पन्न वाढीसाठी अन्य कोणताही मार्ग न सुचविता स्थगित ठेवण्याचा मनपाच्या हिताविरुद्ध निर्णय घेतला, परंतु त्यामागील सभेने भूमिका इतिवृत्तात स्पष्ट केली नाही.

2. वरील स्थगितीचा ठराव महाराष्ट्र मनपा अधिनियमाचे कलम 451(1) नुसार विखंडीत करण्यासाठी व कलम 451(3) नुसार दि. 20.07.2012 च्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी आयुक्त मनपा यांनी पत्र क्र. 354 दि. 26.03.2013 अन्वये राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडे प्रस्ताव सादर केला, परंतु त्यापुढील काळात शासनाकडून विखंडनास मंजुरी प्राप्त न झाल्याने किंवा त्यासाठी मनपा प्रशासनाने शासनाकडे पाठपुरवठा केला नसल्यामुळे मनपाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

सदरचे नुकसान पुढीलप्रमाणे आहे.

(रक्कम रुपयात)

| वर्ष | खाजगीकरणाद्वारे निश्चित केलेले उत्पन्न | जुन्या प्रचलित पद्धतीप्रमाणे उत्पन्न | उत्पन्नातील तूट (नुकसान) |
|---|---|---|---|
| 2013-14 | 20,50,000 | 2,22,840 | **18,27,160 (89%)** |

याबाबत जारी केलेल्या अर्धसमासाचे अनुषंगाने मनपाचे अभिप्राय प्राप्त नसल्याने आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

DATABWM6901 (Ref No : 8, Item No : 101)

## *20 शास्ती 2% पेक्षा कमी आकारून चंद्रपूर मनपाचे झालेल्या हानीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 183830.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 183830.00/-



Scanned by CamScanner

**सन 2013-2014 च्या लेखापरीक्षणादरम्यान आढळलेल्या मालमत्ता कराच्या थकबाकीच्या वसुलीमध्ये विहित दराने शास्ती न आकारल्यामुळे व याबाबीकडे दुर्लक्ष केल्यामुळे मनपा निधीची हानी झाल्याचे दिसून आले.**

चंद्रपूर महानगरपालिका मधील सन 2013-2014 कर विभागाचे माहे मार्च 2014 मधील उपलब्ध करण्यात आलेल्या अभिलेख्याची तपासणी केली असता, घर मालमत्ता करामध्ये 2% पेक्षा कमी दराने शास्ती आकारण्यात आल्याचे आढळून आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण आठ कराधान नियम-41 पहिल्या सहामाही कराची रक्कम बिल दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत भरावयाची असेल आणि बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दुसऱ्या सहामाही कराची रक्कम, प्रत्येक वर्षाच्या 31 डिसेंबरपूर्वी भरावयाची असेल, आणि जर कराची रक्कम भरली नाही तर, अशी अदत्त कराची रक्कम किंवा त्या रकमेचा भाग याव्यतिरिक्त, त्याने ज्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता, त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणून भरण्यास तो जबाबदार असेल आणि बिलाची पूर्ण रक्कम देईपर्यंत अशी शास्ती भरण्यास तो जबाबदार असण्याचे चालू राहील, अशी तरतूद आहे.

माहे मार्च 2014 मध्ये शास्तीसह वसुली केल्याचे आढळलेल्या निवडक पावत्या उदाहरणादाखल पुढीलप्रमाणे आहेत.

(रक्कम रुपयांत)

| अ.क्र. | पावती क्र | कराचे वर्ष | कर वसुलीसाठी झालेला विलंब | थकबाकी | थकबाकीवर आकारावयाची शास्तीची रक्कम 2% प्रतीमहिना | आकारलेली शास्तीची रक्कम | फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 66602 | 2010-11 ते 2013-14 | 48 महिने | 3260 | 3130 | 392 | 2738 |
| 2 | 66604 | 2012 ते 2013-2014 | 36 महिने | 1342 | 966 | 262 | 704 |
| 3 | 66617 | 2012-2014 | 36 महिने | 2291 | 1650 | 275 | 1375 |
| 4 | 67728 | 2010-11 ते 2013-14 | 48 महिने | 1985 | 1906 | 238 | 1668 |
| 5 | 67782 | 2012-13 ते 2014 | 12 महिने | 2409 | 578 | 289 | 289 |
| 6 | 69303 | 2012-2014 | 36 महिने | 1413 | 1017 | 170 | 847 |
| 7 | 72412 | 2010-11 ते 2013-14 | 48 महिने | 2422 | 2325 | 292 | 2033 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 72430 | 2005-06 ते 2014 | 108 महिने | 6857 | 14811 | 823 | 13988 |
| 9 | 72432 | 2012-13 ते 2014 | 12 महिने | 2638 | 633 | 328 | 305 |
| 10 | 72455 | 2010-11 ते 2013-14 | 48 महिने | 2407 | 2311 | 289 | 2022 |
| 11 | 73706 | 1993-94 ते 2008 | 252 महिने | 6803 | 34287 | 816 | 33471 |
| 12 | 75133 | 2006-07 ते 2013-2014 | 96 महिने | 12268 | 23554 | 1472 | 22082 |
| 13 | 76336 | 2012 ते 2014 | 36 महिने | 20176 | 14526 | 2421 | 12105 |
| 14 | 76345 | 2009-2010 ते 2014-15 | 60 महिने | 4752 | 5702 | 570 | 5132 |
| 15 | 66526 | 2010-11 ते 2013-14 | 60 महिने | 5181 | 6217 | 1243 | 4974 |
| 16 | 71520 | 2010 ते 2013-2014 | 48 महिने | 947 | 1136 | 227 | 909 |
| 17 | 71560 | 2012 ते 2013 | 24 महिने | 3214 | 1542 | 386 | 1156 |
| 18 | 71580 | 2010-11 ते 2012 | 24 महिने | 2808 | 2022 | 337 | 1685 |
| 19 | 71593 | 2009-2010 ते 2013 | 60 महिने | 1775 | 2556 | 425 | 2131 |
| 20 | 74402 | 2009-2010 ते 2014 | 72 महिने | 2641 | 3803 | 317 | 3486 |
| 21 | 74425 | 2012-13 ते 2014 | 36 महिने | 1010 | 727 | 242 | 485 |
| 22 | 74481 | 2012-13 ते 2014 | 36 महिने | 23242 | 16734 | 2789 | 13945 |
| 23 | 74490 | 2009 ते 2014 | 72 महिने | 2556 | 3681 | 613 | 3068 |
| 24 | 65277 | 2011 ते 2013 | 36 महिने | 5390 | 3880 | 1724 | 2156 |
| 25 | 65290 | 2008 ते 2014 | 84 महिने | 3687 | 5309 | 442 | 4867 |
| 26 | 67028 | 2008 ते 2014 | 84 महिने | 1367 | 1968 | 646 | 1504 |
| 27 | 72021 | 2011 ते 2014 | 48 महिने | 1509 | 1086 | 513 | 573 |
| 28 | 74606 | 2008 ते 2014 | 84 महिने | 2914 | 4196 | 1068 | 3128 |
| 29 | 74628 | 2009 ते 2013 | 60 महिने | 5926 | 7111 | 1074 | 6037 |
| 30 | 74682 | 2006 ते 2014 | 108 महिने | 5122 | 9834 | 615 | 9219 |
| 31 | 63871 | 2010 ते 2014 | 60 महिने | 846 | 1015 | 102 | 913 |
| 32 | 67649 | 2008 ते 2014 | 84 महिने | 3717 | 5352 | 446 | 4906 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 33 | 67658 | 2009 ते 2012 | 48 महिने | 2260 | 2712 | 381 | 2331 |
| 34 | 72127 | 2010 ते 2014 | 60 महिने | 2424 | 2327 | 291 | 2036 |
| 35 | 72178 | 2011 ते 2014 | 48 महिने | 1435 | 1033 | 172 | 861 |
| 36 | 72193 | 2001 ते 2014 | 168 महिने | 3969 | 12383 | 476 | 11907 |
| 37 | 75621 | 2008 ते 2014 | 84 महिने | 2117 | 3048 | 254 | 2794 |
| वसूलपात्र रक्कम रुपये | | | | | | | 183830 |

वरीलप्रमाणे विहित कालावधीत मालमत्ता कराची रक्कम भरणा करण्यात न आल्याने उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार शास्तीची रक्कम वसूल करणे अनिवार्य होते. तथापि, याबाबीकडे दुर्लक्ष केल्यामुळे मनपा निधीची हानी झाल्याचे दिसून आले.याचप्रकारची अनियमितता सन 2013-2014 मधील इतरही पावत्यांमध्ये असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी संबंधित मालमत्ता धारकाकडून शास्तीची रक्कम वसूल करून अनुपालन सादर करावे.

यासंदर्भात जारी केलेले मूळ अर्धसमास पत्र क्र.21 दि.06/04/2016 नुसार अभिप्राय मागविले असता ते प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

DLFSRWFB9H (Ref No : 47, Hmm No : 21)

## 21 *वृक्षकर 1% ऐवजी 0.5% वसूल केल्यामुळे महसुलाची हानी झाल्याबाबत.*

**वृक्ष कर**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4773747.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 4773747.00/-

| |
|---|
| ***महाराष्ट्र नागरी क्षेत्र वृक्ष संवर्धन अधिनियम 1975 चे कलम 18(1) नुसार मालमत्ता कराच्या 1% वृक्ष कर आकारणे आवश्यक असताना 0.5% वृक्षकर आकारुन चंद्रपूर मनपा सन 2013-2014 मध्ये रु.1444807 ची हानीबाबत.*** |



Scanned by CamScanner

सन 2013-2014 चे कर विभागाचे लेखापरीक्षण करताना मालमत्ता कराच्या पावतीपुस्तकांची तपासणी केली असता वृक्षकर 1% ऐवजी 0.5% आकारल्याचे आढळून आले.

महाराष्ट्र नागरी क्षेत्र वृक्ष संवर्धन अधिनियम 1975 चे कलम 18(1) नुसार मालमत्ता कराच्या 1% वृक्ष कर आकारणे आवश्यक असताना 0.5% वृक्षकर आकारणी करून वृक्षसंवर्धन निधीखाली बँक खाते क्र 06910100004417 (Bank चे नाव) मध्ये जमा करण्यात येत आहे.मागील चार वर्षातील वृक्ष संवर्धन निधी मध्ये 0.5% वृक्ष करापोटी रु.4773747/- एवढा महसूल गोळा करण्यात आला असून खर्च वजा जाता बँक खात्यात रु. 2306991.82/- निधी शिल्लक आहे. (2010-2011 पूर्वीची जमा या परिच्छेदामध्ये विचारात घेतलेली नाही.) सदर महसूल 1% वसुलीयोग्य दराऐवजी 0.5% दराने जनतेकडून वसुल करण्यात आल्याने उपरोक्त अधिनियमानुसार त्या चार वर्षात उर्वरित 0.5% प्रमाणे रु. 4773747/- एवढा कर वसूल करण्यात आला नाही.

चंद्रपूर शहरातील वाढते औद्योगिकीकरणामुळे केंद्र शासनाच्या Ministry of Environment and Forests (MOEF) and Central Pollution Control Board(CPCB) च्या 2009 अहवालाप्रमाणे चंद्रपूर शहर महाराष्ट्रातील प्रथम व देशातील चवथ्या क्रमांकाचे प्रदूषित शहर असल्याने अधिकाधिक वृक्षारोपण, जतन व संवर्धन ही अत्यंत महत्वाची उपाययोजना करणे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हितावह होते. त्यासाठी 1975 च्या उपरोक्त अधिनियमात विस्तृत तरतुदी मांडण्यात आल्या आहेत. असे असताना त्यानुषंगाने पुरेसा निधी न उभारता आवश्यक वृक्षकराच्या अर्धी रक्कम वसूल करणे व त्यातूनही अपुरा खर्च करणे या अनियमितता आढळून येतात.

(रक्कम रुपयात)

| वर्ष | जमा केलेला (0.5%) वृक्षकर | जमा करणे योग्य (1%) वृक्षकर | कमी जमा केलेला वृक्षकर | वृक्षरोपण व इतर संबंधित बाबीवर केलेला खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 2010-2011 | 909171 | 1818342 | 909171 | 17188 |
| 2011-2012 | 1056553 | 2113106 | 1056553 | 0 |
| 2012-2013 | 1363216 | 2726432 | 1363216 | 17188 |
| 2013-2014 | 1444807 | 2889614 | 1444807 | 917675 |
| **एकूण** | **4773747** | **9547494** | **4773747** | **952051** |

टीप- 1) अंदाजपत्रकीय आकडेवारी

2) वरील तक्त्यात 2010-11 पूर्वीची आकडेवारी विचारात घेतलेले नाही.



Scanned by CamScanner

यासंदर्भात उचित कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

DLFSRWF8901 (Ref No : 48, Hmm No : 125)

## 22 तज्ञ व्यक्तीऐवजी सल्लागार संस्थांची पॅनलवर नेमणूक करून खर्चात अनावश्यक वाढ करण्याबाबत व निविदेच्या स्पर्धेत नसलेल्यांची सुद्धा पॅनलवर निवड करणेबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***खर्चातील काटकसरीच्या दृष्टीने शासन निर्देशाप्रमाणे बांधकाम विषयातील तज्ञ व्यक्तींची निवड न करता सल्लागार संस्थांची निवड करून खर्चात अनावश्यक वाढीस वाव मिळाला आहे.***

महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय खाक्षेस-1095/प्र.क्र.216/रस्ते-8, दि.11/12/1997 नुसार सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे किंवा असाधारण, गुंतागुंतीच्या, विशेष प्रकारच्या बांधकामासाठी सल्लागार संस्थाच्या सेवा कंत्राटमूल्याप्रमाणे किंवा वैयक्तिक स्तरावर काम करणाऱ्या तज्ञांच्या सेवा मासिक मानधन तत्वावर घेण्याची तरतूद करण्यात आली आहे.

या शासन निर्णयाचा आधार घेवून एकूण पाच प्रकारच्या कामांसाठी (निम्नलिखित) वास्तूसल्लागाराकडून दर मागविण्यात आले. सदर दरांमध्ये वाटाघाटी होवून प्रकारनिहाय कामाचे दर निश्चित करून पुढील निविदाकारांची पॅनलवर तीन वर्षासाठी (01/06/2013 ते 31/05/2016) निवड करण्यात येऊन दि.01/06/2013 रोजी करारबद्ध करण्यात आले.

| पॅनलवर निवड केलेल्या निविदाकाराची नावे | करावयाची कामे | स्थायी समितीने वाटाघाटी करून |
|---|---|---|

| | | मान्य केलेलं दर |
|---|---|---|
| 1) मे.पराते अँड असोसिएट्स, नागपूर<br>2) मे.एस.के.ए. असोसिएट्स, नागपूर<br>3) मे.मोहता अँड असोसिएट्स, नागपूर | 1. Preparation of detailed drawing & Estimate... | 1.5% |
| | 2. Preparation & Submission of Structural and Working Design | 0.5% |
| | 3. Site supervision, Bill recording, Quality Report, Completion Report | 1.0% |
| | 4. Renovation of Existing buildings | 4.5% |
| | 5. For Interior design of building, etc. | 4.0% |

याप्रमाणे निविदाकारांना पॅनलवर नियुक्त केले असतांना निविदेच्या स्पर्धेत नसलेल्या पुढील संस्था/ व्यक्तीकडून प्राप्त अर्जाच्या आधारे त्यांनासुद्धा उपरोक्त मंजूर दरानुसार कामे करण्यास स्थायी समितीने 3 वर्षासाठी निवड केली.

| निविदा सादर न केलेल्या परंतु पॅनलवर निवड केलेल्या संस्था/व्यक्तींची नावे | अर्ज केल्याचा दिनांक | तीन वर्षासाठी करारनामा केल्याचा दिनांक | स्थायी समिती ठराव |
|---|---|---|---|
| श्री.वैभव सुरेश सहारकर, आर्किटेक्ट, चंद्रपूर | 22/08/2013 | 11/09/2013 | क्र.132, दि.23/08/2013 |
| मे.कावरे अँड जबादे प्रोजेक्ट प्रा.ली.नागपूर | 13/02/2014 | 24/02/2014 | क्र.316, दि.21/04/2014 |
| मे.मुकेश इन्फ्रास्ट्रक्चर, नागपूर | 30/01/2014 | 24/02/2014 | क्र.316, दि.21/04/2014 |

यावरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहे.

1) उपरोक्त शासन निर्णयान्वये बांधकामामार्फत पार पाडता येऊ शकणाऱ्या पुढील विशिष्ट प्रकरणात सल्लागार/तज्ञ नेमण्याचे अनुज्ञेय करण्यात आले आहे.



Scanned by CamScanner

(i) गुंतागुंतीची दुरुस्ती व पुनर्स्थापित बांधकामाची (Rehabilitation) प्रकरणे.

(ii) असाधारण गुंतागुंतीच्या विशेष प्रश्नाबाबतची प्रकरणे.

(iii) प्रकल्प व्यवस्थापन, पर्यवेक्षण, उपकरण साधन (Instrumentation), प्रकल्प अहवाल, आणि सनियंत्रण (Monitoring).

(iv) गुंतागुंतीच्या बांधकामाचे विशेषीकृत संकल्पन (Design) आणि तपासणी (Proof Consultancy)

(v) संगणक आणि सॉफटवेअर विकसन

(vi) प्रकल्पांचे सर्वेक्षण व अन्वेषण.

(vii) बांधकामाचा वातावरणावर होणाऱ्या आघातासंबंधी तसेच प्रकल्पांच्या तांत्रिक आणि आर्थिक सुसाध्यतेची पडताळणी करून निर्धारण व अहवाल.

शासन अनुदान व मनपा निधीतून घेण्यात येणाऱ्या रस्ता बांधकामाचे स्वरुप असाधारण किंवा गुंतागुंतीचे किंवा शासन निर्णयातील वर नमूद प्रकरणात मोडत नसल्यामुळे अनुज्ञेय नसलेल्या प्रकरणांसाठी मनपाने सन 2013-14 मध्ये सल्लागार संस्थांचे पॅनल तयार करून त्यावर मानधनापोटी शासन अनुदानातून मोठी रक्कम खर्च केली असल्याची शक्यता आहे.

2) पॅनलवर निवड करण्यासाठी खुल्या जाहिरातीद्वारे निविदा प्राप्त करून वरील प्रथम तक्त्यातील तीन निविदाकारांची स्थायी समिती ठरावाद्वारे निवड करण्यात आली तर निविदा सादर न केलेल्या अन्य तीन फर्म्सकडून लेखी अर्ज प्राप्त करून त्यांना स्थायी समितीने पॅनलवर निवड केली. यावरून काही फर्म्सना अनियमितपणे आर्थिक लाभ पोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला असे दिसून येते.

3) मनपातील रस्ता बांधकामाचे स्वरुप लक्षात घेता साईट सुपरव्हिजन, बिल/देयके बनविणे, कामाचे मोजमाप घेणे, काम पूर्ण झाल्याचा अहवाल या किरकोळ कामासाठी मोठी आस्थापना असलेल्या संस्थाची निवड करण्याऐवजी सदर शासन निर्णयातच परिशिष्ट-ब मध्ये तरतूद असल्याप्रमाणे वैयक्तीक स्तरावर काम करणाऱ्या पुढील तज्ञांची मासिक मानधन तत्वावर निवड करणे संयुक्तिक व वित्तीय औचित्यानुसार योग्य ठरले असते.

1. स्पेशलीस्ट (ॲडव्हायसर व एक्सपर्ट) -(टेक्निकल डायरेक्टर) ग्रेड, रु.40,000/- प्रति महिना
2. सिनियर कन्सल्टंट - (टेक्निकल डायरेक्टर) ग्रेड, रु.25,000/- प्रति महिना
3. ज्युनिअर कन्सल्टंट - रु.10000/- प्रति महिना

4. सुपरव्हायझर, ड्राफ्ट्समन, सर्व्हेअर ई. - , रु.5000/- प्रति महिना

यांप्रकारे निविदा स्पर्धेच्या बाहेरील फर्म्सला लाभ देणे व अनावश्यकरित्या वैयक्तीक तज्ञांऐवजी संस्थांना पॅनलवर स्थान देणे या अनियमिततांबाबत अर्धसमास पत्राद्वारे (क्र.88,दि.02/07/2016) अभिप्राय मागविले असता ते प्राप्त झाले नसल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATABWM6901 (Ref No : 17, Hmm No : 88)

लेखा वाचण्य

## 23 कंत्राटदारांच्या देयकातून 5% ऐवजी 4% दराप्रमाणे मूल्यवर्धित कराची वसुली झाल्यामुळे राज्य शासनाकडील महसुलाची हानी झाल्याबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 राज्य शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
गुंतलेली रक्कम रु. 404762.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 404762.00/-

***कंत्राटदाराच्या कामाच्या देयकातून वसूल करावयाच्या मूल्यवर्धित कराची रक्कम प्रदान रकमेच्या 5% वसूल केली नाही. त्यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान झाले आहे.***

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 ची सुधारणा दि. 04 एप्रील 2012 नुसार विक्रीकर विभागाकडे नोंदणी नसलेल्या कंत्राटदारांकडून कार्यकंत्राट रकमेच्या 5% मूल्यवर्धित कर वसुल करून शासनाकडे भरणा करावयाचा आहे. सदर दरात 01.04.2012 पासून सुधारणा झाली असून त्यापूर्वी हा दर 4% असा होता. परंतु सन 2013-14 मधील बांधकामाच्या व विविध विभागातील कामांच्या नस्त्यांमध्ये कंत्राटदारांनी सादर केलेल्या निविदा सोबत उपरोक्त नोंदणी प्रमाणपत्र जोडले नसल्याने ते अनोंदणीकृत असल्याचे गृहीत धरून 4% ऐवजी 5% प्रमाणे वसूल होणे जरुरी आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रदान | | | कंत्राटदार | 5% प्रमाणे व्हावयाची मुल्यवर्धीत कराची रक्कम | वसूल केलेली रक्कम (4%) | कमी वसुलीची रक्कम (1%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्र.क्र | दिनांक | रक्कम | | | | |
| 1 | जलनगर वाई | 2 | 29.03.2014 | 1257557 | सुरेंद्र गौड | 62877 | 50302 | 12516 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मलीक अहमद घर ते सपना टाकीज भागात कॉंक्रीट रोड | | | | | | | |
| 2 | नागपूर रोड गजानन मंदीर रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण | 10 | 7.03.2014 | 2587194 | रामा इन्फ्रास्ट्रक्चर | 129359 | 103488 | 25871 |
| 3 | महाकाली मंदीर प्रभाग मध्ये श्री कालडा ते नराटखेडे घर कॉंक्रीट रोड | 12 | 29.03.2014 | 1413455 | तेजस खांडरे | 70672 | 56851 | 13821 |
| 4 | रयतवारी प्रभागात भुजाच्या ते रायत डेकोरेशन पर्यंत कॉंक्रीट नाली | 1528 | 3.03.2014 | 517324 | भाग्यलक्ष्मी कॅन्स्ट्रक्शन | 25866 | 20693 | 43030 |
| 5 | नगाप प्रभागात चिंताबाई वाढई ते क्षीरसागर घर कॉंक्रीट नाली | 1530 | 3.03.2014 | 500455 | राजीव सिंग | 25022 | 20022 | 5000 |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रभागात श्री.बंडू शंभरकर ते रफीक शेख घर कॉंक्रीट नाली. | 1531 | 3.03.2014 | 485469 | शतमय कॅन्स्ट्रक्शन | 24273 | 19419 | 4854 |
| 7 | एमईएल प्रभागात डोंगरे ते धारकर घर कॉंक्रीट नाली. | 1591 | 7.03.2014 | 475466 | शंकर चवरे | 23773 | 19019 | 4754 |
| 8 | राजेपर्मताव बाबा प्राथमिक शाळा तळमजला रंगरंगोटी | 1600 | 13.03.2014 | 710589 | आर.एम. सोनटक्के | 35728 | 1421 | 34307 |
| 9 | तुकूम येथे चौरेकर ते वाढई घर कॉंक्रीट रोड | 46 | 6.03.2014 | 1101446 | मोहन नामनवार | 55072 | 44058 | 11014 |
| 10 | तुकूम तलाव प्रभाग उपगनलावार घरापर्यंत कॉंक्रीट रोड | 47 | 19.03.2014 | 664606 | सुभाष गेगरवार | 33230 | 26584 | 6646 |
| 11 | शास्त्रीनगर प्रभागात छत्रपती नगर ते सरकारनगर भागात कॉंक्रीट नाली. | 48 | 29.03.2014 | 1095041 | भाग्यलक्ष्मी कॅन्स्ट्रक्शन | 54752 | 43802 | 10950 |
| 12 | शास्त्रीनगर | 1019 | 29.03.2014 | 1057261 | अनिल घुमडे | 52863 | 42290 | 10573 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रभागात छत्रपती नगर ते सरकारनगर प्रभागात कॉंक्रीट रोड | | | | | | | |
| 13 | बाजार प्रभागात गणेश पतरंगे ते कृष्णा मेडीकल पर्यंत कॉंक्रीट रोड | 52 | 29.03.2014 | 435118 | आशिष काकडे | 21775 | 11710 | 10045 |
| 14 | बपाप वार्ड मध्ये प्रदीप बलास प्लॉट ते निर्माण यांचे घर कॉंक्रीट रोड | 19 | 18.03.2014 | 74387 | भाग्यलक्ष्मी कैन्स्ट्रक्शन | 3719 | 2975 | 744 |
| 15 | बपाप वार्ड मध्ये डोंगरगडे ते गांगुली घर कॉंक्रीट रोड | 20 | 18.03.2014 | 202050 | राजेश बाकोडे | 10102 | 8082 | 2020 |
| 16 | बिनबा प्रभागात मालवी चौक ते गोपालपुरी चौक कॉंक्रीट रोड | 22 | 29.03.2014 | 1914164 | भाग्यलक्ष्मी कैन्स्ट्रक्शन | 95708 | 76567 | 19141 |
| 17 | झोन क्र 4 विविध ठिकाणी मटेरिअल पुरवठा | 23 | 29.03.2014 | 323224 | भाग्यलक्ष्मी कैन्स्ट्रक्शन | 16161 | 12929 | 3232 |
| 18 | जलनगर वार्ड क्र.22 मध्ये श्री.पठाण ते श्री. पेंदाम यांचे घर कॉंक्रीट रस्ता. | 26 | 28.03.2014 | 488097 | रमेश पडारे | 24404 | 19524 | 4880 |
| 19 | बपाप वार्ड मध्ये श्री.सुधांशु विश्वास ते खनके यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रोड | 27 | 29.03.2014 | 99222 | राजेश बाकोडे | 4961 | 3969 | 992 |
| 20 | बपाप वार्ड मध्ये श्री. विद्याधर लाडे ते श्री. खनके यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रोड | 28 | 29.03.2014 | 34305 | राजेश बाकोडे | 34305 | 2744 | 31561 |
| 21 | अंचलेश्वर प्रभाग बुद्धविहार ते अडगुलवार घर परिसर कॉंक्रीट रोड | 39 | 29.03.2014 | 38879 | श्रीकांत भोयर | 36679 | 29343 | 7336 |
| 22 | पोटी हायस्कूल ते श्री.राजे विश्वेश्वरराव | 32 | 29.03.2014 | 2258418 | मनोज खान | 112920 | 90828 | 22092 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुलापर्यंत कॉंक्रीटरस्ता | | | | | | | |
| विद्युत विभाग (DATABWM6901) | | | | | | | | |
| 23 | विद्युत देखभाल व दुरुस्ती | 23 | 01.04.2013 | 1226762 | मे. आधुनिक | 36802 | 24535 | 12267 |
| 24 | विद्युत देखभाल व दुरुस्ती | 16 | 12.07.2013 | 617538 | मे. आधुनिक | 30877 | 12351 | 18526 |
| 25 | विद्युत देखभाल व दुरुस्ती | 4 | 30.05.2013 | 1239613 | मे. आधुनिक | 61980 | 24792 | 37188 |
| 26 | विद्युत देखभाल व दुरुस्ती | 11 | 14.10.2013 | 1028056 | मे. आधुनिक | 51403 | 00 | 51403 |
| एकुण रक्कम | | | | | | | | 4,04,762 |

सन 2013-2014 मधील वरील विवरणामध्ये दर्शविलेली रक्कम रुपये 4,04,762/- सह उर्वरीत सन 2013-2014 मध्ये प्रदान केलेल्या प्रकरणात सुद्धा 5% प्रमाणे वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे. तफावतीच्या करमूल्याचा शासन भरणा करून अनुपालन सादर करावे.

DATBNKM6401 (Ref No : 27, Hmm No : 55)

***24 विहित मूल्याच्या मुद्रांकावर करारनामे न केल्याने झालेल्या शासन महसुलाची हानी बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 47900.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 47900.00/-

***विविध कामाचे करारनामे शासन निर्णयामध्ये नमूद मूल्याच्या मुद्रांकशुल्कावर करण्यात न आल्याने शासन महसुलाची हानी झालेली आहे.***



Scanned by CamScanner

सन 2013-14 मध्ये विविध योजनेमधून करण्यात आलेल्या बांधकामाची करारनामे मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 63 व महसूल व वन विभाग, शासन अधिसूचना दिनांक 23.04.2006 नुसार कार्यकंत्राटाची रक्कम रु. 10 लाखापर्यंत रु. 100/- व पुढील प्रत्येक लाखासाठी रु. 100/- प्रमाणे अधिकतम रु. 5 लाख पर्यंतच्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक आहे. परंतु कंत्राटदारांनी सरसकट रु. 100/- चे मुद्रांकशुल्कावर करारनामे केल्याचे दिसून आले आहे.

(रक्कम रुपयात)

| अक्र | कामाचे नाव | प्राकलन मूल्य | प्रदान | | | करारनाम्याकरिता वापरावयाच्या मुद्रांका चे मूल्य | वापरलेले मुद्रांक मूल्य | शासन महसुलाच्या नुकसानाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| अ) महाराष्ट्र नगरोत्थान निधी | | | | | | | | |
| 1 | तुकूम येथे घाटेवराते वाडई घर कॉंक्रिट रस्ता बांधकाम. | 1124220 | 46 | 06.03.14 | 1101446 | 200 | 100 | 100 |
| 2 | शास्त्रीनगर विविध ठिकाणी नाली बांधकाम. | 1030900 | 48 | 29.03.14 | 1095041 | 200 | 100 | 100 |
| 3 | शास्त्रीनगर जयस्वाल ते गावंडे घर कॉंक्रिट रस्ता बांधकाम. | 1695570 | 50 | 29.03.14 | 1563786 | 800 | 100 | 700 |
| 4 | शास्त्रीनगर प्रभागात छत्रपतीनगर व सरकार नगर भागात कॉंक्रिट रस्ता बांधकाम. | 1006520 | 51 | 29.03.14 | 1057261 | 200 | 100 | 100 |
| 5 | महाकाली मंदिर परिसरात कॉंक्रिट रस्ता बांधकाम | 1433940 | 12 | 29.03.14 | 1413455 | 1500 | 100 | 1300 |
| पंचशताब्दी महोत्सव | | | | | | | | |
| 1 | हनुमान मंदिर, जगन्नाथबाबा मठ, माहेश्वरी भवन, महसूल कॉलनी पाईप लाईन. | 7506582 | 7 | 07.03.14 | 4647280 | 7700 | 100 | 7600 |
| 2 | साईबाबा पाण्याची टाकी ते वैष्णवी अपार्टमेंट दाताळा रोड पाईप लाईन. | 7506582 | 8 | 07.03.14 | 2827739 | 7700 | 100 | 7600 |
| सार्वजनिक रस्ता बांधकाम निधी | | | | | | | | |
| 1 | भिवा प्रभागात कॉंक्रिट रस्ता बांधकाम. | 2198810 | 22 | 29.03.14 | 1914164 | 2000 | 100 | 1900 |
| 2 | सिटी हायस्कूल ते विश्वेश्वर पुतळ्यापर्यंत कॉंक्रिट | 2461620 | 32 | 29.03.14 | 2258418 | 2300 | 100 | 2200 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रस्ता बांधकाम. | | | | | | | |
| बी. आर. जी. एफ. | | | | | | | | |
| 1 | मुलरोड ते रेल्वे नाला रस्ता डांबरीकरण. | 4206350 | 9 | 03.03.14 | 3229631 | 4300 | 100 | 4200 |
| 2 | नागपूर रोड गजानन मंदिर रस्ता डांबरीकरण. | 7795040 | 10 | 07.03.14 | 2587194 | 7800 | 100 | 7700 |
| 3 | बीएसएनएल ऑफिस ते रेल्वे कॉसिंग रस्ता डांबरीकरण. | 7345400 | 11 | 19.03.14 | 3473030 | 7400 | 100 | 7300 |
| 4 | पठाणपुरा व्यायामशाळा ते अस्थानाअंर्गत रस्ता डांबरीकरण. | 6741210 | 13 | 29.03.14 | 5981148 | 6000 | 100 | 5900 |
| अल्पसंख्यांक निधी | | | | | | | | |
| 1 | जलनगर वार्डात कॉक्रिट रस्ता बांधकाम. | 1260803 | 2 | 29.03.14 | 1257967 | 1300 | 100 | 1200 |
| | | | | एकूण रक्कम (अ) | | | | **47,900** |
| ब) पायाभूत सुविधा योजना (DATABWM6901) | | | | | | | | |
| 1 | चोर खिडकी ते बिनबा गेट डांबरी रस्ता | 17793723 | 230 | 31.03.15 | 79169 | 16900 | 100 | 16800 |
| 2 | पूल ते बेले डांबरीकरण. | 5357840 | 244 | 31.03.15 | 3477432 | 4600 | 100 | 4500 |
| 3 | नरसिंग रेवेल्लीवार ते रामदिन शाहू कॉक्रिट रस्ता. | 1863000 | 156 | 02.03.15 | 1041213 | 1100 | 100 | 1000 |
| 4 | घटे ते मोगरे कॉक्रिट रस्ता. | 1292100 | 227 | 30.03.15 | 1305365 | 500 | 100 | 400 |
| 5 | वंश मेडिकल ते पक्वते कॉक्रिट रस्ता. | 1346200 | 178 | 26.03.15 | 391234 | 600 | 100 | 500 |
| पंचशताब्दी (DATABWM6901) | | | | | | | | |
| 1 | बंगाली कॅम्प ते रयतवारी कॉलरी पाईप लाईन टाकणे. | 10017568 | 10 | 26.03.15 | 3515160 | 8300 | 100 | 8200 |
| 2 | बाबपास ते महाकाली कॉलरी कॅंटीन चौक पाईप लाईन टाकणे. | 10460356 | 3 | 17.10.14 | 4766036 | 9700 | 100 | 9600 |
| 3 | तुकूम पाण्याची टाकी ते ऊर्जानगर नगर पाईप लाईन | 11123036 | 8 | 28.03.15 | 1620541 | 10400 | 100 | 10300 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | टाकणे. | | | | | | | |
| 4 | बंगाली कॅम्प ते संजयनगर पाईप लाईन टाकणे. | 10520263 | 3 | 23.06.15 | 5246934 | 9800 | 100 | 9700 |
| 5 | जटपुरा ते पी एन.नगर पाईप लाईन टाकणे. | 10813787 | 9 | 23.06.15 | 4550584 | 10100 | 100 | 10000 |
| 6 | बाबूपेठ ते बंगाली कॅम्प पाईप लाईन टाकणे. | 8150857 | 11 | 23.06.15 | 2154751 | 7400 | 100 | 7300 |
| 7 | महाकाली ते गौतम नगर व ओमनगर पाईप लाईन टाकणे. | 6048284 | 5 | 17.10.14 | 2518143 | 5300 | 100 | 5200 |
| | **एकूण रक्कम (ब)** | | | | | | | **84,500** |
| | **एकूण रक्कम (अ) + (ब)** | | | | | | | **1,32,400** |

तरी उपरोक्त प्रकरणी शासनाचे एकूण रु. 1,32,400/- महसुलाचे नुकसान झाले आहे. ते वसूल करून शासन जमा करावे. याशिवाय अन्य कामाचे करारनामे सुद्धा चुकीच्या मूल्यावर आधारित मुद्रांकावर करण्यात आलेले आहेत असे दिसून आले आहे. त्यांची तपासणी करून आवश्यक कार्यवाही करावी.

DATBNKM6401 (Ref No : 30, Hunn No : 51)

***25 शासनाकडील कल्याणकारी योजनेवरील एकूण प्राप्त अनुदानातून केवळ 5% रक्कम खर्च करून उर्वरित निधी मुदत ठेवीच्या स्वरुपात गुंतवून रु.1.0 कोटीवरील प्राप्त व्याज शासनाकडे जमा न करणेबाबत.***

**वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम अनुदान**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष :344 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 75515000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 73507484.00/-

***शासनाची महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत जाहीर केलेली योजना अतिशय असमाधानकारकपणे (5%) राबवून महानगरपालिकेने उद्दिष्टपुर्तीविना मोठ्या प्रमाणावरील निधी बँकेत अकारण गुंतवून ठेवलेला आहे.***



Scanned by CamScanner

Chandrapur (M Corp.)

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त राज्यात महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकाकडील खाजगी नळ व वैयक्तिक शौचालय बांधकाम योजनेसाठी पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र. नादव 2012/ प्र.क्र.-121/पापु-22, दि.01/03/2012 अन्वये 6 महिन्याच्या कालावधीसाठी पुढील प्रमाणे उद्दिष्ट व अनुदान प्राप्त झाले होते.

**मूळ योजना:-**

1) उद्दिष्ट :- 1. खाजगी नळ जोडणी- 616

2. वैयक्तिक शौचालय- 408

3. नळ कनेक्शन + वैयक्तिक शौचालय- 2150

टीप:- (क्र. 2 व 3 मिळून एकूण 2558 उद्दिष्ट)

2) शासन:- लाभार्थी हिस्सा- 90% : 10% (यामधील 10% हिस्सा प्रत्येक लाभार्थी किंवा मनपाने उपलब्ध करून द्यावयाचा होता)

3) नागरी संस्थेचा सहभाग किंवा लाभार्थी हिश्श्याच्या लाभार्थ्यांस अनुज्ञेय अनुदान

1. खाजगी नळ जोडणी - रु. 4000 प्रति कुटुंब

2. वैयक्तिक शौचालय बांधकाम- रु.12000/-

4) मंजूर योजनेचे मूल्य - रु. 7,55,15,000/- (7.55 कोटी)

शासन अनुदान 90% - 6,79,63,500/- (प्रत्यक्ष प्राप्त अनुदान रु.3.39 कोटी)

नागरी संस्थेचा सहभाग 10%- 75,51,500/-

------------

एकूण रु. 7,55,15,000/-

**उद्दिष्टपूर्ती (2013-14 अखेर)**

आयुक्त ननपा चंद्रपूर यांचे कपात सूचना क्र. 8 च्या अनुषंगाने शासनास पाठविलेल्या पत्र क्रमांक चंशमनपा/बांध/झोन-3/175/2013, दि. 01/07/2013 नुसार,

- दि. 01/07/2013 पर्यंत एकूण 155 लाभार्थ्यांनी अनुदानाचा लाभ घेतला.
- एकूण खर्च- रु.9.30 लक्ष
- 50 लाभार्थ्यांची कामे सुरु आहेत.

**यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.**

(1) सदर योजना 01/02/2012 च्या शासन निर्णयानुसार 6 महिन्यातच पूर्ण करावयाची असताना सन 2013-14 मध्ये रु.3.39 कोटी पैकी पुढीलप्रमाणे खर्च दिसून येते.

(अ) अंदाजपत्रकाप्रमाणे सन 2011-12 ते 2013-14 पर्यंत एकूण खर्च - 2007516/-

सन 2011-12- रु. 272516



Scanned by CamScanner

सन 2012-13- रु. 1228000

सन 2013-14- रु. 507000

---------

एकूण रु. 2007516

(ब) मनपाने शासनास दि. 01/06/2013 च्या पत्रान्वये सादर केलेल्या माहितीनुसार दि. 01/06/2013 पर्यंत खर्च - 9.30 लक्ष

(क) अदिनांकित उपयोगिता प्रमाणपत्रानुसार झालेला खर्च - 17.73 लक्ष

वरीलप्रमाणे सदर योजनेंतर्गत झालेल्या खर्चाच्या अ,ब व क मधील आकडेवारीत सुसूत्रता दिसत नसल्याने प्रत्यक्ष खर्चाच्या निधीबाबत मनपाचे लेख्यामध्ये निश्चितता नाही.

(2) सदर योजनेच्या बँक खाते पुस्तकानुसार सन 2013-14 अखेरची शिल्लक रु.246261 दिसून येते.

वरील अनु.क्र.1 वरील अ,ब व क मधील आकडेवारीनुसार रु.9.30 लक्ष ते रु.20.07 लक्ष एवढाच खर्च झाला असल्यामुळे मागासवर्गीयांसाठी उर्वरित अखर्चित निधीतील रकमा अनियमितपणे शासनाच्या परवानगी शिवाय बँकांमध्ये वेळोवेळी गुंतवून व पुनःर्गुंतवणूक करून संबंधित शासन निधी कल्याणकारी योजनेवर न राबविता व्याजरूपाने महसूल प्राप्त करण्यासाठी वापरला. सदर बाब शासनाच्या धोरणात्मक निर्णयाशी विसंगत असून सदर अनियमिततेस शासनाकडून क्षमापन प्राप्त करावे व बँकाकडून प्राप्त व्याजाची रक्कम रु.11906242/- (अंदाजे उपलब्ध गुंतवणूक नोंदवहीनुसार) व मूळ अखर्चित रक्कम शासनास परत करावी.

(3) लाभार्थ्यांची उपलब्ध प्रकरणांची तपासणी करताना पुढील त्रुट्या निदर्शनास आल्या-

लाभार्थ्यांनी समर्थनीय दस्तऐवज सादर न करता योजनेचा लाभ घेतल्याचे दिसून येते. जसे, वास्तव्याचे प्रमाणपत्र, घरी शौचालय नाही अश्या आशयाचे प्रमाणपत्र, या पूर्वी शौचालयाकरिता दुसऱ्या कोणत्याही योजनेतून लाभ घेतलेला नाही चे शपथपत्र, कर भरल्याची पावती, लाभार्थी हिस्सा रु.1200/- भरल्याची पावती, सेप्टिक टँक व पूर्ण बांधकाम झाल्याबाबत, बांधकाम विभागाचे प्रमाणपत्र/ अहवाल इत्यादी दिलेले नसताना योजनेचा आर्थिक लाभ घेतला आहे. त्यामुळे चुकीच्या व अपात्र लाभार्थ्यांना सुद्धा योजनेचा लाभ दिला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एकूणच सदर योजना राबविताना पुरेसे प्रबोधन करणे, योजना जनतेपर्यंत पोचविणे व शासनाची सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त जाहीर झालेली धोरणात्मक योजना राबविण्यात तत्कालीन व नगरपरिषद/महानगरपालिका, चंद्रपूर उदासीन असल्याचे या योजनेच्या अल्प उद्दिष्टपूर्तीवरून दिसून येते.

DATPMPM5901 (Ref No : 45, Hmm No : 122)

***26 गांधी चौक ते जटपुरा गेट व जटपुरा गेट ते गिरनार चौक या रस्त्याच्या दुतर्फा रॉयल पामचे 12 ते 15 फुटी झाडे लावणेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :271 मनपा निधी*



Scanned by CamScanner

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 727950.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 727950.00/-

**पावसाळ्याच्या शेवटी 12 ते 15 फुटी पामचे 481 झाडे लावून सिंचनासाठी विशिष्ठ उपाययोजना न केल्याने त्यावरील खर्च निष्फळ ठरण्याची शक्यता आहे**

प्रमाणक क्र.20, दि.10.12.2013, रक्कम रु. 122550/-

प्रमाणक क्र.1929, दि.29.03.2014 रक्कम रु. <u>172500/-</u>

एकूण रु. 295050

महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समिती सभा दि. 08.05.2013 चे ठराव क्रमांक 4 अन्वये रस्त्याच्या दुतर्फा 12 ते 15 फुटी रॉयल पामचे झाडे लावण्यास मंजुरी देण्यात आली. उक्त वृक्ष लावण्याकरिता रोनक गार्डनिंग, चंद्रपूर यांची निविदा कमी दराची असल्याने स्विकृत करुन कामाच्या वर्णनाप्रमाणे 12 ते 15 फुटी रॉयल पाम झाड 20 फुटाच्या अंतरावर लावण्याचे कार्यादेश दिनांक 26.07.2013 ला निर्गमित करण्यात आले.

दिनांक 26.07.2013 ला निर्गमित केलेल्या आदेशामध्ये सदर वृक्ष लागवडीचे काम हे 15 दिवसात पूर्ण करण्याचे कार्यादेशाप्रमाणे बंधनकारक होते व करारनाम्यामध्ये सदर कामात मुदतवाढ देण्याची कोणतीही अट नसतानासुद्धा दि. 10.12.2013 पर्यंत मुदतवाढ देऊन एकूण सरासरी 481 झाडासाठी रु. 295050/- चे प्रदान करण्यात आले. त्याशिवाय ते झाडे व शहरातील इतर झाडासाठी 1500 ट्री गार्ड तयार करण्यासाठी प्रमाणक क्र.1420 दि. 14.02.2014 अन्वये रु.620625/- याप्रमाणे सन 2013-14 मध्ये अंशतः प्रदान करण्यात आले.

यावरील अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) पाऊसाचे प्रमाण सप्टेंबर महिन्यानंतर कमी कमी होत असते. त्यामुळे मुदतवाढीच्या कालावधीमध्ये 12 ते 15 फुटी रॉयल पामचे झाड लावल्यानंतर जिवंत राहतील याची दक्षता घेतल्याची नोंद आढळत आली नाही. चैतन्य बहुउद्देशीय महिला मंडळ, चंद्रपूर या संस्थेस रस्त्यावरील दुकानदारांना झाडांचे वृक्ष संवर्धन करण्यासाठी प्रबोधन करण्याचे दि.02.07.2013 च्या पत्रान्वये कळविले असले तरी रु.295050/- (481 झाडे) व रुपये 432900/- (रु.900 प्रमाणे 481 ट्रीगार्ड) याप्रमाणे रु.727950/- खर्चून प्रत्यक्ष सिंचनाची व्यवस्था न करता केवळ प्रबोधनाच्या आधारे झाडे जिवंत राहतील हे गृहीत धरण्यात आले आहे असे दिसते. अशी झाडे जिवंत आहेत अश्या नोंदीचा अभिलेख नस्तीत दिसून आलेला नाही. त्यामुळे पावसाळ्याच्या शेवटच्या कालावधीमध्ये वृक्षावर केलेला खर्च निष्फळ झालेला आहे अशी शक्यता आहे. सबब जागेवर तपासणी करुन प्रत्यक्ष झाडे जिवंत असल्याची खात्री करावी.

DATPMPM5901 (Ref No : 56, Item No : 12)

**27 रमाई आवास (घरकुल) योजनेची शून्य अंमलबजावणी असल्यामुळे योजना राबविण्यात मनपा प्रशासन उदासीन असणेबाबत.**

रमाई आवास योजना

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 04



Scanned by CamScanner

*लेखा शीर्ष:348 शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 46392000.00 /-

| |
|---|
| *2001 च्या जणगणनेनुसार शहरात 3058 अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबे असून (2011 च्या जणगणनेनुसार त्याहून अधिक शक्य) व पुरेसा निधी उपलब्ध असतांना 2010-2011 ते 2013-2014 च्या कालावधीत केवळ 35% उदिष्टपुर्ती झाली. कोट्यावधीचे अनुदान बँकेत पडून आहे. मनपाद्वारे योजनेचे मार्गदर्शन व जनतेमध्ये मेळावे, भित्तीपत्रके, वृत्तपत्रांद्वारे प्रबोधन करण्यात आले नाही.* |

महाराष्ट्र शासनाचा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शा.नि.क्र. बीसीएच 2008/प्र.क्र.36/मावक-2/ दि.15/11/2008 अन्वये राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकासाठी सदरची योजना जाहीर करण्यात आली असून या घटकांना पक्की घरे तसेच कच्च्या घराचे पक्के बांधकाम करता यावे यासाठी महानगरपालिका क्षेत्रात प्रत्येकी रु.2 लाख अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे.

<u>योजनेचे स्वरूप</u>

1. प्रतिलाभार्थी (कुटुंब) अनुदान- 2 लाख

   अ. घराचे बांधकाम सुरु करताना देय अनुदान- रु. 1 लाख (50%)

   ब. 50% अनुदानाची उपयोगिता सादर केल्यानंतर देय अनुदान- रु. 80000 (40%)

   क. घराचा ताबा व पूर्णत्वाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर देय अनुदान- रु. 20000 (10%)

   ड. लाभार्थी हिस्सा- शून्य

2. लाभार्थी निवड [लॉटरी पध्दत]-

   अ) भूखंड असलेल्यांना प्राधान्य

   ब) मनपा क्षेत्रातील आरक्षित जागेवर वसलेल्या व 1/1/1995 च्या मतदार यादीत समाविष्ट असलेल्यांना संरक्षण देऊन निवड.

या योजनेंतर्गत मनपास 2010-2011 पासून रु.21.297 कोटी एवढे अनुदान प्राप्त झाले असून 2422 घरकुलाचे उदिष्टांपैकी 614 घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे. शहर अभियंता यांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, चंद्रपूर यांना पाठविलेल्या माहे जुलै 2015 च्या अहवालानुसार (पत्र क्र.133, दि. 7/8/2015) त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ष | उद्दिष्ट | मंजूर केलेली | पूर्ण झालेली | प्रगती | अद्याप सुरु न |
|---|---|---|---|---|---|



Scanned by CamScanner

| | | घरकुले | घरकुले | पथावरील घरकुले | झालेली घरकुले |
|---|---|---|---|---|---|
| 2010-2011 | 22 | 22 | 22 | - | - |
| 2011-2012 | 1400 | 818 | 592 | 164 | 62 |
| 2012-2013 | 1000 | - | - | - | - |
| 2013-2014 | - | - | - | - | - |
| एकूण | 2422 | 840 | 614 | 164 | 62 |

1. आयुक्त, मनपा, चंद्रपूर यांचे पत्र क्र.1643, दि. 14/8/2013 नुसार 2001 च्या जनगणनेप्रमाणे शहरात अनुसूचित जाती कुटुंबांची संख्या 9573 असून त्यापैकी 3058 दारिद्र्य रेषेखालील होती, तर उर्वरित 6515 कुटुंबे दारिद्र्य रेषेवरील होती. सदर योजना मूलतः दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांसाठी असतांना मनपाने 2010-2011 ते 2013-2014 या कालावधीत 2422 पैकी 840 कुटुंबांनाच घरकुले मंजूर केली. अर्थात लाभ अनुज्ञेय असलेली कुटुंबाची संख्या 3058 असतांना केवळ 840 कुटुंबांनाच सदर लाभ देण्यात आला.

सदर योजनेंतर्गत सामाजिक न्याय विभागाच्या दि. 9/3/2010 शासन निर्णयानुसार स्वयंसेवी संस्था तलाठी यांचे मार्फत कुटुंबांचे सर्वेक्षण करणे, योजनेचे मार्गदर्शन करणे, प्रकरण तयार करणे, नवीन घराचा आराखडा तयार करणे या कामांसाठी योजनेच्या निधीमधून रु.1.06 कोटी (5%) राखीव तरतूद उपलब्ध असताना मनपाने या तरतुदीचा लाभ घेतला नाही. परिणामतः त्यावर अंमल न करता शासकीय लाभापासून जनतेस वंचित ठेवले आहे, असे दिसते.

2. वरील तक्त्यानुसार सन 2011-2012 मध्ये मंजूर झालेल्या 818 घरकुलांपैकी 164 घरकुले माहे जुलै 2015 च्या अहवालानुसार प्रगतीपथावरच असल्याचे दिसते. तर 62 घरकुलांचे बांधकाम सुरूच झाले नाही. अर्थात पुरेसा निधी उपलब्ध असतांना मंजूर कामे चार पाच वर्षापर्यंत पूर्ण न होणे यावरून योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात मनपा अपयशी ठरली आहे असे दिसते.

3. सदर योजनेंतर्गतच सन 2010-2011 व 2011-2012 मधील मंजूर 1422 कुटुंबांना प्रत्येकी दोन याप्रमाणे 2844 ब्लँकेट्स व 2844 सतरंज्या मंजूर असल्याने त्या समाजकल्याण विभागाच्या कार्यालयातून नेऊन लाभार्थी कुटुंबाना वाटप करण्याची सूचना सहायक आयुक्त, समाज कल्याण,चंद्रपूर यांनी पत्र क्र.63 दि. 14/1/2013 अन्वये मनपास केली असतांना मनपाने सदर सूचनेचे पालन केलेले नाही. परिणामी 1422 कुटुंबांना सदर साहित्यांचा लाभ घेता आला नाही, त्यामुळे समाज कल्याण विभागाच्या संबंधित कार्यालयात त्या तशाच पडून असाव्यात किंवा त्यांची अन्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली असण्याची शक्यता आहे.

4. सदर योजनेच्या बँक खातेपुस्तकाबाबत माहिती घेतली असता खात्यात पुढील शिल्लक असल्याचे कळले.

सन 2013-2014 सुरुवातीची शिल्लक - रु.14,43,18,639/-



Scanned by CamScanner

सन 2013-2014 अखेरची शिल्लक - रु.10,62,36,639/-

संबंधित नस्तीमध्ये माहे मार्च 2014 अखेरचा मासिक अहवाल उपलब्ध नाही. योजनेच्या प्रारंभापासून प्राप्त रु.21.297 कोटी अनुदानातून मार्च 2014 पर्यंत झालेल्या खर्च रु.10.67 कोटी (रु.21.297 वजा रु.10.623 कोटी) या रकमेतून किती लाभार्थ्यांना व कोणत्या टप्प्याप्रमाणे (अनुदान वितरणाचे एकूण 3 टप्पे आहेत) वाटप करण्यात आले त्याबाबत नस्तीमध्ये तपशील उपलब्ध नाही. तसेच बँक खात्यानुसार 2013-2014 मध्ये रु. 3,80,82,000/-खर्ची पडले असून प्रत्यक्ष अंदाजपत्रकातील प्रत्यक्ष खर्चाची रक्कम रु.4,63,92,000/- एवढी आहे. बँक खात्यातील अखेरच्या शिलकेचा राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियमावलीतील प्रकरण 30 परिच्छेद 30.5 नुसार ताळमेळ घालण्यात आलेला नाही. यावरून योजना राबविण्यात पारदर्शकतेचा अभाव दिसून येतो.

DATABWM6901 (Ref No : 15, Hmm No : 23)

## *28 महानगरपालिकेच्या अभिलेख्यावर कंत्राटदार नोंदणीकृत नसणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

| ***कंत्राटदाराच्या मनपातील नोंदणीअभावी शुल्क रकमेचे मनपाचे नुकसान होत आहे.*** |
|---|

महानगरपालिकेकडील बांधकाम विषय कामे खाजगी कंत्राटदाराकडून करण्यात येत असून त्यांना या कामाच्या मूल्याचे प्रदान होत असते. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील कलम 197 नुसार नोंदणीकृत कंत्राटदारासच निविदा जारी करण्याचे निर्देश आहे. या मधीलच परिशिष्ट 11 मध्ये कंत्राटदारांच्या वर्गीकृत नोंदणीसाठी नियमांची मांडणी केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने जारी केलेले शासन निर्णय दि.20/04/1998, 11/08/2003 तसेच क्र. सीएसटी1096/प्र.क्र.172/(एलबी)2009/इमा-2, दि.27/02/2009 अन्वये कंत्राटदारांच्या नोंदणी/नुतनीकरण/श्रेणीवाढीसाठी पुढीलप्रमाणे शुल्क निर्धारित केले असून त्याप्रमाणे मनपाच्या महसुलात भार टाकता येते.



Scanned by CamScanner

(अ) स्थापत्य कामे-

| अ.क्र. | कंत्राटदार नोंदणी वर्ग | कंत्राटदाराची काम करणेची कमाल मर्यादा | कंत्राटदार नोंदणी/नुतनीकरण/श्रेणीवाढीसाठी आकारावयाचे शुल्क (रुपये) |
|---|---|---|---|
| 1 | 1 अ | अमर्याद | 40,000/- |
| 2 | 1 ब | रु.2500 लक्ष | 35,000/- |
| 3 | 1 क | रु.1500 लक्ष | 35,000/- |
| 4 | 2 | रु.750 लक्ष | 30,000/- |
| 5 | 3 | रु.300 लक्ष | 25,000/- |
| 6 | 4 | रु.150 लक्ष | 20,000/- |
| 7 | 4 अ | रु.90 लक्ष | 15,000/- |
| 8 | 5 | रु.50 लक्ष | 10,000/- |
| 9 | 5 अ | रु.30 लक्ष | 7,500/- |
| 10 | 6 | रु.15 लक्ष | 5,000/- |
| 11 | 7 | रु.10 लक्ष | 3,000/- |
| 12 | 8 | रु.5 लक्ष | 2,000/- |
| 13 | 9 | रु.3 लक्ष | 2,000/- |

(ब) विद्युत कामे-

| अ.क्र. | कंत्राटदार नोंदणी वर्ग | कंत्राटदाराची काम करणेची कमाल मर्यादा | कंत्राटदार नोंदणी/नुतनीकरण/श्रेणीवाढीसाठी आकारावयाचे शुल्क (रुपये) |
|---|---|---|---|
| 1 | अ | अमर्याद | 25,000/- |
| 2 | ब | रु.25 लक्ष | 20,000/- |
| 3 | ब 1 | रु.15 लक्ष | 15,000/- |
| 4 | क | रु.10 लक्ष | 10,000/- |
| 5 | ड | रु.7.5 लक्ष | 5,000/- |
| 6 | इ | रु.2 लक्ष | 3,000/- |

तथापि, मनपाच्या कामावरील कंत्राटदारांची पात्रता तपासून मनपाच्या अभिलेख्यात नोंदणी



Scanned by CamScanner

करण्यात येत नाही असे आढळून आले आहे. परिणामी मोठया प्रमाणावर प्रत्येक वर्षी शुल्क रकमेपासून मनपा वंचित राहिली आहे असे दिसते.

उचित कार्यवाहीसह अनुपालन सादर करावे.

DATABWM6901 (Ref No : 66, Hmm No : 02)

अ.२०१९५१

***29 सन 2013-14 या आर्थिक वर्षात आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांचे आयकराची चुकीची परिगणना करून कमी रकमेची कपात केल्याबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| *सन 2013-14 या आर्थिक वर्षात मनपा चंद्रपूर शहर यांचे आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांचे आयकराची चुकीची परिगणना करण्यात आली असून उपलब्ध अभिलेखाची तपासणी केली असता संबंधित अधिकारी/कर्मचा-यांचे वेतनातून कमी रक्कम कपात करण्यात आल्याचे दिसून आले.* |

सन 2013-14 या आर्थिक वर्षात मनपा चंद्रपूर शहर यांचे आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांचे आयकराची चुकीची परिगणना करण्यात आली असून त्याप्रमाणे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे वेतनातून चुकीची आयकराची कपात केली आहे. याबाबत त्यांना संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे आयकर फॉर्म नं.16 उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.97, दिनांक 12.7.2016 नुसार कळविले असता त्यापैकी फक्त श्री.रविन्द्र ल.देवतळे, उपायुक्त यांचे नमुना फॉर्म नं.16 उपलब्ध करून देण्यात आले आहे. उर्वरित अधिका-यांचे फॉर्म नं.16 उपलब्ध करून देण्यात आले नाही. संबंधितांचे वैयक्तिक गुंतवणूकीचे अभिलेखसुध्दा उपलब्ध झाले नाहीत. तथापि, उपलब्ध करून देण्यात आलेल्या आयकर नोंदवहीच्या तपासणीत वेतनातून कमी आयकर कपात केल्याचे दिसून आले. पुढील उदाहरणांवरून आयकराची चुकीची परिगणना केल्याचे लक्षात येते :-

5) श्री.प्रकाश राजारामजी बोखड, आयुक्त, मनपा, चंद्रपूर शहर (रक्कम रुपयात)

| वजाती Deductions | | आयकराची परिगणना | |
|---|---|---|---|
| अनिनि - | 30000 | ग्रॉस पे - | 721949 |
| एलआयसी - | 0 | (-) PT - | 2500 |
| गटविमा - | 11520 | शिल्लक - | 719449 |
| व्यवसाय कर - | 2500 | (-) S.D. - | 71520 |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| गृह कर्ज - 30000 | करपात्र उत्पन्न् - | 647929 |
| | प्रदानायोग्य कर | |
| रु.200000 पर्यंत (निरंक) - | | निरंक |
| रु.500000 पर्यंत (10%) - | | 30000 |
| रु.1000000 पर्यंत (10%) - | | 29586 |
| आयकर - | | 59586 |
| | 3% surcharge - | 1788 |
| | एकूण आयकर - | 61372 |
| आयकर नोंदवहीनुसार वेतनातून कपात केलेला आयकर | | 41203 |
| कमी कपात केलेला आयकर | - | 20169 |

6) श्री.रविन्द्र लक्ष्मण देवतळे, उपायुक्त, मनपा, चंद्रपूर शहर (रक्कम रुपयात)

| वजाती Deductions | | आयकराची परिगणना | |
|---|---|---|---|
| भनिनि | - 36000 | ग्रॉस पे - | 711553 |
| एलआयसी | - 52480 | (-) PT - | 2500 |
| गटविमा | - 11520 | शिल्लक - | 706053 |
| व्यवसाय कर - | 2500 | (-) S.D. - | 100000 |
| TA - | 3000 | करपात्र उत्पन्न् - | 606053 |
| | | प्रदानायोग्य कर | |
| | | रु.200000 पर्यंत (निरंक) - | निरंक |
| | | रु.500000 पर्यंत (10%) - | 30000 |
| | | रु.1000000 पर्यंत (10%) - | 21211 |
| | | आयकर - | 51211 |
| | | 3% surcharge - | 1536 |
| | | एकूण आयकर - | 52747 |
| आयकर नोंदवहीनुसार वेतनातून कपात केलेला आयकर | | | 40132 |
| कमी कपात केलेला आयकर | | - | 12615 |

(सदर माहिती ही श्री.देवतळे, उपायुक्त यांचे आयकर फॉर्म-16 वरुन घेतलेली आहे.)

7) श्री.देवानंद ध.मेश्राम, मुख्य लेखापरीक्षक, मनपा, चंद्रपूर शहर (रक्कम रुपयात)

| वजाती Deductions | | आयकराची परिगणना | |
|---|---|---|---|
| भनिनि | - 36000 | ग्रॉस पे - | 659722 |
| एलआयसी | - 52480 | (-) PT - | 2500 |
| गटविमा | - 11520 | शिल्लक - | 657222 |
| व्यवसाय कर - | 2500 | (-) S.D. - | 80760 |
| TA | - 30000 | करपात्र उत्पन्न् - | 576462 |
| | | प्रदानायोग्य कर | |
| | | रु.200000 पर्यंत (निरंक) - | निरंक |
| | | रु.500000 पर्यंत (10%) - | 30000 |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | रु.1000000 पर्यंत (10%) - | 15292 |
| | आयकर - | 45292 |
| | 3% surcharge - | 1359 |
| | एकूण आयकर - | 46650 |
| आयकर नोंदवहीनुसार वेतनातून कपात केलेला आयकर | | 36170 |
| कमी कपात केलेला आयकर | - | 10481 |

8) श्री.संतोष हनमंतराव कंदेवार, मुख्य लेखाधिकारी, मनपा, चंद्रपूर शहर - (रक्कम रुपयात)

| वजाती Deductions | | आयकराची परिगणना | |
|---|---|---|---|
| भनिनि | - 96000 | ग्रॉस पे - | 578867 |
| एलआयसी | - 0 | (-) PT + TA - | 7300 |
| गटविमा | - 5760 | शिल्लक - | 571567 |
| व्यवसाय कर | - 2500 | (-) S.D. - | 100000 |
| TA | - 4800 | करपात्र उत्पन्न - | 471567 |
| | | प्रदानायोग्य कर | |
| | | रु.200000 पर्यंत (निरंक) - | निरंक |
| | | रु.500000 पर्यंत (10%) - | 27157 |
| | | रु.1000000 पर्यंत (20%) - | 0 |
| | | आयकर - | 27157 |
| | | 3% surcharge - | 815 |
| | | एकूण आयकर - | 27972 |
| आयकर नोंदवहीनुसार वेतनातून कपात केलेला आयकर | | | 15000 |
| कमी कपात केलेला आयकर | | - | 12972 |

(5) श्री.देवआनंद लि.कांबळे, लघुलेखक, मनपा, चंद्रपूर शहर - (रक्कम रुपयात)

| वजाती Deductions | | आयकराची परिगणना | |
|---|---|---|---|
| भनिनि | - 66000 | ग्रॉस पे - | 569485 |
| एलआयसी | - 17068 | (-) PT + TA - | 7300 |
| गटविमा | - 300 | शिल्लक - | 562185 |
| व्यवसाय कर | - 2500 | (-) S.D. - | 83388 |
| TA | - 4800 | करपात्र उत्पन्न - | 478797 |
| | | प्रदानायोग्य कर | |
| | | रु.200000 पर्यंत (निरंक) - | निरंक |
| | | रु.500000 पर्यंत (10%) - | 27898 |
| | | रु.1000000 पर्यंत (20%) - | 0 |
| | | आयकर - | 27898 |
| | | 3% surcharge - | 836 |
| | | एकूण आयकर - | 28734 |



Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| आयकर नोंदवहीनुसार वेतनातून कपात केलेला आयकर | 15500 |
| कमी कपात केलेला आयकर | - 13234 |

(गव्हर्नमेन्ट ऑफ इंडिया, मिनिस्ट्री ऑफ फायनांस, डिपार्टमेंट ऑफ रेव्हेन्यु, सेन्ट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस, न्यु दिल्ली यांचे परिपत्रक क्र. 08 /2013 F.No. 275/192/2013-IT(B), दिनांक 10/10/2013 नुसार आयकराची परिगणना करण्यांत आली आहे.)

वरील उदाहरणानुसार सन 2013-14 या आर्थिक वर्षात कमी कपात केलेल्या आयकराची अचुक परिगणना करुन फरकाची रक्कम आयकर विभागाकडे भरणा केल्याची खात्री करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 97, दि.12.7.2016 नुसार विभागास अनुपालन / अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATDSTM7301 (Ref No : 11, Hmm No : 97)

***30 म.न.पा.चंद्रपूर शहर येथील अधिकारी / कर्मचारी व इतर फर्मला दिलेल्या अग्रिमाबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 02**

*म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| ***सन 2013-14 या आर्थिक वर्षात मनपा चंद्रपूर शहरने त्यांचे अधिकारी कर्मचारी तसेच इतर फर्मला दिलेल्या अग्रिमांचे समायोजन अग्रिम दिल्यापासून तीन महिन्यांचे आत करणे आवश्यक असतांना ब-याच कालावधीपर्यंत ते प्रलंबित ठेवून विलंबाने समायोजन केले आहे. दोन अग्रिमांचे 1994 व 2004 पासून अद्यापही समायोजन करण्यात आले नाही*** |

चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूरने सन 2013-14 या आर्थिक वर्षात त्यांचे अधिकारी/कर्मचारी तसेच इतर फर्मला योजना/उपक्रम राबविणे/प्रवासभत्ता तसेच वाहन खरेदीकरिता अग्रिम दिल्याचे दिसून येते. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मं.मुंबई शासन निर्णय क्र.विअप्र-10.08/ प्र.क्र.70/2008/विनियम, दिनांक 15.5.2009 तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, 1978, भाग पहिला, उपविभाग-एक, अ.क्र.18, नियम क्र.142-क नुसार अग्रिम काढल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांचे आत त्याचे समायोजन करणे आवश्यक आहे. परंतु ब-याच विलंबाने अग्रिमाचे समायोजन केल्याचे दिसून येते. तसेच विवरणपत्रातील अ.क्र.1 व 2 वरील अग्रिमाचे प्रदीर्घ कालावधीपासून प्रलंबित असून अद्यापही समायोजन करण्यात आले नाही.



Scanned by CamScanner

अग्रिमाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क. | अग्रिम दिलेल्या अधिकारी/ कर्मचारी/ फर्मचे नांव | प्रमाणक क्र.व दिनांक | अग्रिम देण्याचे प्रयोजन | अग्रिमाची रक्कम | अग्रिम समायोजन प्र.क्र.व दि. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | टाटा इंजि.ऑटो.कंपनी, दिल्ली | 2400, 24.11.1994 | टाटा सुमो कार खरेदी अग्रिम | 20000/- | निरंक | प्रलंबित |
| 2 | श्री.संजय वाघमारे, टाऊन प्लॅनर | 326, 1.6.2004 | मुंबई प्रवास भत्ता अग्रिम | 6000/- | निरंक | प्रलंबित |
| 3 | श्री.बेनाहर जोसेफ (एस.आय.) | 727, 15.1.2010 | प्रदुषणाबाबत पाणी तपासणीकरिता अग्रिम | 5000/- | 285, 11.5.2014 | विलंबाने समायोजन |
| 4 | श्री.एम.के.बारई, कनि.अभि. | 98, 23.12.2011 | हद्दवाढ प्रस्ताव तयार करणेकरिता अग्रिम | 15000/- | 292, 11.8.2014 | -"- |
| 5 | श्री.अनिल गेडमवार, क.लि. | 352, 9.7.2012 | प्रवासभत्ता अग्रिम | 2500/- | 270, 11.6.2014 | -"- |
| 6 | श्री.मधुसूदन दिंगलवार,आ.नि. | 582, 6.8.2012 | मोकाट कुत्रे पकडण्यास साहित्य खरेदी | 5000/- | 549, सप्टेंबर 2013 | -"- |
| 7 | श्रीमती अलका आकुलवार,म.आ.अ | 1114, 20.12.2012 | रोगनिदान शिबीर अग्रिम | 5000/- | 237, मे 2013 | -"- |
| 8 | श्री.राऊत, नगर रचनाकार | 1347, 4.2.2013 | चंद्रपूर विकास योजना अधि प्रमाणित प्रति सादर करणेबाबत अग्रिम | 40000/- | 199, 4.8.2014 | -"- |
| 9 | श्री.शरद नागोसे, क.लि. | 1492, 25.2.2013 | पोल्स पोलीओ अग्रिम | 5000/- | 1740, 27.3.2014 | -"- |
| 10 | श्री.बबन भाकरवाले, क.लि. | 1499, दि.25.2.2013 | मनपा गाळे लिलाव अग्रिम | 5000/- | 561, 23.8.2013 | -"- |
| 11 | श्री.विवेक पोतनुरवार,आ.नि. | 1607, दि.22.3.2013 | महाकाली यात्रा अग्रिम | 10000/- | 678, 25.9.2013 | -"- |
| 12 | श्री.अशोक जयदे,क.लि. | 1736, 28.3.2013 | बेवारस मृतदेह | 2250/- | 575, 30.8.2013 | -"- |
| 13 | श्री.सुरेश अरगुडे, वाहन चालक | 1760, 30.3.2013 | आयुक्त यांचे वाहन सर्व्हीसिंगकरीता अग्रिम | 10000/- | 107, 7.5.2014 | -"- |
| 14 | श्री.एस.ए.मोळे, ज.नि. | 5, 16.4.2013 | कुलर, पंखे दुरुस्ती अग्रिम | 5000/- | 779, 17.10.2013 | -"- |
| 15 | श्री.नंदु आवारी, ज.नि. | 83, 25.4.2013 | किरकोळ खर्च | 10000/- | 1807, 29.3.2014 | -"- |
| 16 | श्री.शरद नागोसे, क.लि. | 84, 25.4.2013 | यात्रा | 3000/- | 654, 25.9.2013 | -"- |
| 17 | श्री.रफीक शेख, प्रकल्प अधि. | 212, 23.5.2013 | शिकाऊ वाहन चालक परवाना | 25000/- | 828, 28.10.2013 | -"- |
| 18 | श्री.संतोष गर्गेलवार, आ.नि. | 451, 5.8.2013 | अनोळखी मृतदेह विल्हेवाट लावणेकरिता अग्रिम | 7500/- | 1741, 27.3.2014 | -"- |
| 19 | श्री.सुरेश अरगुडे, वा.चा. | 540, 23.8.2013 | मा.आयुक्त यांचे वाहन सर्व्हीसिंगकरिता अग्रिम | 2000/- | 388, 4.8.2014 | -"- |
| 20 | श्री.उदय मैलारपवार | 493, 14.8.2013 | किरकोळ खर्च | 6000/- | 1808, 29.3.2014 | -"- |
| 21 | श्री.रफीक शेख, प्रकल्प अधि. | 495, 14.8.2013 | रक्षाबंधन व परवाना | 40000/- | 1445, 14.2.2014 | -"- |
| 22 | डॉ.सौ.अलका आकुलवार, वैद्यकीय अधिकारी | 663, 25.9.2013 | नागरी आरोग्य केन्द्राकरीता किरकोळ खर्चासाठी अग्रिम | 6000/- | 44, 23.4.2014 | -"- |



Scanned by CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 23 | श्री.बंडु आत्राम, ज.लि. | 729, 9.10.2013 | किरकोळ खर्च | 5000/- | 1738, 27.3.2014 | -/- |
| 24 | श्री.मनोज नन्हेट, कनिष्ठ लिपिक,कर विभाग | 986, 7.12.2013 | व्यापार संकुल गाळे लिलावाकरिता अग्रिम | 4000/- | 223, 4.6.2014 | -/- |
| 25 | श्री.नंदु लाखे | 881, 7.12.2013 | प्रवासभत्ता अग्रिम | 2000/- | 861, 13.10.2014 | -/- |
| 26 | श्री.बी.डी.गोवर्धन, कनिष्ठ लिपिक,कर विभाग | 1309, 24.1.2014 | मनपा समोरील बाजार फी वसुलीचे कंत्राट लिलावाचे किरकोळ खर्चाकरीताअग्रिम | 4000/- | 442, 2.8.2014 | -/- |
| 27 | डॉ.अंजली आंबटकर, वैद्यकीय अधिकारी | 1237, 10.1.2014 | दि.19.1.2014 ला होणाऱ्या पल्स पोलीओ लसीकरण कार्यक्रमाचे खर्चाकरीता अग्रिम | 35000/- | 745, 10.9.14 | -/- |
| 28 | श्री.संतोष गर्गेलवार, अ.नि. | 1464, 20.2.2014 | मनपा कत्तलखाना (स्लॉटर हाउस) अन्न सुरक्षा व मानके कायदा 2006 नुसार परवाना फी करीता अग्रिम | 25000/- | 531, 23.7.2014 | -/- |
| 29 | डॉ.अंजली आंबटकर, वैद्यकीय अधिकारी | 1496, 21.2.2014 | मनपातर्फे दि.23.2.2014 ला पल्स पोलीओ अभियानाकरीता किरकोळ खर्चाकरीता अग्रिम | 29000/- | 786, 10.9.2014 | -/- |
| 30 | श्री.विजय मोगरे | 1675, 13.3.2014 | शिलाईकरीता अग्रिम | 48560/- | 569, 8.2014 | -/- |

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 82, दि.20.06.2006 नुसार विभागास अनुपालन / अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून कोणतेही समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATDSIM7301 (Ref No : 26, Hmo No : 82)

***31 वैदयकीय प्रतिपूर्ती देयकातील चुकीच्या प्रदानामुळे झालेल्या अतिप्रदानाची वसुली करणेबाबत तसेच वैदयकीय देयकातील अनियमितेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 33231.00/-

| |
|---|
| *सन 2013-14 या आर्थिक वर्षात मनपा चंद्रपूर शहरने त्यांचे अधिकारी/ कर्मचारी यांची वैदयकीय प्रतिपूर्ती देयके मंजूर करताना शासन निर्णयानुसार दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन न केल्याचे दिसून आले. त्यामुळे* |



Scanned by CamScanner

**अश्या नियमबाह्य प्रदानांची वसुली करुन रक्कम मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे.**

चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूरने सन 2013-14 या आर्थिक वर्षात त्यांचे आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांची वैदयकीय प्रतिपूर्ती देयके मंजूर केली आहेत. सदर देयके मंजूर करताना वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व दिलेल्या निर्देशानुसार अटी व शर्तीकडे दुर्लक्ष केल्याचे आढळून आले.

अशा पध्दतीने प्रदान केलेल्या देयकातील काही उदाहरणे खालीलप्रमाणे असून मनपा चंद्रपूरने अशी संपूर्ण प्रकरणे पुन्हा तपासून चुकीच्या प्रदानाची रक्कम संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेकडून वसुल करुन मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे.

1) प्रमाणक क्र.1169, दिनांक 13.3.2014, रु.29119/-
श्री.कैलाश हरी देशवाले, शिपाई.

श्री.कैलाश हरी देशवाले, शिपाई यांनी त्यांचे पत्नीचे वैदयकीय प्रतिपूर्ती देयक रु.32355/- मंजूरीस सादर केले असून वरील प्रमाणकान्वये त्यांना सदर देयकाची रु.29119/- वैदयकीय प्रतिपूर्ती मंजूर केलेली आहे.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई शासन निर्णय क्र.एमएजी-1099/प्र.क्र.240/99/आरोग्य-3, दिनांक 30.08.1999 नुसार खाजगी रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून दि. 9.9.2012 ते 17.9.2012 या कालावधीत भरती असताना जो खर्च आला असेल त्या खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेयतेनुसार प्रदान करता येते. परंतु रुग्णालयातील वास्तव्याच्या कालावधी व्यतिरिक्त औषधे खरेदीची देयके मंजूर केलेली आहेत.

अनुज्ञेय नसलेल्या मागणीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | बिल क्र. व दिनांक | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| 1 | BO7535, दि.8.9.2012 | 4282.42 |
| | एकूण | 4282/- |

तरी वरीलप्रमाणे रुग्णालयातील वास्तव्याच्या कालावधीबाहेरील मंजूर केलेली रक्कम रु.4282/- संबंधितांकडून वसुल करुन मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे.

2) प्रमाणक क्र.1172, दिनांक 13.3.2014, रु.33717/-
श्री.एम.एम.बेग, निरीक्षक

श्री.एम.एम.बेग, निरीक्षक यांनी त्यांचे पत्नीचे वैदयकीय प्रतिपूर्ती देयक रु.37464/- मंजूरीस सादर केले असून वरील प्रमाणकान्वये त्यांना सदर देयकाची रु.33717/- वैदयकीय प्रतिपूर्ती मंजूर केलेली आहे.

त्यांचा आंतररुग्ण म्हणून वास्तव्याचा कालावधी दिनांक 6.11.2013 ते 9.11.2013 होता.

अनुज्ञेय नसलेल्या मागणीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | बिल क्र. व दिनांक | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| 1 | 9278, दि.28.9.2013 | 352.37 |
| 2 | 792, दि.26.10.2013 | 1780 |
| 3 | 12443, दि.15.11.2013 | 2444 |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | एकूण | 4576 |

तरी वरीलप्रमाणे रुग्णालयातील वास्तव्याच्या कालावधीबाहेरील मंजूर केलेली रक्कम रु.4576/ संबंधितांकडून वसुल करुन मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे

3) प्रमाणक क्र.1107, दिनांक 27.3.2014, रु.24373/-
श्री.विश्वनाथ रतन महातव, सफाई कामगार

श्री.विश्वनाथ रतन महातव, सफाई कामगार यांनी त्यांचे पत्नीचे वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक रु.27112/- मंजुरीस सादर केले असून वरील प्रमाणकान्वये त्यांना सदर देयकाची रु.24373/- वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर केलेली आहे.

सदर देयकाची तपासणी केली असता श्री.विश्वनाथ रतन महातव यांना सदर देयकाचे शोधन करण्यापूर्वी दोन अपत्ये हयात असतांना तिसऱ्या अपत्याचे प्रसुतीसंबंधीचे वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक मंजूर केले आहे. सदर प्रकरणी श्री.महातव यांना सदर देयक मंजूर करणेपूर्वी दोन हयात अपत्ये असल्याचे कुटुंब मर्यादा प्रमाणपत्रावरुन दिसून येते.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.एमएजी-1095/प्र.क्र.45/आरोग्य-3, दिनांक 28.11.2000 नुसार दोन पेक्षा अधिक हयात अपत्ये असतांना शासनाच्या धोरणानुसार दिनांक 1 मे 2001 नंतर त्यांच्या कुटुंबातील अपत्यांची संख्या वाढल्यास वैद्यकीय सोयी मिळण्यास पात्रता संपुष्टात येते.

तसेच महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई शासन निर्णय क्र.एमएजी-1099/प्र.क्र.237/आरोग्य-3, दिनांक 21.8.1999 नुसार प्रसुतीपूर्वी पहिल्या तीन महिन्याचे आत शासकीय रुग्णालयात नांव नोंदविणे आवश्यक आहे.

उक्त प्रकरणी 2 पेक्षा अधिक हयात अपत्ये व प्रसुतिपूर्व शासकीय रुग्णालयात नोंद केल्याचे प्रमाणपत्र न जोडल्यामुळे नियमबाह्य प्रदान झाल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचेकडून नियमबाह्य प्रदान केलेली रक्कम रु.24373/- वसुल करुन मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे.

(ब) तसेच वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके मंजूर करताना सर्वसाधारणपणे पुढील अनियमितता दिसून आल्यात.

1) वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकामध्ये रुग्णालयाचा नोंदणी क्रमांक लिहिण्यात येत नाही. त्याऐवजी बऱ्याच प्रकरणी डॉक्टरांचा नोंदणी क्रमांक लिहिण्यात आले आहेत.
2) रु.5000/- पेक्षा अधिक रकमेच्या देयकावर मुद्रांक शुल्क लावण्यात येत नाही.
3) प्रमाणकावर "पेड बाय मी" (Paid by me) लिहून स्वाक्षरी घेण्यात येत नाही.
4) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई शासन निर्णय क्र.एमएजी 2005/9/प्र.क्र.1/आरोग्य-3, दिनांक 19.3.2005 मधील अ.क्र.2 नुसार खाजगी रुग्णालयातील वास्तव्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती तक्ता-ब मधील वास्तव्याच्या प्रकारानुसार न करता सरसकट 90% प्रमाणे करण्यात येते. प्रत्यक्षात रुग्णालयात वास्तव्याच्या जनरल वार्ड, वाथरुमसह स्वतंत्र कक्ष, डबल बेडेड स्वतंत्र कक्ष या प्रकारानुसार वास्तव्य खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे 1 ते 3 प्रकरणी वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकाची चुकीचे प्रदानाची रक्कम संबंधितांकडून वसुल करुन मनपा निधीत जमा करुन पूर्तता करावी. तसेच अशी संपूर्ण अनियमित प्रकरणे मनपा स्तरावर तपासणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

आंतर वि.

## 32 चंद्रपूर पंचशताब्दी योजना व महापौर चषक स्पर्धा आयोजनातील बिछायत व भोजनावरील अनियमित खर्चाबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 0**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 5585852.00/-

| |
|---|
| ***मनपाने पंचशताब्दी योजना व महापौर चषक स्पर्धा स्वतंत्रपणे आयोजित करुन मोठया प्रमाणावर अवाजवी खर्च केला असल्याचे दिसून आले.*** |

मनपा ठराव क्र.99, दिनांक 15.12.2013 नुसार चंद्रपूर शहरात दि.21,22 व 23 डिसेंबर, 2013 या कालावधीत चंद्रपूर शहरास 500 वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पंचशताब्दी महोत्सव व लगतच्या कालावधीतच म्हणजे 3 ते 25 जानेवारी, 2014 दरम्यान महापौर चषक स्पर्धा आयोजित करण्या स मंजूरी देण्यात आली . त्यानुसार कार्यक्रम घेऊन त्यावर मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात आला.

या कार्यक्रमाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

**अ) कार्यक्रम - पंचशताब्दी महोत्सव - तरतुद रु.30.00 लक्ष**

(रकमा रुपयात)

| दिनांक | स्पर्धेचा तपशिल | एकूण खर्च |
|---|---|---|
| 21.12.2013 | ज्येष्ठ नागरीक मेळावा | 16,79,452/- |
| 22.12.2013 | मॅराथॉन, कौमी एकता संमेलन, कव्वाली जंगी मुकाबला | |
| 23.12.2013 | मोलकरीण महिला मेळावा, वन जमिन धारक व झोपडपट्टी धारकांचा मेळावा, सांस्कृतिक कार्यक्रम | |

**ब) कार्यक्रम - महापौर चषक - तरतुद रु.35.00 लक्ष**

(सर्वसाधारण सभा बैठक दि.20.2.2014, ठराव क्र.16, दि.29.5.2014 मधील तपशिलानुसार खर्च)

(रकमा रुपयांत)

| कालावधी | स्पर्धेचा तपशिल | खर्च रुपये |
|---|---|---|



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| दि.10,12 व 13.1.2014 | मॅराथॉन | 25415 |
| | व्हॉलीबॉल | 366759 |
| 3 ते 8.1.2014 | फुटबॉल | 547043 |
| 17,18 व 20.1.2014 | कबड्डी | 1284261 |
| 4 ते 8.1.2014 | हॉकी | 329237 |
| 6,7 व 8.1.2014 | कुश्ती | 728386 |
| 10 ते 25.1.2014 | क्रिकेट | 506873 |
| | शरीर सौष्ठव | 248316 |
| | एकूण | 3906400 |

(मनपा ठराव क्र.27, दि.29.5.2014 अन्वये जादा खर्चास कार्योत्तर मंजूरी प्राप्त)

<u>यावरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत</u> :-

9) <u>पंचशताब्दी</u> महोत्सवांतर्गत दिनांक 21, 22 व 23 डिसेंबर, 2013 या केवळ तीन दिवसांच्या वर उल्लेखित कार्यक्रमांकरीता एकूण खर्च रु.16.79 लाखपैकी मे.शिवगार्वती बिछायत केंद्रास रु .9.92 लाखाचे प्रदान झाले. मुंबई वित्तीय नियम, 1959 मधील नियम 58 नुसार सदरचा अवाजवी खर्च वित्तीय औचित्याला धरून नाही, असे दिसते.

10) <u>महापौर चषक स्पर्धा</u> विविध ठिकाणी 3 ते 25 जानेवारी, 2014 या प्रदीर्घ कालावधीत आयोजित करण्यात आली होती. सर्वसाधारण सभेच्या दि .28.11.2013 च्या बैठकीत ठेवण्यात आलेल्या तपशिलानुसार व उपलब्ध बिजकानुसार बिछायत, भोजन व इतर अनावश्यक बाबींवर पुढीलप्रमाणे अवाजवी खर्च झाला.

(रकमा रुपयांत)

| अ. क्र. | खेळाचा तपशिल | कालावधी | स्थळ | बिछायत खर्च | बिछायत, भोजन अंतर्गत खर्चाच्या ठळक आक्षेपीत बाबी | | भोजना-वरील खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | बाब | खर्च | |
| 1 | व्हॉलीबॉल | 10,11, 12.1.2014 (3 दिवस) | दादोर शाळेचे ग्राऊंड | 132541 | स्टेज<br>साऊंड सिस्टीम<br>मंडप, प्रवेश गेट इ. | 28838<br>26460<br>36794 | - |
| 2 | फुटबॉल | 3 ते 9.1.2014 (6 दिवस) | चांदा क्लब ग्राऊंड | 221454 | पेंडाल,मंडप, प्रवेश गेट<br>स्टेज<br>साऊंड सिस्टम<br>रेड कार्पेट<br>जनरेटर | 51948<br>28836<br>52920<br>9720<br>51300 | - |
| 3 | कबड्डी | 17,18, 19.1.2014 (3 दिवस) | पठाणपुरा व्यायाम शाळा ग्राऊंड | 480020 | गॅलरी (4200 रनींग फुट)<br>मंडप, गेट<br>साऊंड सिस्टीम<br>जनरेटर | 283500<br>42150<br>26450<br>25550 | 216507 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | स्टेज | 21427 | |
| 4 | हॉकी | 4 ते 8.1.2014 | जिल्हा स्टेडीयम | 76628 | मंडप, स्टेज | 44568 | - |
| 5 | कुश्ती | 6 ते 8.1.2014 (3 दिवस) | गांधी चौक (जास्त रहदारी व वर्दळीचा चौक) | 209589 | स्टेज,<br>साउंड सिस्टीम<br>LED बॉल<br>कारपेट | 51060<br>26460<br>31500 (1 दिवसा-साठी)<br>8100 | 111928 |

11) दि.3 ते 25.1.2014 या कालावधीत घेतलेल्या विविध कार्यक्रमाचे खेळांचे विविध स्थळ बघता सर्व खेळ एकाच ठिकाणी मोठया ग्राऊंडवर किंवा सर्व सुविधायुक्त जिल्हा स्टेडीयम येथे शासनाच्या क्रिडा विभागाच्या मदतीने नियोजन केले असते तर कमीत कमी कालावधीमध्ये तुलनेने कमी खर्चात संयुक्त कार्यक्रम पार पाडणे शक्य होते.

12) खेळ ही बाब चैनीची किंवा ऐशआरामाची नसून ते खेळ भावनेनेच आयोजित करणे आवश्यक असल्याने फुटबॉल, हॉकी, व्हॉलीबॉल, क्रिकेट सारख्या स्पर्धांसाठी मंडप , स्टेज, रेड कार्पेटसाठी एवढा प्रचंड खर्च करणे समर्थनीय वाटत नाही.

फुटबॉल स्पर्धेसाठी बिजकाप्रमाणे केवळ 3 हॅलोजनाचा दर आकारला आहे. अर्थात सदर स्पर्धा रात्रीच्या वेळेस घेण्यात आली नाही . असे असताना जनरेटरवरील खर्च रु .51300/- चुकीचा व वसुलपात्र ठरतो.

13) दिनांक 18.12.2013 च्या बैठकीत सर्वसाधारण सभेने मान्य केल्याप्रमाणे उपरोक्त सर्व स्पर्धा दिवसाच्या वेळेत घेण्याचे निश्चित केले असल्याचे तसेच मनपाच्या अधिकारी /पदाधिका-यांच्या वाहनाच्या लॉगबुक मधील त्यांच्या विविध खेळाच्या स्थळांना भेट दिल्याच्या वेळेच्या नोंदीचा सर्वसाधारण आढावा घेतला असता सदर स्पर्धा दिवसाच्या वेळेस घेतल्याचे दिसते . असे असताना हॅलोजन, सिरिज, जनरेटर यावरील पुढील खर्च अनावश्यक व वसूलपात्र ठरतो.

16) हॉलीबॉल - रु.23625/-
17) फुटबॉल - रु.54378/- (3 हॅलोजन व जनरेटर)
18) कबड्डी - रु.70920/- (50 हॅलोजन, 30 टयुबलाईल, जनरेटर, सिरिज)
19) कुश्ती - रु.60075/- (25 हॅलोजन, सिरीज, जनरेटर)

14) वरील दोन्ही कार्यक्रम एकत्रितपणे न घेता लगतच्या कालावधीतच स्वतंत्रपणे घेतल्याने वेळेचे व मनपा निधीतून होणा-या खर्चाचे उचित नियोजन झाले नाही , परिणामी दोन्ही कार्यक्रम मिळून एकूण खर्च रु.55.85 लक्ष पैकी मोठया बिछायत , डेकोरेशन व केंटरींग या प्रयोजनासाठी रु .32.19 लक्ष एवढा म्हणजेच 57.70% प्रचंड खर्च करण्यात आला.

15) सदर कार्यक्रमाचे आयोजनावरील खर्चाचे अवलोकन केले असता साऊंड सिस्टमवरील खर्च रु .167580/-,



Scanned by CamScanner

जनरेटरवरील खर्च रु .230850/- तसेच मंडप डेकोरेशनवरील रु .2190123/- चे प्रदान केल्याचे दिसून येते. वास्तविक सदर योजना नियो जनबध्द राबविली असती तर वरील साहित्याचे किरायाऐवजी मनपाला जनरेटर, साऊंड सिस्टम इ.आवश्यक साहित्य खरेदी करता आले असते व मनपाचे निधीची बचत झाली असती.

16) म.शा. शासन अधिसूचना क्र.संकीर्ण-1007/प्र.क्र.376/नावि-26, दिनांक 22.2.2008 नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 चे कलम 66(41) च्या तरतुदीचा वापर करून शासन महानगरपालिकांना वार्षिक समारंभाप्रित्यर्थ खर्चाची मर्यादा "ड" वर्ग महानगरपालिकेस रु .5.00 लक्ष ठरवून देण्यात आली आहे. त्यापेक्षा पंचशताब्दी महोत्सवावर झालेला खर्च हा अधिक आहे. त्यामुळे रु.5.00 लक्ष पेक्षा अधिक झालेल्या खर्चास शासनाची कार्योत्तर मंजूरी घेण्याचे प्रस्तावास स्थायी समिती ठराव क्र.27, दि.29.5.2014 नुसार मंजूरी दिली असून लेखापरीक्षण कालावधीपर्यन्त रु .5.00 लक्ष पेक्षा ज्यादा झालेला खर्च रु .1179452/- चे खर्चास शासनाची कार्योत्तर मंजूरी प्रा प्त झाली नसल्याचे दिसून आले.

वरील आक्षेपासंदर्भात समर्थनिय खुलासा व उचित कार्यवाहीसह अनुपालन सादर करावे.

DATDSTM7501 (Ref No : 68, Hmo No : 124)

***33 श्री. निशिकांत चांदेकर, कनिष्ठ लिपिक विरुध्द नगर परिषद, चंद्रपूर, युपीएल नं.673/2000 मा. औद्योगिक न्यायालय, नागपूर तसेच रिट पिटीशन नं.1097/2003 मा. उच्च न्यायालय, नागपूरचे कोर्ट प्रकरणाबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 0**

*लेखा शीर्ष : 278 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9 व*

***श्री. निशिकांत चांदेकर, कनिष्ठ लिपिक विरुध्द नगर परिषद, चंद्रपूर, युपीएल नं.673/2000 मा. औद्योगिक न्यायालय, नागपूर तसेच रिट पिटीशन नं.1097/2003 मा. उच्च न्यायालय, नागपूर या प्रकरणी नगर परिषद, चंद्रपूरच्या वतीने न्यायालयात बाजू न मांडल्याने नगर परिषद चंद्रपूर विरुध्द एकतर्फी निर्णय झाला परिणामी उक्त कर्मचारी यांना पुर्वलक्षी प्रभावाने दिनांक 17.08.2000 पासून सेवाविषयक बाबींचे सर्व फायदे देण्यात आल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे. या प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 72 (क)(1) अन्वये न्यायालयीन प्रकरणी शासकिय कर्तव्य पार पाडण्यास कसूर केल्याने संबंधीतावर कुठलिही कार्यवाही करण्यात आली नाही.***



Scanned by CamScanner

श्री. निशिकांत मनोहर चांदेकर, कनिष्ठ लिपिक हे चंद्रपूर नगर परिषद, चंद्रपूर यांचे आदेश क्र.चनप/मुलि/आस्था/105/92, दिनांक 21.08.1992 अन्वये अनुकंपा तत्वावर शिपाई वर्ग-4 चे पदावर दिनांक 21.08.1992 ला मध्यान्हपूर्व रुजू झाले. दरम्यानच्या काळात श्री. चांदेकर यांचा अपघात झाल्याने दिनांक 21.7.1995 ते 18.09.1997 पर्यन्त सतत गैरहजर होते. वैद्यकीय बोर्ड नागपूर वैद्यकीय प्राधिकारी यांचे वैद्यकीय तपासणी अहवालाचे अनुषंगाने स्थायी समिती सभा दिनांक 12.08.1997 रोजी ठराव क्र. 43 नुसार कार्यालयीन आदेश क्र.चंनप/मुलि/साप्रआ/119/97, दिनांक 18.09.1997 अन्वये पुर्ववत कामावर रुजू करुन घेतले.

श्री. निशिकांत चांदेकर यांनी त्यांचेकडून वर्ग-3 चे काम करुन घेत असल्यामुळे त्यांना 1984 पासून वर्ग-3 मध्ये सामावून घेणेबाबत मा. औद्योगिक न्यायालय, नागपूर येथे यु.पी.एल.नं. 673/2000 अन्वये न्यायालयात दावा दाखल करण्यात आला होता. परंतु **नगर परिषद, चंद्रपूर कार्यालयाचे वतीने बाजू मांडण्याकरिता प्रतिनिधी हजर न झाल्याने** कार्यालयास या प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन मा. औद्योगिक न्यायालय, नागपूर यांनी नगर परिषद, चंद्रपूर यांचे विरुध्द दिनांक 18.04.2002 रोजी एकतर्फी निर्णय दिला. श्री. चांदेकर यांच्या मागणीनुसार 1984 पासून लाभ मंजूर न केल्याने त्यांनी मा. औद्योगिक न्यायालयाचे निर्णयाला मा. उच्च न्यायालय, नागपूर येथे रिट पिटीशन नं.1079/2003 अन्वये आव्हान दिले. **मा. उच्च न्यायालयात महानगरपालिकेतर्फे बाजू मांडण्यास प्रतिनिधी हजर न झाल्याने** मा. उच्च न्यायालय, नागपूर यांनी औद्योगिक न्यायालय, नागपूर यांचा दिनांक 18.04.2002 रोजीचा निर्णय कायम ठेवून श्री. निशिकांत चांदेकर यांना दिनांक 17.08.2000 पासून सेवाविषयक सर्व बाबींचे फायदे देण्यांत यावे, असा निर्णय दिनांक 1.7.2013 रोजी दिला. मा. उच्च न्यायालय, नागपूर यांचे आदेशांचे अनुषंगाने महानगरपालिका, चंद्रपूर यांचे आदेश. चंश मनपा/साप्रआ/1597/2013, दिनांक 08.08.2013 अन्वये श्री. निशिकांत चांदेकर, शिपाई (निलंबन दिनांक 27.12.2012 ते 07.08.2013 हा कालावधी सेवाकाळ गणण्यात आला.) यांना दिनांक 17.8.2000 पासून वर्ग-3 मध्ये कनिष्ठ लिपिक या पदावर वेतनश्रेणी रु.3050-4590 मध्ये पदस्थापना देवून सेवाविषयक सर्व बाबींचे लाभ द्यावे लागले. परिणामी, महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले.

सदर प्रकरणी तत्कालिन मनपा प्रशासनाचा अक्षम्य बेजबाबदारपणा दिसून येतो. महानगरपालिकेच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असलेल्या कर्मचारी / अधिकारी यांचेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 72(क)(1) अन्वये न्यायालयीन प्रकरणी शासकिय कर्तव्य पार पाडण्यास कसूर केल्या प्रकरणी कुठलीही कार्यवाही केली नसल्याचे आढळून आले.

DATDUBM6401 (Ref No : 41, Hmm No : 34)

## *34 क्रीडासत्र 2013-14 मध्ये सहभागी खेळाडू मुलांसाठी चना (हरभरा) व सॉक्स-बूट खरेदीमध्ये आढळून आलेल्या अनियमिततांबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष :209 म.न.पा. निधी*



Scanned by CamScanner

Chandrapur (M Corp.)

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 85800.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 85800.00/-

***क्रीडासत्र 2013-14 मध्ये सहभागी खेळाडू मुलांना खाण्यासाठी 6 क्विंटल चना (हरभरा) खरेदीच्या नस्तीमध्ये Delivery memo नसल्याने चना योग्य वेळी प्राप्त झाल्याचे पडताळता आले नाही. संबंधीत शाळांना चना व सॉक्स-बूट वाटप केल्याचे दिसून आले. मुलांच्या पायाची मापे न घेताच बुटांची खरेदी केलेली आहे. कोणत्या स्वरूपाचे बूट (लेदर/ कॅनव्हास) खरेदी करण्यात आले याबाबत निविदा/ नस्तीमध्ये स्पष्ट उल्लेख नाही. सॉक्स-बूट योग्य दर्जाचे असल्याबाबतचे संबंधीत अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र नस्तीत दिसून आले नाही. सॉक्स-बूट जोडीचा लाभ केवळ संचलनातील विद्यार्थ्यांना देण्यात आला परंतु खेळाडू विद्यार्थ्यांना नाही.***

1) प्रमाणक क्र. 1429 दिनांक – 14.02.2014 रक्कम रुपये – 22,800/-

महानगरपलिका चंद्रपूर तर्फे दि. 28.01.2014 ते 31.01.2014 या कालावधीत क्रीडासत्र आयोजित करण्यात आले होते. या क्रीडासत्रामध्ये 428 मुले व 405 मुली असे एकूण 833 विद्यार्थ्यांचा सहभाग होता. सहभागी खेळाडू विद्यार्थ्यांना खाण्यासाठी 6 क्विंटल चना (हरभरा) खरेदी करण्यात आला होता. सदर खरेदीमध्ये खालील अनियमितता आढळून आल्या -

अ) महाननगरपालीका चंद्रपूरच्या क्रमांक-चंशननपा/प्रशि/434/2013 दिनांक 30.12.2013 अन्वये मे. सोसायटी ट्रेडर्स, गोल बाजार, चंद्रपूर यांना 6 क्विंटल चना (हरभरा) रुपये 3,800/- प्रति क्विंटल या दराने पुरविण्याची व्यवस्था करण्याबाबत आदेश देण्यात आला होता. संबंधीत नस्तीत चना पुरविल्याबाबतचा डिलीवरी मेमो आढळून आला नाही त्यामुळे चना कधी प्राप्त झाला हे पडताळता आले नाही. परंतु साठा नोंदवहीची तपासणी केली असता चना प्राप्त झाल्याची दि. 24.12.2014 नमूद आहे.

तरी चना, पुरवठा आदेशापूर्वी (दिनांक 30.12.2013) दिनांक 24.12.2014 रोजी प्राप्त झाल्याच्या नोंदीमुळे प्रत्यक्ष खरेदी व विद्यार्थ्यांना वाटप याबाबत शंका निर्माण होते. परिणामी क्रीडासत्रात विद्यार्थ्यांना पोषण आहार पुरविण्याचा महानगरपालिकेचा हेतू सफल झाल्याचे पडताळता आले नाही.

2) प्रमाणक क्र. 1431 दिनांक – 14.02.2014 रक्कम – 63,000/-

क्रीडासत्र 2013-14 मध्ये संचलनात 140 मुले व 220 मुली अशा एकूण 360 विद्यार्थ्यांचा समावेश होता. या विद्यार्थ्यांसाठी 360 जोडी सॉक्स-बूट खरेदी करण्यात आलेले आहे. संबंधीत नस्तीची तपासणी केली असता पुढील त्रुट्या निदर्शनास आल्या –

अ) प्रत्यक्षात क्रीडा प्रकारात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून सॉक्स-बूट पुरविणे तुलनेने आवश्यक असतांना संचलनात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी क्रिडासत्राच्या नावावर सदर खरेदी झाल्याने सदर खर्च योजनेच्या मूळ प्रयोजनाशी सुसंगत व अनावश्यक झाला असल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

ब) क्रीडासत्रात सहभागी मुलांना त्यांच्या पायाच्या मापाचे बूट देणे गरजेचे असते. मुलांच्या पायाची मापे न घेताच बुटांची खरेदी केल्याचे नस्तीवरून दिसून आले. पायाची मापे न घेता बूट खरेदी केल्याने रु. 63,000/- चा झालेला खर्च काटेकोरपणे झाला नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.



Scanned by CamScanner

क) कोणत्या स्वरुपाचे बूट (लेदर/ कॅनव्हास) खरेदी करण्यात आले याबाबत निविदा / नस्तीमध्ये स्पष्ट उल्लेख नसल्याने त्याबाबत अर्धसमास पत्राद्वारे विचारणा केली असता "बिलावर विनस कंपनीचे बूट खरेदी केल्याची नोंद आहे." असे उत्तरादाखल कळविले आहे. सदर उत्तरावरुन बूट खरेदी करण्यापूर्वी कोणत्या प्रकारचे बूट घ्यावयाचे आहेत हे ठरविण्यात आले नव्हते असे दिसून येते.

ड) महाराष्ट्र शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग शा. नि. क्र. भांखस १०८८/(२५१२)/उद्योग-६, दिनांक २ जानेवारी १९९२ चे परिच्छेद 8.4 नुसार वस्तूची खरेदी करतांना तिच्या दर्जाविषयी तपासणी करणे आवश्यक आहे. प्राप्त झालेले सॉक्स-बूट योग्य दर्जाचे असल्याबाबतचे संबंधीत अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र नस्तीत दिसून आले नाही. तरी सॉक्स-बूट योग्य दर्जाचे नसल्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर अनियमिततांबाबत अर्धसमास पत्र क्र. 19 दि. 04/04/2016 नुसार विभागास अनुपालन / अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. परंतु त्याअनुषंगाने विभागाकडून कोणतेही समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSAJF8301 (Ref No : 12, Hmm No : 19)

### *35 महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देय असलेल्या कर्ज परतफेडीची रक्कम व वेतनापोटीच्या रकमेच्या थकबाकीबाबत.*

**विस्तारित पाणीपुरवठा योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 00**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 109288540.00 /-

| |
|---|
| ***चंद्रपूर शहरातील विस्तारित पाणी पुरवठा योजनेसाठी तत्कालिन नगरपालिकेने उभारणी केलेल्या रकमेपैकी शिल्लक निधी रु.4.96 कोटी कोणत्या खात्यात उपलब्ध आहेत त्याची नोंद मनपाकडे नाही. तसेच या योजनेवरील कर्जाच्या (रु.8.86 कोटी) परतफेडीसाठी मनपाने कोणतेही तरतूद केली नसल्याने प्रचंड दायित्व निर्माण झाले आहे.*** |



Scanned by CamScanner

**अ. आयुर्विमा महामंडळाकडील कर्जाच्या परतफेडीची मागणी-**

चंद्रपूर शहरासाठी विस्तारित पाणी पुरवठा योजनेसाठी शासनाने दिलेल्या दि.4/12/1997 च्या प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने रु.38.49 कोटी मूल्याच्या योजनेस केंद्र शासनाने दि.6/7/1998 च्या पत्रान्वये तांत्रिक मान्यता दिली होती. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चंद्रपूर यांचे पत्र क्र. मजीप्रा/नावग्रायोविचं/ताशा 824/2013 दि.14/3/2013 मधील टिपणीनुसार तत्कालीन नगरपालिकेने सदर योजनेसाठी उभारावयाच्या 28.85 कोटी कर्जापैकी आयुर्विमा महामंडळ व हुडको कडून अनुक्रमे रु.6.17 कोटी व रु.1.42 कोटीचे कर्ज घेतले होते.

सदर योजनेचे काम माहे नोव्हे.1998 मध्ये सुरु होऊन नगरपरिषदेने उर्वरित कर्ज न उभारल्याने सन 2007 पासून योजनेवरील काम बंद आहे असे दिसते.

सदर योजनेवरील वित्तीय तपशील पुढीलप्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

| वित्तीय सहभाग | मंजूर वित्तीय आकृतीबंध | प्राप्त/उभारलेला निधी | फेब्रु.2013 पर्यंत झालेला खर्च | शिल्लक |
|---|---|---|---|---|
| शासन अनुदान | 961.00 | 733.83 | 684.87 | 48.96 |
| आयुर्विमा कर्ज | 1178.00 | 617.43 | 617.43 | - |
| हुडको कर्ज | 1707.00 | 142.00 | 142.00 | - |
| बॉन्ड | - | 447.29 | - | 447.29 |
| एकूण | 3846.00 | 1940.55 | 1444.30 | 496.25 |

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत-

1. रु.38.45 कोटी मूल्याच्या मूळ योजनेवर केवळ रु.14.44 कोटी खर्च होऊन जलशुद्धीकरण केंद्र, पंपींग मशीनरी,पाचपैकी दोन पाण्याच्या उंच टाक्या व शुध्द पाण्याची उर्ध्व नलिका ही महत्वाची कामे हाती घेतलेली नसतांना नगरपालिकेकडून महानगरपालिकेकडे कर्जाच्या रकमेचे पुढील दायित्व हस्तांतरित झाले आहे.

| | | |
|---|---|---|
| आयुर्विमा महामंडळ<br>(दि.1/6/2014 ची थकबाकी)<br>[31/3/2014 अखेरची स्थिती उपलब्ध नाही.] | मुद्दल | रु.10627917 (थकबाकीसह) |
| | व्याज | रु.28047090 |
| | दंडनीय व्याज | रु.12482042 |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| (मूळ कर्ज रु.6.17 कोटी) | एकूण | रु.51157049 |
| वरील कर्जावरील शासन हमीशुल्क | हमीशुल्क | रु.16720548 |
| शुल्कावरील दंडनीय व्याज | व्याज | रु.20786221 |
| एकूण | | रु.37506769 |
| हुडको कर्ज व बँक परतफेड थकबाकी | | आकडेवारी उपलब्ध नाही. |
| एकूण थकबाकी 1+2 | | रु.88663818 |

नगरपालिका/महानगरपालिकेवर रु.8.87 कोटी एवढी प्रचंड कर्जाची थकबाकी शिल्लक असताना त्याच्या परतफेडी बाबतही अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आली नसल्याने मोठे दायित्व निर्माण झाले आहे, व त्यामध्ये दरवर्षी वाढ होत असे दिसून येते.

2. उपरोल्लेखित महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पत्रानुसार तत्कालीन नगरपालिकेने उभारणी केलेल्या (शासन अनुदान व कर्ज) रु.1940.55 लाख पैकी रु.1440.30 लाख एवढा खर्च झाला असून उर्वरित रु.496.25 लाख शिल्लक असावी. परंतु मनपा च्या लेख्यात सदरची रक्कम अंतर्भूत असल्याचे दिसत नाही. याबाबतची माहिती सुद्धा मनपाकडे नाही. (अर्धसमास पत्र क्र.113 दि.29/07/2016) त्यामुळे रु.496.25 लाख शिल्लक व त्यावरील व्याज मिळून एकूण रकमेचा शोध घेणे आवश्यक आहे अन्यथा सदर रकमेचा अपहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**ब) वेतनापोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देय मागणीची थकबाकी-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण योजना विभाग, चंद्रपूर यांचेकडील पत्र क्र.मजीप्राना व ग्रायोविचं/लेप.3/चंद्रपूर/986 2014 दि.11/4/2014 नुसार चंद्रपूर महानगरपालिकेकडे वेतनापोटी संकीर्ण लेखाशिर्षाखाली माहे 2014 अखेर रु. 2.06 कोटी थकीत असल्याचे दिसते. या रकमेत रु.47,59,560/-एवढ्या विलंब आकाराचा समावेश आहे.

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1. कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चंद्रपूर यांचे दि.31/01/2015 अखेरच्या थकबाकीबाबत विवरणपत्रानुसार महानगरपालिका अस्तित्वात आल्याच्या दिनांकानंतर मार्च 2014 पर्यंत दरमहा मागणीबाबतची पत्रे महानगरपालिकेकडे प्राप्त होत असतांना त्याची वेळीच दखल न घेतल्यामुळे रु. 2.06 कोटी एवढे प्रचंड दायित्व निर्माण झाले आहे. तथापि, 2013-2014 किंवा त्यापूर्वीच्या अर्थसंकल्पात तशी तरतूद केलेली नाही. त्यामुळे वर्षानुवर्षे थकबाकीपोटी मनपावर बोजा वाढत आहे.



Scanned by CamScanner

मनपा स्थापनेवेळी थकबाकी – रु.15865162

विलंब आकार - रु.4759560

मार्च 2014 अखेर थकबाकी - रु.20624722 म्हणजेच(रु.2.06 कोटी)

2. याशिवाय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील पत्रानुसार 12290 मी लांबीचे पाईप्स इतर योजनेवर वापरण्यात आले असून 3353 .60 मी लांबीचे पाईप्स तुकुम येथील विभागीय भंडारामध्ये ठेवण्यात आले आहेत. सदर 15643.60 मीटर पाईप्सचे तत्कालिन मूल्य मूळ अंदाजपत्रकाप्रमाणे निर्धारित करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देय असलेल्या मूळ रकमेत समायोजित करण्यात यावे, किंवा त्याचे मूल्य वसूल करावे.

3. सदरचे दायित्व चंद्रपूर येथे महानगरपालिका अस्तित्वात येण्यापूर्वी तत्कालिन नगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या योजनेतून निर्माण झालेली दिसते. परंतू सदर योजनेची व देय रकमेबाबतची नस्ती, करारनामा मनपाकडे उपलब्ध नसल्याचे कळते.

यासंदर्भात क्र.113 दि. 29/07/2016 अन्वये जारी केलेल्या अर्धसमासाचे अनुषंगाने अभिप्राय न झाल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATABWM6901 (Ref No : 21, Hmm No : 113)

LBT

***36 स्थानिक संस्था कराच्या निर्धारणाकरिता नियुक्त केलेल्या सनदी लेखापालाच्या मानधनाबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : 157 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 234562.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 234562.00/-

***मनपास वार्षिक विवरणपत्रे सादर करणाऱ्या 261 पैकी 195 व्यापाऱ्यांनी सादर केलेले तपशीलवार अभिलेखे सनदी लेखापालास पडताळणी व कर निर्धारणासाठी पाठविले परंतु त्यापैकी 93 व्यापाऱ्यांचेच कराचे निर्धारण करण्यात आले. असे असताना कामाचे मूल्यमापन न करता सनदी लेखापालास दरमहा मानधनाचे प्रदान करण्यात आले.***



Scanned by CamScanner

Chandrapur (M Corp.)

(1) प्रमाणक क्र.29 (एल.बी.टी.), दिनांक- 04/01/2014, रक्कम रु. 107500

(2) प्रमाणक क्र.1589 (जनरल), दिनांक- 07/03/2014, रक्कम रु. 127062

एकूण रु. 234562

नगररचना विभाग अधिसूचना क्रमांक 0209/प्र.क्र.65/09/नवि.34, दि. 25 मार्च 2010 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (स्थानिक संस्था कर) दि. 01/11/2012 पासून महानगरपालिकेस लागू करण्यात आला असून अर्धवार्षिक व वार्षिक विवरणपत्रे, व्यापाऱ्यांचे चलान, बँकची विवरणपत्रे यांची पडताळणी, कर निर्धारण व मार्गदर्शन करण्याकरीता सनदी लेखापालाच्या नियुक्तीकरिता जाहिरात प्रसिद्ध केल्याचे नस्तीवरुन दिसून आले. पुरविलेल्या दस्ताऐवजानुसार कंत्राटी मानधन तत्वावर सनदी लेखापाल नियुक्तीसाठी एकूण सहा दरपत्रके प्राप्त झाल्याचे नस्तीमध्ये आढळून आले. त्यापैकी मे. दव अँड असोसीएटस, चंद्रपूरचे दरपत्रक निम्नतम दराचे असल्याने वाटाघाटी शिवाय त्यांना 21500/- दरमहाप्रमाणे एक वर्षाकरिता दि. 01.01.2013 रोजी आदेश निर्गमित करण्यात आले. त्यानंतर माहे जून 2014 पर्यंत मुदतवाढी देण्यात आल्या. याबाबत स्थायी समिती ठराव क्र. 30, दि. 24.08.2012 अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

(1) सन 2012-13 या वर्षातील प्राप्त विवरणपत्रांचे अनुषंगाने कर निर्धारणाकरिता विहित नमुन्यामध्ये 261 व्यापाऱ्यांना नोटीस बजावल्यानंतर प्राप्त 195 व्यापाऱ्यांचे अभिलेखे सनदी लेखापाल यांना तपासणीकरिता पाठविल्याचे नस्तीवरुन दिसून आले. त्यापैकी 93 व्यापाऱ्यांचे कर निर्धारण अहवाल सनदी लेखापालाकडून मनपास प्राप्त झाल्याचे दिसते. एकूण 195 व्यापाऱ्यांपैकी फक्त 93 व्यापाऱ्यांचे अहवाल मनपास प्राप्त झाल्याने उर्वरित 102 व्यापाऱ्यांचे कर निर्धारण झाले नाही. त्यासह उर्वरित व्यापाऱ्यांचे कर निर्धारण झाले नसल्याने त्यामध्ये मनपाचा करावरील महसुलाचा मोठ्या प्रमाणावर निधी गुंतला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. उर्वरित 102 व्यापाऱ्यांचे कराचे निर्धारण अहवाल सन 2013-14 मध्ये प्राप्त नसताना दि. 01.01.2013 पासून प्रती माहे रु.21500/- प्रमाणे 18 महिन्याकरिता एकूण रु. 387000/- रकमेचे मानधनाचे प्रदान करण्यात आल्याचे दिसून आले (52.00% कामाकरिता 100% रकमेचे प्रदान करण्यात आले). सदरील कामाचा मासिक अहवाल मागवून काम समाधानकारक असेल तेव्हाच मागणीचे देयक मंजूर करुन रकमेचे प्रदान व्हायला पाहिजे होते. याबाबत मुख्य लेखापरीक्षक यांनी कामाचा आढावा मागितला असता विभागाने दिलेले अभिप्राय समाधानकारक नसतांनाही प्राप्त देयकास मंजुरी देऊन रकमेचे प्रदान करण्यात आले.

(2) मनपाने स्थानिक संस्था कराची वार्षिक विवरणपत्रे तपासणी व कराचे निर्धारण



Scanned by CamScanner

करण्याकरीता कोणत्या आधारावर सनदी लेखापालाची नियुक्ती प्रतिमाह मानधन तत्वावर करण्यात आली, याबाबतचा कोणताही शासन निर्देशाचा संदर्भ मनपाने उपलब्ध करून दिला नाही.

(3) मनपाने संबंधितांशी आदेश दिनांकाच्या दिवशी म्हणजेच दि. 01/01/2013 रोजी, करारनामा करणे अपेक्षित होते. परंतु प्रत्यक्षात दि. 22.01.2013 ला केल्यामुळे अटी व शर्तीविनाच संबंधित कार्यादेश लागू ठरवून त्यापोटी केलेल्या कामाचे मूल्यमापन न करता संपूर्ण जानेवारी 2013 साठी रु. 21500/- चे प्रदान करण्यात आले.

वास्तविक कर निर्धारणाच्या प्रत्यक्षात झालेल्या कामाचे मूल्यमापन करूनच त्या प्रमाणात मानधनाचे प्रदान करण्याची अट करारनाम्यात ठेवणे उचित झाले असते, परंतु सरसकट मासिक मानधन ठरविण्यात आल्याने समाधानकारक कामाशिवायपण मानधनाच्या प्रदानाचा बोजा मनपा निधीवर लादण्यात आल्यामुळे सदर प्रकरणी वित्तीय औचित्याचे पालन करण्यात आले नाही असे नमूद करण्यात येते.

उक्त अनियमिततेबाबत संबंधित विभागाला अर्धसमास पत्र क्र. 111, दि. 29/07/2016 ला निर्गमित करून कळविले असता याबाबतचे अनुपालन विचारात घेऊन सदरील परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DLFSPPM8501 (Ref No : 42, Hmm No : 111)

L.B.T

***37 स्थानिक स्वराज्य संस्था कर जमा महसुलाच्या आकडेवारीतील तफावत, नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडून वार्षिक विवरणपत्रे मुदतीत प्राप्त न होणे व मनपामार्फत कराचे निर्धारणास विलंब होणेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष :06 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1135000.00/-

| |
|---|
| *सन 2013-14 या वर्षात स्थानिक संस्था कराचा प्राप्त महसुलाच्या आकडेवारीमध्ये तफावत दिसते. नोंदणी अर्जावर परिपूर्ण माहिती नमूद नसणे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (स्थानिक संस्था कर) मधील नियम 22 अन्वये व्यापाऱ्यांकडून प्रमाणपत्र देण्यात आले नाही. वार्षिक विवरणपत्रे विभागास विहित मुदतीत सादर न केल्यामुळे नियम 48(6) नुसार रु. 11,35,000 एवढ्या रुपयापर्यंत शास्तीची जमा मनपा निधीत करणे* |



Scanned by CamScanner

***आवश्यक आहे. 3185 व्यापाऱ्यांपैकी सन 2013-14 या वर्षअखेर केवळ 149 नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडील स्थानिक संस्था कराचे मूल्य निर्धारण झाले आहे. 50 कोटीवरील रुपयांची वार्षिक उलाढाल करीत असलेल्या व्यापाऱ्यांचे कर निर्धारण झाले नाही. मार्गस्थ तपासणी करिता वाहन भाडे तत्वावर ठेवल्याचे रु. 43938/- खर्च केल्याचे अभिलेखे उपलब्ध करण्यात आले नाही***

(1) नगररचना विभाग अधिसूचना क्रमांक 0209/प्र.क्र.65/09/नवि.34, दि.25 मार्च 2010 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (स्थानिक संस्था कर) दि. 01/11/2012 पासून महानगरपालिकेस लागू असून त्यानुसार नोंदणी झालेल्या व्यापारी परस्पर बँकामध्ये चलनाद्वारे कर जमा करतात. आर्थिक वर्ष संपल्यानंतर त्यांच्या विक्रीच्या अनुषंगाने कराचे निर्धारण केले जाते. प्रत्यक्ष प्राप्त कर महसुलाचा आढावा घेतला असता सन 2013-14 या वर्षात स्थानिक संस्था कराचा प्राप्त महसुलाच्या आकडेवारीत पुढीलप्रमाणे विसंगती दिसून येते.

(i) रोखपुस्तकानुसार अखेरची शिल्लक - रु. 2,07,00,226.54 (रु. 2.07 कोटी)

(ii) बँक विवरणपत्राप्रमाणे (एकूण 7 बँक खाते मिळून)-रु. 3,69,71,764.53 (रु. 3.69 कोटी)

(iii) अर्थसंकल्पाप्रमाणे प्रत्यक्ष जमा - रु. 41,17,65,684.00 (रु.41.17 कोटी)

वरीलप्रमाणे तफावत प्रचंड मोठी असून त्यांच्या बँक ताळमेळाअभावी प्रत्यक्ष महसुलाच्या आकडेवारीबाबत सत्यता कायम होत नाही.

(2) चंद्रपूर महानगरपालिकामध्ये एल.बी.टी.लागू झालेल्या दिनांकापासून (1 नोव्हेंबर 2012 पासून) सन 2013-14 या आर्थिक वर्षाअखेर महानगरपालिका हद्दीत असलेल्या एकूण 3185 व्यापाऱ्यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (स्थानिक संस्था कर) मधील नियम (3) अन्वये किंवा नियम 5 च्या पोटनियम (7) अन्वये नोंदणीस व/किंवा पात्र असलेल्या कोणत्याही व्यापाऱ्यांनी नियम 29 अन्वये नमुना 'ड-दोन' मध्ये वार्षिक विवरणपत्रे वर्ष संपल्यानंतर 90 दिवसाच्या आत तसेच आयात करीत नसलेल्या व्यापाऱ्यांनी वार्षिक विवरणपत्र निरंक दाखवून आयुक्तास सादर करणे आवश्यक आहे. तथापि, विभागाकडून उपलब्ध माहितीनुसार एकूण 2535 स्थानिक व्यापाऱ्यांनी वार्षिक विवरणपत्रे विभागास सादर केल्याचे दिसून येते. 364 व्यापाऱ्यांनी शास्तीसह विवरणपत्रे सादर केले असून 59 व्यापाऱ्यांनी अभय योजनेतर्गत लाभ घेतल्याचे दिसते. अर्थात उर्वरित 227 नोंदणीकृत व्यापाऱ्यांनी वार्षिक विवरणपत्रे विहित मुदतीत सादर न केल्यामुळे नियम 48(6) नुसार पुरेशा कारणाशिवाय कोणत्याही कालावधीचे विवरण विहित कालावधीत म्हणणे ऐकून घेण्याची वाजवी संधी दिल्यानंतर 5000 रुपयापेक्षा अधिक नसेल एवढी रक्कम शास्ती म्हणून वसूल होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरील 227 व्यापारांकडून शास्तीची रक्कम 5000 नुसार रुपये 227x5000= 11,35,000 एवढ्या रुपयापर्यंत प्रत्यक्ष किंवा मालमत्ता कराचे स्वरुपात वसूल करुन मनपा निधीमध्ये जमा होणे आवश्यक आहे.

(3) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (स्थानिक संस्था कर) मधील नियम 21 व 22 नुसार शहराच्या क्षेत्रामध्ये कोणत्याही आयातीत माल जो व्यापारी धारण करीत असेल त्याने असा माल शहराच्या क्षेत्रामध्ये कोणत्याही इतर व्यापाऱ्यास विकला असेल, त्या बाबत नियम 22 मधील तरतूदीप्रमाणे नोंदणीकृत विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याने तसे प्रमाणपत्र लिहून देणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारच्या प्रकरणामध्ये पुरविण्यात आलेल्या दस्तऐवजामध्ये प्रमाणपत्रे आढळून आलेली नाही.

(4) उक्त अधिनियमातील नियम 33 नुसार आयुक्त, व्यापाऱ्यांना नमुना 'ख' मध्ये नोटीस देऊन नोटीसीच्या अनुपालनाकरिता नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून 15 दिवसापेक्षा अधिक नसेल हे निश्चित करुन त्याद्वारे अशा संबंधित निर्धारणाच्या वर्षाच्या अंतिम दिनांकापासून पाच वर्षाच्या आत व्यापाऱ्याचे निर्धारण करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश असताना उपलब्ध केलेल्या माहितीनुसार सन 2013-14 मधील एकूण उर्वरित 3036 व्यापाऱ्यांचे कर निर्धारण प्रलंबित आहे असे मनपाने पुरविलेल्या विवरणपत्रावरुन दिसते. परिणामी, करावरील महसुलापासून मनपा



Scanned by CamScanner

Chandrapur (M Corp.)

वंचित आहे. 3185 व्यापाऱ्यांपैकी प्रत्यक्षात 149 व्यापाऱ्याचे व्यापाऱ्यांनी स्थानिक संस्था कराचे मूल्य निर्धारण केल्याचे दिसून आले.

50 कोटीवरील रुपयांची वार्षिक उलाढाल करीत असलेल्या पुढील व्यापारी संस्थांनी सन 2013-14 ची वार्षिक विवरणपत्रे सादर केली असली तरी, महानगरपालिकाकडील सनदी लेखापालामार्फत लेखापरीक्षणाचे दिनांकापर्यंत कराचे निर्धारण झालेले नाही.

(i) मे. शिवशंकर मोटर्स प्रा.ली., चंद्रपूर

(5) स्थानिक संस्था कर विभागाकरिता श्री.नामदेव धकाते यांचे वाहन मार्गस्थ तपासणीकरिता भाडे तत्वावर दि. 11.03.2013 पासून ते दि. 28.04.2013 पर्यंत लावण्यात आले व त्यावर रु. 43938/- खर्च करण्यात आल्याचे दिसून आले. तथापि, विभागाने अभिलेखे तपासणीकरिता उपलब्ध करून दिले नाही.

उक्त अनियमिततेबाबत संबंधित विभागास जारी केलेल्या अर्धसमास पत्र क्र. 33, दि. 25/04/2016 व 111, दि. 29/07/2016 चे प्राप्त अनुपालन विचारात घेवून सदरील परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DLFSPPM8501 (Ref No : 34, Unit No : 33)

### *38 गाळे भाड्याची रक्कम वसूल केली नसल्याची अनियमितता (सन 2013-14)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 29701586.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 29701586.00/-

***महानगरपालिका हद्दीतील भाड्याने दिलेली दुकाने / गाळे बाबत येणे असलेली भाड्याची रक्कम थकीत असल्याचे दिसून आले. सबब महानगरपालिकेला महसुली उत्पन्न बाबीचा लाभ मिळत नसल्याचे दिसून आले.***

चंद्रपूर शहर महानगरपालिका यांनी स्वमालकीच्या स्थावर मालमत्तेवर बांधकाम केलेले व्यापारी संकुल, दुकानगाळे इत्यादी भाडे तत्वावर आवंटीत केले आहे, मात्र भाड्यापोटी महानगरपालिकेस प्राप्त होणारी रक्कम खालीलप्रमाणे दुकानगाळे भोगवटादाराकडून वसूल झालेली नसल्याने वसुली विभागावर प्रशासनाचे नियंत्रण नसल्याचे दिसून आले.

| सन 2012-13 अखेर थकीत भाडे | सन 2013-14 ची चालू मागणी | एकूण मागणी | सन 2013-14 मधील वसुली | सन 2013-14 अखेर थकबाकी |
|---|---|---|---|---|
| 21947839 | 23169275 | 45117114 | 15415528 | 29701586 |



Scanned by CamScanner

नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे स्थायी आदेश क्र. 14 दि. 26.11.2001 मधील परिच्छेद (क) (2) नुसार महानगरपालिकेने कोणत्याही प्रकारच्या वसुलीवर शिथिलता न देता संपूर्ण रक्कम शिघ्र गतीने वसूल करावयाची आहे. परंतु वसुलीची कार्यवाही गंभीरतेने होत नसल्याने मनपास एकूण रुपये 2,97,01,586/- थकबाकी वसुलीचा लाभ घेता आलेला नाही.

DATBNKM6401 (Ref No : 37, Hmm No : 141

**39 "पैसे द्या व वापरा" तत्वावरील शौचालये चालवण्यासाठी स्वयंसेवी संस्थेस एकमुश्त रकमेचे अनावश्यक मासिक प्रदान करण्याबाबत.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : 176 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 498000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 498000.00/-

| |
|---|
| *पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे शासन निर्णय दि 30/08/2001 नुसार पैसे द्या व वापरा या तत्वावरील शौचालये चालविण्यासाठी मनपाने स्वयंसेवी संस्थेस रकमेचे प्रदान करणे अपेक्षित नसताना अनियमितपणे तसे अनावश्यक व निरर्थक प्रदान करण्यात आले आहे* |



Scanned by CamScanner

Chandrapur (M Corp.)

प्रमाणक क्र.1831, दिनांक:- 29/03/2014, रक्कम रु.-76000/-

लेखापरीक्षणास उपलब्ध केलेल्या नस्तीनुसार शहरात मनपाच्या मालकीची 25 सुलभ शौचालये असून "पैसे द्या व वापरा" तत्वावर चंद्र स्वच्छता सामाजिक मंडळ यांना क्रमांक 2208, दि. 24/09/2013 च्या कार्यादेशानुसार व दि. 29/09/2012 च्या करारनाम्यानुसार एक वर्षाकरिता देखभाल दुरुस्तीचे काम देण्यात आले. या कामासाठी त्यांना मासिक रु. 41500/- या एकमुश्त रकमेप्रमाणे वेळोवेळी प्रदान करण्यात आले.

या वरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.-

1) सदर कामाच्या करारनाम्यात पुढील बाबी कंत्राटदाराने स्विकृत केल्या आहेत.

अट क्र. 4 -"सदर कामासाठी लागणारे मनुष्यबळ, साहित्य, जंतुनाशक, ब्लिचिंग, फिनाईल मी स्वतः पुरवठा करील मनपाकडून कसल्याही प्रकारचे मनुष्यबळ साहित्य घेणार नाही".

अट क्र. 12 –" जनतेकडून शुल्क घेणे. "

अट क्र. 17 –" वर्षातून एकदा रंगरंगोटी, खिडक्या, दारे, नळ, टाईल्स, इत्यादी व्यवस्थित ठेवीन. "

तसेच शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि. 30/08/2001 मधील परिच्छेद 3 नुसार ' तरंगती लोकसंख्या असलेल्या भागात (उदा. बाजार, सभागृहे, बसस्थानके ई.) स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन स्वखर्चाने "पैसे द्या व वापरा" या तत्वावर शौचालयाचे बांधकाम करून त्यांची देखभाल व दुरुस्ती स्वयंसेवी संस्थांनी करावी ' अशी तरतूद करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णय व करारनाम्यानुसार संपूर्ण खर्च कंत्राटदाराने करणे अपेक्षित असताना त्यांना प्रत्येक शौचालयामागे एकूण सीटनिहाय विशिष्ट मासिक दर ठरवून सर्व 25 शौचालयांसाठी एकूण रु. 41500/- प्रतिमहिना देण्याचे कोणतेही औचित्य नसून करारनाम्यात व कार्यादेशात अवाजवी तरतूद केल्याने रु. 41500/- प्रमाणे 12 महिन्यांसाठी रु. 498000/- अंदाजे अनावश्यक व निरर्थक प्रदान करण्यात आले आहे. यासंबंधाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

DATABWM6904 (Ref No : 54, Hmo No : 126)

***40 महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 अन्वये मंजुर करण्यात येणा-या परतावा अग्रिम व नापरतावा रक्कम तसेच मासिक वर्गणीबाबत.***



Scanned by CamScanner

**No. of Irregularities: 00**

*लेखा शीर्ष :103   म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम  : 9ब*

| |
|---|
| ***महानगरपालिका चंद्रपूर येथे महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 च्या नियम 8 (1)(ब) नुसार मुळ वेतनाच्या किमान 6% तसेच कमाल वर्गणी एकूण वित्तलब्धीच्या मर्यादेपेक्षा जादा दराने मासिक वर्गणी वसुल करणे, जमा रकमेवर ज्यादा दराने व्याज देणे, कर्मचा-यांना परतावा रक्कम मंजूर केल्यानंतर एकूण रकमेतून कमी न करणे तसेच सहाव्या वेतन आयोगानुसार शेवटच्या हप्त्याचे ज्यादा प्रदान करणे इत्यादी प्रकरणी त्रुटया आवळून आल्या.*** |

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 च्या अनुषंगाने महानगरपालिका चंद्रपूर येथील सन 2013-14 चे लेखापरिक्षणादरम्यान भविष्य निर्वाह निधी मंजूर प्रकरणे तसेच नोंदवहीची पडताळणी केली असता पुढील त्रुटया आढळून आल्या.

1. <u>योग्य पडताळणीशिवाय भविष्य निर्वाह निधी अग्रिमाची रक्कम मंजूर करणे-</u>

सर्वसाधारण परिस्थितीत परतावा अग्रिम मंजूर करतांना महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 च्या 13 (2) अन्वये मुळ वेतनाच्या तीन पट किंवा खात्यात जमा असलेल्या शिल्लक रकमेच्या निम्मी रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल ती मंजूर करता येते. तसेच नियम क्र.13 (3) अन्वये खातेधारकाने मागील घेतलेले अग्रिमाचे किमान 12 मासिक हप्ते किंवा शेवटचा हप्ता यापैकी जो अगोदर असेल तो त्याची परतफेड करेपर्यन्त सर्वसाधारण परिस्थितीत त्यास कमाल मर्यादेपेक्षा ज्यादा अग्रिम मंजूर करता येत नाही.

त्याचप्रमाणे नापरतावा रक्कम उचल करणेबाबत सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 चे नियम क्र.16 ते 20 मधील तरतुदीनुसार वर्गणीदाराच्या सहा महिन्याच्या वेतनाएवढी रक्कम किंवा निधीतील शिल्लक रकमेच्या 50 टक्के यापैकी जी कमी असेल ती रक्कम किंवा वर्गणीदाराच्या खात्यात शिल्लक असणारी एकूण रक्कम व वर्गणीदाराच्या अग्रिमाचे प्रयोजन पाहता सक्षम प्राधिकारी त्यास शिल्लक रकमेच्या जास्तीत जास्त ¾ एवढी रक्कम मंजूर करता येईल.

भनिनि नोंदवहीची तसेच प्रकरणाची पडताळणी केली असता परतावा अग्रिम/नापरतावा रक्कम मंजूर करताना कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यातील शिल्लक रक्कम किती व त्यानुसार अग्रिम मंजूरीस किती रक्कम पात्र आहे, याबाबत नमुना एक व नमुना तिन मध्ये माहिती परिपुर्ण भरलेली नाही, असे दिसून आले. त्यामुळे विभागाकडून प्राप्त अभिलेख्यानुसार किती रक्कम मंजूर केली याचा बोध होत नाही. नमुन्यादाखल उदाहरणे पुढीलप्रमाणे-

(रक्कम रुपयात)

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव व खाते क्र. | अग्रिमाचा प्रकार | मागणी केलेली रक्कम | उणिवा |
|---|---|---|---|---|



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री. प्रकाश ग.चंदणखेडे , स.का. (खाते क्र. 833) | नापरतावा | 90000/- | मुळ वेतन नमुद नाही. वार्षिक विवरणपत्र जोडलेले नाही. सेवेत रुजू झाल्याचा दिनांक नमुद नाही. वर्गणीचा दर नमुद नाही. |
| 2. | श्रीमती. रसीका सो. भडावी, रेंज (खाते क्र 965) | नापरतावा | 50000/- | --वरीलप्रमाणे-- |
| 3. | श्री.प्रकाश वि. आवळेवार, हेल्पर (खाते क्रं. 1072) | परतावा | 30000/- | --वरीलप्रमाणे-- |
| 4. | श्री. रविन्द आ. चौधरी, क. लि. (खाते क्र. 1129) | नापरतावा | 90000/- | --वरीलप्रमाणे-- |
| 5. | श्री. अशोक श्रा. जथाडे, क.लि. (खाते क्र. 1635) | नापरतावा | 100000/- | --वरीलप्रमाणे-- |
| 6. | श्री. प्रदीप रा. पाटील, लेखापाल (खाते क्र. 2167) | नापरतावा | 100000/- | --वरीलप्रमाणे-- |
| 7. | श्रीमती. साधना रा. नन्हेर,स.का. (खाते क्र. 2280) | परतावा | 40000/- | --वरीलप्रमाणे-- |

नमुना एक व तिन मध्ये माहीती परीपुर्ण भरलेली नसल्यामुळे उचल करावयाची रक्कम नियमानुसार प्रदान करण्यात आली किंवा नाही, यांची तपासणी करता आली नाही.

2. <u>कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधीचे वार्षिक विवरणपत्र न देणे</u>-

सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 नुसार संबंधित वर्गणीदारांनी परतावा अग्रिम तसेच नापरतावा रकमेची मागणी विहित नमुन्यातील स्वतंत्र अर्ज नमुना-एक व नमुना-तीन अर्जासोबत सादर केलेला आहे. परंतु सादर केलेल्या अर्जासोबत वर्गणीदाराने मागील वर्षाचे खाते शिल्लक विवरणपत्र सादर केलेले नाही. महाराष्ट्र भविष्य निर्वाह निधी 1998 चे नियम 6 (1) (2) मधील तरतूदीनुसार प्रत्येक आर्थिक वर्ष समाप्तीनंतर शक्य तितक्या लवकर प्रत्येक वर्गणीदारास त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात वर्षभरात जमा वर्गणी , केलेली उचल, व्याजाची रक्कम तसेच 31 मार्च अखेर खात्यात असलेली शिल्लक रक्कम याबाबतचे खाते विवरणपत्र संबंधीत खातेदारास देवुन अचुक असल्याची खात्री केल्याबद्दल पोच घेणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही करण्यात येत नाही. त्यामुळे खातेदाराच्या खाते शिल्लक असलेल्या रकमेशी योग्य ती पडताळणी न करता प्रकरणे मंजूर केलेली आहेत, असे निदर्शनास येते.

3. <u>वित्तलब्धीनुसार वर्गणीची मर्यादा न तपासणे</u>-

सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 चे नियम क्रं. 8 (1) (ब) नुसार मुळ वित्तलब्धीच्या 6 टक्के दराने भविष्य निर्वाह निधीची मासीक वर्गणी जमा करणे आवश्यक आहे. तसेच अनुज्ञेय असलेली वर्गणीची कमाल रक्कम वर्गणीदाराच्या वित्तलब्धीपेक्षा जास्त असणार नाही. कमाल वर्गणीची मर्यादा निश्चित केली असल्यामुळे त्याहून अधिक वर्गणी भरली असल्यास अश्या ज्यादा भरण्यात आलेल्या रकमेवर व्याज देय नाही. महानगरपालिका कार्यालयात ठेवण्यात आलेल्या भविष्य निर्वाह निधी खाते नोंदवही तसेच मासिक वेतन देयकाची पडताळणी केली असता उदाहरणादाखल खालील कर्मचा-याच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधीची मासिक वर्गणी जादा कपात करून त्यावर व्याज देण्यात आल्याने मनपा निधीची हानी झाली आहे.



Scanned by CamScanner

श्री सिताराम लक्ष्मण येरेवार शिपाई खाते क्र. 621 नुसार संबंधित वर्गणीदाराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. संबंधीत कर्मचा-याची मासिक वित्तलब्धी (मुळ वेतन 9620 व ग्रेड-पे रु. 1800) रु. 11420/- असताना माहे आक्टो. 2013 पासून वेतनातून दरमहा रु.12000/- दराने कपात करण्यात आली.

अ) माहे आक्टो. 2013 ते मार्च 2014 पर्यंत कपात केलेली वर्गणी रु. 12000x 6= रु. 72000/-

ब) माहे आक्टो. 2013 ते मार्च 2014 पर्यंत कपात करावयाची वर्गणी रु. 11420x6 = रु. 68520/-

रु. 3480/-

जादा कपात करण्यात आल्याने त्यावर जमा झालेले व्याज मनपा निधीत जमा करून संबंधीताच्या लेख्यात सुधारणा करुन अनुपालन करावे.

4. नियमानुसार वर्गणीची कपात न करणे-

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम क्रं. 8(1)(ब) नुसार मुळ वित्तलब्धीच्या किमान 6% दराने भविष्य निर्वाह निधीची मासिक वर्गणी करणे आवश्यक आहे. आर्थिक वर्ष 2013-14 मधील मासिक देयकाची पडताळणी केली असता खालील कर्मचा-याच्या वेतनातून भनिनि ची मासिक वर्गणी कपात केली नसल्याचे आढळून आहे.

| अ.क्रं. | कर्मचा-याचे नांव | महिना व प्रमाणक क्रमांक | मासिक वेतन मुळ वेतन+ग्रेड पे | वसुल करावयाची वर्गणी 6% दराने | वर्गणीची वसूली |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री. प्रकाश बोखड, आयुक्त | 2/14 देय 3/14 प्र.क्र.1103 दि.7/3/14 | 25790+6600 = 32390 | 1943/- दरमहा | निरंक |
| 2. | श्री .राजेश म. मोहिते, उप आयुक्त | 2/14 देय 3/14 प्र.क्र.1104 दि.7/3/14 | 22240+5400 = 27640 | 1659/- दरमहा | निरंक |
| 3. | श्री. रविन्द्र फुलगाळी, क.लि. | 2/14 देय 3/14 प्र.क्र.1110 दि.7/3/14 | 12970+2800 =15770 | 946/- दरमहा | निरंक |
| 4. | श्री. मधुकर गोटेफोडे, 20) लि. | 2/14 देय 3/14 प्र.क्र.1111 दि.7/3/14 | 11560+2400 = 13960 | 838/- दरमहा | निरंक |
| 5. | श्री. शेखर कि. ढेंगे, शिपाई | 2/14 देय 3/14 प्र.क्रं.1112 दि.7/3/14 | 6620+1600 = 8220 | 494/- दरमहा | निरंक |
| 6. | श्री.शेख शब्बीर शेख बापुमिया, शिपाई | 2/14 देय 3/14 प्र.क्र.1112 दि.7/3/14 | 6140+1600 = 7740 | 465/- दरमहा | निरंक |
| 7. | श्री. सुभाष बा. चव्हाण, कुली | 2/14 देय 3/14 प्र.क्र.1132 दि.7/3/14 | 9410+1800 .= 11210 | 673/- दरमहा | निरंक |
| 8. | श्री. निशिकांत आ. चांदेकर, 1) लि. | 2/14 देय 3/14 प्र.क्र.1140 दि.7/3/14 | 8620+1900 = 10250 | 615 दरमहा (400/-दराने कपात केली.) | रु.215/- ने कमी |



Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9. | श्री. सुशिल के. तळवेकर, विजतंत्री | 2/14 देय 3/14 प्र.क्र.1143 दि.7/3/14 | 6310+1900 = 8210 | 493 दरमहा | निरंक |
| 10. | श्री. भगवान कोकमकर, कुली | 5/13 देय 6/13 प्र.क्र.238 दि.4/6/13 | 7380+1600 =8980 | 539/- दरमहा | निरंक |
| 11. | श्री. राजेश बु. मार्वे , सफाई कामगार | 5/13 देय 6/13 प्र.क्र.245 दि.3/4/13 | 5580+1300 = 6980 | 210/- दरमहा | निरंक |
| 12. | श्री. रविन्द्र फुलमाळी, 4) लि. | 3/14 देय 414 प्र.क्र.8 दि.3/4/14 | 12970+2800 = 15770 | 946/- दरमहा | निरंक |

उपरोक्त प्रकरणी नियमानुसार एकूण वित्तलब्धीच्या 6 % दराने भनिनि ची कपात करुन खात्यात जमा करण्यात यावी, तसे तपशिलासह अनुपालन सादर करावे.

5. जादा व्याजाचे प्रदान होणे-

महाराष्ट्र शासन राजपत्र , वित्त विभाग अधिसुचना क्रं. भनिनि- 2013/प्र.क्र.सेवा-6 दिनांक 28.06.2013 नुसार महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीच्या जमा शिल्लक रकमेवर 8.7 % व्याजदर निश्चित केलेला आहे.

परंतु चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांना सन 2013-14 या आर्थिक वर्षा अखेरच्या जमा रकमेवर 8.8 % दराने व्याज दिल्याने अतिप्रदान झाले असून मनपा निधीची हानी झाली आहे.

1) श्री. सुरेश गोविंदराव आंबेकर (से. नि. वरिष्ठ लिपीक) भनिनि खाते क्र. 838 हे दिनांक 30.09.2013 सेवानिवृत्त झाले असून त्यांना भनिनि ची एकूण देय रक्कम रु. 231720/- वर 8.8 % दराने व्याज दिल्याने अतिप्रदान झाले असून मनपा निधीची हानी झाली आहे.

ब) श्री. रामभाऊ गणपतरावर नगरकर ( से. नि.सफाई कुली) खाते क्र.1732 हे दिनांक 31.08.2013 ला सेवा निवृत्त झाले असून त्यांना भनिनि ची एकूण देय रक्कम रु. 113798/- वर 8.8 % दराने व्याज दिल्याने अतिप्रदान झाले असून मनपा निधीची हानी झाली.

क) श्री.अशोक बळीराम टेंभे. सफाई कुली खाते क्र. 1943 यांचा दिनांक 11.09.2013 ला मृत्यू झाला असून त्यांचे वारसदारांना भनिनि ची एकूण देय रक्कम रु.91721/- वर 8.8% दराने व्याज देण्यात आल्याने अतिप्रदान झाले असून मनपा निधीची हानी झाली.

उपरोक्त सर्व प्रकरणी अतिप्रदानाची वसुली करुन वसुलपात्र रक्कम मनपा निधीत जमा करुन अनुपालन सादर करावे.

DATDUBM6401 (Ref No : 52, Hmn No : 74)



Scanned by CamScanner

सफाई

**41 नाली सफाईचे काम सहकारी संस्थांऐवजी खाजगी कंत्राटदाराकडून अत्याधिक दराने देऊन मनपा निधीचे अनावश्यक प्रदान होणेबाबत.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3563926.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 440500.00/-

| |
|---|
| ***शहरातील इतर प्रभागातील नाली सफाईचे काम सहकारी संस्थाचे मार्फत 18 मजूर लावून रु.430/- प्रतीमजूर प्रतीदिवस या दराने दिलेले असतांना काही प्रभागातील त्याच स्वरूपाच्या कामासाठी खाजगी कंत्राटदाराकडून मासिक एकमुश्त दराचे प्राकलन मूल्य निश्चित करून निविदा मागविल्या परंतु या निविदेत मजूर संख्येचे बंधन नसल्यामुळे प्रत्यक्षात लावलेल्या मजूर संख्येचा विचार करता सहकारी संस्थांना प्रदान केलेल्या रु.430/- दराच्या तुलनेत पाचपट अधिक दराने मोठ्या रकमेचे अनावश्यक प्रदान झाले आहे.*** |

चंद्रपूर शहरातील झोन क्र.1 व 3 मधील एकूण 6 प्रभागातील 'भूमिगत नाल्या, खुली गटारे सफाई करून कचरा हॉडीपर्यंत/कंटेनर पर्यंत टाकणे तसेच इतर सफाई करणे व कचरा हॉडीपर्यंत पोचता करणे' या कामासाठी स्थायी समिती च्या ठराव क्र.62 दि.21/06/2013 चे अनुषंगाने वर्तमानपत्राद्वारे जाहिरात प्रसिद्ध करून निविदा मागविण्यात आल्या. प्रथम 3 वेळा प्रतिसाद न मिळाल्याने चवथ्या वेळी प्राप्त दोन निविदांमधून श्री.विलास बानकर यांची रु.605000/-+सेवाकर याप्रमाणे प्रतिमाह रु.679770/-ची कमी दराची निविदा स्विकृत करण्यात आली. त्यानुसार दि.21/10/2012 ते 31/03/2014 या कालावधीसाठी करारनामा व 19/10/2013 रोजी कार्यादेश देण्यात आला. या कालावधीसाठी कंत्राटदारास विविध प्रमाणकान्वये रु.3563926/-चे प्रदान करण्यात आले.

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

भारत सरकारचे वित्त मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचना क्र.25/2012 सर्विस टॅक्स नवी दिल्ली दि. 20/06/2012 मधील परिच्छेद क्र.25 नुसार व्यापक जनहितासाठी पुढील

1. भारत सरकारचे वित्त मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचना क्र.25/2012 सर्विस टॅक्स, नवी दिल्ली, दि.20.06.2012 मधील परिच्छेद क्र.25 नुसार व्यापक जनहितासाठी पुढील सेवेस सेवाकरापासून सूट प्रदान करण्यात आली आहे.

" Service provided to government, a local authority, or a government authority by way of-



Scanned by CamScanner

a) Carrying out any activity in relation to any function ordinarily entrusted to a municipality in relation to water supply, public health, sanitation conservation, solid water management or slum improvement and upgradation."

कंत्राटदारास स्वच्छतेच्या सेवेपोटी मिळणाऱ्या उत्पन्नातून सेवाकराचे प्रदान शासनास देणेपासून सूट असतांना त्या प्रयोजनासाठी महानगरपालिकेने कंत्राटदारास प्रदान करण्याचे किंवा सेवाकरासह निविदा स्विकृत करण्याचे कोणतेही औचित्य दिसत नाही. त्यामुळे 12.36% सेवकराच्या दराने वरीलप्रमाणे रु.440500/- चे कंत्राटदारास अनावश्यक व अतिप्रदान झाले आहे. सदर कंत्राटदाराने सदर सेवाकराचा केंद्र शासनास भरणा केल्याची खात्री मनपाने केलेली नाही किंवा तसा अभिलेखही नस्तीमध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे रु.440500/- चे अतिप्रदान वसूलपात्र ठरते.

2. खाजगी कंत्राटदाराने सहा प्रभागातील नाली सफाईचे काम केले असून इतर प्रभागातील तेच काम स्वयंसेवी संस्थांनी केले आहे. परंतु सारख्याच कामासाठी श्री. बानकर यांना स्विकृत निविदेच्या आधारावर तुलनेने जादा प्रदान झाल्याचे दिसते.

उदाहरणादाखल तुलनात्मक तपशील पुढीलप्रमाणे आहे-

(रकमा रुपयांत)

| कंत्राटदार/ स्वयंसेवी संस्था | कामाचा कालावधी (महिना) | प्रभागांची संख्या | महिन्यातील एकूण मजूर पुरवठा | कमी केलेल्या कामापोटी दंड कपातीसह एकूण प्रदान | प्रमाणक क्र. व दिनांक | कामाचे दिवस | कामाचे प्रत्येक दिवशी मजूर पुरवठा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| श्री.विलास बानकर | फेब्रु2014 | 6 | 245½ | 663328 | 16 15/03/2014 | 12 | 6 ते 12 |
| संजीवनी बेरोजगार सेवा सहकारी संस्था | फेब्रु2014 | 2 | 478½ | 205755 | 1696 20/03/2014 | 14 | 18 |
| संत मीराबाई सेवा | फेब्रु2014 | 10 | 465½ | 162970 | 1745 29/03/2014 | 24 | 9 (सरासरी) |



Scanned by CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सहकारी संस्था | | | | | | | |
| विठ्ठल सेवा सहकारी संस्था | फेब्रु2014 | 2 | 419½ | 180385 | 1749 29/03/2014 | | 18 |

श्री.विलास बानकर यांच्या करारनाम्याप्रमाणे व प्रसिद्ध केलेल्या निविदेत जाहीर केल्याप्रमाणे दररोज नाली व इतर सफाईचे काम करणे बंधनकारक असतांना प्रत्येक महिण्यात नाली सफाईचे देयकाचे त्यांना प्रदान झाले आहे.

श्री बानकर कंत्राटदार यांची निविदा मासिक एकमुक्त दराने ( रु.605000/- + सेवाकर = रु.679778/-) स्विकृत असून त्यावर लागणाऱ्या मजुरांच्या संख्येची मर्यादा निश्चित केलेली नाही. माहे फेब्रुवारी मध्ये त्यांनी दररोज 6 ते 12 या संख्येत मजूर लावल्याचे (एकूण 245½) उपस्थिती अहवालावरुन दिसते. या संख्येनुसार प्रतीमजूर (रु.663328 / 245½) रु.2702/- नुसार मनपाने कंत्राटदारास प्रदान केले आहे.

याउलट स्वयंसेवा सहकारी संस्थांना निविदेत 18 मजूर संख्या व रु.430/- प्रतीमजूर निश्चित करून दरमहा प्रदान करण्यात आले.

| | |
|---|---|
| कंत्राटदारास झालेले प्रदान | रु. 2702 प्रतीमजूर प्रतिदिवस (माहे फेब्रुवारी2014) |
| स्वयंसेवी संस्थांना झालेले प्रदान | रु. 430 प्रतीमजूर (प्रतिमाह किमान दर) |
| | तफावत रु. 2272 |
| शासन परिपत्रक दि.04/02/2013 नुसार किमान वेतनाचा दर | रु.311.24 प्रतीमजूर प्रतिदिवस माहे फेब्रुवारी 2014 साठी |

किमान वेतनदराचा आधार घेतल्यास प्रतिदिवस प्रत्येक मजुरामागे स्वयंसेवी संस्थांना रु.119/- (रु.430 - 311.24) चा लाभ प्राप्त असून खाजगी कंत्राटदारास रु.2391/- चा लाभ प्राप्त झाला आहे. याच प्रकारे इतरही महिण्यात खाजगी कंत्राटदारास तुलनेने प्रचंड लाभाचे प्रदान झाले आहे.

ही वस्तुस्थिती लक्षात घेता शासनाने निश्चित केलेल्या किमान वेतनानुसार उचित व अत्यल्प दराने काम करण्यास स्वयंसेवी शहरात उपलब्ध असतांना व मनपांतर्गत कामे करीत असतांना खाजगी कंत्राटदाराकडून



Scanned by CamScanner

निविदा प्राप्त करून तुलनेत प्रचंड आर्थिक लाभ पोचविण्यात आला आहे. सदर बाब मनपाच्या आर्थिक हिताविरुध्द व वित्तीय औचित्याचे उल्लंघन करण्यासाठी आहे असे नमूद करण्यात येते.

DATABWM6915 (Ref No : 64, Hmm No :46)

आस्थापना

**42 सफाई कामगारांच्या भरलेल्या अतिरिक्त पदांमुळे आस्थापना खर्चात अनावश्यक वाढ झाल्याबाबत.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष :176 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***चंद्रपूर शहर महानगरपालिकेचा आकृतीबंध महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.चंमपा-2012/546/प्र.क्र.77/12/नवि-26, दिनांक 28.05.2013 अन्वये मंजूर करण्यात आला असून मंजूर आकृतीबंधामध्ये सफाई कामगारांची 462 पदे दर्शविण्यात आली असताना महानगरपालिकेने एकूण 572 सफाई कामगार कार्यरत असल्याने 110 पदे अतिरिक्त असल्याने आस्थापना खर्चात अनियंत्रीत वाढ झाली आहे***

नवनिर्मित चंद्रपूर शहराकरीता सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनास सादर केल्यानुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.चंमपा-2012/546/प्र.क्र.77/12/नवि-26, दिनांक 28.05.2013 अन्वये आकृतीबंध मंजूर केला असून मंजूर आकृतीबंधामध्ये सफाई कामगारांची 462 पदे दर्शविण्यात आली असतांना महानगरपालिकेत एकूण 572 सफाई कामगार कार्यरत असल्याने 110 पदे अतिरिक्त कार्यरत आस्थापना खर्चात अनियंत्रीत वाढ झाली आहे. यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1. चंद्रपूर शहर महानगरपालिकेने, शासनास सादर केलेला प्रस्ताव पत्र क्र.चंशमनपा/साप्रआ/1091/2012, दिनांक 17.7.2012 चे अनुषंगाने नवीन चंद्रपूर शहर महानगरपालिकेकरिता एकूण 1197 पदांचा समावेश असलेल्या आकृतीबंधास मान्यता देण्याबाबत प्रस्तावित केले होते. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाने राज्यातील महानगरपालिकेकरिता आकृतीबंध निश्चित करणेबाबत शासन निर्णय दिनांक 4 मे, 2006 व 28 मार्च, 2011 मध्ये असलेली मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन नवनिर्मित चंद्रपूर शहर महानगरपालिकेकरिता महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.चंमपा/2012/546 /प्र.क्र.77/12/नवि-26, दिनांक 28 मे, 2013 अन्वये



Scanned by CamScanner

एकूण 869 पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला.

मंजूर आकृतीबंधात सफाई कामगारांची एकूण 462 मंजूर पदे असतांना 572 सफाई कामगार कार्यरत आहेत. त्यामुळे 110 सफाई कामगारांची पदे अतिरिक्त ठरत आहे.

सन 2015-16 चे सुधारित अंदाजपत्रकामधील सन 2013-14 मध्ये दर्शविल्याप्रमाणे 462 सफाई कामगारांचे वेतनावर झालेला प्रत्यक्ष खर्च पुढीलप्रमाणे आहे -

1. मलनि:सारण स्थायी अस्थापना (कुली / रेज्या) - रु. 11,02,01,088/-
2. साफसफाई स्थायी अस्थापना (सार्व.संडास / सफाई कामगार) - रु. 29,43,202/-
3. पर्यवेक्षक स्थायी आस्थापना (रस्ते सफाई) - रु. 1,85,53,974/-

रु. 13,16,98,264/-

**(अतिरिक्त ठरलेल्या 110 सफाई कामगारांचे वेतनावर झालेला प्रमाणशीर खर्च 2,53,26,589/-)**

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-2512/प्र क.157/का-12 दिनांक 3 सप्टेंबर 2014 चे मुद्दा क्रं. 2 अन्वये सफाई कामगाराची पुर्ण वेळ नेमणूक आवश्यक नसल्यास, त्यास तासिका (Pro-rata-basis) पध्दतीने रक्कम अदा करणे अथवा साफसफाईच्या पूर्णवेळ कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग इलाका शहर मुंबई यांचेमार्फत जारी केलेल्या निविदेप्रमाणे कार्यालयीन इमारत व परिसर यांच्या साफसफाई आणि प्रसाधनगृहाच्या साफसफाईचे किमान दर निश्चितीबाबत तसेच निविदा मागविणेप्रकरणी कार्यवाही निर्देशित करणेबाबत नमुद आहे. चंद्रपूर शहरातील खुल्या व भूमीगत नाल्यांच्या सफाईची कामे सहकारी संस्था व कंत्राटदारांमार्फत व मोठया नाल्याच्या सफाईचीही कामे कंत्राटदारांमार्फत करण्यात आली असून त्यावर 2013-14 मध्ये रु. 2,47,47,373/- एवढा खर्च करण्यात आला आहे. असे असतांना विहीत मार्गदर्शक तत्वांच्या आधारे रस्ते झाडणे, कार्यालय सफाई इत्यादी कामासाठी आकृतीबंधात मंजूर केलेली 462 पदे पुरेशी आहेत असे दिसते. त्यामुळे अतिरिक्त 110 कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील अंदाजे रु. 2.53 कोटी एवढा वार्षिक आर्थिक भार कमी करण्यासाठी त्याच्या समायोजनाबाबत शासनाकडून मार्गदर्शन / निर्देश प्राप्त करून त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

2. सन 2013-14 चे लेखापरिक्षणादरम्यान मनपाच्या आस्थापनेवर 784 पदे कार्यरत होती तर 85 पदे रिक्त होती. मंजुर आकृतीबंधानुसार सफाई कामगाराची 462 पदे मंजुर असून 572 सफाई कामगार कार्यरत आहे. त्यामुळे 110 सफाई कर्मचारी अतिरिक्त ठरतात. मंजुर 869 पदापैकी 462 सफाई कामगारांची पदे वगळता उर्वरित 397 अन्य कर्मचा-यांची पदे मंजुर आहे. एकुण 397 कर्मचा-यांपैकी 212 कर्मचारी कार्यरत असून 185 अन्य पदे रिक्त आहे.

अन्य रिक्त पदाची स्थिती पाहता सफाई कर्मचा-यांची 123.80 % पदे भरली असून अन्य अधिकारी/कर्मचा-यांची केवळ 46.59 % पदे भरली आहेत, असे दिसते. लेखापरिक्षणाचे दिनांकास वरीलप्रमाणे स्थिती असल्याने प्रत्यक्ष रिक्त असलेल्या अन्य संवर्गातील महत्वाच्या कार्यकारी/ अकार्यकारी पदावर नविन भरती नसल्यामुळे कार्यरत असलेल्या कर्मचा-यावर कामाचा अतिरिक्त ताण



Scanned by CamScanner

पडत आहे, असे दिसते. कनिष्ठ लिपीक पदावरील कर्मचा-यांना विभाग प्रमुख (उदा. कर विभाग ), क्षेत्रिय अधिकारी (zone officer) इ. महत्वाच्या पदांचा अतिरिक्त कार्यभार सांभाळावा लागत आहे. यामुळे नगर प्रशासनातील सुसुत्रता, संनियंत्रण, अंमलबजावणी इत्यादीवर प्रतिकूल परिणाम झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3. सदर प्रकरणी चंद्रपूर शहर महानगरपालिका यांना देण्यात आलेले अर्धसमास पत्र क्र. 41 दिनांक 10/05/2016 चे अनुपालन प्राप्त झाले असून सफाई कामगारांची 110 पदे अतिरिक्त असल्याचे मान्य करण्यात आले आहे. आकृतीबंधात मंजुर एकूण 869 पदांपैकी सफाई कर्मचा-यांची 462 मंजुर पदे वगळल्यास उर्वरित 407 अन्य पदांपैकी काही पदे रिक्त असली तरी सफाई कामगारांच्या अतिरिक्त (110 पदे) पदभरतीमुळे आस्थापना खर्चात वाढ झालेली आहे.

सन 2013-14 या आर्थिक वर्षातील आस्थापना खर्चाची टक्केवारी 48.17% एवढी प्रचंड आहे. अर्थसंकल्पामधील भाग-1 अंतर्गत अ,ब,क,ड व ई शिर्षाखाली एकूण जमा उत्पन्न खालील प्रमाणे आहे.

(मनपाने उपलब्ध केलेल्या आकडेवारीनुसार)

अ] 1. करापासुन उत्पन्न (मालमत्ता कर व इतर कर ,स्थां.सं.कर) रु. 493074695

2. मनपा मालमत्तेपासुन उत्पन्न (मार्केट रेंट , गाळे विक्री उत्पन्न) रु. 19949741

3. मनपा विविध, मार्गस्थ दाखला फि व इतर किरकोळ उत्पन्न रु. 21513184

4. अनुदाने -

अ) सहाय्यक अनुदान ------

ब) शिक्षण अनुदान रु. 4475200

क) जमिन महसुल/ करमणुक कर , मुद्रांक , ग्रंथालय, आरोग्य सेवा रु. 3755984

एकूण उत्पन्न रु. 583045604

ब] 1. आस्थापना खर्च ( स्थायी आस्थापना )

(सपुर्ण पदांच्या वेतनावरील एकूण वार्षिक खर्च ) रु. 280886334

क] आस्थापना खर्च X 100 / एकुण उत्पन्न =

280886334 X 100

---------------------- = 48.17 %

583045604

राज्य शासनाच्या नगरविकास विभागाचे शा. नि. क्र. संकीर्ण-1005/वर्गीकरण/प्र.क्र.379/05/नवि-



Scanned by CamScanner

24 दि. 04 मे 2006 नुसार मनपांना विकास कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्य दृष्टीने आस्थापना खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी जास्तीत जास्त 35% एवढी खर्च मर्यादा ठेवण्यात आली आहे. परंतु मनपा चंद्रपूरकडील आस्थापना खर्चावर जादा खर्च होत असल्याने शहरातील नागरिकांना नागरी सुविधा पुरविणा-या विकास कामावर परिणाम झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

DATDUBM6401 (Ref No : 59, Hmm No : 41)

विद्युत वि

***43 विद्युत व्यवस्थेच्या देखभाल व दुरुस्तीच्या रु.99.82 लाख मूल्याचे कामास तांत्रिक मान्यता नसणे व इतर अनियमितता.***

**विद्युत व्यवस्था देखभाल व दुरुस्ती**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :159 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 9782740.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 2951201.00/-

| |
|---|
| *विद्युत व्यवस्थेच्या देखभाल दुरुस्तीच्या कामास तांत्रिक मान्यता प्राप्त नसणे, कंत्राटदाराकडील कर्मचाऱ्यांचा, त्रयस्थ व्यक्ती व मालमत्तांना संरक्षण न देणे, ई-निविदे ऐवजी वर्तमानपत्राद्वारे कमी मुदत कालावधीची निविदा प्रसिद्ध करुन उचित स्पर्धा घडवून न आणणे इत्यादी अनियमितता दिसून येतात.* |

"चंद्रपूर शहरातील महाराष्ट्र वीज कंपनीचे खांबावरील तसेच मध्यवर्ती प्रकाश व्यवस्थेमधील पथदिवे नियमित बंद चालू होण्याकरिता वीज मंडळाचे पोलवरील स्वयंचलित ट्वी लाईट व टाईमर स्वीच, यांची देखभाल व दुरुस्ती करणे" या कामाचे सीएसआर सन 2012-13 चे आधारावर रु.99,82,388/- मूल्याचे प्राकलन तयार करण्यात आल्याचे दर्शवून दोन वर्षाच्या कालावधीसाठी सदर कामाची निविदा वर्तमानपत्राद्वारे प्रसिध्द करण्यात आली. मे. आधुनिक इलेक्ट्रिक सर्विस, चंद्रपूर यांची निविदा वाटाघाटीनंतर 2% कमी दराप्रमाणे स्थायी समितीने मंजूर करण्यात आली. त्यानुषंगाने कंत्राटदारास प्रती माह रकमांचे प्रदान करण्यात आले.

यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत -

1) या कामाचे मूळ प्राकलन, दर पृथःकरण उपलब्ध झालेल्या मूळ नस्तीमध्ये उपलब्ध नाही. मूळ नस्तीत त्यामध्ये उपलब्ध असलेल्या तांत्रिक मान्यतेच्या स्वतंत्र प्रमाणपत्रावर शहर अभियंता यांची स्वाक्षरी



Scanned by CamScanner

प्राप्त केलेली नाही. सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील परिच्छेद 135 नुसार देखभाल दुरुस्तीच्या खर्चाच्या तपशीलवार अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याची मजुरी आवश्यक आहे. ती नसल्यामुळे देखभाल व दुरुस्तीच्या विविध बाबींवरील प्रदानाचे दर योग्य असल्याची खात्री होत नाही. शिवाय एवढ्या मोठ्या मूल्याचे काम तांत्रिक मंजुरीशिवाय करण्यात आले ही बाब नियमसंगत नाही.

2) सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.मातंस/नस्ती2012/प्र.क्र.273/39, दि.19.01.2013 नुसार रुपये 10 लाख मुल्यावरील कामाच्या निविदा इलेक्ट्रोनिक पद्धतीने (ई-निविदा) प्रसिध्द करून निकोप व मोठ्या प्रमाणावर स्पर्धा घडवून आणणे बंधनकारक असताना रु.99.82 लाख मूल्य प्रथम वर्षी व त्यापुढील वर्षी 5% अधिक म्हणजेच रु.102.82 लाख याप्रमाणे दोन वर्षासाठी रु.2 कोटी मुल्यावरील कामाची निविदा 2 वर्तमानपत्राद्वारे अल्पमुदतीसाठी प्रसिद्ध केली. (प्रसिद्धी दिनांक 29/06/13 व निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दि.12.07.2013- एकूण मुदत 14 दिवस). ई-निविदा लागू होणेपुर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय क्र.सीएटी-10/2006/प्र.क्र.133/इमारती-2, दि. 02/11/2006 नुसार थेट वर्तमानपत्राद्वारे निविदा मागविण्यासाठीचा प्रथम सूचना कालावधी 25 दिवस व दुसरी कालावधी 15 दिवस इतका होता. वरील दोन्ही तरतुदीचे सदर प्रकरणी उल्लंघन झाले असून मागील कंत्राटदाराची निविदा पुन्हा मंजूर करण्यात आली. यावरून जुन्या कंत्राटदारास कंत्राट मिळण्यास अप्रत्यक्षपणे साहाय्य करण्यात आले अशी शक्यता नाकारता येत नाही.

3) **कर्मचाऱ्यांचा विमा** - मूळ नस्ती मधील दस्तावेजानुसार कंत्राटदाराने एकूण सात कर्मचाऱ्यांच्या दिनांक 13.08.2013 ते 12.08.2015 या कालावधीतील विमा काढला असून भविष्य निधी संघटनेच्या संस्थेकडे 87 कर्मचाऱ्यांची नोंदणी (Subcription) केल्याचे दिसते. त्यानुषंगाने पुढील बाबी महत्वाच्या आहे.

(I) कामाची निविदा मूल्य - रु. 99.82 लाख (प्रथम वर्ष)
- रु. 102.82 लाख (दुसरे वर्ष)

(II) देखभाल दुरुस्ती अंतर्गत पॉईंट्स (Points) ची संख्या

| अ.क्र. | पॉईंट्स | संख्या |
|---|---|---|
| 1 | पथदिवे | 13022 |
| 2 | पथदिवे चालू बंद स्वीच | 118 |
| एकूण | | 13140 |

(III) विमा संचालनालयाकडील Workmen's Compensation Insurance Policy no.AIF-2313/Chandrapur Municipal Corporation/ TCE & WC/90/Engg.-2. नुसार सदर कंत्राटासाठी सात कर्मचारी कार्यरत असल्याचे दर्शवून त्यांचे एकूण वार्षिक वेतनाच्या अनुषंगाने रुपये 25823/- विमा प्रीमियम



Scanned by CamScanner

रकमेचा कंत्राटदाराने policy no. 109785 दि.08.01.2014 अन्वये भरणा केला.

| अ.क्र. | कार्यरत कर्मचारी | संख्या |
|---|---|---|
| 1 | सुपरव्हायजर | 1 |
| 2 | Skilled (कुशल) | 2 |
| 3 | Unskilled (अकुशल) | 4 |
| 4 | एकूण | 7 |

याप्रमाणे अत्यल्प कर्मचाऱ्यांकडून 13140 पॉईंट्सच्या देखभाल व दुरुस्तीचे रु.99.82 लाख मूल्याचे काम पार पाडणे असमर्थनीय असून प्रत्यक्षात तसे असल्यास कामाचा दर्जा व नियमितपणा राखला जात नसावा अशी शक्यता आहे.

दुसरी बाब म्हणजे कंत्राटदाराने भविष्य निधी संघटन या संस्थेकडे 87 कर्मचाऱ्यांची नोंदणी केल्याचेही अभिलेख उपलब्ध आहेत. सदर 87 कर्मचारी मनपातील संबंधित कामावर प्रत्यक्षात कार्यरत असल्यास कंत्राटदाराने 87 वजा 7 या प्रमाणे 80 कर्मचाऱ्यांचा विमा न काढल्याने विमा प्रीमियम रकमेतून राज्य शासनास प्राप्त होणाऱ्या महसुलाचे नुकसान केले आहे, हे स्पष्ट आहे. सदर 7 कर्मचाऱ्यांची भरणा केलेली विमा रक्कम रुपये 25823 या प्रमाणानुसार उर्वरित 80 कर्मचाऱ्यांपोटी ढोबळमानाने रुपये 295120 वसूलपात्र व शासनाकडे भरण्यायोग्य आहे.

4) **त्रयस्थ व्यक्ती व मालमत्तेचा विमा** – विमा संचालनालयाच्या Erection all Risk Insurance Policy प्रपत्रातील Section II नुसार त्रयस्थ व्यक्तीच्या जीवास किंवा त्याच्या मालमत्तेसाठी Third Party Insurance द्वारे कंत्राटदाराने विमा संरक्षणाची उपाययोजना केलेली नाही. संबंधित कंत्राट विद्युत देखभालीशी संबंधित असून होणाऱ्या कोणत्याही संभाव्य दुर्घटनेमुळे इतर लोकांना व इतर मालमत्तांना हानीची शक्यता विचारात घेणे आवश्यक होते. कंत्राटदाराने या प्रकारचा विमा न काढल्याने कंत्राटदाराचा बेजबाबदारपणा किंवा दुर्लक्षामुळे त्रयस्थ हानी झाल्यास त्याच्या दायित्वाची जबाबदारी मनपावर येण्याची शक्यता आहे. यासंबंधाने उचित कार्यवाही व्हावी.

DATABWM6901 (Ref No : 62, Hmm No : 126)

***44 नगररचना विभागाच्या दुर्लक्षामुळे विविध नियमांचे व अटी शर्तींच्या उल्लंघनासह मनपाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याबाबत.***

**नगररचना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**



Scanned by CamScanner

Chandrapur (M Corp.)

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष :00   मनपा निधी*

*अनियमितता कलम  : 9ब*

***बांधकाम मंजुरीच्या प्रकरणांमध्ये विविध नियमाखालील तरतुदीचे उल्लंघन होत असून त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे.***

मनपा चंद्रपूर येथील नगररचना विभाग महसूल प्राप्तीच्या दृष्टीने महत्वाचा विभाग असून वाढीव चटईक्षेत्र, गुंठेवारी, इमारत बांधकाम परवानगी/विकास/अनुज्ञप्ती नूतनीकरण इ. बाबींपासून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न अपेक्षित असताना उचित नियंत्रण, नियमित सर्वेक्षणाअभावी पुढीलप्रमाणे अपेक्षेपेक्षा कमी उत्पन्न प्राप्त झाले.

| उत्पन्नाच्या बाबी | अपेक्षित | प्रत्यक्ष उत्पन्न | |
|---|---|---|---|
| इमारत परवाना/विकास/ अनुज्ञप्ती नूतनीकरण | 1.24 कोटी | 0.83 कोटी | 67% |
| वाढीव चटईक्षेत्र | 0.74 कोटी | 00 | 0% |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त कमी उत्पन्नाच्या अनुषंगाने लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत-

1. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार अभिन्यास / लेआउटसना मंजुरी देताना एकूण क्षेत्रफळापैकी ठराविक क्षेत्र (उदा. 2 ते 5 हेक्टर क्षेत्राच्या ले आउट्स पैकी 20% क्षेत्र) लोकोपयोगी वापर आणि सोयीसुविधांसाठी (Public Utility) आरक्षित ठेवणे आवश्यक आहे. अशा आरक्षित क्षेत्रावर मैदाने, रस्ते, नाल्या इ सोयी अभिन्यासधारकाने मनपाच्या निर्देशांप्रमाणे विकसित करून मनपाकडे हस्तांतरित करावयाचे जिल्हाधिकारी यांनी विविध प्रकरणात अभिन्यासधारकांना, अकृषक वापरासाठी दिलेल्या परवानगी आदेशांनुसार बंधनकारक करण्यात आले आहे.

परंतु नगरविकास विभागाकडे वरीलप्रमाणे विकसित करून हस्तांतरित करावयाच्या रस्ते, मैदाने, नाल्या इ मालमत्ताबाबत आवश्यक कार्यवाही झाल्याचे दिसत नाही. परिणामी, अशा अभिन्यासातील सदर मालमत्ता मनपास हस्तांतरित न होणे व त्या अभिन्यासधारकाने विकसित न केल्याने त्याचा भार मनपाने उचलून अभिन्यासातील रहिवाशांना सोयी उपलब्ध करून देण्याची व पर्यायाने अभिन्यासधारकाने करावयाचा खर्च मनपाने केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

नविन बांधकामांच्या अनुषंगाने नगरपरिषदांची विकास नियंत्रक नियमावली मधील नियम 6.2.10, 6.2.11, 6.2.13 व 6.2.14 नुसार अनुक्रमे परवानगी शुल्क, सुरक्षा ठेव, विकास शुल्क (नगररचना कायदा 1966 मधील कलम 124 A) व प्रिमिअम चार्जेसची आकारणी करण्याची तरतूद आहे. परंतु मनपा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावरील बांधकाम उचित परवानगी शिवाय व नगररचना विभागाचे दुर्लक्षामुळे होत असल्यामुळे सदर शुल्कापासून मनपा वंचित आहे असे दिसते.

2. <u>अवैध बांधकामामुळे रु. 8 1.97 लाख महसुलाची हानी</u> - कर विभागाने उपलब्ध माहितीनुसार सन 2013-2014 मध्ये मनपा क्षेत्रात 801 मालमत्तांची वाढ झाली असून नगरविकास विभागाने प्रत्यक्षात 403 बांधकामांना परवानगी दिल्याचे अभिलेख्याप्रमाणे दिसून येते. यावरून बांधकाम परवाना शुल्क, विकास शुल्क डावलून बांधकाम झालेली आहेत असे स्पष्ट होते. या अवैध / अनधिकृत बांधकामावर नगरविकास विभागाचे



Scanned by CamScanner

दुर्लक्ष असल्यामुळे (403 परवानगींच्या अनुषंगाने रु.0.83 कोटी परवानगी व विकासशुल्क या प्रमाणानुसार) अनधिकृत बांधकामांपोटी (801-403) म्हणजेच 398 बांधकाम परवानगी व विकास शुल्काचे अंदाजे रु.0.82 कोटी (रु. 81.97 लाख) एवढ्या महसुलाची हानी झाल्याची शक्यता आहे.

3. <u>बांधकाम परवानगी देण्यास विलंब करणे</u> - नगरपरिषदांची विकास नियंत्रण नियमावली मधील नियम 6.6.3 नुसार " Sanction/ Refusal shall be given within 60 days of notice for permission otherwise it will be assumed as deemed permission causing loss of several fees"

बांधकाम परवानगी नोंदवहीचा आढावा घेतला असता सहा महिन्याच्या विहित मुदतीचे उल्लंघन करुन विलंबाने मंजुरीची प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत असे दिसून आले-

उदा.

| | | |
|---|---|---|
| Primas Realtors private limited<br>सर्व्हे नं. 21, प्लाट क्र.। | प्रकरण क्र-113, दि. 17/06/2011<br>बांधकाम परवनगी दि. 04/07/2013 | विलंब अंदाजे 2 वर्षे |

नगररचना विभागाकडे अशा प्रलंबित प्रकरणापैकी उपरोक्त नियम 6.6.3 मधील तरतुदींचा विकासकानांना/ मालमत्ताधारकांना लाभ होऊन विविध शुल्कांपासून प्राप्त होऊ शकणाऱ्या महसुलाचे मनपास नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4. <u>अग्नीशमन उपाययोजना (fire safety measures) शिवाय बांधकाम नकाशा मंजूर करणे</u> - Fire Protection of National Building Code मधील भाग-4 व Maharashtra Fire Prevention and Life Safety Measures Act 2006 मधील तरतुदीनुसार सर्व प्रकारच्या इमारतींचे बांधकाम होणे आवश्यक आहे. MRTP Act 1966 अंतर्गत नगरपरिषदांची विकास नियंत्रण नियमावली मधील नियम 6.2.6.1, 20 नुसार पुढील विशेष प्रकारच्या इमारतीच्या प्रारूप नकाशात अग्नीशमन यंत्रणेची तरतूद असल्याशिवाय नकाशे मंजूर करता येत नाही.

अ. 15 मीटर पेक्षा जास्त उंच इमारती

ब. शैक्षणिक, व्यावसायिक, औद्योगिक इ. प्रकारच्या इमारती

क. 500 चौ.मि. पेक्षा जास्त क्षेत्राच्या मिश्र रहिवासी योजना (mixed occupancies)

याप्रकारच्या इमारतीच्या नकाशांमध्ये अग्नीशमन यंत्रणा / उपाययोजना स्पष्टपणे दर्शविली असणे अत्यावश्यक आहे (6.2.6.1 मधील 1 ते 9)

त्यापैकी काही पुढीलप्रमाणे आहेत-

17) Access to fire appliances/vehicles
18) Size of main and alternate staircase
19) Location and size of fire Lift
20) Air conditioning system with fire dampers
21) Smoke exhausters system
22) Details of fire alarm system
23) Location of fire protection installation, इत्यादी.

नगररचना विभागाने मंजूर केलेल्या प्रकरणांत नकाशांचा सर्वसाधारण आढावा घेतला असता वरील अत्यावश्यक बाबी अंतर्भूत असल्याचे आढळून आले नाही. तसेच सदर नकाशांना मनपाच्या किंवा शासनाच्या अग्नीशमन अधिकाऱ्यांकडून (अग्नीशमन विषयक बाबींच्या संदर्भात) मान्यता प्राप्त असल्याचे दिसून येत नाही



Scanned by CamScanner

(6.2.12). पर्यायाने अग्नीशमन विभागाकडून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवन संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 11(2) अन्वये आकारण्यायोग्य शुल्काची सुद्धा हानी झाल्याची शक्यता आहे.

**काही प्रकरणे पुढीलप्रमाणे-**

| | | |
|---|---|---|
| श्रीमती बबीता अग्रवाल | फ्लॅट स्किम (G+2) 482 चौ.मि. | बांधकाम परवानगी 07/2013 दि. 09/05/2013 |

5. मालमत्ता कर भरल्याचा पुरावा नसताना बांधकामास मंजुरी देणे - उपरोक्त नियमावलीतील नियम 6.2.15 नुसार बांधकामास मंजुरी देण्यापूर्वी सदर भूखंडावर मालमत्ता कराची थकबाकी नसल्याबाबत कर विभागाकडून प्रमाणपत्र प्राप्त करून ते प्रकरणास जोडणे आवश्यक असताना सर्व प्रकरणात नगररचना विभागाने दुर्लक्ष केल्याचे दिसून आले.

उदा. राजीव गांधी कॉलेज ऑफ इंजिनीअरींग ॲंड टेक्नोलॉजी, चंद्रपूर या संस्थेवर सन 2013-2014 अखेर मोठ्या प्रमाणावर मालमत्ता कराची थकबाकी असतांना 'सध्याच्या इमारतीत वाढ करणे' या प्रयोजनाखाली क्र.259/2013 दि. 28/11/2013 अन्वये बांधकामास मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

6. पूर्णत्वाचे प्रमाणपत्र व ताबा प्रमाणपत्र (certificate of occupancy) जारी न होणे - (नियम 7.5 व 7.6)

नगररचना विभागातील बांधकाम परवानगी नोंदवहीत व संबंधित प्रकरणात सदरची प्रमाणपत्रे दिल्याचे आढळून येत नाही. तसेच जोत्यानंतरचे बांधकाम करण्यासही परवानग्या जारी केल्याचे दिसून आले नाही. बांधकाम मंजुरी नकाशाप्रमाणे प्रत्यक्ष बांधकाम झाल्याची खात्री नगररचना विभाग करीत नाही. परिणामी, अनधिकृत बांधकामे, अटी व शर्तीचे उल्लंघन यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने नगररचना विभाग गंभीर नाही हे स्पष्ट होते.

उपरोक्त नियमावलीतील विविध तरतुदीनुसार नगररचना विभागाचे नियंत्रण व अवैध बांधकामावर निर्बंध नसल्यामुळे अवैध बांधकामे करणाऱ्याविरुद्ध MRTP Act 1966 मधील कलम 52 नुसार तरतूद असलेल्या दंडाच्या रकमेचे नुकसान होत आहे. या व्यतिरिक्त नागरिकांच्या हितास बाधा आणणाऱ्याविरुद्ध कलम 53 (अवैध बांधकाम पाडणे) नुसार व नियमावलीतील नियम 10.1 (c)(d) (संबंधित अनुज्ञप्तीधारक अभियंता, वास्तूशास्त्रज्ञ यांच्या विषयक कार्यवाही) नुसार कार्यवाही करण्यासही संबंधित विभाग उदासीन असल्याचे दिसते.

7. बांधकाम मंजुरी आदेशातील अटी व शर्ती बाबत नगररचना विभाग स्वतःच गंभीर नसणे - नगररचना विभागाकडून विविध बांधकामांना मंजुरी देताना विविध अटी व शर्ती नमूद असलेले आदेश जारी करण्यात येतात. त्यानुसार पूर्तता होत असल्याबाबत व होत नसल्यास त्याची दखल घेऊन उचित कार्यवाही करण्यास नगररचना विभाग प्राधिकृत असताना बांधकामास मंजुरी दिल्यानंतर सदर बांधकामाकडे सरसकट दुर्लक्ष करून नियमानुसार विहित असलेल्या जबाबदारीपासून अलिप्त असल्याचे आढळून येते. त्यामुळे रेन हार्वेस्टिंग (अट क्र.12) भूकंप रोधक बांधकाम (अट क्र.20), विहित एक वर्षाच्या कालावधीत बांधकाम पूर्ण करणे व भोगवटा प्रमाणपत्र घेणे (अट क्र.1) इ तरतुदींचे उल्लंघन होत आहे.

DATABWM6911 (Ref No : 71, Item No : 104)



Scanned by CamScanner

# कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम



Scanned by CamScanner

निरंक



Scanned by CamScanner

# भाग दोन

## सर्वसाधारण अनियमितता



Scanned by CamScanner

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी



Scanned by CamScanner

लेखापरिच्छेद-01

## 45 महानगरपालिकेच्या लेख्यांची छाननी व लेखापरीक्षा न होणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष :00 मनपा शासन निधी

अनियमितता कलम : 9इ

**मनपाचे जमा खर्चाच्या लेख्यांची नियमित तपासणी होत नसल्याने मनपाचे स्तरावरुन अंतर्गत नियंत्रणाचा अभाव दिसून येतो**

मनपाकडे स्वतःचे स्त्रोत व शासनाकडून विविध प्रकारचे अनुदानाद्वारे मोठ्या प्रमाणावर निधी जमा असून त्यामधून विविध महसुली व भांडवली योजनेवर खर्च केला जातो तर काही निधी ठेव स्वरुपात बँकांमध्ये गुंतविण्यात येतो. शासन निधी वगळल्यास मनपाकडील जमेच्या मालमत्ता कर, बाजार इत्यादी विविध स्त्रोतांच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने त्यांची व प्रत्यक्ष जमा रकमांची नियमित तपासणी होणे आवश्यक आहे. तसेच पाणीपुरवठा योजना, घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छता व बांधकामे इत्यादी सारख्या योजनांमध्ये प्रचंड निधी गुंतलेला असतांना या संपूर्ण लेख्यांची सुद्धा नियमित तपासणी करण्याची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात तरतूद करण्यात आलेली आहे, जेणेकरुन मनपास येणे असलेल्या रकमांची पूर्ण वसुलीसाठी उचित नियोजन करणे शक्य होईल व जमा खर्चाच्या व्यवहारात गैरप्रकार, गैरविनियोग, अनियमितता, अपहार सारख्या गंभीर बाबी टाळता येतील.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियामध्ये कलम 105 (1)(2) मध्ये नगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास मनपाच्या लेख्यांची तपासणी व लेखापरीक्षा करून त्याचा अहवाल स्थायी समितीस पाठविण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

उक्त अधिनियमाचे कलम 106(1)(2) मध्ये मनपास येणे रकमांच्या वसुलीच्या बाबतीत व तिच्या लेख्यांच्या बाबतीत आढळलेले अयोग्य किंवा नियमबाह्य प्रकार अभिप्रायासह अहवालाद्वारे स्थायी समितीचे निदर्शनास आणणे जरुरी आहे. तसेच पोटनियम (3)(4) नुसार मुख्य लेखापरीक्षकाने वार्षिक लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर केला पाहिजे.

तथापि, महानगरपालिका चंद्रपूर येथे 2013-14 मध्ये उक्त तरतुदीप्रमाणे अंमलबजावणी झाली



Scanned by CamScanner

नाही. पर्यायाने महानगरपालिकाकडील जमा, खर्च व त्यांचे लेखे यावर अंतर्गत नियंत्रणाचा अभाव आहे असे नमूद करण्यात येते.

DATADWM6901 (Ref No : 2, Item No : 92)

**46 बांधकामावर वापरलेल्या गौण खनिजाच्या परीमाणाचा खनिकर्म विभागाने जारी केलेल्या ट्रांझीट पासशी मेळ न घेण्याबाबत.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :00 शासन व मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***बांधकामाच्या विविध करारनाम्यांप्रमाणे अंतिम देयक सादर झाल्यानंतर एक महिन्यांचे आत बांधकामावर वापरलेल्या गौण खनिजांच्या परीमाणाचा खनिकर्म विभागांच्या ट्रांजीट पासशी मेळ घालणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही होत नसल्याने अनुसूचित मार्गाने गौण खनिजाची वाहतुक व वापर करण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही.*** |

मनपाच्या विविध रस्ता बांधकामावर वाळु, मुरुम, गिट्टी इ.गौण खनिजाचा वापर होत असून मोजमाप पुस्तिकांमध्ये दर्शविलेल्या मोजमापांच्या वापरलेल्या गौण खनिजांचे परिमाण निश्चित करुन रु.71/- प्रति घनमीटर या दराने राजस्व शुल्काची (Royalty) रक्कम देयकातून कपात करण्यात येते. कंत्राटदाराशी केलेल्या करारनाम्याप्रमाणे अंतिम देयक सादर झाल्यानंतर एक महिन्याच्या आत खनिकर्म विभागाने जारी केलेल्या ट्रांझीट पासशी मेळ घालून राजस्व शुल्क मोकळे करण्याचे प्रमाणपत्र खनिकर्म अधिकारी यांचेकडून प्राप्त न झाल्याने देयकातून कपात केलेले खनिज शुल्क शासनाकडे वेळोवेळी जमा करण्यात येतात.

परंतु असे दिसून आले आहे की, कंत्राटदार खनिकर्म विभागाकडून उपरोक्त प्रमाणपत्र प्राप्त करुन देयकातून कपात केलेल्या राजस्व शुल्काची रक्कम मनपाकडून परत घेत नाही. अर्थात सदर रक्कम कालांतराने मनपाकडून शासनाकडे जमा करण्यात येते. मनपासुध्दा अशा कंत्राटदारांना खनिकर्म विभागाकडून उपरोक्त प्रमाणपत्र प्राप्त न करण्याची पर्यायाने मुभा देत आहे, असे लक्षात येते.

उदा.पायाभूत सुविधा योजनेअंतर्गत महाकाली मंदीर प्रभागात श्री.गोवर्धन ते शिवमंदीर व गौतम नगर परिसरात कॉंक्रीट रस्ता बांधकामात 1014.02 घनमीटर रेती, मुरुम व खडी हे गौण खनिज वापरले असून यापोटी मनपाने देयकातून रु.73435/- ची राजस्व शुल्काची कपात केली असली तरी गौण खनिजाचा जिल्हा खनिकर्म अधिकारी, यांचेकडून ताळमेळ घालून राजस्व शुल्क मोकळे करण्याचे प्रमाणपत्र



Scanned by CamScanner

प्राप्त केले नाही.

यावरुन कंत्राटदार राजस्व शुल्क भरलेल्या गौण खनिजाची खरेदी न करता किंवा खनिकर्म विभागाकडून ट्रांझीट पास प्राप्त न करता व त्याचे उचित राजस्व मुल्य शासनाकडे जमा न करता अनुचित मार्गाने रस्ता बांधकामासाठी गौण खनिजाची वाहतुक व वापर करण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाहि.

तसेच बांधकामाच्या प्राकलनातील तरतुदीप्रमाणे आवश्यक त्या योग्य परीमाणाचे गौण खनिज न वापरता तसे वापरल्याने मोजमाप पुस्तकात नोंदविणे व पर्यायाने रस्त्याचा दर्जा उचित स्वरुपाचा नसणे, याचीही शक्यता नाकारता येत नाही. यामुळे शासनाचा/मनपाचा निधी निरर्थक खर्च होण्याचा संभव निर्माण होतो.

मनपाकडील बांधकामाचा सर्वच प्रकरणांच्या बाबतीत सदर बाब लागु असल्याचा संभव आहे.

2) कंत्राटदाराच्या देयकातून गौण खनिजावरील स्वामीत्वधनाच्या रकमेची प्रती घनमीटर परिगणना करतांना सर्व प्रकारच्या गौण खनिजांसाठी (रेती, मुरुम, खडी) एकच दर लावण्यांत येत आहे असे दिसून आले. सदरच्या दराची योग्यता तपासण्यासाठी प्रचलीत शासन संदर्भाची प्रतीबाबत मनपास विचारणा केली असता ती उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामुळे शासनाचा महसुल उचित दराने वसुल केला जातो, हे निश्चित करता आले नाही.

यासंदर्भात मनपाने अभिप्राय सादर न केल्यामुळे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATABWM6901 (Ref No : 25, Hmm No : 90)

***47 वाटाघाटीअंती मान्य झालेला दर निविदाप्रपत्र या मूळ दस्तावेजात नमूद न केल्याने कार्यारंभाच्या आदेशात चुकीचा दर नमूद करणे व चुकीच्या दराने कामाचे प्रदान करण्याच्या शक्यतेस वाव मिळण्याबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : 00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 24112981.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 24112981.00/-

***निविदाप्रपत्रामध्ये कंत्राटदार व आयुक्त यांच्या वाटाघाटी मध्ये मंजूर झालेला दर निविदाप्रपत्रात Tender for works ह्या शर्तीनुसार निविदा पत्रात नमूद केला नसल्यामुळे महाराष्ट्र बांधकाम नियमावली, परिशिष्ठ 12,***



Scanned by CamScanner

**परिच्छेद 21 मधील तरतुदीचे उल्लंघन झाले आहे**

सन 2013-2014 मध्ये महानगरपालिकेने मंजूर केलेल्या विविध कामाच्या निविदाप्रपत्रात पान क्रमांक 13 व त्यानुसार महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका मधील परिशिष्ट 12 परिच्छेद 21 अनुसार निविदा उघडणाऱ्या अधिकाऱ्याने उपस्थित कंत्राटदारांस दर जाहीर केल्यानंतरच दर तेथेच स्वतः आक्षरामध्ये लिहिणे आवश्यक आहे. Tender for works हा परिच्छेद असून सदर परिच्छेदानुसार कंत्राटदार व आयुक्त यांच्यामधील वाटाघाटीअंती मंजूर झालेला कामाचा दर आयुक्तांनी निविदा प्रपत्रात स्वतः नमूद करून स्वाक्षरी करणे आवश्यक होते. निविदा प्रपत्र म्हणजे निविदा प्रक्रियेतील महत्वाचा मूळ अभिलेख असल्यामुळे त्यात निविदेचा स्विकृत दर नमूद असल्यास कार्यारंभ आदेशात चुकीचा दर नमूद करण्याची व कामाचे प्रदान करतांना उचित दराची आकारणी करून अतिप्रदानाची शक्यता कमी करता येते. संबंधित नस्तीमध्ये वाटाघाटीअंती मान्य केलेला दर नमूद करण्यात येत असला तरी निविदा प्रपत्रात त्याची नोंद न घेणे हे नियमसंगत ठरत नाही. परंतु खालील कामाच्या निविदाप्रपत्रामध्ये आयुक्तांनी निविदा स्विकृतीचा दर नमूद केला नसतांना कंत्राटदारांना नियमबाह्यपणे कार्यारंभ आदेश दिला आहे.

निविदा प्रपत्रात कामाचा दर नमूद करून स्वाक्षरीत केले नसल्याचे विवरणपत्र

| अ.क्र. | कामाचे नाव | कार्यारंभ आदेश | | प्रदान | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | क्रमांक | दिनांक | प्र.क्र. | दिनांक | रक्कम |
| 1 | पठाणपुरा, घुटकाळ, खिश्चन, कब्रस्थान, हायमास्ट लाईट लावणे | 342 | 25.07.2013 | 1 | 15.03.2014 | 659666 |
| 2 | जलनगर वार्ड महमंद ते सपना टाकीज कॉंक्रीट रोड | 343 | 25.07.2013 | 2 | 29.03.2014 | 1257557 |
| 3 | मुल रोड स्प्रे नाला रस्ता डांबरीकरण | 302 | 10.07.2013 | 9 | 03.03.2014 | 3229531 |
| 4 | पठाणपुरा व्यायाम शाळा ते अस्थानापर्यंत रस्ता डांबरीकरण | 176 | 01.06.2013 | 13 | 29.03.2014 | 5981148 |
| 5 | हनुमान मंदीर ते जगन्नाथ बाबा मठ एरिया ते महेश्वरी व महसूल कॉलनी पर्यंत पाईप लाईन टाकणे. | 716 | 31.10.2012 | 7 | 07.03.2014 | 4647280 |
| 6 | साईबाबा पाण्याची टाकी ते वैष्णवी अपार्टमेंट दताळा, रोड पर्यंत पाईप लाईन टाकणे. | 718 | 31.10.2012 | 8 | 07.03.2014 | 2827739 |



Scanned by CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 7 | क्यापवार्ड मध्ये खोब्रागडे इले दुकान ते गांगुली घर कॉंक्रीट रोड | 860 | 31.03.2011 | 20 | 18.03.2014 | 202050 |
| 8 | महाकाली वार्ड क्र.33 मध्ये विविध ठिकाणी कॉंक्रीट रोड बांधकाम | 497 | 19.10.2011 | 21 | 18.03.2014 | 435773 |
| 9 | बिनबा प्रभाग बालवीर चौक ते गोपालपुरी चौक कॉंक्रीट रस्ता | 764 | 19.12.2013 | 22 | 29.03.2014 | 1914164 |
| 10 | झोन क्र.4 मध्ये विविध मटेरीअल पुरवठा | - | 19.10.2012 | 23 | 29.03.2014 | 323224 |
| 11 | झोन क्र.3 मध्ये विविध मटेरीअल पुरवठा | 391 | 11.09.2012 | 24 | 29.03.2014 | 1041332 |
| 12 | कंपोस्ट डेपो येथे रोड ते ब्रिज रस्ता डांबरीकरण | 848 | 13.12.2013 | 25 | 29.03.2014 | 272624 |
| 13 | जलनगर वार्ड क्र.22 मध्ये पठाणपुरा ते पेंदाम यांचे घर रस्ता सिमेंटीकरण | 511 | 20.10.2011 | 26 | 29.03.2014 | 488091 |
| 14 | क्याप वार्ड मध्ये सुधांशु विश्वास ते खनके घर कॉंक्रीट रोड | 157 | 24.06.2011 | 27 | 29.03.2014 | 99222 |
| 15 | अंचलेश्वर प्रभाग, बुद्धविहार ते अडगुरवार घर कॉंक्रीट रोड | 181 | 01.06.2013 | 31 | 29.03.2014 | 733580 |
| | एकूण रुपये | | | | | 24112981 |

मनपाअंतर्गत होत असलेल्या कामांचे मूल्य प्रचंड असल्यामुळे अंतिम: स्विकृत केलेल्या निविदा दराच्या उचित ठिकाणी नोंदी घेण्याबाबत काटेकोरपणा आढळत नसल्यामुळे चुकीच्या दराप्रमाणे प्रदान होऊन अतिप्रदान घडण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उपरोक्त प्रकरणे व इतर प्रकरणांबाबत उचित तपासणी करून झालेल्या खर्चाच्या योग्य-अयोग्यता प्रमाणित करून व आवश्यक असल्यास अतिप्रदान वसूल करून अनुपालन सादर करावे.

DATBNKM6401 (Ref No : 28, Hmm No : 52)

*48 कंत्राटदारास विनादंड मुदतवाढी देण्याबाबत.*

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 01

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*



Scanned by CamScanner

*अनियमितता कलम : 9इ*

गुंतलेली रक्कम रु. 9825899.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 9825899.00/-

**कंत्राटदारानी विहीत मुदतीत काम पूर्ण केले नसतांना त्यांना विनादंड मुदतवाढी मंजूर केल्या आहेत.**

महानगरपालिकेच्या विविध बांधकामावर गुंतलेल्या रकमेवरील व्याज, कामाच्या संनियंत्रणासाठी वापरण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन व भत्यावरील खर्च, विचाराधीन कामाची उपयोगीता, बांधकामे विहीत कालावधीत पूर्ण न झाल्यामुळे त्यापासून नागरिकांना मिळणाऱ्या लाभाचे नुकसान, रस्त्याच्या कामास झालेल्या विलंबामुळे वाहनाचे नुकसान व ज्यादाचा इंधन खर्च इत्यादी सर्वकष विचार आर्थिक स्वरुपात परिगणित करून निर्धारीत रकमेचा दंड संबंधित कंत्राटदाराकडून वसूल होणे आवश्यक आहे. कामाच्या आदेशामध्ये बांधकाम पूर्ण होण्याच्या कालावधीचा सर्वंकष विचार करूनच कामे पूर्ण करण्यासाठीची मुदत निश्चित केली असतांना महानगरपालिकेने कंत्राटदारास विनादंड मुदतवाढी दिल्या आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 05-06/प्र.क्र.53/इमा-2 मुंबई दिनांक 18-09-2006 चे परिच्छेद 3 अनुसार कंत्राटदाराने निविदा सूचनांचे अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक आहे. जर कोणत्याही कंत्राटदरांनी अटी व शर्तीचे पालन केले नाही तर त्यास पदावनत करणे, नोंदणी रद्द करणे, दंड लावणे, काळ्या यादीत टाकणे इत्यादी शिक्षा करण्याबाबत शासनाने कडक धोरण अवलंबिले आहे. त्याला अनुसरून बांधकामे विहीत मुदतीत करणे कंत्राटदारास बंधनकारक आहे. परंतु उदाहरणादाखल पुढील बांधकामे कंत्राटदारानी विहीत मुदतीत पूर्ण केली नसतांना त्यांना महानगरपालिकेने विनादंड मुदतवाढी मंजूर केल्या आहेत.

यासंदर्भात समर्थनीय खुलासा करावा किंवा कंत्राटदारावर दंड आकारून त्याची वसुली करावी. तोपर्यंत वरील खर्चाची एकूण रक्कम रुपये 98,25,899/- आक्षेपीत ठेवण्यात येत आहे.

विनादंड मुदतवाढी दिल्याचे विवरणपत्र

| अ.क्र. | कामाचे नाव | कार्यारंभ आदेश | | काम पूर्ण करण्याची मुदत | कामपूर्ण दिनांक | विलंब कालावधी | प्रदान | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्र. | दिनांक | | | | प्र.क्र | दिनांक | रक्कम |
| 1 | जलनगर वार्ड मलीक अहमद ते सपना टाकिज कॉंक्रीट रोड | 343 | 25.07.2013 | 4 महिने | 4.3.2014 | 3 महिने | 2 | 29.3.2014 | 1257557 |
| 2 | नागपूर रोड गजानन मंदीर | 967 | 30.01.2013 | 4 महिने | 27.9.2013 | 4 महिने | 10 | 7.3.2014 | 2587194 |



Scanned by CamScanner

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण | | | | | | | | |
| 3 | पठाणपुरा व्यायामशाळा ते होकम चौक ते अस्थाना पर्यंत रस्ता डांबरीकरण | 13 | 29.03.2014 | 3 महिने | 2.11.2013 | 5 महिने | 13 | 29.3.2014 | 5981148 |
| एकुण रुपये | | | | | | | | | 9825899 |

DATBNKM6401 (Ref No : 29, Hmm No : 53)

## *49 त्रयस्थ लेखापरीक्षण शुल्क या बाबीवर अनियमित खर्च नोंदविण्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :09 शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 93*

गुंतलेली रक्कम रु. 82955.00 /-

***बांधकामाचे त्रयस्थ लेखापरीक्षणाच्या शुल्काच्या प्रदानाची जबाबदारी कंत्राटदाराची असताना मनपा निधीतून रु 82,955/- खर्च केल्याचे नोंदविण्यात आले आहे.***

बांधकाम विभागांतर्गत करण्यात येणाऱ्या रस्ता बांधकामांचे त्रयस्थ लेखापरीक्षण करण्याची व त्याचे शुल्क अदा करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदारांची असल्याचे करारनाम्यांवरुन लक्षात येते. सदर लेखापरीक्षणासाठी महानगरपालिकेने वेळोवेळी चंद्रपूर येथील स्थानिक राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयास कार्यादेश जारी करुन सदर कामासाठीचे शुल्क संबंधित कंत्राटदारांनी अदा करण्याचेही निर्देशित करण्यात आले आहे.

असे असतांना "त्रयस्थ संस्थेमार्फत लेखा परीक्षण खर्च" या (बांधकामे - 238) लेखाशिर्षाखाली 2013-14 मध्ये रु. 82,955/- एवढा खर्च झाल्याचे सन 2014-15 च्या सुधारित अंदाजपत्रकातील 2013-14 च्या प्रत्यक्ष खर्चाच्या आकडेवारीवरुन दिसून येते. या बाबतीत खर्चाचे अभिलेखे उपलब्ध करण्यास अर्धसमास पत्र क्र.91, दिनांक 04.07.2016 अन्वये सुचविले असता तशी कार्यवाही न केल्याने किंवा कोणतेही स्पष्टीकरण उपलब्ध न केल्यामुळे सदरची रक्कम अनियमितपणे खर्च करण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही.

DATABWM6901 (Ref No : 46, Hmm No : 91)

## *50 बांधकामांची नोंदवही व अपूर्ण बांधकामांच्या नोंदीबाबत.*



Scanned by CamScanner

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 0**

*शासन/ मनपा निधी*

*अनियमितता कलम : 95*

**मनपा चंद्रपूर मध्ये विहित पद्धतीने बांधकाम नोंदवही ठेवली नसून वर्ष अखेर एकही बांधकाम अपूर्ण नसल्याची बांधकाम विभागाने पुरविलेली माहिती मोघम व शंकास्पद वाटते.**

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहितेमधील परिच्छेद 10.7 मध्ये प्रत्येक बांधकामावर वर्षभरात झालेल्या खर्चाच्या कायम व संयुक्त नोंदी ठेवून त्यायोगे बांधकामांची प्रगती व होत असलेल्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने नोंदवह्या ठेवण्याचे निर्देशित आहे. राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहितेतील (NMAM) प्रकरण 12 मधील Form PW-1 या नमुन्यात तशी माहिती नोंदविण्यासाठी तरतूद आहे. सदर माहिती परिपूर्ण असल्यास बांधकाम पूर्ण झाल्यावर दायित्व व मत्ता यांचा हिशेब चुकता करता येतो व वर्षअखेर अपूर्ण बांधकामांसाठी पुढील वर्षातील अंदाजपत्रकात उचित तरतूद करता येते.

मनपा चंद्रपूर मध्ये वरीलप्रमाणे नोंदवही न ठेवता वार्डनिहाय मंजूर कामाची प्रगतीदर्शक नोंदवही ठेवण्यात आल्याचे दिसते.

शहर अभियंता, मनपा चंद्रपूर यांनी पुरविलेल्या सन 2013-2014 अखेर योजनानिहाय अपूर्ण बांधकामांच्या माहितीदर्शक तक्त्यात 9 कामे नोंदविली असून सर्व कामे पूर्ण होऊन प्रदान होणे बाकी असल्याचे दर्शविले आहे. एकूणच उपलब्ध केलेल्या माहितीनुसार महानगरपालिकेकडील कोणतेही काम सन 2013-2014 अखेर प्रत्यक्षात अपूर्ण नव्हते ही बाब मोघम व शंकास्पद वाटते.

यासंदर्भात मनपाने खातरजमा करावी व उचित नमुन्यामध्ये नोंदवही ठेवून योग्य अनुपालन सादर करावे.

DATABWM6901 (Ref No : 63, Hmm No : 67)

संधारण

***51 संबंधित कामाच्या निविदेसोबत कंत्राटदाराकडे अन्य बांधकामापैकी राहिलेल्या कामाचे मूल्य दर्शविणारे प्रतिज्ञापत्र न जोडणेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 01**



Scanned by CamScanner

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : ९इ*

| |
|---|
| **कंत्राटदारास त्याचे आर्थिक क्षमतेपेक्षा जास्त कामे दिल्या जावू नयेत ह्यासाठी त्याचे कडील अपूर्ण स्थितीतील बांधकामाच्या मूल्याचे प्रतिज्ञापत्र निविदा प्रपत्रासोबत घेण्यात आले नसल्याने कंत्राटदारांच्या एकूण आर्थिक क्षमतेच्या पलीकडे कामे मंजूर होण्याची शक्यता आहे.** |

सन 2013-2014 मध्ये महानगरपालिकेने मंजूर केलेल्या निवडक निविदाप्रपत्र व अभिलेख्यांची पडताळणी केली असता महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका मधील परिच्छेद 206 नुसार निविदा सादर करण्याच्या तारखेस त्याच्या कडील अन्य अपूर्ण कामे किंवा अन्य बांधकामापैकी करावयाचे राहिलेल्या कामाचे मूल्य दर्शविणारे प्रतिज्ञापत्र कंत्राटदारांनी सादर केलेल्या निविदाप्रपत्रासोबत आढळले नाही. त्यामुळे संबंधित कंत्राटदाराची निविदा अल्पदराची असल्याने विभागाने मंजूर केली असली तरी कंत्राटदाराने आर्थिक क्षमतेपेक्षा जास्त रकमेची कामे स्विकारली किंवा कसे पडताळणी महानगरपालिकेस करता आलेली नाही. परिणामः मनपाकडील बहुतेक बांधकामे विहित मुदतीचे आत पूर्ण झालेली नाहीत. यावरून कंत्राटदाराकडील निविदासोबतच्या प्रपत्राची काटेकोरपणे पडताळणी न करताच कंत्राटदाराच्या निविदा मंजूर करून कार्यारंभ आदेश देण्यात आल्याचे दिसून आले.

DATBNKM6401 (Ref No : 32, Haun No : 58)

### *52 मोजमाप पुस्तकांस एकसारखे क्रमांक देण्याची अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा शासन निधी*

*अनियमितता कलम : ९इ*

| |
|---|
| **मोजमाप पुस्तकांस सारखे अनुक्रमांक देणे नियमबाह्य आहे.** |



Scanned by CamScanner

Chandrapur (M Corp.)

सन 2013-14 चे बांधकाम विभागाकडील मोजमाप पुस्तकांची पडताळणी केली असता मोजमाप पुस्तक क्रमांक 64,62 व 29 ह्या मोजमाप पुस्तकांचे क्रमांक इतर मोजमाप पुस्तकांस देण्यात आले आहेत. म्हणजे क्र. 64, 62 व 29 ह्या क्रमांकाचे प्रत्येकी 2 मोजमाप पुस्तके तयार केली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिशिष्ट 10 (3) नुसार सर्वसाधारण मोजमाप नोंदवह्यांना क्रमांक देण्यात येऊन त्याची नोंद विभागीय नोंदवहीमध्ये करावयाची आहे. तरीसुद्धा वरील वर्णक्रमांकाच्या दुय्यम नोंदवह्या तयार करण्यात आलेल्या असल्याने या मोजमाप पुस्तकांशी संबंधित नोंदी व मोजमाप शंकास्पद असल्याची शक्यता नाकारता येत नाही. यासंदर्भात विभागास विचारणा केली असता खुलासा करण्यात आला नाही.

DATDNKM6401 (Ref No : 31, Hmm No : 62)

***53 विद्यार्थ्यांची मापे न घेता गणवेश शिवल्यामुळे गणवेशासाठी झालेला खर्च समाधानकारक नसल्याबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 631198.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 631198.00/-

***विद्यार्थ्यांची मापे न घेताच गणवेश शिवण्यात आल्याचे दिसून आले. मुख्याध्यापकांकडील बँक खात्यामध्ये अनुदानाची रक्कम पंचायत समितीकडून थेट जमा होत असून कोणतेही अनुदान अथवा आदेश पत्र या संबंधाने प्राप्त होत नाही.***

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर अंतर्गत सर्व प्राथमिक / माध्यमिक शाळांना, शाळेतील विद्यार्थ्यांना (मुला-मुलींना) गणवेश उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडून प्रत्येक वर्षी अनुदान प्राप्त होते. सन 2013-14 मध्ये प्राप्त अनुदानातून गणवेशासाठी कापड खरेदी व शिलाई यांसाठी खालील प्रमाणे खर्च केल्याचे दिसून आले.

| अ.क्र. | शाळेचे नाव | झालेला खर्च (रु.) |
|---|---|---|
| 1 | महात्मा ज्योतिबा फुले प्राथमीक शाळा, घुटकाळा वार्ड. | 20,000 |
| 2 | सरदार पटेल कन्या प्राथमीक शाळा, ढोर दवाखाना नगीनाबाग. | 8,450 |
| 3 | महात्मा गांधी कन्या प्राथमीक शाळा, रैयतवारी वार्ड. | 13,200 |
| 4 | मौलाना आझाद उर्दू प्राथमीक शाळा, रैयतवारी वार्ड. | 6,200 |
| 5 | महर्षी अण्णासाहेब कर्वे कन्या प्राथमीक शाळा, बाबूपेठ वार्ड. | 30,540 |
| 6 | सरोजिनी देवी नायडू कन्या प्राथमीक शाळा, महाकाली कॉलरी. | 33,600 |
| 7 | महाकाली कॉलरी प्राथमीक शाळा, महाकाली कॉलरी. | 28,000 |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 8 | चक्रवर्ती राजगोपालचारी प्राथमीक शाळा, भानापेठ वार्ड. | 16,200 |
| 9 | डॉ. राजेन्द्रप्रसाद प्राथमीक शाळा, भानापेठ वार्ड. | 20,400 |
| 10 | माता कस्तुरबा गांधी कन्या प्राथमीक शाळा, एम. ई. एल. वार्ड. | 10,400 |
| 11 | पंडीत जवाहरलाल नेहरु प्राथमीक शाळा, इंदिरा नगर वार्ड. | 44,800 |
| 12 | लोकमान्य टिळक प्राथमीक शाळा, काळाराम मंदिर सन्नाधी वार्ड. | 13,602 |
| 13 | शहीद भगतसिंग कन्या प्राथमीक शाळा, भिवापूर वार्ड. | 31,200 |
| 14 | लालबहादूर शास्त्री प्राथमीक शाळा, भिवापूर वार्ड. | 27,200 |
| 15 | कर्मवीर कन्नमवार प्राथमीक शाळा, शास्त्री नगर वार्ड. | 20,205 |
| 16 | नरकेसरी अभ्यंकर प्राथमीक शाळा, बालाजी वार्ड. | 34,698 |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमीक शाळा, घुटकाळा वार्ड. | 23,600 |
| 18 | सरदार पटेल प्राथमीक शाळा, जटपुरा वार्ड. | 16,635 |
| 19 | रामचंद्रनगर हिंदी प्राथमीक शाळा, जटपुरा वार्ड. | 36,000 |
| 20 | दे. गो. तुकूम मराठी प्राथमीक शाळा, दे. गो. तुकूम वार्ड. | 10,800 |
| 21 | रैय्यतवारी कॉलरी मराठी प्राथमीक शाळा, इंडस्ट्रीअल वार्ड. | 28,000 |
| 22 | रैय्यतवारी कॉलरी तेलगु प्राथमीक शाळा, कॉलरी क्वार्टर. | 9,000 |
| 23 | भारतरत्न डॉ. भीमराव आंबेडकर प्राथमीक शाळा, लुंबीनीनगर वार्ड. | 67,600 |
| 24 | वडगाव प्राथमीक शाळा, वडगाव वार्ड. | 7,600 |
| 25 | सिव्हील तुकूम मराठी प्राथमीक शाळा, साईबाबा वार्ड. | 16,800 |
| 26 | शहीद अब्दुल हमीद उर्दू प्राथमीक शाळा, घुटकाळा वार्ड. | 20,894 |
| 27 | वि. दा. सावरकर हिंदी प्राथमीक शाळा, लालपेठ कॉलरी वार्ड. | 23,200 |
| 28 | आचार्य कृपलानी हिंदी प्राथमीक शाळा, गिरनार चौक. | 8,774 |
| 29 | डॉ. जाकिर हुसेन उर्दू प्राथमीक शाळा, दादमहाल वार्ड. | 3,600 |
| | एकूण खर्च | 6,31,198 |

यावरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत –

1) मुख्याध्यापकांकडील बँक खात्यामध्ये अनुदानाची रक्कम थेट व त्यांनी सांगितल्याप्रमाणे पंचायत समितीकडून थेट जमा होत असून कोणतेही अनुदान वाटप आदेश पत्र या संबंधाने प्राप्त होत नाही. शिवाय अनुदान प्राप्त होण्याचे अर्थात पंचायत समितीकडून अनुदान वितरणाचे कोणतेही निश्चित वेळापत्रक दिसून येत नाही. काही शाळांना एका टप्प्यात तर काही शाळांना अधिकतम दोन टप्प्यात अनुदान प्राप्त झाल्याचे दिसून येते.

2) गणवेश शिवण्यापूर्वी विद्यार्थ्यांची मापे घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेअंतर्गत कोणत्याही शाळांच्या नस्तीमध्ये विद्यार्थ्यांची मापे घेतल्याचे दिसून आले नाही. माप न घेता शिवलेले गणवेश विद्यार्थ्यांना आकाराच्या दृष्टीने उचित असल्याची खात्री होत नाही. महानगरपालिकेकडील शाळांना परस्पर प्राप्त अनुदानातून करण्यात आलेल्या खर्चावर महानगरपालिकेचे नियंत्रण शुन्य असल्याचे दिसते.

शिक्षण विभागाचे पत्र क्र. चंशमनपा/प्रआशि/14/2016 दि. 13.04.2016 अन्वये प्राप्त माहितीनुसार मनपाच्या अंतर्गत सन 2013-14 मध्ये एकूण 37 शाळा होत्या. संबंधीत शाळांमध्ये एकूण विद्यार्थी पटसंख्या 2,246 व लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अभिलेख्यानुसार एकूण खर्च रु. 6,31,198/- लक्षात घेता प्रती विद्यार्थी रु. 281/- खर्च झाला असे ढोबळमानाने दिसून येते. परंतु सदर दर बाजारभावाप्रमाणे वास्तविक नसल्याने शाळांमधील एकूण विद्यार्थ्यांपैकी मोजक्या विद्यार्थ्यांना हा लाभ दिला असल्याची शक्यता आहे. मनपाने यासंदर्भात पाठपुरावा करून सर्व विद्यार्थ्यांना गणवेशासाठी अनुदान प्राप्त करणे अपेक्षित होते परंतु तसे न झाल्यामुळे शासनाच्या गणवेश वाटपाची कल्याणकारी योजना फलश्रुत झाली नसल्याची शक्यता नाकारता येत नाही.



Scanned by CamScanner

Chandrapur (M Corp.)

DATSAJF8301 (Ref No : 3, Hmm No : 17)

**54 चंद्रपूर महानगरपालिकेअंतर्गत सर्व प्राथमिक / माध्यमिक शाळांना, शाळा देखभाल दुरुस्तीसाठी पंचायत समितीकडून परस्पर प्राप्त होत असलेल्या अनुदानाबाबत.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

गुंतलेली रक्कम रु. 53256.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 53256.00/-

***सन 2013-14 अखेर शाळांकडील कामाचा अखर्चित निधी रु. 53,256/- शासनखाती जमा झालेला नाही. काही शाळांनी प्रप्त अनुदानापैकी जादा खर्च केला असून उणे अनुदान शिल्लक आहे. खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, चंद्रपूर, यांचेकडून अनुदान खर्चाचे प्रयोजन, अनुदान वितरणाचे निकष, खर्चाच्या अटी व शर्ती याबाबत आदेश/ पत्रे शाळांना किंवा मनपास निर्गमित न होता मुख्याध्यापकांच्या बँक खात्यावर थेट अनुदानाची रक्कम जमा होते.***

सन 2013-14 चे चंद्रपूर महानगरपालीकेअंतर्गत शिक्षण विभागाचे लेखापरीक्षणादरम्यान, चंद्रपूर शहर महानगरपलिका, चंद्रपूर अंतर्गत सर्व प्राथमिक / माध्यमिक शाळांना, शाळा देखभाल दुरुस्तीसाठी पंचायत समिती चंद्रपूर यांचेकडून प्रत्येक वर्षी अनुदान प्राप्त झाल्याचे लक्षात आले. सन 2013-14 मधील अनुदान प्राप्त झालेल्या व तपासणीस उपलब्ध झालेल्या शाळांकडील प्राप्त अनुदान, खर्च व शिल्लक अनुदान याबाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | प्राप्त अनुदान (रु.) | खर्च रक्कम (रु.) | शिल्लक रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1 | महात्मा ज्योतिबा फुले प्राथमीक शाळा, घुटकाळा वार्ड. | 5,000 | 0 | 5,000 |
| 2 | सरदार पटेल कन्या प्राथमीक शाळा, ढोर दवाखाना नगीनाबाग. | 10,000 | 7,000 | 3,000 |
| 3 | महर्षी अण्णासाहेब कर्वे कन्या प्राथमीक शाळा, बाबूपेठ वार्ड. | 10,000 | 0 | 10,000 |
| 4 | चक्रवर्ती राजगोपालचारी प्राथमीक शाळा, भानापेठ वार्ड. | 10,000 | 6,576 | 3,424 |
| 5 | डॉ. राजेन्द्रप्रसाद प्राथमीक शाळा, भानापेठ वार्ड. | 10,000 | 5,000 | 5,000 |
| 6 | लालबहादूर शास्त्री प्राथमीक शाळा, भिवापूर वार्ड. | 10,000 | 8,000 | 2,000 |
| 7 | कर्मवीर कन्नमवार प्राथमीक शाळा, शास्त्री नगर वार्ड. | 10,000 | 0 | 10,000 |
| 8 | रामचंद्रनगर हिंदी प्राथमीक शाळा, जटपुरा वार्ड. | 15,000 | 14,700 | 300 |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | सिव्हील तुकुम मराठी प्राथमीक शाळा, साईबाबा वार्ड. | 10,000 | 0 | 10,000 |
| 10 | शहीद अब्दुल हमीद उर्दू प्राथमीक शाळा, पुटकाळा वार्ड. | 10,000 | 7,000 | 3,000 |
| 11 | आचार्य कृपलानी हिंदी प्राथमीक शाळा, गिरनार चौक. | 5,000 | 3,468 | 1,532 |
| | एकूण | 1,05,000 | 51,744 | 53,256 |

1) शाळांकडील उर्वरित अखर्चित रक्कम पंचायत समितीस समर्पित / परत करणे आवश्यक होते. परंतु अखर्चित निधी रु. 53,256/- परत केल्याचे दिसून आले नाही. संबंधित शाळांना सदर शिल्लक अनुदान समर्पित करणे किंवा पुढील वर्षी वापरणे याबाबत कोणतेही निर्देश नाहीत. सदर शाळा मनपाचे प्रत्यक्ष नियंत्रणात असूनही उपरोक्त खर्चावर मनपातील शिक्षण विभागाने दुर्लक्ष केल्याचे दिसते. परिणामी शाळांच्या देखभाल दुरुस्तीवर वरीलप्रमाणे प्राप्त अनुदान वा मनपा निधीमधून या प्रकारे दुबार प्रदानाद्वारे गैर प्रकारची शक्यता नाकारता येत नाही.

2) याव्यतिरिक्त खालील शाळांनी प्राप्त अनुदानापैकी जादा खर्च केला असून उणे अनुदान शिल्लक आहे.

| प्राप्त अनुदानापेक्षा जादा खर्च (सन 2013-14) | | | | |
|---|---|---|---|---|
| शाळांक. | शाळेचे नाव | प्राप्त अनुदान रु. | खर्च(रु.) | शिल्लक(रु.) |
| 3 | महात्मा गांधी कन्या प्राथमीक शाळा रयतवारी वार्ड | 10,000 | 12,930 | -2,930 |
| 9 | महाकाली कॉलरी प्राथमीक शाळा महाकाली कॉलरी | 10,000 | 10,100 | -100 |
| 14 | लोकमान्य टिळक प्रा. शाळा काळाराम मंदिर समाधी वार्ड | 10,000 | 12,000 | -2,000 |
| 28 | रयतवारी कॉलरी तेलगु प्राथमीक शाळा कॉलरी क्वार्टर | 20,000 | 21,953 | -1,953 |
| | एकूण | 50,000 | 56,983 | -6,983 |

3) मनपाच्या विविध शाळांच्या मुख्याध्यापकांच्या बँक खात्यांमध्ये अनुदानाच्या रकमा परस्पर जमा होत असून व त्यासंदर्भात खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, चंद्रपूर, यांचेकडून अनुदान खर्चाचे प्रयोजन, अनुदान वितरणाचे निकष, खर्चाच्या अटी व शर्ती याबाबत आदेश / पत्रे शाळांना किंवा मनपास निर्गमित होत नाही. सदर बाब वित्तीय नियंत्रणाच्या दृष्टीने अयोग्य असून जिल्हा परिषद प्रशासनाच्या निदर्शनासही आणून देणे जरुरीचे वाटते.

एकंदरीत अत्यंत मोघम पद्धतीने कोणाच्याही वित्तीय नियंत्रणाशिवाय अनुदाने प्राप्त व खर्च होत आहेत.

सदर अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 18 दि. 04.04.2016 नुसार विभागास अनुपालन / अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. तथापि विभागाकडून समर्पक अनुपालन / अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद नोंदविण्यात येत आहे.

DATSAJF8301 (Ref No : 4, Hmm No : 18)

***55 न्यायालयीन प्रकरणात महानगरपालिकेला सेवा देणाऱ्या अधिवक्त्यांच्या शुल्कातून आयकराची कपात उचित दराने न करणेबाबत.***



Scanned by CamScanner

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :278 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

गुंतलेली रक्कम रु. 501175.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 18856.00/-

***महानगरपालिका, चंद्रपूर या कार्यालयाचे वतीने न्यायालयीन प्रकरणासाठी नियुक्त अभियोक्ता यांना प्रदान करण्यात आलेले शुल्क, नियमानुसार कपात करावयाचा आयकर तसेच कपात केलेला आयकर शासन खाती जमा करणे तसेच प्राप्त रकमा विलंबाने शासन खाती जमा करणे इत्यादी प्रकरणी अनियमितता झाल्याचे दिसून येते***

चंद्रपूर महानगरपालिकेकडील न्यायालयीन प्रकरणी कार्यालयाची बाजू मांडण्याकरिता पॅनलवर विविध अधिवक्त्यांची नियुक्ती करुन स्थायी समितीच्या ठरावाव्दारे निश्चित केलेल्या दराने प्रदान करण्यात येते. सन 2013-14 मध्ये एकूण 84 प्रकरणांमध्ये रु. 5,01,175/- व किरकोळ खर्चासाठी रु.14,112/- असा एकूण रु. 5,15,287/- इतका खर्च दर्शविण्यात आला.

1. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मुंबई शासन निर्णय क्र.आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा.प्र.क्र.5, दिनांक 22.2.2008 नुसार आहरण व संवितरण अधिकारी यांनी वेळोवेळी आयकर अधिनियमातील तरतुदीनुसार आयकर कपात करणे बंधनकारक असून वित्त् विभाग, शासन परिपत्रक क्र.आयकर 1009/प्र.क्र.40/कोषा क्र.5, दिनांक 10.12.2013 नुसार उदगम कपातीबाबत सुचना दिलेल्या आहेत. आयकर कलम 194 जे नुसार व्यावसायीक सेवा शुल्कावर 10 टक्के आयकर कपात करणे बंधनकारक होते. परंतु अधिवक्ता यांना त्याचे प्रदान करतांना एकूण देय रकमेवर विहीत दरानुसार आयकर कपात न केल्याने शासन महसुलाची हानी झाल्याचे लेखापरीक्षणादरम्यान आढळून आले. तपशिलवार विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-

**सन 2013-14** (रक्कम रुपयात)

| अ.क्र. | अधिवक्त्याचे नांव | प्रकरण संख्या(84मुळ प्रकरणे +25 उपप्रकरणे) | प्रदान केलेली रक्कम | नियमा नुसार कपात करावयाची रक्कम | प्रत्यक्षात कपात केलेला आयकर | कमी वसूल केलेला आयकर |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. ॲड प्रकाश बजाज | 33 | 105350 | 10535 | 3000 | 7535 |
| 2 | श्री. ॲड अविनाश ठावरी | 3 | 15000 | 1500 | 0 | 1500 |
| 3 | श्री. ॲड एस.के.मुनघाटे (सर.वकील) | 1 | 3000 | 300 | 0 | 300 |
| 4 | श्री. ॲड पी.एम.सातपुते | 39 | 175500 | 17550 | 11650 | 5900 |
| 5 | श्री. ॲड अंजन डे | 1 | 10000 | 1000 | 1000 | 0 |



Scanned by CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 6 | श्री. ॲड एम.एच.टंडन | 8 | 40500 | 4050 | 2350 | 1700 |
| 7 | श्री. ॲड सत्तार शेख | 6 | 22500 | 2250 | 2250 | 0 |
| 8 | श्री. ॲड महेश धात्रक | 6 | 61000 | 6100 | 5600 | 500 |
| 9 | श्री. ॲड विक्रम टंडन | 2 | 8000 | 800 | 800 | 0 |
| 10 | श्री. ॲड किशोर देशपांडे | 7 | 36125 | 3613 | 2612 | 1001 |
| 11 | श्री. ॲड वसंत अटकापूरवार | 1 | 4200 | 420 | 0 | 420 |
| 12 | श्री. ॲड जे.बी.कासट | 2 | 20000 | 2000 | 2000 | 0 |
| | एकूण | | 501175 | 50118 | 31262 | 18856 |

सन 2013-14 मध्ये रु. 50118/- एवढी आयकरापोटी रक्कम कपात करावयाची असतांना रु.31262/- एवढाच आयकर प्रत्यक्षात कपात करण्यात आल्याने रु.18856/- एवढी आयकराची रक्कम कमी कपात करण्यात आल्याने केंद्र शासनाच्या महसुलाची हानी झालेली आहे. 2 अधिवक्त्यांना द्यावयाची शुल्काचे दर निश्चिती करतांना जिल्हा शासकीय अभियोक्ता यांच्या सल्ल्याने दर निश्चित केलेले नाही. प्रत्येक दाव्यासाठी शुल्क ठरवितांना कुठल्या निकषाचा आधार घेतला याचा तपशिल नाही.

DATDUBM6401 (Ref No : 14, Hmm No : 27)

***56 मनपा चंद्रपूर अंतर्गत नागरी आरोग्य केंद्रातील बाह्यरुग्ण तपासणी नोंदवही (OPD Register), औषधी साठा व पुरवठा नोंदवहीतील त्रुट्याबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 11**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

| |
|---|
| ***मनपाच्या विविध आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण तपासणी नोंदवहीत परिपूर्ण नोंदी घेण्यात येत नाही. दैनंदिन व्यवहारानंतर गोषवारा काढून प्रमाणित करण्यात येत नाही. रुग्ण तपासणी फी पुरावा म्हणून पावती किंवा तत्सम प्रमाणित चिठ्ठी लेखापरीक्षणास पडताळणी करण्यासाठी उपलब्ध करण्यात आली नाही. तसेच औषधी साठा व पुरवठा नोंदवहीत दैनिक व्यवहारानुसार परिपूर्ण नोंदी घेण्यात येत नाही. नोंदवह्या सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रमाणित करण्यात येत नाही. दैनिक औषधांच्या वापराबाबत तपशील उपलब्ध केलेला नाही.*** |



Scanned by CamScanner

**अ) बाह्यरुग्ण तपासणी नोंदवही-**

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर अंतर्गत एकूण 10 नागरी आरोग्य केंद्रे असून या आरोग्य केंद्रात दैनंदिन रुग्णांची तपासणी करून उपचार करण्यात येतो. त्याकरिता बाह्यरुग्ण तपासणी नोंदवही (OPD Register) ठेवण्यात येत असून रुग्णाकडून रु. 10/- प्रती नवीन रुग्ण व जुने नोंदणीकृत रुग्णाकडून रु.5/- प्रती रुग्ण प्रमाणे तपासणी फी वसूल करून तशी नोंद सदर नोंदवहीत घेऊन दिवस अखेर जमा रकमेचा हिशेब करून पटनी रजिस्टरद्वारे मनपा खात्यात जमा करण्यात येतो.

सन 2013-2014 मधील निवड महिन्यातील बाह्यरुग्ण तपासणी नोंदवही (OPD Register) ची तपासणी केली असता सर्वच नागरी आरोग्य केंद्रातील नोंदवह्यात खालील त्रुट्या व अनियमितता आढळून आल्या.

1) सदर बाह्यरुग्ण तपासणी नोंदवही (OPD Register) पृष्ठांकन करून सक्षम प्राधिकारी यांचे सही शिक्क्यानिशी प्रमाणित करण्यात येत नसल्याचे दिसून आले.

2) राष्ट्रीय महानगरपालिका लेखासंहिता नियमावलीतील प्रकरण 15 मधील परिच्छेद 15.7 नुसार सदर नागरी आरोग्य केंद्रात येणाऱ्या बाह्यरुग्णांची नोंद बाह्यरुग्ण तपासणी नोंदवही (OPD Register) मध्ये कशाचे आधारे घेण्यात आली त्याचा पुरावा म्हणून पावती किंवा तत्सम प्रमाणित चिठ्ठी लेखापरीक्षणास पडताळणी करण्यासाठी उपलब्ध केली नसल्याने प्रत्यक्ष किती रुग्ण आले व किती रुग्णांकडून तपासणी फी वसूल करण्यात येऊन किती रुग्णांच्या नोंदवहीत नोंदी घेण्यात आल्या याचा मेळ घेता आला नाही.

3) सदर बाह्यरुग्णतपासणी नोंदवही मध्ये घेतलेल्या दैनिक रुग्ण नोंदीनुसार दिवस अखेर हिशेब करून दैनिक गोषवारा काढण्यात येत नसल्याचे तसेच काढलेला दैनिक गोषवारा सक्षम प्राधिकारी यांचे सही शिक्क्यानिशी प्रमाणित करण्यात येत नसल्याचे दिसून आले.

4) सदर बाह्यरुग्ण तपासणी नोंदवही नुसार प्रत्येक दिवस अखेर झालेली जमा रकमेची नोंद पटनी नोंदवहीत (दैनिक जमा नोंदवही) घेऊन व चलान पावती तयार करून मनपाचे रोखपालाकडे जमा करण्यात येत असून सदर पटनी नोंदवही पृष्ठांकन करून सक्षम प्राधिकारी यांचे सही शिक्क्यानिशी प्रमाणित केले नसल्याचे दिसून आले.

5) सदर नागरी आरोग्य केंद्रास प्राप्त झालेल्या चलान पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध केली नसल्याने कोणत्या क्रमांकाचे किती चलान पुस्तक सदर नागरी आरोग्य केंद्रास प्राप्त झाली व किती वापरात आहेत याची पडताळणी करता आली नाही.

उपरोक्त त्रुट्या विचारात घेतल्यास नागरी आरोग्य केंद्राचे प्रमुख तसेच आरोग्य विभागाचे प्रमुख यांचे महसुलाच उचित भरणा व त्याचे केंद्रस्तरावर योग्य लेखांकनासंदर्भात आवश्यक वित्तीय नियंत्रण नाही असे दिसून येते. या नियंत्रणा अभावी महसुली रकमांचा गैरविनियोगकिंवा इतर अनियमितता घडण्यास वाव निर्माण होतो.

**ब) औषधी साठा व पुरवठा नोंदवही-**

मनपाच्या आरोग्य विभागाद्वारे विविध आवश्यक औषधी खरेदी करून सदर नागरी आरोग्य केंद्रास मागणीप्रमाणे वेळोवेळी पुरवठा केला जातो, याची नोंद घेण्यासाठी विहित साठा व पुरवठा नोंदवही



Scanned by CamScanner

सदर नागरी आरोग्य केंद्रात व आरोग्य विभागात ठेवण्यात आली आहे.

सन 2013-2014 मधील निवड महिन्यातील औषधी साठा व पुरवठा नोंदवहीची तपासणी केली असता आरोग्य विभागातील व सर्वच नागरी आरोग्य केंद्रातील नोंदवह्यात खालील त्रुट्या व अनियमितता आढळून आल्या.

1) राष्ट्रीय महानगरपालिका लेखासंहिता नियमावलीतील प्रकरण 13 अन्वये सदर औषधी साठा व पुरवठा नोंदवही पृष्ठांकन करून सक्षम प्राधिकारी यांचे सही शिक्क्यानिशी प्रमाणित करण्यात येत नसल्याचे दिसून आले.

2) सदर औषधी साठा व पुरवठा नोंदवहीत प्राप्त औषधांच्या नोंदीनुसार पृष्ठ क्रमांकासह अनुक्रमणिका तयार केलेली नाही. बहुतेक नागरी आरोग्य केंद्रातील नोंदवहीत अपूर्ण व अर्धवट अनुक्रमणिका असून संपूर्ण प्राप्त औषधांच्या नोंदी घेण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले.

3) सदर औषधी साठा व पुरवठा नोंदवहीत व्यवहाराच्या दिनांकानुसार नोंद घेण्यात येत नाही. नोंदवहीतील विहित रकान्यात परिपूर्ण माहिती भरण्यात आली नसून अर्धवट नोंद घेण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. जसे, औषधांचे नाव, बॅच क्रमांक, मॅन्युफॅक्चर दिनांक, एक्सपायरी दिनांक, इत्यादीची नोंद घेण्यात येत नाही. त्यामुळे मुदतबाह्य झालेली औषधांचा उपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) सदर नागरी आरोग्य केंद्राद्वारे विविध उपचारासाठी व शिबिरात मागणीप्रमाणे औषधी पुरवठा करण्यात येत असून नोंदी व्यवहाराच्या दिनांकानुसार घेण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे प्रारंभिक शिल्लक व अखेरची शिल्लक दिनांकानुसार दिसून येत नाही.

5) मनपाच्या आरोग्य विभागाकडून खरेदी केलेली औषध नागरी आरोग्य केंद्रांना हस्तांतरित करतांना विभागाकडील औषधी साठा पुस्तकात केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या औषधी प्राप्त झाल्याच्या नोंदी घेण्यात येत नाही, असे दिसून आले. प्राप्त औषधांच्या मुद्रित केलेल्या पावत्यावरील संबंधीत रकान्यात विभागाचा साठा नोंदवही क्रमांक व पृष्ठ क्रमांक टाकण्यात येत नसून नागरी आरोग्य केंद्राद्वारे सुद्धा त्यांनी नोंद घेतलेला साठा नोंदवही क्रमांक व पृष्ठ क्रमांकनमूद करण्यात येत नाही. त्यामुळे सदर औषधांच्या अनेक ठिकाणी नोंदी होण्याची शक्यता असून प्राप्त साठा व वापर याचा ताळमेळ संबंधितांद्वारे घेण्यात येत नसल्याचे निदर्शनास येते.

6) नागरी आरोग्य केंद्रात पुरवठा केलेल्या औषधांचा कसा व किती रुग्णावर वापर करण्यात आला याचा तपशील लेखापरीक्षणास नागरी आरोग्य केंद्राद्वारे उपलब्ध करून देण्यात आला नाही. त्यामुळे प्राप्त औषधांचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येत आहे.

तरी वरीलप्रमाणे त्रुट्या व अनियमितता भविष्यात राहणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

DATYBDM6301 (Ref No : 16, Hmm No : 20)



Scanned by CamScanner

उणे शून्य

**57 विवाह मंडळाची नोंदणी शुल्क व नुतनीकरणाची तसेच विवाह नोंदणी शुल्काची रक्कम शासनाकडे जमा न करणे.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*
*अनियमितता कलम : 9इ*

| |
|---|
| ***महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम 1999 मधील नियम 3 नुसार निबंधकाच्या स्थानिक अधिकार क्षेत्रातील विवाह मंडळे यांची नमुना 3 मध्ये नोंदणी व नुतनीकरणासाठी अर्ज सादर करुन अर्जासोबत रु. 5,000/- फी प्राप्त करुन घेणे आवश्यक असून नमुना-ह मध्ये नोंदवही ठेऊन विवाह मंडळाची नोंद घेण्याबाबत स्पष्ट निर्देश आहेत. असे असतांनाही चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रातील सन 2013-14 अखेरपर्यंत विवाह मंडळाची नोंदणी व नुतनीकरण शुल्क, वसुलीची नोंदवही नमुना-ह लेखापरीक्षणास उपलब्ध करुन न देणे तसेच प्राप्त रक्कम शासनाकडे जमा न करणे प्रकरणी झालेली अनियमितता.*** |

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम 1999 नुसार नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. का-13/रवका/ विवाह नोंदणी दिनांक 21/04/2008 अन्वये विवाह नोंदणी करण्याचे काम दिनांक 01 मे 2008 पासून नगरपालिका / महानगरपालिकाकडे हस्तांतरीत झालेले आहे. चंद्रपूर शहर महानगरपालिका कार्यालयामार्फत विवाह नोंदणी व नुतनीकरणाची फी वसूल केली जात असून ती शासनाकडे जमा न करण्यात आल्याचे संबंधितांकडून सांगण्यात आले तथापि, प्राप्त रकमेचा अनुषंगाने सन 2013-14 चे अंदाजपत्रकात विवाह लेखा शिर्षाखाली प्रत्यक्ष जमा दिसून येत नाही.

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम 1999 मधील नियम 3 नुसार निबंधकाच्या स्थानिक अधिकार क्षेत्रातील विवाह मंडळे यांची नमुना अ मध्ये नोंदणी नुतनीकरणासाठी अर्ज सादर करतांना अर्जासोबत रु. 5000/- शुल्क प्राप्त करुन घेणे आवश्यक असून नमुना - ह नोंदवहीत विवाह मंडळाची नोंद घेण्याबाबत स्पष्ट निर्देश आहेत.

याचप्रकारे विवाह नोंदणीचे काम दि. 01.05.2008 पासून मनपा मार्फत होत असून त्यासाठी मनपाकडे शुल्क जमा होत असते. वरील दोन्ही विषयावरील जमा महसूल राज्य शासनाकडे कोषागारामार्फत जमा होणे आवश्यक आहे. सन 2013-14 मध्ये विवाह नोंदणीसाठी जमा झालेल्या शुल्काची रक्कम रु. 79825/- शासनाकडे जमा करण्यात आली नसल्याचे संबंधीताकडून सांगण्यात आले. तसेच विवाह मंडळ नोंदणीची आकडेवारी प्राप्त झाली नाही. सदर प्रकरणी अर्धसमास पत्र क्र. 102 दि. 21.07.2016 चे अनुषंगाने आक्षेप नोंदविण्यापर्यंत अभिलेख तपासणीस प्राप्त झाले नाही.

उपरोक्त रकमा शासनाकडे जमा न करणे तसेच शासन निधी शासकीय लेख्याबाहेर ठेवणे ही गंभीर स्वरुपाची अनियमितता आहे. तरी उचित कार्यवाहीसह अनुपालन सादर करावे.

DATDUBM6(0) (Ref No : 23, Item No : 102)



Scanned by CamScanner

आक्षेप

## 58 नगरपरिषद चंद्रपूर व महानगरपालिका चंद्रपूर यांच्या मंजुर आकृतीबंधातील व्यस्त प्रमाणाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014

No. of Irregularities: 01

*लेखा शीर्ष :161 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

***तत्कालिन नगरपरिषद चंद्रपूरचा मंजुर आकृतीबंधातील व शासन अधिसुचना नगर विकास विभाग क्रं. एम.यु.एम. 1011/प्र.क्र.44/नवि 18 दिनांक 25 आक्टो. 2011 अन्वये चंद्रपूर शहर महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर मंजुर करण्यात आलेला आकृतीबंधामधील मंजूर पदसंख्या यात फार मोठया प्रमाणावर तफावत असल्याने नवनिर्मित महानगरपालिकेतील पदे रिक्त असल्याने महानगरपालिकेने सादर केलेला आकृतीबधांचा प्रस्ताव तृटीपुर्ण असल्याचे स्पष्ट होते.***

नगरपरिषद , चंद्रपूर यांचे पत्र क्रं. चनप/मुली/सापआ/1636/05 दिनांक 22.03.2005 अन्वये सादर केलेल्या आकृतीबंधास नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचा आदेश क्र. नपप्रसं 2005/6/32सीएच/1/प्रलंबित पदनि/प्र.क्र. 877/2005/का-24 दिनांक 17.12.2005 अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औदयोगिक नगरे 1965 चे कलम 76 (1) व (2) नुसार एकुण 1178 पदाचा आकृतीबंध मंजुर करण्यात आला होता. त्यात वर्ग-3 ची 132 स्थायी पदे व 98 अस्थायी पदे तसेच वर्ग-4 च्या 352 स्थायी व 596 अस्थायी पदाचा समावेश होता. चंद्रपूर शहर महानगरपालिका अस्तित्वात आली तेव्हा एकुण 1076 कर्मचारी कार्यरत होते तर 102 पदे रिक्त होती.

शासन अधिसुचना नगर विकास विभाग क्रं. एम.यु.एम. 1011/प्र.क्र.44/नवि 18 दिनांक 25 आक्टो. 2011 अन्वये चंद्रपूर शहर महानगरपालिका अस्तित्वात आली आहे. नवनिर्मित चंद्रपूर शहर महानगरपालिका अस्तित्वात आल्याने चंद्रपूर शहर महानगरपालिका यांचे पत्र क्र. चंशमनपा/सापआ/1091/2012 दिनांक 17/07/2012 अन्वये महानगरपालिकेकरीता एकूण 1197 पदाचा समावेश असलेला सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने शासनाने राज्यातील विविध महानगरपालिकांकरिता आकृतीबंध निश्चित करण्याबाबत शासन निर्णय दिनांक 04 मे, 2006 व 28 मार्च, 2011 मध्ये असलेली मार्गदर्शक तत्वे विचारात घेवून चंद्रपूर शहर महानगरपालिकेकरिता आदेश क्र. 28.05.2013 मध्ये एकुण 869 पदाचा सुधारित आकृतीबंध मंजुर करण्यात आला.

1. दि. 25.10.2011 पूर्वी नगरपालिका मंजूर पदे – 1178
2. दि. 25.10.2011 नंतर अस्तित्वात मंजूर पदे – 1076
3. दि. 28.05.2013 अन्वये मनपा साठी सुधारित आकृतिबंधनुसार मंजूर पदे – 869



Scanned by CamScanner

तुट (I-3) -- 309

नगरपरिषद अस्तित्वात असताना 1178 पदे मंजुर होती परंतु महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर केवळ 869 पदे मंजुर आहे . हे व्यस्त प्रमाण लक्षात घेता मुळ आकृतीबंधासाठी सादर केलेला प्रस्ताव त्रुटीपुर्ण असल्याची शक्यता नाकारता येत नाही. सद्यस्थिती चंद्रपूर शहराची हद्दवाढ मंजूर झाली असून कामाचा आवाका लक्षात घेऊन मनपास विहित केलेली कर्तव्ये प्रभावीरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने आकृतीबंधाच्या प्रस्तावाचा फेरआढावा घेऊन आवश्यक असल्यास वाढीव पदासह सुधारित आकृतिबंधासाठी नव्याने प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यासाठी नियमोचीत कार्यवाही करावी.

DATDUBM6401 (Ref No : 58, Item No : 41)

**59 वारसान हक्काने शासकीय नझुल जागेवरील मालमत्ता हस्तांतरणाने नांव दाखल करणे.**

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

| |
|---|
| ***वारसान हक्काने शासकीय नझुल जागेवरील मालमत्ता विकताना कायदेशीर वारसदारास मृत दर्शवून मालमत्ता हस्तांतरणाने महानगरपालिका रेकार्डवर नांव दर्ज करतांना झालेली अनियमीतता*** |

चंद्रपूर शहर महानगरपालिका अंतर्गत झोन क्रं 1 मधील शासकीय (नझुल) जागेवरील मालमत्ता हस्तांतरणाने नाव दाखल करणे, अंतर्गत प्रकरणाची अभिलेख पडताळणी केली असता गंभीर स्वरुपाची अनियमिता झाल्याचे आढळून आले. अर्जदार श्री. शेख इरफान बाबा चंद्रपूर यांचा मालमत्ता हस्तांतरणाचा अर्ज दिनांक 25.02.2014 रोजी झोन क्र. 1 या कार्यालयास प्राप्त झाला. मामला क्रं. 544 ही मालमत्ताधारक श्रीमती सदोरीबाई प्रेमचंद झुंज (लग्नापुर्वीचे नांव) तसचे श्रीमती शिलाबाई आनंदराव मुंदडा (लग्नानंतरचे नाव) यांचा मृत्यू दिनांक 19.12.2014 ला झाला. त्यांचे कायदेशीर वारसदार श्री. कैलास आनंदराव मुंदडा (मुलगा) यांचा वंशावळमध्ये मृत्यू झाला असल्याचे दाखविले आहे. परंतु श्री. कैलास आनंदराव मुंदडा यांचे मृत्यूचे प्रमाणपत्र जोडलेले नाही. तर श्री. सुमित कैलासराव मुंदडा (श्रीमती शिलाबाई आनंदराव मुंदडा यांचा नातू) यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात ते स्वतः एकमेव वारसदार असल्याचे नमूद केले आहे. प्रभाग अधिकारी यांनी काढलेल्या जाहिरनामा क्रं. चशमनपा/कर अधिक्षक/दा.खा./2014 दिनांक 12/03/2014 वर श्री. कैलास आनंदराव मुंदडा यांनी स्वाक्षरी केली आहे. त्यामुळे श्री कैलास आनंदराव मुंदडा हे जिवीत असल्याचे सिध्द होते. प्रभाग अधिकारी यांनी कायदेशिर वारसदार जिवीत असल्याची खातरजमा न करता केलेली हस्तांतरणाची कार्यवाही अवैध ठरते.



Scanned by CamScanner

2. दैनिक चंद्रधुन मध्ये जाहिरात प्रकाशीत करतांना मालमत्तेचे वर्णन मौजा, भुमापन क्रं., शिट क्र, आखिव पत्रिका क्रं., प्लाट नं., आराजी, इत्यादी माहिती नमुद केलेली नाही. त्यामुळे सदर प्रक्रिया मोघम स्वरुपाची व संशयास्पद वाटते.

3. दैनिक वृत्तपत्र चंद्रधुन या वर्तमानपत्रात जाहिरनामा प्रकाशित केला असल्याने बिल क्रं. 894 दिनांक 13/03/2014 चे प्रदान रु. 800/- कर अधिक्षक यांनी केले असून सदर रक्कम अर्जदाराकडून वसुल केलेली आहे, असे टिप्पणीवरुन दिसून येते. परंतु संबंधीतास मनपाची पावती देण्यात आल्याचे आढळले नाही.

4. संबंधीत मालमत्ता धारकाने कराचा भरणा न करताच हस्तांतरणाची कार्यवाही केली असल्यामुळे ती त्रृटीपुर्ण ठरते.

5. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम , 1949 मधील नियम 72(अ)(2) अन्वये नागरिकांच्या सनदेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये संबंधीत प्राधिकाऱ्याकडून कोणताही अंतिम निर्णय घेण्यात आला नाही तर , आवश्यक कार्यवाही न केल्याबद्दल त्यांना जबाबदार धरण्यात येईल असे नमुद आहे. नागरीकांची सनद यामध्ये नमुद केल्यानुसार हस्तांतरणाची प्रकरणे 15 दिवसाचे आत निकाली काढायची असतांना विलंबाने निकाली काढण्यात आली. उदाहरणादाखल काही प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्रं. | मामला कमांक | अर्जदाराचे नांव | विक्री किमंत | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | मंजूरी आदेशाचा दिनांक | विलंबाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 810 | श्री. राजेश सु. चाटोळे | रु.300000/- | 18/03/2014 | 28/11/2014 | 8 महिने |
| 2. | 842/9 | श्री. भार्गव मोहन बांडे | रु.450000/- | 18/07/2014 | 28/11/2014 | 4 महिने |
| 3. | 640/4 | श्री. प्रकाश दि. ढोकणे | रु.700000/- | 30/12/2013 | 06/12/2014 | 12 महिने |
| 4. | 289 | श्री. संजय ना. उपरे | रु.500000/- | 30/12/2013 | 24/07/2014 | 6 महिने |
| 5. | 813 | श्री. दिलीप ना. राखडे | रु.1000000/- | 02/07/2013 | 22/12/2014 | 4 महिने |

नागरिकाकडून पावती न देता जाहीरनाम्यासाठी रकमा प्राप्त करणे, हस्तांतरणाची कार्यवाही विलंबाने पार पाडणे, जाहिरातीमध्ये मालमत्तेचे वर्णन तिरक दर्शविने यावरुन संबंधीताकडून नियमास विसंगत अशी कार्यवाही केली जात असल्याने परिणामस्वरुप मनपाचे हित जोपासले जात नाही असे दिसते. या प्रकारच्या अन्य प्रकरणासहित मनपा प्रशासनाचे स्तरावर तपासणी होणे जरुरीचे वाटते.

आवश्यक कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

DATDUBM6401 (Ref No : 24, Hmm No : 85)



Scanned by CamScanner

## 60 मौल्यवान वस्तू अथवा रोख हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून क्षतीपुर्ती बंधपत्र न घेणेबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 01**

म.न.पा. निधी निधी

अनियमितता कलम : ९३

| |
|---|
| मुंबई वित्तीय नियम 1959 च्या नियम क्र. 51 नुसार शासनाच्या/ संस्थेच्या, रोख रकमा/ मौल्यवान वस्तू हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून सुरक्षा ठेव जमा करणे, विमा उतरविणे अथवा क्षतीपुर्ती बंधपत्र घेणे आवश्यक असतांना मनपा चंद्रपूर येथील अशा कर्मचाऱ्यांकडून क्षतीपुर्ती बंधपत्र, सुरक्षा ठेव न घेतल्याची अनियमितता आढळून आली. |

मुंबई वित्तीय नियम 1959 च्या नियम क्र. 51 नुसार रोखपाल, स्टोअर किपर, रोख संग्राहक इ. कर्मचाऱ्यांना 'रोख रकमा' किंवा 'मुद्रांक शुल्क' यांसारख्या मौल्यवान वस्तू हाताळाव्या लागतात करिता यांसारख्या कर्मचाऱ्यांकडून सुरक्षा ठेव, विमा काढणे, क्षतीपुर्ती बंधपत्र घेणे आवश्यक आहेत. चंद्रपूर मनपा कर्मचाऱ्यांनी सन 2013-2014 मध्ये एकूण 51,30,25,683/- एवढी रक्कम हाताळल्याचे दिसून आले आहे.

अंदाजपत्रकातील आकडेवारी नुसार सन 2013- 2014 मध्ये कर व इतर उत्पन्नापोटी मनपाच्या विविध कर्मचाऱ्यांमार्फत पुढीलप्रमाणे महसूल गोळा करण्यात आला.

| | |
|---|---|
| अ) महानगरपालिका कर व दर | –49,30,74,695/- |
| ब) विशेष अधिनियमाखालील वसुली | - 1,240/- |
| क) म.न.पा. मालमत्ता मिळकतीपासूनचा महसूल | - 1,99,49,748/- |
| एकुण - | 51,30,25,683/- |

परंतु संबंधीतांकडून सुरक्षा रक्कम जमा केल्याचे अथवा रकमेचा विमा काढल्याचे तसेच क्षतीपुर्ती बंधपत्र घेतल्याचे दिसून आले नाही. ही गंभीर स्वरुपाची बाब आहे. तरी सदर बाबीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येत असून योग्य कार्यवाहीसह अनुपालन सादर करावे.

DLFSRWF 8961 (Ref No : 65, Item No : 11)

## 61 सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत स्वयंरोजगारा करीता वैयक्तिक कर्ज मंजुरीबाबत.

सुवर्ण जयंती रोजगार योजना



Scanned by CamScanner

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
No. of Irregularities: 05

लेखा शीर्ष:00 केंद्र शासन निधी

अनियमितता कलम : 9इ

गुंतलेली रक्कम रु. 1810250.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1810250.00/-

**सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत लेखा परीक्षणास मूळ नस्ती सादर करण्यात आली नाही. स्वंयरोजगारा करीता वैयक्तिक कर्ज मंजुरीकरिता 25% अनुदान (subsidy) वरील योजना राबविताना आवश्यक प्रमाणपत्रा शिवाय लाभार्थी निवड, आवश्यक दस्तावेज उपलब्ध नसणे, या अनियमितता आढळून आल्या.**

मनपा चंद्रपूर सन 2013-2014 चे सुवर्ण जयंती रोजगार योजनेचे लेखापरीक्षण करतांना खालील अनियमितता आढळून आल्यात.

सन 2013 -2014 चे लेखापरीक्षण करिता सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत स्वंयरोजगारा करीता वैयक्तिक कर्ज मंजुरीकरिता 25 % अनुदान (subsidy) चा लाभ शासन निधीतुन लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे दर्शवून खालील दर्शविलेले लाभार्थ्यांचे वैयक्तिक कर्ज मंजुरीबाबत नस्ती लेखापरीक्षणास दर्शविलेल्या नाहीत त्यांची नावे खालील प्रमाणे आहेत.

| अनु.क्र. | लाभार्थ्यांची नावे | अनुदानाची रक्कम रु. |
|---|---|---|
| 1 | श्री.राजू अगलवल्लरवार | 25000 |
| 2 | श्री.अरीजवान जब्बार | 20000 |
| 3 | श्री.इमरान शेख | 25000 |
| 4 | श्री.हबीब पठाण | 12500 |
| 5 | श्रीमती.शांता सीताराम झांडे | 12500 |
| 6 | श्री.इन्तेजार बानो काझी | 25000 |
| 7 | श्री.राजेश दुर्गे | 25000 |
| 8 | श्री.रघुनाथ कलोडे | 25000 |
| 9 | श्रीमती.सुनिता देऊळकर | 25000 |
| 10 | श्री.नकुल नंदावरी | 25000 |
| 11 | श्री.दिलीप बल्की | 10000 |
| 12 | श्री. सरोज अंडेलवार | 12,500 |
| 13 | श्री. मनीष गढुकर | 50000 |
| 14 | श्री. गंगाराम गुप्ता | 25000 |
| 15 | श्रीमती. जयमाला शानकर | 25000 |
| 16 | श्री.शिशिर हलदर | 50000 |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 17 | श्री. शिरीन शेख | 12500 |
| 18 | श्री. श्रीनिवास बुड्डी | 25000 |
| 19 | श्री. श्रीनिवास पारबंदी | 50000 |
| 20 | दिलीप नेवलकर | 25000 |
| 21 | राजेश शेंडे | 12500 |
| 22 | ज्योती गणवीर | 25000 |
| 23 | सिद्धार्थ केशकर | 25000 |
| 24 | शेख अमीन रो.अ | 12500 |
| 25 | देवराव आवळे | 50000 |
| 26 | प्रकाश सूरजागडे | 25000 |
| 27 | श्याम आक्केवार | 25000 |
| 28 | सर्जेराव मरसकोल्हे | 50000 |
| 29 | विजय रा. कुंभरे | 12500 |
| 30 | संपत रा. आकापेल्ली | 25000 |
| 31 | गुलबरकतवी शेख | 12500 |
| 32 | तरुण दु. तिवारी | 25000 |
| 33 | सपना खो. दास | 25000 |
| 34 | मदन हि. बाकरवाले | 50000 |
| 35 | रहीम शाहा जुम्मा शाहा | 37500 |
| 36 | शाहिदा बानो साबीर | 25000 |
| 37 | सरीता भा. नगराळे | 25000 |
| 38 | केशव दा. किन्नाके | 17500 |
| 39 | मघलाल म. बर्मन | 50000 |
| 40 | पुरुषोत्तम ना. रामटेके | 25000 |
| 41 | शेख रहीम शेख कादर | 25000 |
| 42 | अनिता रा. नागपुरे | 25000 |
| 43 | भावना र.देशटटीवार | 25000 |
| 44 | धनशीला अगतकर | 50000 |
| 45 | रामराज रविदास | 5250 |
| 46 | मल्लेश लक्ष्मण गंधमवार | 25000 |
| 47 | भाग्यलक्ष्मी तालापेल्ली | 25000 |
| 48 | पोचम लक्ष्मण गित्तावार | 25000 |
| 49 | अनिल चंद्रय्या अडर | 25000 |
| 50 | भीमराव खोब्रागडे | 22500 |
| 51 | प्रभाराव जामनकर | 22500 |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 52 | शितल वाकडे | 22500 |
| 53 | हर्षा पचारे | 22500 |
| 54 | सकीना मोबीन | 22500 |
| 55 | माला तोडकर | 22500 |
| 56 | प्रकाश तुमाने | 50000 |
| 57 | तसलीम बानो शेख | 25000 |
| 58 | शमसून बानो पठाण | 25000 |
| 59 | अविनाश कोरेकर | 25000 |
| 60 | शेख रशिदा अ. कदिर | 25000 |
| 61 | सुरेश बुरडकर | 25000 |
| 62 | शिखा चक्रवती | 25000 |
| 63 | जयश्री पेंदुलवार | 25000 |
| 64 | कल्पना मेंदळकार | 50000 |
| 65 | नत्थूजी इंसकार | 25000 |
| 66 | फरिदा परविन हबीब | 25000 |
| 67 | सलीम गुलाब पठाण | 25000 |
| 68 | साधना वैरागडे | 10000 |
| 69 | छाया नन्नावरे | 25000 |
| एकूण | | 18,10,250 |

उपरोक्त तक्त्यातील लाभार्थी यांचे वैयक्तिक कर्ज मंजुरीबाबत नस्ती लेखा परीक्षणास उपलब्ध न झाल्यामुळे तपासणी करता आली नाही. विभागाने उपलब्ध केलेल्या प्रमाणकानुसार सन 2013-2014 चे तपासणी केली असता खालील त्रुटी निदर्शनास आल्यात

1. सदर लाभार्थ्यांच्या प्रमाणकात त्यांचे अर्ज जोडलेले नाहीत करिता त्यांची अनुदानाची मागणी असल्याबाबत खात्री होत नाही.

2. सदर लाभार्थ्यांच्या प्रमाणकात त्यांचे सन 2005-2006 मध्ये झालेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या सर्वेक्षण यादी नुसार लाभार्थी बी.पी.एल.गटात मोडत असल्याचे सन 2005-2006 मधील यादीची छायांकित प्रत जोडली आहे. परंतु सदर लाभार्थी हे सन 2013-2014 या वर्षातील योजनेतून लाभ घेत असल्याने त्यांचे सन 2012-2013 या आर्थिक वर्षातील उत्पन्नाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक होते. त्यामुळे प्रत्यक्षात आर्थिक दृष्ट्या अपात्र उमेदवारांना योजनेचा लाभ मिळाला असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3. सदर लाभार्थ्यांचे वैयक्तिक अपूर्ण दस्तवेजामुळे त्यांचे बँक खात्यात अनुदान (subsidy) जमा झाल्या बाबत खात्री करता आली नाही.



Scanned by CamScanner

4. नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे परिपत्रक क्र.सुजयो.102003/प्र.क्र.83/03/13 दिनांक 10 सप्टेंबर 2004 मधील परिच्छेद 2 नुसार या योजनेचा लाभ देताना अनुसूचित जाती / जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात लाभार्थी असले पाहिजेत. असे असताना लाभार्थ्यांचे जात प्रमाणपत्र उपलब्ध नाही. यामुळे अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती गटा ऐवजी अन्य गटातील उमेदवारांना चुकीच्या पद्धतीने लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

5. नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे परिपत्रक क्र.सुजयो.102003/प्र.क्र.83/03/13 दिनांक 10 सप्टेंबर 2004 नुसार किमान 3% लाभार्थी अपंग व्यक्तीपैकी असणे आवश्यक आहे. परंतु अपंगत्वाची प्रमाणपत्र सोबत जोडेली नाही. यावरून पात्र उमेदवारांना योजनेचा लाभ मिळाल्याची खात्री होत नाही. लाभार्थीची वैयक्तिक प्रमाणपत्रे उपलब्ध नसणे किंवा जाणीवपूर्वक न जोडणे या मध्ये अनियमितता व लाभाच्या रकमेचा अपहार असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त अनियमितता बाबत खुलाशासह समर्थक अनुपालन सादर करावे. तोपर्यंत खर्च रु.18,10,250/- आक्षेपाधीन ठेवण्यात येतो.

DLFS[illegible] (Ref No : 36, Item No : 89)

पाणी पुरवठा

## 62 टँकरद्वारे पाणी पुरवठा केलेल्या प्रकरणी प्राप्त रकमांचा तपशिल व आवश्यक अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करुन न देणेबाबत.

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूरचे सन 2013-14 चे लेखापरीक्षणा दरम्यान महानगरपालिकेस प्राप्त निधीचे स्त्रोत इत्यादीपासून प्राप्त होणारे उत्पन्न इत्यादी प्रकरणी पडताळणी केली असता टँकरने पाणी पुरवठा केलेल्या प्रकरणी जमा महसुल तरतुद केली नसल्याचे अंदाजपत्रकात आढळून आले.***

महानगरपालिकेने केलेल्या करारनाम्यानुसार शहरात मे. उज्वल कंट्रक्शन क. लि. चंद्रपूर यांनी अस्तित्वात असलेल्या नळ योजनेव्दारे व दरवर्षी 1.5 कि.मी. पाईपलाईन टाकूण शहरात पाणी पुरवठा करावयाचा आहे. त्याव्यतीरिक्त शहरातील बोअरवेल्स , विहीरीची दुरुस्ती व परिरक्षण करण्याची जबाबदारी त्यांचेवरच आहे. शहरातील ज्या भागात नळयोजना नाही, त्याभागात बोअरवेल्स चालु स्थितीत ठेवणे व महानगरपालिकेने नव्या जादा बोअरवेल्स बसविणे अपेक्षित आहे. परंतु बोअरवेल्स बंद पाडुन किंवा त्याठिकाणी कायमस्वरुपी उपाय करण्याऐवजी महानगरपालिका टँकरव्दारे नोफत पाणीपुरवठा करीत आहे. त्यामुळे नागरिकांना मुलभूत सोयी कायमस्वरुपी उपलब्द न करता टँकरच्या सतत वापरामुळे त्यावरील इंधनाच्या खर्चात



Scanned by CamScanner

अकारण वाढ होत आहे.

चंद्रपूर शहर महानगरपालिका हद्दीतील ज्या भागामध्ये नळाव्दारे अथवा इतर स्त्रोतातून पाणी पुरवठा होत नाही, अश्या वस्त्यांना अग्निशमन विभागामार्फत टँकरव्दारे नागरिकांच्या मागणीनुसार पाणी पुरवठा करण्यात येतो. याकरिता स्थायी समितीने अंदाजपत्रकात प्रस्तावित केल्यानुसार प्रति टँकर रु.500/- प्रमाणे आकारणी करण्यास मंजूरी दिली. टंचाईग्रस्त भागास पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्याने अग्निशमन विभागाने सन 2013-14 या आर्थिक वर्षात टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्याप्रकरणी मनपास किती उत्पन्न प्राप्त झाले, याबाबत अर्धसमास पत्र क्र. 89 दिनांक 04.07.2016 अन्वये माहिती उपलब्ध करुन देण्यास सूचित करण्यात आले. परंतु लेखापरीक्षण कालावधीत अर्धसमास पत्राचे उत्तर प्राप्त झाले नाही.

मुंबई स्थानिक निधी अधिनियम, 1930 मधील कलम 6 नुसार लेखापरीक्षणास आवश्यक अभिलेख तपासणीस उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. तसेच महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षण अधिनियम (सुधारणा) 2011 मधील कलम 8 नुसार सदर बाब अत्यंत गंभीर असून लेखापरीक्षणास आवश्यक असलेले अभिलेख विहित मुदतीत सादर न केल्याने सदर प्रकरणी तपासणी करता आली नाही.

तरी याबाबत समर्पक खुलासा करुन अनुपालन करावे.

DATDUBMS401 (Ref No : 38, Hmm No : 39)

## 63 अखर्चित शासकीय अनुदान व उपयोगिता प्रमाणपत्रांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014
**No. of Irregularities: 00**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

गुंतलेली रक्कम रु. 464652725.00 /-

***मनपास मोठया प्रमाणावरील प्राप्त अनुदानातून प्रत्यक्ष योजनांवर पूर्ण निधी खर्च न करता बँकांमध्ये गुंतविण्याची पध्दत प्रचलित आहे. अशा अनुदान व गुंतवणूकीवरील प्राप्त व्याजाच्या एकूण रकमेतून केवळ 70% खर्च करुन उर्वरित निधी अखर्चित ठेवण्यात आला आहे.***

मनपा, चंद्रपूर मध्ये दरवर्षी विविध भांडवली/विकासात्मक कामासाठी मोठया प्रमाणावर अनुदान प्राप्त होत असून तो विहित मुदतीचे आत विहित तरतुदीनुसार खर्च करुन त्याची उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास सादर करणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेने प्राप्त अनुदानाची रक्कम विहित प्रयोजनासाठी पूर्णपणे खर्च न करता बँकांमध्ये गुंतवून अखर्चित ठेवली आहे.

या अहवालासह जोडलेल्या विवरणपत्र क्र.2 नुसार मनपाने उपलब्ध केलेल्या तपशिलाप्रमाणे सर्व योजनांखालील अनुदानाच्या रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | तपशिल | रक्कम (रुपये) |
|---|---|---|



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 1 | मागील वर्षात प्राप्त अनुदानातील अखर्चित व दि.1.4.2013 रोजीची सुरुवातीची शिल्लक | 40,74,43,914/- |
| 2 | चालु वर्षात (सन 2013-14) प्राप्त अनुदान | 1,06,58,42,270/- |
| 3 | चालु वर्षात (सन 2013-14) गुंतवणुकीतील प्राप्त व्याज | 1,78,30,078/- |
| 4 | व्याज व अनुदानासह 2013-14 मध्ये उपलब्ध असलेला निधी | 1,51,90,81,132/- |
| 5 | सन 2011-12 मध्ये महाराष्ट्र सुवल व निर्मल अभियानांतर्गत वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी प्राप्त अनुदानाच्या गुंतवणूकीतून प्राप्त झालेले व अखर्चित असलेल्या व्याजाची रक्कम | 1,19,06,242/- |
| 6 | वरील 4 व 5 मिळून सन 2013-14 मध्ये उपलब्ध निधी | 153,09,87,374/- |
| 7 | सन 2013-14 मध्ये झालेला खर्च | 106,63,34,649/- (70%) |
| 8 | दि.31.3.2014 अखेर शिल्लक अनुदान (व्याजासह) | 46,46,52,725/- |

याप्रमाणे मोठ्या प्रमाणावर (रु.46.5 कोटी) शासकीय अनुदान अखर्चित असल्याने शासनाचा निधी योजनांच्या अंमलबजावणीअभावी अकारण बँकांमध्ये गुंतवून ठेवण्यात आला आहे. या संदर्भात मनपाने आवश्यक कार्यवाहीसह शासन अनुदानावरील प्राप्त व्याजाची रक्कम शासनास परत करून अनुपालन सादर करावे.

2. <u>उपयोगिता प्रमाणपत्रे</u> - अर्धसमास पत्र क्र.40, दिनांक 17.5.2016 अन्वये अनुदानासंदर्भात उपयोगिता प्रमाणपत्रे उपलब्ध करण्याची मनपास सूचित करूनही ती उपलब्ध करण्यात आली नाही. सदर प्रमाणपत्रे शासनासही सादर केली नसल्याची शक्यता नाकारता येत नाही.

DATA3WM6901 (Ref No : 49, Hmm No : 40)

### *64 दिनांक 1 नोव्हें. 2005 नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांचे मासिक वेतनातून परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन रकमेची 10% रक्कम कपात न करणे, व मनपाच्या सममुल्य हिस्स्याची रक्कम संबंधीत खात्यात वळती न करणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष : 113 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 93*

| |
|---|
| *चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूर कार्यालयाचे आस्थापनेवर दिनांक 1 नोव्हें 2005 नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतनाची शासन निर्णयानुसार 10% रक्कम* |



Scanned by CamScanner

**कपात करून कर्मचा-यांचे खात्यात जमा करणे आवश्यक आहे. माहे मे 2013 चे मासिक देयकाची पडताळणी केली असता काही कर्मचा-यांचे अंशदान वेतनाची शासन निर्णयानुसार 10% रक्कम कपात करण्यात आली नाही, असे दिसून आले.**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रं.अंनियो/1005/126/सेवा-4 दिनांक 31 आक्टो. 2005 व शासन निर्णय क्र. अंनियो/1007/18/सेवा-4 दिनांक 7 जुलै 2007 नुसार दिनांक 1 नोव्हे.2005 नंतर सेवेत रूजू झालेल्या कर्मचा-यांना प्रचलित पध्दतीनुसार निवृत्ती वेतन देय नसल्याने नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू केली , यामध्ये कर्मचा-यांचे नियुक्ती दिनांकाचे पुढील महिन्यापासून मुळ वेतन अधिक ग्रेड-पे तसेच महा. भत्ता या रकमेच्या किमान 10% रक्कम कपात करून आलेली रक्कम व वेतनाच्या 10% रकमेएवढे सममुल्य मनपाचा हिस्सा म्हणून मनपा खात्यात ठेवणे आवश्यक आहे. या दोन्ही रकमाची एकत्रित रक्कम विहित व्याज दरासह कर्मचा-यास तो सेवानिवृत्त झाल्यावर लाभ म्हणून देय ठरेल, अशी तरतूद करण्यात आली आहे.

महानगरपालिका चंद्रपूरचे आस्थापनेवरील दिनांक 1 नोव्हे. 2005 नंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांचे माहे मे 2013 देय जुन 2013 चे वेतन देयकाची पडताळणी केली असता खालील कर्मचा-यांचे वेतनातून परिभाषीत अंशदान योजनेची 10 % रक्कम कपात करण्यात आली नाही, असे दिसून आले.

(आकडे रूपयांत)

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | महिना व प्रमाणक क्रमांक | मुळ वेतन+ग्रे पे+ महा.भत्ता 80 % | कपात करावयाची रक्कम 10 टक्के | प्रत्यक्षात कपात |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री. चंदन क. राठोड, स.का. | मे-13 देय जुन-13 प्रं.क्रं.237दि.4/6/13 | 5180+1300+5184/= 11664/- | 1166/- दरमहा | निरंक |
| 2. | श्री. धरन शा.सारसार, स. का. | मे-13 देय जुन-13 प्रं.क्रं.237दि.4/6/13 | 4990+1300+5032 =11322/- | 1132/- दरमहा | निरंक |
| 3. | श्री. विशाल म. मालिक, स. का. | मे-13 देय जुन-13 प्रं.क्रं.23दि.4/6/13 | 4800+1300+4880 = 10980/- | 1098/- दरमहा | निरंक |
| 4. | श्री. मनोज कु. मंजरे, स.का. | मे-13 देय जुन-13 प्रं.क्रं.237दि.4/6/13 | 5180+1300+5184 = 11664/- | 1166/- दरमहा | निरंक |



Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5. | श्री. अनिश म. समुंद, स.का. | मे-13 देय जुन-13 प्र.क्र.237दि.4/6/13 | 4400+1300+4560 = 10260/- | 1026/- दरमहा | निरंक |

वरील प्रकरणामध्ये कर्मचा-यांकडून परिभाषीत अंशदान योजना या अंतर्गत शासनाचे धोरणानुसार 10 % रक्कम कपात करुन तसेच महानगरपालिकेला देय असलेले अंशदान संबंधीत कर्मचा-यांचे खात्यात जमा करुन विवरण पत्रासह अनुपालन सादर करावे.

2. उपरोक्त शासननिर्णयानुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर दरवर्षी या योजनेखालील वर्गणी मनपाचे सममुल्य तसेच त्यावरील देय व्याजाचे विवरण संबंधीत कर्मचा-यांना देणे आवश्यक आहे. परंतु वरील कार्यवाही होत असल्याचे दिसत नाही.

DATDUBM6401 (Ref No : SL Item No : 74)

*65 सेवापुस्तकातील अनियमितता तसेच वेतननिश्चितीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :126 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 95*

*महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 च्या नियम 38 व 45 अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात संबंधीत कर्मचाऱ्याच्या सेवाकालावधीमध्ये घडणाऱ्या सर्व प्रकारच्या घटनांची नोंद घेण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची असुन सेवापुस्तकात वार्षिक वेतनवाढी, तात्पुरत्या व स्थानापन्न पदोन्नत्या, रजेच्या नोंदी व रजेचा हिशोब, जात पडताळणी नोंद, निवृत्तीवेतन नामनिर्देशनाची नोंद, सेवापडताळणी नोंद, मराठी व हिंदी भाषा सुट मिळाल्याची नोंद, DCPS लेखा क्रमांकाची नोंद इत्यादी नोंदी घेऊन कार्यालय प्रमुखाने साक्षांकित करणे आवश्यक आहे. अशा नोंदी सेवापुस्तकात घेण्यात आलेल्या नाहीत.*



Scanned by CamScanner

महाराष्ट्र नागरी सेवा ( सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 च्या नियम 38 व 45 अन्वये शासकीय कर्मचा-यांच्या सेवापुस्तकात संबंधीत कर्मचा-यांच्या सेवाकालावधीमध्ये घडणा-या सर्व प्रकारच्या घटनांची नोंद घेण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची असून सेवापुस्तकात वार्षिक वेतनवाढी, तात्पुरती पदोन्नती व पदस्थापना, रजेच्या नोंदी व रजेचा हिशोब, चारित्र्याचे प्रमाणपत्र, वैद्यकिय तपासणी , सेवापडताळणीची नोंद , संगणक परिक्षा उत्तीर्ण होण्याची नोंद, मराठी व हिन्दी भाषा सुट मिळाल्याची नोंद , परिभाषीत अंशदान योजनेच्या खाते क्रमाकाची नोंद, गट विमा योजनेच्या सदस्यत्वाची नोंद इत्यादी नोंदी घेवुन कार्यालय प्रमुखानी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. चंद्रपूर शहर महानगरपालिकेतील कार्यरत काही कर्मचा-यांच्या सेवापुस्तकाची सन 2013-14 चे लेखापरिक्षणा दरम्यान पडताळणी केली असता सेवापुस्तकात आवश्यक नोंदीच घेण्यात आल्या नसल्याचे आढळून आले. ,

1. सेवापुस्तकातील नोंदीबाबत सर्वसाधारण अनियमितता-

अ) चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर या कार्यालयातील सन 2013-14 च्या लेखापरिक्षणा दरम्यान सेवापुस्तकांची पडताळणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आली.

कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात आढळून आलेल्या अनियमितता खालील प्रमाणे-

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | नियुक्तीचा दिनांक | अनियमितता |
|---|---|---|---|
| 1 | श्री. नितीन येरावार, क.लि. | 09.04.1999 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) निवृत्तीवेतन नामनिर्देशनाचे प्रपत्र जोडलेले नाही. |
| 2 | श्री. जसवंत पतरंगे, क.लि. | 13.10.1999 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) निवृत्तीवेतन नामनिर्देशनाचे प्रपत्र जोडलेले नाही. |
| 3 | श्री. सुधाकर स. गुल्ले, क.लि. | 01.01.1999 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) वार्षिक सेवापडताळणीची नोंद नाही.<br>5) निवृत्तीवेतन नामनिर्देशनाचे प्रपत्र जोडलेले नाही. |
| 4 | श्री. अशोक जाधव, क.लि. | 01.01.1999 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) निवृत्तीवेतन नामनिर्देशनाचे प्रपत्र जोडलेले नाही. |
| 5 | श्री. रमेश वा. धावेकर क.लि. | 01.01.1999 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) निवृत्तीवेतन नामनिर्देशनाचे प्रपत्र जोडलेले नाही |
| 6 | श्री. अनिल ग. रेभणकर क.लि. | 01.01.1999 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) निवृत्तीवेतन नामनिर्देशनाचे प्रपत्र जोडलेले नाही |
| 7 | श्री. गुलाब गर्गेलवार, स. कुली | 26.08.1992 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही. |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) निवृत्तीवेतन नामनिर्देशनाचे प्रपत्र जोडलेले नाही. |
| 8 | कु. संघमित्रा पुणेकर, क. लि. | 09.04.1999 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही. |
| 9 | श्री. एकनाथ रा. घहारे, क. लि. | 01.01.1999 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) वार्षिक सेवापडताळणीची नोंद नाही.<br>5) निवृत्तीवेतन नामनिर्देशनाचे प्रपत्र जोडलेले नाही. |
| 10 | कु. ज्योत्स्ना पोहणेकर, क.लि. | 02.07.2015 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) वार्षिक सेवापडताळणीची नोंद नाही.<br>5) डि. सी. पि. एस. लेखा क्रमांक नमुद नाही. |
| 11 | कु. लता सु. कन्नाके,<br>स.परि., ए.एन.एम. | 01.10.2013 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) वार्षिक सेवापडताळणीची नोंद नाही.<br>5) डि. सी. पि. एस. लेखा क्रमांक नमुद नाही. |
| 12 | कु. पुष्पा बनसोड. पि.एच.एन. | 03.03.2014 | 1) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>2) रजा लेखा अद्यावत नाही.<br>3) वार्षिक सेवापडताळणीची नोंद नाही.<br>4) डि. सी. पि. एस. लेखा क्रमांक नमुद नाही. |
| 13 | कु. निता स. सेडमाके, एन.एम. | 01.10.2013 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) वार्षिक सेवापडताळणीची नोंद नाही.<br>5) डि. सी. पि. एस. लेखा क्रमांक नमुद नाही.<br>6) पोलीस तपासणी अहवालाची नोंद नाही. |
| 14 | कु. वैशाली रा. पुनसे, ए.एन.एम, | 15.10.2013 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) वार्षिक सेवापडताळणीची नोंद नाही.<br>5) डि. सी. पि. एस. लेखा क्रमांक नमुद नाही.<br>6) पोलीस तपासणी अहवालाची नोंद नाही. |
| 15 | कु. ज्योती व्यवहारे, एन.एम. | 01.10.2013 | 1) जात पडताळणीची नोंद सेवापुस्तकात नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) वार्षिक सेवापडताळणीची नोंद नाही.<br>5) डि. सी. पि. एस. लेखा क्रमांक नमुद नाही. |
| 16 | कु. संगीता जवादे, एन.एम. | 01.10.2013 | 1) जात पडताळणीची नोंद सेवापुस्तकात नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) वार्षिक सेवापडताळणी नोंद नाही. |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 5) दि. 01.10.2014 ची वेतन वाढ मंजूर नाही.<br>6) डि.सी.पि.एस. लेखा क्रमांक नमूद नाही. |
| 17 | कु. पिंकी उ. बावणे, एन.एम. | 23.07.2014 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) वार्षिक सेवापडताळणी नोंद नाही.<br>5) डि.सी.पि.एस. लेखा क्रमांक नमूद नाही.<br>6) स्थायित्व प्रमाणपत्राची नोंद नाही.<br>7) पोलिस विभागाकडून चारित्र्याची तपासणी केल्याची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आलेली नाही. |
| 18 | कु. येस रा. निठुरी, पि.एच.एन. | 01.03.2014 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा आद्यावत नाही.<br>4) वार्षिक सेवापडताळणीची नोंद नाही.<br>5) डि.सी.पि एस. लेखा क्रमांक नमूद नाही.<br>6) स्थायित्व प्रमाणपत्राची नोंद नाही. |
| 19 | कु. पल्लवी पाटील, क.लि | 03.02.2014 | 1) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>2) वार्षिक सेवापडताळणीची नोंद नाही.<br>3) डि.सी.पि.एस. लेखा क्रमांक नमूद नाही.<br>4) स्थायित्व प्रमाणपत्राची नोंद नाही. |
| 20 | कु. मंजुषा म. क्हाडे, एन.एम. | 25.09.2013 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) वार्षिक सेवापडताळणीची नोंद नाही.<br>5) डि.सी.पि.एस. लेखा क्रमांक नमूद नाही. |
| 21 | कु. शेख रेश्मा शेख, एन.एम. | 27.09.2013 | 1) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>2) रजा लेखा अद्यावत नाही.<br>3) वार्षिक सेवापडताळणीची नोंद नाही.<br>4) डि.सी.पि.एस. लेखा क्रमांक नमूद नाही. |
| 22 | कु. शुभांगी गोडककर, एन.एम. | 02.07.2015 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) वार्षिक सेवापडताळणीची नोंद नाही.<br>5) डि.सी.पि.एस. लेखा क्रमांक नमूद नाही. |
| 23 | कु. अश्विनी चव्हाण, पि.एन.एम. | 23.11.2015 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) वार्षिक सेवापडतालणीचो नोंद नाही.<br>5) डि.सी.पि.एस. लेखा क्रमांक नमूद नाही. |
| 24 | कु. प्रियंका नव्हाते, पि.एच.एन. | 03.03.2014 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) वार्षिक सेवापडताळणीची नोंद नाही.<br>5) डि सी.पि.एस. लेखा क्रमांक नमूद नाही. |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 25 | कु. शारदा स. शुक्ला, ए.एन.एम. | 22.10.2013 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) रजा लेखा अद्यावत नाही.<br>4) वार्षिक सेवापडताळणीची नोंद नाही.<br>5) डि.सी.पि.एस. लेखा क्रमांक नमूद नाही. |
| 26 | श्री. अतुल रा. पारेलवार, क.लि. | 13.04.1999 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही. 2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) कुटुंब निवृत्तीवेतनाकरिता नामनिर्देशन नमुना फॉर्म जोडलेला नाही.<br>4) रजा लेखा अद्यावत नाही. |
| 27 | श्री. सुनील रा. माळवे क. लि. | 06.12.2000 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही. 2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) कुटुंब निवृत्तीवेतनाकरिता नामनिर्देशन नमुना फॉर्म जोडलेला नाही.<br>4) रजा लेखा अद्यावत नाही. |
| 28 | सौ. वासंती बहादुरे क. लि. | 29.04.1999 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही.<br>2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) कुटुंब निवृत्तीवेतनाकरिता नामनिर्देशन नमुना फॉर्म जोडलेला नाही.<br>4) रजा लेखा अद्यावत नाही. |
| 29 | श्री. सारंग सु. निर्मळे, क. लि. | 07.12.2000 | 1) जात पडताळणीची सेवापुस्तकात नोंद नाही. 2) मराठी व हिंदी भाषा सूट मिळाल्याची नोंद नाही.<br>3) कुटुंब निवृत्तीवेतनाकरिता नामनिर्देशन नमुना फॉर्म जोडलेला नाही.<br>4) रजा लेखा अद्यावत नाही. |

य) **रजा लेखाबाबत-**

. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 चे नियम 38(1) नुसार सेवापुस्तकात कर्मचा-याने घेतलेल्या रजेची नोंद नियमितपणे आणि त्या-त्यावेळी केली पाहिजे आणि ती कार्यालय प्रमुखाकडून सांक्षाकित केली पाहिजे. परंतु पुढील नमुद कर्मचा-यांनी रजा उपभोगली असुन रजा लेख्यात खर्ची पडली नाही.

1. श्री. विजय ज. बोरीकर कनिष्ठ अभियंता यांचा रजा लेखा अदयावत नाही. रजा मंजुरी आदेश क्र. 443/2010 दिनांक 24.12.2010 अन्वये दिनांक 08.11.2010 ते 15.11.2011 पर्यंत एकुण 8 दिवस अर्जित रजा उपभोगली असुन रजा खात्यात खर्ची पडलेली नाही.

2. श्री.भुषन ठवरे क. लि. यांनी अर्जित रजा मंजुरी आदेश क्र. 200/201/दिनांक 31.12.2012 अन्वये दिनांक 16.11.2012 ते 19.11.2012 पर्यंत एकुण 4 दिवस रजा उपभोगली असुन रजा लेख्यात खर्ची पडली नाही. तसेच दिनांक 01.01.2013 नंतर उपभोगलेल्या रजेची नोंद सेवापुस्तकात घेतली नसुन रजा लेखा अदयावत नाही.

3. श्री. अनिल मा. घुमडे कनिष्ठ अभियंता यांनी वेळोवेळी अर्जित रजा उपभोगली असुन रजा रजा लेख्यात खर्ची टाकण्यात आली नाही. दिनांक 01.07.2013 पासुन रजा लेखा अदयावत नाही.

| रजा मंजुरी आदेश | उपभोगलेला रजा कालावधी | एकुण रजा |
|---|---|---|
| क्र. 13 दिनांक 06.06.2008 | 21.05.2008 ते 23.05.2008 | 3 दिवस |
| क्र. 151/2009दिनांक 17.12.2009 | 21.12.2009 ते 29.12.2009 | 9 दिवस |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| क्र. 321/2012 दिनांक 23.04.2012 | 27.04.2012 ते 03.05.2012 | 7 दिवस |
| | एकुण | 19 दिवस |

उपरोक्त सर्व प्रकरणी रजा लेखा अदयावत करुन उपभोगलेली रजा खर्ची टाकण्यात येवुन अनुपालन सादर करावे.

क) <u>सेवापडताळणीबाबत-</u>

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 चे नियम 45 नुसार कर्मचा-याच्या सेवापुस्तकात नियमानुसार सेवाविषयक नोंदी बरोबर नमुद करण्यात आल्याबाबत कार्यालय प्रमुख वेतन देयके, वेतनपट आणि इतर अभिलेखावरुन कर्मचा-याच्या सेवेची पडताळणी मागील वित्तीय वर्षाच्या अखेरपर्यंत करण्यात आली आहे, असे प्रमाणपत्र सेवापुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे. चंद्रपूर शहर महानगरपालिकेतील कार्यरत काही कर्मचा-यांच्या सेवापुस्तकाची सन 2013-14 चे लेखापरिक्षणा दरम्यान पडताळणी केली असता सेवापुस्तकात नोंदीच घेण्यात आल्या नसल्याचे आढळून आले. उदाहरणादाखल काही प्रकरणे पुढीलप्रमाणे-

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | सेवेत नियुक्तीचा दिनांक | सेवापुस्तकात नोंद घेण्यात न आल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | श्री. नितीन येरावार क. लि. | 09.04.1999 | 09.04.1999 |
| 2 | श्री. जसवंत पतरंगे क. लि. | 13.10.1999 | 13.10.1999 |
| 3 | श्री. अशोक जथाडे क. लि. | 01.01.1999 | 01.01.2005 |
| 4 | श्री. रमेश का. थावेकर क. लि. | 01.01.1999 | 01.01.1999 |
| 5 | श्री. अनिल रेभणकर क. लि. | 01.01.1999 | 01.01.1999 |
| 6 | श्री. गुलाब गर्गेलवार स.कुली | 26.08.1992 | 26.08.1992 |
| 7 | कु. संघमित्रा पुणेकर क. लि. | 09.04.1999 | 01.01.2003 |
| 8 | श्री. अतुल रा पारेलवार क. लि. | 13.04.1999 | 13.04.1999 |
| 9 | श्री. सुनिल रा. माळवे क.लि. | 06.12.2000 | 01.01.2003 |
| 10 | श्रीमती.वासंती बहादुरे क.लि. | 29.04.1999 | 29.04.1999 |
| 11 | श्री. सारंग सु. निमेकर क.लि. | 07.12.2000 | 07.12.2000 |
| 12 | श्री. रविन्द्र वासेकर स.अभि. | 16.10.1999 | 01.01.2008 |

2. <u>वेतन निश्चितीतील अनियमितता व सेवापुस्तकातील उणीवा.</u>

